Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

AYUR MEEMANSA
1854 G.K.U.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Samaj Foundation Chen

mains. Gurukul Kangri C

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

079434

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

Stock Verification-2024

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILE

38

आयुर्मीमांसा

079434

जानेवारी] [१९५४.

079434

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारी संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

यामुळे त्यांना ह्या
म्हणून ते निरीक्षण
लागू पडत नाहीं.
ाबा मिळवूं शकतो व
कतो, महात्मा गांधी,
हेडगेवार, गोळवलकर
कांचे कर्तृत्व, जीवनां-
णजे विकृतीचे नावही

ठिकाणीं मलबद्धत
ी द्रव्यें खाऊं नये
विकृतो निर्माण
किंवा
लैंगिक : Se
कामप्रेरणा : Se

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वार्षिक वर्गणी ३ रु.] [किरकोळ अंक ८ आणे.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मी मां से चा

राजयक्ष्मा-विशेषांक

१ फेब्रुवारीस प्रकाशित होणार आहे.

आ ज च व र्ग णी दा र व्हा.

नम्र विनंति-

ज्यांची वर्गणी संपली आहे. अशा वर्गणीदारांना यापूर्वी सूचना पत्रें गेली आहेत. मुद्दामच अंकाची व्ही. पी त्यांना पाठविलेली नाहीं. कृपया त्यांनीं त्वरित वर्गणी पाठवावी.

व्य व स्था प क.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

— आयुर्मीमांसा —

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १७वें] जानेवारी १९५४. [अंक १ ला.

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें [illegible]

* अंक मिळाला नसल्याच[illegible] न्याच्या दहा तारखेच्या [illegible] शक्य असल्यास दुसरा [illegible]

* सर्व व्यवहार 'व्यवस्[illegible] अर्कशाला बिल्डिंग, सात[illegible] करावा.

वाचकांचा पत्रव्यवहार.

पदवी अभ्यासक्रमाची प्रथम परीक्षा

अभूतपूर्व निर्णय–

फॅकल्टीप्रणीत पदवी शिक्षणक्रम गेल्या वर्षी जूनमध्यें अमलांत आला आणि प्रथम वर्षाची पहिली परीक्षा गेल्या आक्टोबरमध्यें घेण्यांत आली. या परीक्षेचा निर्णय नुकताच जाहीर झालेला असून एकशें शहाण्णव विद्यार्थ्यांपैकीं फक्त एकतीस विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याचें वृत आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें प्रमाण सुमारे सोळा टक्के पडते. हा निर्णय अतीशय कडक आहे हें उघड आहे. आयुर्वेदीय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या हेतूनें पदवी अभ्यासक्रम अमलांत आला आणि या दर्जाचा कांटेकोरपणा सांभाळण्यासाठीं परीक्षानिर्णयाचें हें प्रमाण ठेवण्यात आलें असलेस आयुर्वेदाच्या हिताविषयीं एवढी दक्षता बाळगणाऱ्या परीक्षा समितीचें कौतुकच केलें पाहिजे. पहिल्या परीक्षेस जर हें प्रमाण राहिले तर शेवटच्या पदवी परीक्षेंतून एकमेवाद्वितीय पदवीधर बाहेर पडणें सहज संभवनीय आहे. आयुर्वेदाचा अभ्यास महाग झाला आहे, दीर्घ मुदतीचा झाला आहे, आणि त्यांतच तो पुरा करण्यासाठीं अशा निर्णयामुळें आणखी अधिक वर्षें लागूं लागली म्हणजे शिक्षणक्रमाचा स्वीकार करतांना विद्यार्थी दहा वेळां विचार करतील.

पुणे विद्यापीठाची टीका–

एम्. बी. बी. एस्. चा शिक्षणक्रम पांच ऐवजीं साडेचार वर्षांचा करावा, कांहीं विषयांचा संकोच करावा असा विचार पुणे विद्यापीठांत चालू आहे. पाश्चिमात्य वैद्यकाचा शिक्षणक्रम सोपा, सुटसुटीत कमी मुदतीचा व कमी खर्चाचा करावा असा त्या क्षेत्रांत विचार चालू असतांना आयुर्वेदाचा शिक्षणक्रम बोजड, [illegible] करण्यांत येत आहे हें पाहिलें [illegible] वेदाकरितां पुणे विद्यापीठानें [illegible] करावी असा ठराव पुढें आला [illegible] चाण्णव टक्के ॲलोपॅथिकच [illegible] करण्यांत आलें या टीकेचा [illegible] वा.

[illegible] झाल्यानंतर अभ्यासाची परीक्षेचें धोरण कसें ठेवावें,

[illegible] यामुळें त्यांना [illegible] म्हणून ते निरीक्षण [illegible] लागू पडत नाहीं. [illegible] बा मिळवूं शकतो व [illegible] कतो, महात्मा गांधी, [illegible] हेडगेवार, गोळवलकर [illegible] कांचे कर्तृत्व, जीवनां- [illegible] णजे विकृतीचे नावही

कांहीं ठिकाणीं मलबद्धत [illegible] तशी द्रव्यें खाऊं नये [illegible] विकृती निर्माण [illegible] किंवा [illegible]

शब्द [illegible]

बाह्यशु[illegible]

शुक्रजीवाणु : Sp[illegible]

लैंगिक : Se[illegible]

कामप्रेरणा : Se[illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषयाच्या ज्ञानाची कोणत्या मर्यादेपर्यंत विद्यार्थ्यांकडून अपेक्षा करावी याबद्दल सर्व शिक्षणसंस्थांच्या चालकांना व प्राध्यापकांना विश्वासांत घेऊन प्रारंभींच फॅकल्टीनें विचार विनिमय केला नसावा असें दिसतें. एम्. बी. बी. एस्. चाच शिक्षणक्रम ॲलोपॅथीच्या विषयांना लावण्यांत आला आणि पदवी परीक्षाहि त्याच धर्तीवर घेण्यांत आली असें दिसतें. ॲलोपॅथिक विद्यार्थ्यांपेक्षा कमी कालावधींत आयुर्वेद व ॲलोपॅथिचें दुप्पट ज्ञान या विद्यार्थ्यांना देण्याची ही योजना फेरविचार करण्यासारखी आहे असें म्हणावेसें वाटतें.

कालपर्यंत डिप्लोमा कोर्स शिकविणाऱ्या संस्थांना त्याच सामुग्रीवर ॲलोपॅथीच्या विषयांचें एम.बी.बी एस्. इतके ज्ञान देण्याची सक्ती व्हावी हें त्याहूनहि नवलाचे आहे. कोटयावधि रुपयांची सामुग्री ॲलोपॅथिक कॉलेजांच्या संग्रही असते. आयुर्वेदीय संस्थांची स्थिती त्यांच्या तुलनेनें दुर्लक्षणीय ! पण अपेक्षा मात्र 'पंगुं लंघयते गिरिम्' या थाटाची !

संस्कृत हा एक विषय या परीक्षेस आहे. इंटर सायन्सकडे दोन वर्षें घालविलेल्या विद्यार्थ्यांच्या या विषयाचा परिचय पुसट झालेला असतो. त्यांना पुन: या विषयांचीं परीक्षा येथें द्यावी लागते. कां ? तर मूळ संहिता संस्कृतांत आहेत म्हणून ! पण शिक्षणाची तऱ्हा कांहीं वेद-पाठ-शाळेची नाहीं. विषयाचें विवरण मराठींत वा मातृभाषेंत होत असतांना हा ग्रांथिक भाषेचा आग्रह कां असावा ?

एम्. बी. बी. एस्. च्या कॉलेजांतून प्रवेश न मिळाल्यामुळे, इंटर सायन्समध्यें तिसऱ्या वर्गांत उतीर्ण झाल्यामुळें निरुपायानें आयुर्वेदाकडे वळलेले पुष्कळसे विद्यार्थी संस्कृतासारख्या विषयाकडे दुर्लक्ष करीत असले तर नवल नाहीं. ते कांहीं आयुर्वेदाचे ध्येयवादी अभ्यासू नव्हेत.

सध्या साधनांच्या अपुरेपण[illegible] प्रारंभीच्या परीक्षांच्या वेळीं तर[illegible] शिक्षणाचें धोरण व व्याप्ती नि[illegible] संस्थांना विश्वासांत घेऊन विच[illegible] असें सुचवावेसें वाटतें. एरवीं [illegible] आणि वेळ प्रयोगावारीं व्यर्थ ज[illegible]

—सेवा—

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधें वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान–

दि ऑल इंडिया करियाणा स्टोअर्स

पायधुणी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.

सूचिपत्र मागवा.

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

[illegible]ोस्ट खर्च १० आ.

[illegible]विंद केमिकल वर्क्स,

[illegible]छिंदवाडा (सी. पी.)

[illegible]दलचे आपले अनुभव [illegible]क्रेते यांनीं कळवीत [illegible] ठरतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मचर्य-पालनामुळें होणाऱ्या लाभाचें शास्त्रीय विवेचन.

ले. वै. गो. वि. जोशी आयुर्वेद विशारद

धर्म्यं यशस्यं आयुष्यं लोकद्वयरसायनम् ।
अनुमोदामहे ब्रह्मचर्यमेकांतनिर्मलम् ।।
वा. उत्तर. वाजीकरण सूत्र ४

रसायनमिति ।
दीर्घमायुः स्मृतिं मेधामारोग्यं तरुणं वयः ।
प्रभावर्णस्वरौदार्यं देहेंद्रियबलोदयम् ।।
वाक्सिद्धिं वृषतां कांतिमवाप्नोति रसायनात् ॥१॥
लाभोपायो हि शस्तानां रसादिनां रसायनम् ।
पूर्वे वयसि मध्ये वा तत्प्रयोज्यं जितात्मनः ॥२॥
वा. उ. रसायनाध्याय

वर श्रीमत् वाग्भटाचार्यांचे दोन श्लोक उध्दृत केले आहेत. त्या श्लोकांवरून ब्रह्मचर्य पालनाला त्यांनीं अत्यंत महत्त्व दिले असून ते रसायन आहे असें सांगितले आहे. रसायन म्हणजे काय हें स्पष्ट करण्यासाठीं वरील श्लोक मुद्दाम दिला आहे. त्यावरून वाग्भटाचार्यांना ब्रह्मचर्यासंबंधानें काय म्हणावयाचे आहे हें लक्षांत येईल.

हें निसर्गसिद्ध रसायन घेतल्यास तरूण पिढी वर वर्णन केलेल्या श्रेष्ठ गुणाची होईल व राष्ट्राचे हित होईल. म्हणून पुनः एकदां ह्या विषयावर पुष्कळ लिखाण प्रसिद्ध झालेले असूनहि हा लेख लिहिला आहे.

ब्रह्मचर्य ह्या विषयाचे तीन भाग पडतातः-

(१) ब्रह्मचर्यव्रताचा प्रात्यामुळे त्यांना ह्या
(२) त्या व्रतामुळें शरीर म्हणून ते निरीक्षण वैद्यकीय वर्णन; लागू पडत नाहीं.
(३) जे लोक आचरतात बा मिळवूं शकतो व पैकी फक्त दुसऱ्या क्रियेचें वर्णकतो, महात्मा गांधी, आहे. हेडगेवार, गोळवलकर

व्याख्या :- ...कांचे कर्तृत्व, जीवनां-
प्रजोत्पादनार्थच शास्त्रीय दृ... णजे विकृतीचे नावही

संभोगी उपयोग करणें ह्याला ब्रह्मचर्य असें व्यवहारतः म्हणतात. (गृहस्थम्यांचे ब्रह्मचर्य)

जन्मभर जननेंद्रियांचा उपयोग न करतां निष्ठेनें सर्व जीवन श्रेष्ठ ध्येयास्तव घालविणें ह्यास नैष्ठिक ब्रह्मचर्य असें म्हणतात.

संभोगामध्यें सुख चिकटलेलें असल्यामुळें ह्या संभोगक्रियेचा अतिरेक होतो त्याला अब्रह्मचर्य असें म्हणतात. व ह्या अब्रह्मचर्यामुळें पुष्कळ तोटे होतात. तेव्हां ब्रह्मचर्य ह्या विषयाचा अभ्यास करण्याची जरूर उत्पन्न होते.

ब्रह्मचर्यपालनाचे दृष्टीनें बाल, तरुण, व विवाहित इसम असे तीन वर्ग पडतात.

बालांचे दृष्टीनें ब्रह्मचर्य विचार :-

बालांची वाढ एकसारखी होत असते. शरीराची वाढ होत जाऊन ती पूर्णावस्थेला आली म्हणजे मग जननेंद्रियें कार्यक्षम होतात. तोंपर्यंत ती सुप्त असतात.

The gonads and the accessory organs of reproduction remain quiescent till puberty, when growth sets in and continues rapidly throughout adolescence.

Page 942. Applied Physiology.

कांहीं ठिकाणीं मलबद्धता जननेंद्रियाची वाढ हळूं हळूं ...न तशी द्रव्यें खाऊं नये...स्थेला गेली म्हणजे बाह्य ...विकृती निर्माण ...तो. तत्पूर्वी बालांमध्यें फक्त ...य किंवा ... थोडा होत असतो व त्यामुळें बाह्यशु... ...थि... बाह्य तरुणपणाचीं चिन्हें उत्पन्न शुक्रजीवाणु : Sp... ही शरिराची वाढ होत असते लैंगिक : Se... ...ची वाढ होत असते. ही वाढ कामप्रेरणा : Se... २२ वयापर्यंत पूर्णावस्थेला येते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्या कोणत्याहि इंद्रियाची वाढ पूर्ण झालेली असेल ती इंद्रियें जोरदार असतात व त्या जोरदार इंद्रियांची क्रियाहि जोरदार असते म्हणून पूर्ण वाढ होण्याआधीं जर त्या इंद्रियांना काम लागले तर तीं अर्थातच दुर्बल राहतात.

कामप्रेरणा ही बाह्य परिस्थितींत असणाऱ्या चेतनावर अवलंबून असतें. प्रणयी चित्रपट, मधुचंद्र चित्रपट, शृङ्गारिक कादंबऱ्या ह्यामुळें अगर अशा चेतनामुळें मुलांची कामप्रेरणा लवकरच जागृत होते व त्याचा परिणाम म्हणून जननेंद्रियांना चेतना मिळते व त्याचा वापर सुरू होतो. त्यामुळें त्यांची क्रिया सुरू होते. ही क्रिया पूर्ण वाढ होण्यापूर्वी सुरू झाली म्हणजे त्या माणसाची जननेंद्रियें दुबळी बनतात व दुबळ्या जननेंद्रियाचे तोटे होतात. ते पुढें वर्णन करावयाचे आहेत.

म्हणून बालांना कामप्रेरणेपासून अलिप्त ठेवले पाहिजे व त्यांच्या शरीराची वाढ पूर्ण करण्याकडे दृष्टी ठेवली पाहिजे.

ब्रह्मचर्याचा तरुणांचे दृष्टींतून विचार

जननेंद्रियाचे कार्य सुरू झाले म्हणजे निसर्गतः कामप्रेरणा वाढते व त्यामुळें मनामध्यें व शरीरामध्यें पुष्कळ फरक पडतो. म्हणून ब्रह्मचर्य पालनानें होणाऱ्या शारीरिक व मानसिक परिणामांचा विचार करूं.

ब्रह्मचर्याचे दृष्टीनें विचार करतांना खालील मुद्दे महत्त्वाचे ठरतात.

(१) बाह्य शुक्र तयार होण्यासाठीं म्हणून शरीरांत कोणते घटक लागतात व ते कसे येतात व त्यांचा देहाच्या जीवनव्यापारांत काय भाग असतो. ?

(२) बाह्य शुक्र उदीरणाचा नेहमींचा वेग काय असतो ? तो कमी जास्त करणें [illegible] तो कमी करून शुक्र घटकांचे [illegible] शरीरावर काय परिणाम घडतात [illegible]

(३) त्याचा परिणाम मेंदू [illegible] असल्यास कसा होतो ?

(४) अन्तःशुक्राचें स्वरूप [illegible] होणारे परिणाम काय होतात ?

(५) अन्तः शुक्र व बाह्य शुक्र ह्यांचा परस्परांशीं काय संबंध असतो ?

व्रतपालनाचे दृष्टीनें

(१) ब्रह्मचर्यामुळें अंतः स्राव, बहिस्राव यांचेवर काय परिणाम होतात ?

(२) जननेंद्रियाचा वापर न केल्यामुळें त्यांचा नाश होतो काय ?

(३) उत्पन्न झालेल्या शुक्राचा जर तो बाह्य स्राव आहे तर बाह्य गमन होणार कीं कसे ? त्याचें स्तंभन व शोषण शक्य आहे काय ?

व ह्या सर्वांवरून व्रतपालनाचे फायदे. हे ब्रह्मचर्याचे दृष्टीनें महत्त्वाचे मुद्दे असून त्यांचा आपण क्रमशः शास्त्रीय दृष्टीकोनांतून विचार करूं.

प्रश्न १

बाह्य शुक्र हें एका वेळीं ६० थेंबापर्यंत स्रवतें. त्यामध्यें Albumin, Fibrin, Calcium हीं रासायनिक द्रव्यें व कमीत कमी वीस दशलाख इतके शुक्र जीवाणू असतात. ह्या पैकीं केवळ एकानेंच गर्भधारणा होते व त्या एकामध्यें ज्या व्यक्तीचा तो जीवाणु असेल त्याचे-त्याच्या वंशाचे गुण उतरतात. ह्यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात.

(१) ज्या अर्थी शुक्र धातूपासून गर्भामध्यें सर्वांगशरीर उत्पन्न होते त्या अर्थी देहाच्या प्रत्येक अंग विभागाचा सूक्ष्म भाग त्यांत प्रातिनिधिकत्वानें असलाच पाहिजे.

(२) व वंशाचे व व्यक्तीचे गुण सांठवून ठेवून ते शुक्रांत उतरविण्याची कांहीं तरी शरीरांत अत्यंत सूक्ष्म योजना असलीच पाहिजे.

ह्या दोन सिद्ध गोष्टी विचारांत घेतल्या म्हणजे [illegible] वंशगुणसिद्ध असा शुक्रस्राव, [illegible] Albumin युक्त स्राव [illegible]चा सारभूत व प्रातिनिधिक [illegible]नाश म्हणजे ॲलब्यूमिन नाश [illegible] Oral Albumin दिले [illegible]वरी झाली असती व शुक्र- [illegible]ninuria सारखी दिसली [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजच्या शास्त्रज्ञांना शुक्राचे पूर्वघटक कसे येतात व त्यापासून हा विशिष्ट गुणयुक्त स्राव कसा तयार होतो हें माहीत नाहीं. व त्याचा कुठल्याही Physiology मध्यें उल्लेख नाहीं.

आयुर्वेदामध्यें ह्याच्या स्पष्ट कल्पना आहेत व धातुपरिपोषण क्रमानें शुक्रधातु हा सर्व धातूंच्या सारतर भागापासून उत्पन्न होतो व त्यापासून बाह्य शुक्र उत्पन्न होते. ह्या शुक्राच्यापासून शरीरांत ओज तयार होते व ओजानें प्राणशक्तीचे पोषण होते. अशा प्रकारें ब्रह्मचर्य पालन म्हणजे सर्व धातुसारसंग्रह व प्राणशक्तीचे साक्षात् वर्धन होय. म्हणून ब्रह्मचर्य हें श्रेष्ठ ठरते. आयुर्वेदाप्रमाणें प्रत्येक धातूंची घटकवृद्धि ही (Celldivision) अंतःशुक्रावर अवलंबून असते.

Alopathy मध्यें जरी धातु परिपोषण क्रमाची कल्पना नसली तरी शुक्र व इतर धातू ह्यांचा परस्परांशीं कसा संबंध आहे ह्याबद्दल थोडेसे पुरावे मांडतां येतील.

रसधातु –

रसधातूत असणारे Albumin शुक्रधातूंत असतेच. तसेच फाईब्रीन-चुना ही द्रव्यें असतात.

रक्तधातु –

मागे आयुर्मीमांसेच्या एका अंकात वैद्य नरसिंहाचार्य बागेवाडीकर यांनी शुक्रक्षयाच्या रोग्याची हकीगत दिलेली होती. त्यामध्यें Liver extract वगैरे देऊनसुद्धां जो रोगी बरा झाला नाहीं, तो वंगभस्मासारख्या शुक्रवर्धक औषधानें बरा झाला अशी हकीगत दिलेली आहे. Alopathy प्रमाणें त्याचें निदान पांडू Anaemia असें केलेलें होतें.

मांसधातु –

(१) सुश्रुतांनीं व्रणाच्या चि[illegible] म्हणून ते निरीक्षण केल्यास व्रण लौकर भरून येता[illegible] लागू पडत नाहीं. आहे. [illegible]बा मिळवूं शकतो व

(२) ज्याच्या शुक्रग्रंथीची पु[illegible]कतो, महात्मा गांधी, अशा माणसाचे शरीर निर्बल [illegible] हेडगेवार, गोळवलकर असतात. अशा माणसास ज[illegible]कांचे कर्तृत्व, जीवनां- (अंतःशुक्रस्राव) दिले तर त्याचे[illegible]णजे विकृतीचे नावही

[illegible]यामुळे त्यांना ह्या [illegible] कांहीं ठिकाणीं मलबद्धत[illegible] [illegible]न तशी द्रव्यें खाऊं नये [illegible] विकृती निर्माण [illegible]

Page 1112 Applied Physiology.

In the first thin underdeveloped boy with usual signs of defective testicular internal secretory function, administration of methyl testesterone daily. for 41 days, leads to increase in weight and height $\frac{1}{4}''$.

This increase in muscle bulk is important showing greater muscular development of the male partly at least a secondary sexual characteristic which is dependent on testosterone.

ह्यावरून मांसधातु व शुक्र ह्यांचा संबंध स्पष्ट होतो. म्हणजे शुक्रामुळें मांसघटकांचे जनन वाढते असे सिद्ध होते.

मेद –

कोंबडा, खाण्यांत मेदस्वी व्हावा म्हणून त्याची Vasectomy करतात व त्यामुळें मेद वाढतो. बैलांच्यामध्यें हाच अनुभव येतो. ह्यावरून मेद व शुक्राचा संबंध दिसतो. शुक्रस्राव बंद झाल्यावर मेद धातू साठतो असे स्पष्ट होते.

अस्थि –

मागील मांसाच्या उदाहरणांत $\frac{1}{4}''$ उंची वाढल्याचे दिलेच आहे. त्यावरुन अस्थिवरहि परिणाम होतो हे कळेल. म्हणजे अस्थिघटकांची वृद्धि स्पष्ट होते.

मज्जा –

मज्जेपासून शुक्र बनत असल्यामुळें मज्जा व शुक्र [illegible] हे. त्याचा सविस्तर विचार [illegible] एकच वाक्य येथें देतो.

शब्द[illegible] [illegible]wn, by Dr. Alexis [illegible] विकृती निर्माण [illegible].)

बाह्यशु[illegible] [illegible]n that sexual excess [illegible]थि[illegible]

शुक्रजीवाणु : S[illegible]tual activity.

लैंगिक : Se[illegible] शुक्राशीं संबंध आहे हें सिद्ध

कामप्रेरणा : Se[illegible] आणखी खोल करून पुष्कळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरावा अजून मांडण्यासारखा आहे. तूर्त ह्या पुराव्यावरून ही गोष्ट सिद्ध होते असें मला वाटते, कीं शुक्र धातूच्या सुस्थितीवर सर्व धातूंचे स्वास्थ्य अवलंबून आहे. व ह्यावरून ब्रम्हचर्य पालनानें शरीरांत सप्त धातूंची वृद्धि होऊन जीवनशक्ती परिपुष्ट होते. व "धी धैर्य च्यवन प्रीतिः" हे शुक्रगुण स्पष्ट प्रतीत होतात.

प्रश्न २ –

बाह्य शुक्राचा स्त्राव होण्याचा नियम काय? म्हणजे कसा होतो, त्याचा वेग काय? वगैरे.

Page 1102 Applied Physiology.

Little is known about the normal rate of sperm formation. It depends upon the integrity of Pituitary.

म्हणजे बाह्य शुक्र उदीरणाचा नेहमीचा वेग कांहीं सांगता येत नाहीं; परंतु तो Pituitary वर अवलंबून आहे. Pituitary ग्रंथिमधून निघणाऱ्या स्रावामुळें वृषणाचे स्राव मर्यादित होतात. यावरून लक्षांत येईल कीं Pituitary ग्रंथीला मिळणारी प्रमुख चेतना ही शरीरसुस्थिती व मानसीक चेतना ह्यावर आहे.

Page 1104. Applied Physiology.

There is no need to stress the enormous importance of psychological influences and emotional influences on the act of intercourse तीव्र इच्छाशक्तीनें त्या ग्रंथीवर ताबा मिळविता येतो. ज्या प्रमाणे प्राणायामाचे अभ्यासानें ९ दिवस पुरून घेतां येते तसे ब्रम्हचर्य व्रतपालनानें हा बाह्य शुक्राचा स्राव कमी करणें सहज शक्य आहे. कारण मेंदूकडून प्रेरणा मिळाल्याशिवाय उत्थान होत नाहीं व त्यांतून जो स्राव उत्पन्न होईल तो Seminal Vesicle मध्यें सांठून राहील. येथें राहिलेला स्राव हा बाहेर जाऊं न देता त्याचे शोषण होऊन तो रक्तांत जाणे शक्य आहे असे वाटते. कारण चेतना न देता उत्पन्न झालेलें शुक्र तसेच शुक्राशयांत राहून दिले असता त्याचे शोषण होईल असे वाटते. त्याला अजून प्रत्यक्षाचा आधार नाहीं व अशा वृद्ध शुक्राचा थोडासा स्रावही एखाद्या वेळेस होईल. परंतु नेहमीच्या मानानें विचार करतां संचय पुष्कळ प्रमाणांत होणें शक्य आहे. ह्या Epithelium ला anatomy चे दृष्टीनें शोषण क्रिया असावयास हरकत वाटत नाहीं.

प्रश्न ३ –

ज्या द्रव्यापासून शुक्र उत्पन्न होते अशी धातूंची सारभूत द्रव्यें शरीरांत संचित झाली म्हणजे त्याच्या योगें ओज उत्पन्न होते व त्यामुळें प्राणशक्ती वाढते. तसेच मज्जाधातूही बलिष्ठ होतो, त्यामुळें बुद्धिमत्ता वाढते. म्हणजे मज्जाधातू परिपुष्ट होण्यानें म्हणजे सर्व मागचे धातूसुद्धा परिपुष्ट होण्यानें शरीर बलवान व प्रतिकारक्षम होते, वजन वाढते, अग्नि-कांति सुधारते व रसायनाचे सर्व फायदे साक्षात् मिळतात.

शुक्राचा संचय व मज्जाधातू म्हणजे मेंदू ह्यांचा परस्पर संबंध आहे. मेंदूचे पोषण त्यामुळें होते. शुक्र उत्पन्न करणारी इंद्रियें पूर्ण वाढ झालेली व कार्यक्षम असली तरच हा परिणाम पहावयास मिळतो व त्या बरोबर ब्रह्मचर्य आवश्यक पाळावे लागते.

Man the unknown ह्या सुप्रसिद्ध पुस्तकाचे लेखक डॉ. Alexis Carrel ‡ ह्यांनीं ह्याबाबत खालील गोष्टी दिलेल्या आहेत.

---

‡ डॉ. कॅरेल ह्यांचेबद्दल [illegible] म हृदय तयार करण्याचे ह्यांनीं हें फ्रेंच शास्त्रज्ञ १८७३ म[illegible] नें मूळचे प्राण्याचे हृदय काढले लिऑन्स. डॉक्टर झाल्यावर [illegible] णतात. वैद्यकीय संशोधन संस्था न्यूयॉ[illegible] ीं वारले. ह्यांनीं Man the त्यानीं संशोधनाचे कार्य केले. [illegible] सुप्रसिद्ध पुस्तक लिहिले आहे डॉ. कॅरेल ह्यांना १९१२ [illegible] निरीक्षणें शास्त्रीय दृष्टी कोना- शिवणें व दुसऱ्याची इंद्रियें शरीर[illegible] ा त्यांच्या ४० वर्षांच्या सूक्ष्म नोबेल प्राईझ मिळाले. [illegible] वा आधार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Page 91. Man the unknown.

The sexual glands have other functions than that of impelling man to gesture which in primitive life perpetuated the race.

They also intensify all physiological mental and spiritual activities.

No eunuch has ever become a great philosopher, a great scientist or even a great criminal.

The testicle engenders audacity. violence and brutality, the qualities distinguishing the fighting bull from ox drawing the plough along the furrow.

Page 137.

The testicle more than any other gland exerts a profound influence upon the strength and quality of the mind. In general great Poets, Artists and Saints as well as Conqurers are strongly sexed.

The removal of genital glands produces even in adult individuals, modifications of mental state.

Inspiration seems to depend on certain condition of sexual glands.

In case of great mystics it seems that their unassuaged sexual appetites urged them more their path of reno complete scacrifice.

ब्रम्हचर्याचे फल In orde full power intellige require both the pr *developed sexual gland repression of sexual a*

यामुळे त्यांना ह्या म्हणून ते निरीक्षण लागू पडत नाहीं. ावा मिळवूं शकतो व कतो, महात्मा गांधी, हेडगेवार, गोळवलकर कांचे कर्तृत्व, जीवनां- णजे विकृतीचे नावही

Frend has rightly emphasized the capital importance of sexual impulses in activities of conciousness. However his observations refer chiefly to sick people.

His conclusions should not be generalized to include normal individuals espescially those who are endowed with strong nervous system and mastery over themselves.

ह्या वरील मोठ्या उताऱ्यामध्ये डॉ. कॅरेल ह्यांनीं निःसंदिग्ध शब्दांत ब्रह्मचर्य पालनाचे फायदे मांडले आहेत, व मेंदू व शरिरावर कसे परिणाम होतात हेंही स्पष्ट सांगितले आहे.

ब्रह्मचर्यावर येणाऱ्या नव्या फ्राईडवादी मानसशास्त्रज्ञांच्या आक्षेपाचाही त्यांनीं समाचार घेतला आहे व जितेंद्रिय व बलवान अशा माणसाला कामप्रेरणेवरसुद्धां ताबा ठेवतां येतो असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.

अशा प्रकारें ताबा ठेऊन कामप्रेरणेचे उच्चीकरण केल्यानें काव्य, शास्त्रांचे शोध लागतात; साधू लोकांना सर्वस्वी आत्मार्पण करून परमेश्वर प्राप्ती करून घेतां येते हेंही त्यांनीं स्पष्ट शब्दांत मांडलेलें आहे

एवढ्या मोठ्या थोर शास्त्रज्ञाची भाषा येवढी स्पष्ट व जोरदार आहे कीं त्यांवर जादा भाष्य करण्याची जरूर नाहीं.

ब्रह्मचर्य हे रसायन आहे ह्या एका शब्दांत त्याचा समारोप होऊं शकतो. ब्रह्मचर्यापासून होणारे मानसिक फायदे पुढें सविस्तर वर्णन करावयाचे आहेत. त्यांत फाईडच्या तत्वज्ञानाचा पुनः थोडा विचार करूं.

प्रश्न ४–

कांहीं ठिकाणीं मलबद्धत त्पन्न होते व त्यालाहि चेतना न तशी द्रव्यें खाऊं नये मिळते हें सविस्तर कळत शब्द विकृतो निर्माण

बाह्यशु किंवा lls पासून हा स्राव उत्पन्न शुक्रजीवाणु : Sp थि. ह्या स्रावानें बाह्य शुक्र लैंगिक : Se त्वाची चिन्हे मिशा दाढी वगैरे कामप्रेरणा : Se ymis, Prostate ह्या ल जाते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा प्रकारें बाह्य शुक्रोत्पादक मार्ग व बाह्य शुक्र जास्त प्रमाणांत सुस्थितींत येतात.

संभोगप्रवण मनोवृत्ती ह्या स्रावामुळें होते. ह्या स्रावांचा उपयोग नपुंसकत्वावर होतो. हें स्राव टोचल्यापासून वृषण, मेढ्र ह्या इंद्रियांची लांबी रुंदी वाढते.

अशा प्रकारें ह्या स्रावाचा उपयोग आहे. ह्याचा थोडक्यांत व सूक्ष्म विचार केल्यास हा अन्तःस्राव म्हणजे मज्जाधातूचे पचन करून शुक्रोत्पादन करणाऱ्या अग्निसारखा आहे. ह्यामुळें शुक्राची जास्त उत्पत्ति होते.

ह्या अंतःस्रावाचा पुस्तकांत वर्णन केलेला उपयोग येवढाच आहे. परंतु ह्या खेरीज दोन मुद्दे ह्या बाबत अस्पष्ट आहेत.

पहिला म्हणजे Oestrogen म्हणजे स्त्रियांचे अंतःशुक्रासारखा स्राव ह्या ग्रंथिमधून निघतो व तो कां असावा हें समजत नाहीं.

दुसरी गोष्ट हृत्शूलामध्यें (Angina Pectoris) ह्या स्रावाचा उपयोग होतो. म्हणजे हृदयावर नेहमीच्या पोषणामध्यें यांचें कांहीं अंग आहे का? असा मुद्दा उत्पन्न होतो. व अशा प्रकारें ह्या स्रावाची आणखी कार्ये बरीचशी अज्ञात आहेत.

तारुण्य पुनः उत्पन्न करण्यासाठीं शुक्रग्रंथीचा उपयोग करण्याचा प्रयत्न चालू आहे. ह्यावरून शरीरांतील धातूंची जननशक्ती वाढते अगर पुनः कसे तारुण्य प्राप्त होते हा प्रश्न आहे.

प्रश्न ५ –

बाह्य शुक्र व अंतःशुक्र ह्यांचा संबंध वर वर्णन केलाच आहे. ह्यावरून अंतःशुक्रानें बाह्य शुक्राचे वर्धन होते असे दिसते. ह्यावरुन दोघांच्या क्रिया परस्परास पूरक आहेत असे वाटते. परंतु अंतःशुक्राच्या पुष्कळशा क्रिया अजून पूर्णपणें माहित [illegible] येत नाहीं. असा भाग बराच [illegible]

प्रश्न ६ –

ब्रह्मचर्य पालनानें अंतःस्रावा[illegible] काय ?

ब्रह्मचर्य पालनामुळें शुक्रस्राव [illegible] होणाऱ्या शुक्राचे शोषण करणें ही [illegible] त्यामुळें इंद्रियाचे कार्य चालूच अ[illegible]

Vasectomy चे operation करून वीर्यवह स्रोतस बांधून टाकल्यावर शुक्रस्रावाचे कार्य थांबते. अशा वेळी अंतःस्रावावर काय परिणाम होतो ते पाहूं. ह्या Operation मुळें शुक्र ज्या पासून उत्पन्न होते असे पदार्थही शरीरांत साचतात त्यामुळें ब्रह्मचर्य पालनाचे फायदे ह्या Operation मुळें होतात कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

अंतःस्रावावर ह्या Operation चा कांहींही परिणाम होत नाही.

Page 1108 Applied Physiology.

The interstitial cells always persist as definite masses of epithelial cells and presumably continue to release their hormone,

ह्यावरून जर ह्या Operation मध्यें हा स्राव थांबत नाहीं तर ब्रह्मचर्यामध्ये थांबण्याचा प्रश्न उत्पन्नच होत नाहीं.

Vasectomy केल्यानंतर वृत्तींत फरक पडतो काय ?

Vasectomy केलेले बैल हे लढत खेळण्यास उपयोगी पडत नाहींत. त्यांच्यातील शौर्य, पराक्रम हे गुण कमी होतात. माणसांच्या दृष्टीनें हा अभ्यास अजून मोठ्या प्रमाणावर करून आकडेवारी जमावयास पाहिजे परंतु डॉ. कॅरेल ह्यांचे मत

Page 137. Man the unknown.

The personality of men who have undergone castration is altered in more or less marked way.

आणि मागे दिलेल्या उतारांत त्यांनी बैलाचेच उदाहरण दिलेले आहे.

[illegible] पासून मात्र शौर्य, धैर्य, बुद्धिमत्ता, [illegible] पाहिले म्हणजे Vasectomy [illegible] स्पष्ट होतो.

[illegible] ग्रंथीचा (वृषणांचा) वापर [illegible] श होतो काय ?

[illegible] Operation मध्यें ह्या [illegible] बंद होतो. परंतु ब्रह्मचर्यात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसा बंद होत नाहीं. असे असूनसुद्धा हें Operation केल्यावर दहा वर्षांनंतर एका माणसाला आपल्याला मूल व्हावे अशी इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां पुनः Operation करून त्याचे वीर्यवह स्रोतस पुनः जोडले व त्यानंतर त्याला मूल झाले अशी हकीगत Applied Physiology मध्यें पान ११०९ वर Samson wright ह्यांनीं दिलेली आहे. ते वाचून पहावे.

Operation केल्यावरसुद्धा

More commonly however some spermatogenesis continues, the newly formed sperms undergoing liquifaction and being replaced by freshly formed cells अशा प्रकारची स्थिती असते. त्यामुळें ब्रह्मचर्यामुळें ह्या ग्रंथींचा नाश न होता त्या कार्यक्षम राहतातच ह्याबद्दल थोडीही शंका नाहीं.

प्रश्न ८ वा–

ब्रह्मचर्य पालनापासून फ्राईडच्या तत्वज्ञानाप्रमाणें कामप्रेरणेची पूर्ती न झाल्यामुळें त्याचा परिणाम अन्तर्मनावर होऊन कांहीं मनोविकृति उत्पन्न होते काय?

ह्या प्रश्नाचें उत्तर मागे डॉ. कॅरेल ह्यांचे उताऱ्यांत स्पष्टपणें आलेले आहे.

तीव्र इच्छाशक्तीनें व ब्रह्मचर्यामुळें मानसिक धैर्यादि गुण वाढल्यामुळें माणसाला कामप्रेरणेवर तावा मिळविता येतो. ह्या प्रेरणेचा विनियोग उच्च ध्येयासाठीं करता येतो, व त्यामुळें ध्येय प्राप्ती होण्यास अतिशय मदत होते. डॉ. कॅरेल ह्यांनीं उल्लेखिलेल्या साधूंच्या उदाहरणाचा उल्लेख मागे केलेलाच आहे.

डॉ. फ्राईड ह्यांचे निरीक्षण बलवान व जितेंद्रिय माणसावरचे नसून दुर्बल व कामुक अशा माणसांचे बहुतेक जास्त स्त्रियांचे होते. त्यामुळें त्यांना ह्या जितेंद्रियत्वाची कल्पना नाहीं व म्हणून ते निरीक्षण खंबीर व जितेंद्रिय माणसांना लागू पडत नाहीं. जितेंद्रिय माणूस कामप्रेरणेवर तावा मिळवूं शकतो व त्या प्रेरणांचे उच्चीकरण करूं शकतो, महात्मा गांधी, आचार्य P. C. Ray, डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी वगैरे पुष्कळ ब्रह्मचारी लोकांचे कर्तृत्व, जीवनांतील आनंदमयता पाहिली म्हणजे विकृतीचे नावही आढळत नाहीं.

ह्या उदाहरणांवरून व अनेक ब्रह्मचारी महात्म्यांच्या जीवनाची परीक्षा केली तर हें म्हणणें पटेल.

ह्या सर्वांहून श्रेष्ठ मुद्दा म्हणजे ह्या ब्रह्मचर्यपालनानें जे इच्छाशक्तीचे सामर्थ्य माणसाला लाभते त्याचा विचार केला पाहिजे

कामप्रेरणा ही अत्यंत बलवान प्रेरणा, त्याचे नियंत्रण करता आले म्हणजे इच्छाशक्ती ह्या प्रयत्नानें बलवान होते. या बलवान इच्छाशक्तीमुळें इंद्रियजय प्राप्त होतो. मानसोपचारामध्ये प्रबळ इच्छा हें एकच रोग बरे करण्याचे साधन समजले जाते व हें ब्रह्मचर्यामुळें प्राप्त होते.

प्रबळ इच्छाशक्ती हें जीवनाचें एक यशस्वी होणेचे मोठे साधन आहे. त्याची प्राप्ती ब्रह्मचर्यानें होते म्हणजे यशाची गुरुकिल्ली मिळते.

तात्पर्य–

१ शुक्रधातू हा सप्तधातूतील श्रेष्ठ व सारतर धातु आहे.

२ शुक्रधातूचे शरीरांत स्तंभन केले म्हणजे प्राणशक्ती वाढते. सप्तधातू परिपुष्ट होतात.

३ ह्या व्रतपालनानें इच्छाशक्ती वाढते.

४ प्रबळ व सारवान शरीर व बलवान मन ह्या दोन्ही गोष्टी ब्रह्मचर्यापासून मिळतात.

५ तात्पर्य ब्रह्मचर्य हें इहलौकिक कल्याण करून देणारे प्रत्येकास सहज प्राप्य पण सर्व रसायनांहून श्रेष्ठ असे रसायन आहे.

ग्रंथाधार–

(१) अष्टांगहृदय (२) पातंजल योगदर्शन–कोल्हटकर (3) Applied Physiology of Samson Wright 1952. (4) Man the unknown by Dr. Alexis Carrel (5) Lectures of Dr. Frend (Pelican [illegible] 6) Brain of India, [illegible]

[illegible] कांहीं ठिकाणीं मलबद्धत[illegible]h.

[illegible] तशी द्रव्यें खाऊं नये.

शब्द[illegible]otum.

[illegible] विकृती निर्माण[illegible]stesterone.

बाह्यशु[illegible] किंवा [illegible]men.

शुक्रजीवाणु : Sperm.

लैंगिक : Sexual.

कामप्रेरणा : Sexual instinct.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... काय म्हणतां !

मलप्रवृत्तीमध्यें

१. मल-पुरीष म्हणजे शौचमल म्हणजे अत्यंत क्षुद्र, त्याज्य पदार्थ असें वरवर पाहतां दिसेल ! पण या पदार्थाची खरी माहिती समजल्यावर त्यांचें महत्व समजून येईल. या पदार्थाच्या विकृतीमुळें होणाऱ्या व्याधींचें प्रमाण फार मोठे आहे; शुद्ध स्वरूपाचा मल व त्याची नैसर्गिक गति ही फार थोडया व्यक्तींमध्यें आढळतात.

२. गर्भदेहामध्यें मलाची निर्मिती:-

मानव गर्भाशयामध्यें असतां, त्याला मातेकडून येणाऱ्या रसधातूमुळें (पोषण करणाऱ्या पदार्थामुळें) पोषण मिळत असते; हा पदार्थ अत्यंत प्रसन्न असल्यानें त्यांतून मल या पदार्थाची अत्यंत थोडी निर्मिती होते; गर्भाशयांत गर्भाचा मल त्याग करणाऱ्या वायूची गति, सुरू झालेली असत नाहीं. त्यामुळें गर्भ गर्भाशयांत पुरीष त्याग करत नाहीं. हा मल कृष्णवर्णाचा किंचित हिरवट बुळबुळीत व मध्यम द्रव असा असतो; जननानंतर बालक या मलाचा त्याग करतें. हें पहिलें मलविसर्जन होय ! हें मलविसर्जन नीट व्हावें म्हणून बालकाला मध व एरंडेल चाटवण्याची प्रथा पडली आहे. मूल जन्मल्यावर त्याचें गुदद्वार योग्य आहे कीं नाहीं, व त्यानें मलविसर्जन केलें आहे कीं नाहीं, हें पाहणें अगत्याचें असतें. कांहीं वेळां बालकाला जन्मदोष म्हणून गुदद्वार असत नाहीं. अशा वेळीं मलप्रवृत्ति होऊं शकत नाहीं, म्हणून शस्त्रवैद्याकडून द्वारनिर्मिती करून मलविसर्जनाची व्यवस्था करावी लागते !

३. नंतरच्या आयुष्यांत म[illegible] झाल्यावर मलाची घटना अ[illegible]गते. आंतडयामध्यें अन्नाचें पचन हो[illegible] सारभूत भाग शरीरामध्यें शोषला जा[illegible]यातला उरलेला मलीन भाग म्हणजे मल होय. अशा रितीनें एका पद्धतीनें मल तयार होतो; मलाच्या निर्मितीमध्यें दुसरी एक आणखी पद्धत आहे. शरीर व्यापार चालूं असतां शरीरांतलें पदार्थ हे थकतात, दमतात. त्यांतले कांहीं मृत होतात. हे मृत झालेले पदार्थ आंत्रांकडे येतात व त्यामुळें मल निर्मिती होते. या मध्यें विशेषत: मांसधातूच्या पचनांत निर्माण होणारा मल व मज्जा धातूचा स्निग्ध मल असतो; अशा या दोन्ही पद्धतीचा परिणाम म्हणून पुरीषमलाची घटना होते. माणसानें जरी कांहीं खाल्ले नाहीं, तरी शरीर व्यापार चालूं असल्यानें तज्जनित निर्माण होणारा मल हा तयार होत असतोच !

४. प्राकृतिक मल कसा असावा ?

५. प्राकृतिक मलप्रवृत्ति कशी होते ?

प्राकृतिक मल हा बराचसा घन, पीत वर्णाचा असतो; या मलाचे भोवतीं कांहींसा पांढरा स्निग्ध पदार्थ असतो. हा मल हलक्या दाबानें चेपला असतां चेपला जातो. त्याला अतिदुर्गंध असत नाहीं. त्याचा रस तिखट असतो. हा मल पाण्यावर तरंगतो.

हा मल आंत्राच्या शेवटच्या भागांत असतो. त्या भागाला पक्वाशय-मलाशय असें नांव असते. या भागांत अपान नांवाच्या वायूची गति असते. स्थूलान्त्राच्या शेवटच्या भागीं गुद अवयव असतो. या गुदांत प्रवाहिणी, विसर्जनी व संवरणी या नांवाच्या व त्याप्रमाणें काम करणाऱ्या वली असतात; व सर्वांत शेवटीं गुदविवर असते. जेव्हां मलाशयांत मल येतो, तेव्हां त्याचा स्पर्श मलाशयाला होतो, व मलाशयांत मल आला आहे. अशी संज्ञा तयार होते. या नंतर शरीर या मलाला बाहेर टाकून द्यावें अशी क्रिया सुरू करतें. अपान वायु काम करूं लागतो व मलाशयाचा संकोच करून, त्याच वेळीं गुद विवर विस्तृत होऊन मलाचें शरीराबाहेर विसर्जन होतें याला मलवेग असें म्हणतात. अगदी बाल वयांत मल द्रव असतो व पुढें हळूंहळूं घनत्व येऊं लागते. वार्धक्यामध्यें वयाच्या रूक्षतेमुळें मलही रूक्ष. कठीण-अतिघन असा होतो. हा देहस्वभाव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विकृती आहे ?

: लेखक :
दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

६. विकृत स्वरूपाचा मलः–

आहार, अग्नि, याच्या विकृतीमुळें व अनेक व्याधींत मलाचें नैसर्गिक स्वरूप बदलून जातें. हा विषय फारच विस्ताराचा होईल, म्हणून थोडक्यांत येथें दिग्दर्शन करूं. लहान मुलांमध्यें आईचें दूध बिघडलें असतां, व बाहेरचें दूध दुष्ट असतां त्या मुलाचें पचन बिघडतें; पोट फुगतें, पोटांत आवाज येतो; पोट दुखत असलें तर मूल रडते. मल हा हिरवट, पिवळट, पातळ कढत, नासल्याप्रमाणें वा आंबूस अशा विविध स्वरूपाचा होतो; किंवा लहानपणीं मुलाला मलाच्या गांठी होतात. २।३ दिवस मलप्रवृत्ति होत नाहीं. अशी अवस्था उत्तर आयुष्यांतही होऊं शकते. विविध रोगांमध्यें, उदा. क्षयामध्यें मल हा द्रव होणें, अतिसार विकारांत पुष्कळ व द्रव पुरीष होणें, किंवा आवेसारख्या व्याधींत सकफ मल असणें अशा मलाच्या अवस्था दिसतात. आंत्रामध्यें व्रण असतां त्यांतून होणारा रक्तस्राव मलांत मिसळतो, व मल हा अतिकृष्ण वर्णाचा होतो. विसूचिका किंवा कॉलरा अशा व्याधींत अति पातळ तांदुळाच्या धुवणाप्रमाणें असा मल त्याग होतो; अशा तऱ्हेनें मलाचें नैसर्गिक स्वरूप बदलून विविध स्वरूपाचा मल दिसतो. व अशा वेळीं वैद्याची मदत घेऊन उपचार करून घ्यावा लागतो.

७. मलप्रवृत्ति प्राकृतिक होत नसतां काय करावें ?

मलप्रवृत्ति ही नैसर्गिक, सुखकारक क्रिया असली तरी फारच थोड्या व्यक्तींच्या ठिकाणीं ही दिसून येते ! सम्यक् मलप्रवृत्ति ही आरोग्यदायी आहे. ती दुष्ट स्वरुपाची असतां पुष्कळ रोग होतात ! लहान मूल (हें रडत असतां) शांत होऊन खेळूं लागलें, कीं सामान्यतः समजावें मलप्रवृत्ति झाली आहे ! उत्तर आयुष्य, हें आपल्या सामाजिक सुधारणांच्यामुळें (!) मलावर फार परिणाम करते ! मलवेग आला असतां त्याचा त्याग करावयास मिळेलच याची शाश्वती नाहीं ! अशा वेळीं मल त्याग हा वेगानंतर व व्यक्तीच्या फुरसतीच्या वेळीं योजला जातो! व अशा वेळीं मल त्याग होईलच असें नाही. या स्वरूपानें आलेला वेग थांबवणें, व न आला असतां, प्रवृत्त (प्रयत्न) करणें याला शास्त्रांत वेगाचें धारण व उदीरण असें म्हणतात. या दोन्ही संवयींचा परिणाम गुदाचा भाग दुर्बल होण्यांत होतो; गुदांत मल आला तरी त्याची संवेदना कमी होते, व मलावरोधाची संवय जडते. हा मल पुढें दुष्ट होतो, व वातनिर्मिती होऊं लागते. कंबर दुखणें, डोकें दुखणें, हातपायांतून विशेषतः पिंढऱ्यांतून रेपा येणें, पडसें येणें, डोळे बिघडणें, अग्नि मंद होणें, व स्त्रियांना ऋतुकालीं वेदना असणें असे विविध रुजा-दर्शन होतें. विविध त्वक् विकार, पोटाचे व्याधी, कृमी, उदर, मुळव्याध, व भगंदर असे त्रासदायक व्याधी यामुळें निर्माण होतात!

अशा वेळीं प्रत्येक व्यक्तीमध्यें मलप्रवृत्ति दुरुस्त करण्यासाठीं वेगळा विचार करावा लागतो ! कांहीं व्यक्तींना कांहीं ठिकाणचें पाणी सोसत नाहीं जड पाणी अग्नि मंद करते, व मलावरोध निर्माण करतें. उलट कांहीं, ठिकाणचें पाणी हलके असते. अशा वेळीं स्थलांतर जरी शक्य नसलें तरी निदान पाणी उकळून हलके करून घ्यावे. कांहींच्या आहारांत अति स्वच्छ केलेले पदार्थ फार असतात. त्यामुळें पुरीष हें कमी प्रमाणांत निर्माण होतें, व त्यानें वेगनिर्मिती केली जात नाही. अशा वेळीं मुद्दाम मल वाढविणारी कडधान्यें, पाले-भाज्या यांच्या सेवनानें मल वाढवून मलविकृतीचा विनाश करतां येतो. तुरट रसाचीं द्रव्यें मलाचे ग्रथन-स्तंभन (खडा) करतात. उदा. सुपारी अधिक खाणें हें कांहीं ठिकाणीं मलबद्धता करणारें कारण असतें, म्हणून तशी द्रव्यें खाऊं नयेत. मानसिक अवस्था ही मलप्रवृत्तींत विकृती निर्माण करणारी असते. वरिष्ठांचा त्रास, आर्थिक भय किंवा दुसऱ्या चिंता, यामुळें वायु प्रकुपित होऊन मल ग्रथित होतो. व मलावरोध होतो. अतिभीतिमुळें आंत्राच्या क्रिया जलद होऊन जुलाब होतात ! अशा दोन्ही अवस्थेंत मानसोपचाराची आव-श्यकता असते. पुष्कळ खाणें, जडपदार्थ खाणें, व व्यायाम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न करणें अशामुळें मल बद्ध होतो. या उलट अति व्यायाम व अतितिखट, रूक्ष, हलक्या पदार्थांनींही मल बद्ध होतो; व्यायाम न करणाऱ्यांना थोडा व्यायाम, फिरणें या क्रिया करावयास सांगाव्या. व अति व्यायाम करणारांना व्यायाम कमी करण्याचा उपदेश करावा. पोट हलके चोळण्याचा उपयोग होतो; थोडक्यांत म्हणजे योग्य ठराविक वेळीं भूक असतां, हलके, स्निग्ध रुचकर अन्न, मानसिक स्वस्थता, मित व्यायाम, (उघड्या हवेंत फिरणें इ.) योग्य झोंप या गोष्टी केल्या असतां मलप्रवृत्तीचा त्रास होऊं नये !

मल हा ज्या मार्गानें जातो, त्यावर जर व्याधी असला तर मलप्रवृत्ति नीट होत नाहीं. उदा. मूळव्याध अगर भगंदर असणें, यामुळें मलप्रवृत्ति होतांना वेदना होत असल्यानें मलत्याग केला जात नाहीं. व मलबद्धता होते. अशा वेळीं शस्त्रक्रिया करून घ्यावी.

आश्चर्य वाटण्याची गोष्ट म्हणजे उत्तम मलविरेचक अस्तित्वांत नाहीं ! चांगल्या औषधाचें लक्षण पुढील-प्रमाणें केलें जातें. तें घेण्यास रुचि, गंध व रूपानें चांगलें असावें. अग्निवर व बलावर त्याचा परिणाम होऊं नये, मलप्रवृत्ति नैसर्गिक स्वरूपाची व्हावी; त्या वेळीं पोट दुखूं नये, व त्याचा वापर पुनः लवकर करावयास लागूं नये. अशा स्वरूपाचें औषध उपलब्ध नाहीं. उघडच आहे कीं प्रत्येक व्यक्ती, त्याचा अग्निकोठा व त्याचा अवरोध या दृष्टीनें वेगळी असते. व त्यामुळें एकाला लागूं होणारे औषध दुसऱ्यास लागूं होत नाहीं! प्रत्येकाचें औषध वेगळे; 'नियमितपणा हा गुण पक्वाशयाला गुलाम बनवणारा आहे. पुरीषप्रवृत्ति झाली नाहीं तरी ठराविक वेळीं पुरी गूहाला भेट द्यावी. कांहीं दिवसानंतर त्या नियमित वेळीं पुरीष त्याग होऊं शकतो. पोटाचे हलके व्यायाम हे ही कांहीं प्रमाणांत उपयोगी पडतात.

त्रिफळा २ मासे रात्रीं निजतांना कोमट पाण्याबरोबर घ्यावा. यानें दुष्ट कफ पित्त दोषाचें शोधन होतें. एरंडेल, सोनामुखीचा काढा, उषःपान व दूध व तूप हे योग सर्वांच्या परिचयाचे आहेत. आरग्वध तथा बाहवा याच्या शेंगांतला ३ तोळे मगज १० तोळे पाण्यांत कुस्करून तें पाणी गाळून रात्रीं निजतांना प्यावें; त्यानें (स्रंसन) मलविरेचन होतें. मनुकांचा काढा रात्रीं निजतांना घ्यावा; त्यांचा मृदु कोष्टांत उपयोग होतो. कुटकी ही तव्यावर भाजून त्याची काळी पूड करावी व रात्रीं निजतांना मधांतून चाटावी; रोज सकाळीं नियमितपणें गोमूत्र प्यावें. चुका, चाकवत अशा भाज्या आहारांत ठेवाव्या. त्यानें आन्त्रगत वेदना, वायुध्वनि कमी होतात व स्वास्थ्य वाटते. याहून तीक्ष्ण मलविरेचन करणारी इच्छाभेदी, जेपाळबीज, किंवा त्रिधारी निवडुंगाचा चीक ही औषधें वैद्याच्या सल्याशिवाय वापरूं नयेत. मलहरबस्ति (एनिमा) याचा उपयोग करावा.

हा लेख विद्वान् वैद्यांसाठीं नाहीं. तर सामान्य लोकांना मल म्हणजे काय त्याची प्रवृति कशी होते, व न झाल्यास त्यावर काय (थोडे) उपचार करावें याचे दिग्दर्शन करण्यासाठीं लिहिला आहे.

द्राक्षाकुमारी

लहान मुलांच्या यकृत विकारांवर हें अतिशय गुणकारी औषध आहे. यकृत वाढून मुलांची प्रकृति बिघडून जाते व ती सुधारणें कठीण जातें. यकृत वृद्धीचीं लक्षणें दिसतांच द्राक्षाकुमारी सुरू करावें. यकृत व प्लीहा या दोहोंचीहि विकृति द्राक्षाकुमारीनें बरी होते. लहान मुलांना वारंवार होणारा खोकला व पचनाच्या तक्रारी यावरहि हें गुणकारी औषध आहे. उदर, अग्निमांद्य, वातविकार, बद्धकोष्ठ, पोटशूळ या विकारांत द्राक्षाकुमारीचा उपयोग करावा. लहन मुलांना १ चमचा व मोठ्या माणसांना २ ते ४ चमचे समभाग पाण्यासह जेवणानंतर द्यावें.

—नित्योपयोगीं अर्कशाला औषधें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

★ ★ वातवृद्धीचीं कारणें

ले०— गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

रसादि धातूंचा ज्यामुळें क्षय होतो तीं सर्व कारणें वातप्रकोपक वा वर्धक असतात. त्यांत मुख्यत: दोन उपविभाग पडतात. कांहीं आहारांतून पोटांत जातात व वात वाढवितात. कांहीं शरिराच्या विविध हालचाली अथवा विहार यामुळें वात वाढवितात.

(अ) आहारजन्य कारणें—

आपल्या आहारांतून कित्येक वेळा वातवर्धक पदार्थ पोटांत जातात त्यामुळे आपल्या शरिरांत वाताची वृद्धि होते. विशेषत: आपल्या आहारांत जे पदार्थ कडु, तिखट, आणि तुरट रसाचे असतात ते प्राय: वात वाढवितात. कारण या रसांचे उत्पत्तींत जीं पंचमहाभूतें भाग घेतात. त्यांत वात या भूताचें प्राबल्य असतें. या तीन रसांचीं द्रव्यें पोटांत गेल्यावर त्यांचे पाचक अग्निकडून पचन अथवा रूपांतर होते व या रूपांतरांत वायु गुण जास्त प्रमाणांत निर्माण होतात, व हे वात गुण आहार रसांतून सर्व शरीरभर प्रसार पावतात. कायाग्नि पाकांत वायु गुणांची उपलब्धी जास्त प्रमाणांत झाली म्हणजेच त्याला कटु विपाक असें म्हणतात. किंवा तिक्त, कटु कषाय रसांचीं द्रव्यें प्राय: कटु विपाकी असतात असें म्हटलें जातें. पाकांत निर्माण झालेलें प्रधानगुण अन्नरसाबरोबर सर्व शरीरभर जातात व शरीरस्थ वाताची वाढ करितात. किंवा त्या द्रव्याश्रयी गुणांचा स्वभाव विशिष्ट स्थानांतील वाताची वाढ करण्याचा असेल तर त्या त्या स्थानांतील वाताची वाढ होईल. तें द्रव्य स्वभावावर अवलंबून राहील.

आपल्या आहारांत अनेक वेळा कडवान्यें अथवा शिंबीं धान्यें असतात. विशेषत: पावटे, वाल (निष्पाव) वाटाणे, तूर चवळी, मसूर ही शिंबी धान्यें कटु विपाकी आहेत. त्यामुळे हीं धान्यें अधिक प्रमाणांत पोटांत गेल्यास शरीरस्थ वाताची वाढ करितात. वायूच्या रूक्ष, लघु, शीत या गुणांची वाढ यामुळे होते. वरी, सांवे, हारीक, ही क्षुद्र अथवा तृण धान्यें ही रूक्ष, लघु व शीत गुणांचीं आहेत त्यामुळेही वात वाढतो. धान्याप्रमाणें कांहीं भाज्याही वातवर्धक असतात. कारले, करटोले, अशा कडु भाज्या व दोडका, घोसावळे, हीं वातल आहेत. तसेंच फळांपैकीं जांभूळ हें फळ वातवर्धक आहे. असे वातवर्धक पदार्थ अतिप्रमाणांत, वारंवार, खाण्यापिण्यांत येऊं लागले म्हणजे हे आपल्या गुणांचा परिणाम शरिरावर करितात. या द्रव्यांचे सेवन केल्यापासून जो आहाररस निर्माण होतो तो रूक्ष, लघु शीत, अशा वातवर्धक गुणांचा असतो व हा रस शरीरस्थ रसादि धातूंची पुष्टी न करितां उलट शरीर धातूंना कृशच बनवितो. शरिराचे या द्रव्यांपासून लंघन व रूक्षण होते किंवा धातूंचा नाशच जास्त प्रमाणांत होतो. यासाठीं आपण आहारांत जीं द्रव्यें कमी अधिक प्रमाणांत वापरूं त्यावर वात वाढणें वा न वाढणें ही गोष्ट अवलंबून असते.

अल्पभोजन, अतिनियमित भोजन-उपवास-यामुळेही वाताची वाढ होते. अति कमी प्रमाणांत भोजन केल्यामुळे अन्नांतून दोष पोटांत अथवा पुढे शरिरांत जात नाहींत हें खरें आहे. पण, अल्प भोजनामुळे शरीर धातूंना जितका आहार पाहिजे आहे तेवढाही मिळत नाहीं, धातूंना आहार कमी पडतो, धातूंची वाढ होत नाही. शरिराचे व्यापार चालण्यास धातूंची हालचाल मात्र चालूं ठेवावी लागते. पण झीज आहारांतून पुरेशी भरून न निघाल्यामुळे धातूंची पदरमोड मात्र होत राहते. जोपर्यंत गंगाजळी आहे तोपर्यंत शरीर-व्यापार चालतात. या कारणांत शरीर धातूंची संघटना नाहींच, उलट विघटनाव्ययच अधिक आहे. शरिरांत झीज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथवा व्यय जास्त होणें यालाच वात वृद्धी असें म्हणतात. विघटना अथवा व्यय वाताच्या रूक्षादि गुणांमुळेच होत असतो. शरीर झिजते या कार्याविरून वातवृद्धीचे अनुमान निघते.

(आ) विहारजन्य कारणें:–

आहाराप्रमाणें विहारावरही वात वाढणें वा न वाढणें ही गोष्ट अवलंबून असते. आहाराप्रमाणें विहारही जीवन चालण्यास अवश्यक असतो. घेतलेल्या आहाराची विल्हेवाट विहारावाटे होते. विहारानें झालेली झीज अन्नामार्फत भरून निघते. यामुळे जीवन चालण्यास आहाराप्रमाणेंच विहाराचीही जरूरी असते. आपण आहार अधिक घेतला पण त्यामानानें शरिराची हालचाल केली नाहीं तर शरिरांत गेलेले धातूपोषक अंश शरिरांत वाढतात. त्याला कफाची वाढ अथवा मेदाची वाढ झाली असें म्हणतात. याच्या उलट आहारापेक्षां विहार जास्त प्रमाणांत ठेवला तर धातूंची झीज जास्त प्रमाणांत होऊन शरीर कृश होईल. यास्तव आहार व विहार ही समतोल ठेवावी लागतात.

व्यायाम किंवा श्रम अधिक केले गेले; त्या मानानें आहार मिळाला नाहीं तर वात वाढतो. धावणें, पळणें, ही सर्व कर्मे वातवर्धक आहेत. यांत शरिराची झीज आहे. ज्या भागाची या कर्मांत आपण हालचाल करितो तेथें शरीर धातूंचे पचन अधिक होऊं लागते. तेथें रसरक्तांचा पुरवठा व्यानाला अधिक प्रमाणांत करावा लागतो. तत्रस्थ अग्नीलाही अधिक प्रमाणांत रूपांतर करावें लागते. धातूंची विल्हेवाट ही अधिक प्रमाणांत घडली कीं कार्य वाढले– वात वाढला.

वेगविधारण:–

मलमूत्रांचे आलेले वेग बळेच धारण केल्यानें वात वाढतो. वेग उत्पन्न होऊन तो बाहेर पोचविण्याची क्रिया वायु करीत असतो. उदाहरणार्थ पुरीषाचा वेग. स्थूल गुदांत मल साठला कीं गुदस्थ त्वचेला वेदना होते व ही वेदना प्राणामार्फत हृदयाकडे अथवा बुद्धीकडे जाते. लगेच अपान वायूला कामाला इषारा मिळतो. गुदाकडील बाह्यवलीचे विकसन व उत्तर गुदाचे संकोचन होऊन पुरीषमल गुदावाटे शरीराबाहेर टाकला जातो. या पुरीष विसर्जनाच्या क्रियेला पोटांचे स्नायू मागे व खाली दाबून मदत करीत असतात. अपानाच्या या क्रियेला प्राण, व्यान, उदान हेहि सहाय्यभूत होतात; मग मलविसर्जनाची क्रिया घडते. पुरीष विसर्जन करण्याची क्रिया रुद्ध करावयाची म्हणजे तिच्या शक्तीपेक्षा रोधनाची शक्ती अधिक उपयोगांत आणावी लागते. संवरणी स्नायू– वलीनें जास्त संकोच केला पाहिजे. प्रवाहिणीचा हुकूम संवरणीनें विकसन करून मलाला बाहेर जाऊं देणें असा आहे. पण मनुष्य आपल्या विवेक बुद्धीनें हा हुकूम मानत नाहीं. तो दाबून ठेवतो. आलेला वेग दाबून धरावयाचा तर संकोच अधिक करावा लागतो. संकोच अधिक करावयाचा म्हणजे तेथें फार– बरेंच मोठे– शरीर सामर्थ्य खर्च करावें लागते. तेथें जास्त प्रमाणांत रस रक्तांचा पुरवठा केला पाहिजे. जास्त सामर्थ्य व्यानाला व प्राणाला खर्ची घालावे लागते. व अपानानें आणलेला वेग उलटा किंवा विलोम करावा लागतो. यांत शरीर सामर्थ्य खर्ची पडते – व्यय होतो. म्हणून वातवृद्धी या क्रियेनें होते असें म्हटले जाते. नैसर्गिक रीत्या आलेला वेग पोचविला म्हणजे यांत फारसे सामर्थ्य खर्ची पडत नाहीं. त्याला रोध आणला गेला म्हणजे रोधांत जास्त व्यय होतो.

जितका मनुष्य वयानें, ज्ञानाने लहान तितके वेग विधारण कमी होते. पण मनुष्य सुधारला म्हणजे त्याच्या मनावर सामाजिक बंधनें निर्माण होतात. लज्जा निर्माण होते व तो वेग विधारण करतो. लहान माणसें आळसानें किंवा भीतीनें आलेला वेग धारण करितात. या वेगावरोधानें वात प्रकुपित होऊन हा रुद्ध झालेला वायु अन्य वाटेल त्या मार्गानें बाहेर पडण्याचा प्रयत्न करितो व त्यामुळे वाटेल तो व्याधि त्याला होण्याची शक्यता असते.

वेग धारणाप्रमाणें वेग उदीरण हेही वात प्रकोपाचे कारण असते. शौचाला लागली नसतांनाही मुद्दाम बळेंच वेग आणून कुंथत बसण्याची म्हणजे वेग उकरून काढण्याची कित्येकांना सवय असते. त्या प्रयत्नामुळे मुद्दाम अपानाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालना दिली जाते. व ढकलण्यास मल नसल्यामुळे वात शक्ती खर्ची पडते. एका वेगांत सहज मल निःसरणाचे कार्य झाले असते त्या साठीं पांच पन्नास वेगांचे सामर्थ्य वेगोदीरणांत खर्च होते व मल मात्र कांहीं निघून जात नाहीं तो नाहींच. अशी देहांतील धातूंची शक्ति वेग उदीरणांत खर्च झाली म्हणजे यांत धातूंचा नाश असतो. विघटना अधिक होते. विघटना अधिक म्हणजेच वात कार्य अधिक होते. त्यालाच वात वृद्धी असे म्हणतात. कार्य अधिक तेथें वात अधिक असेंच अनुमान निघते. वायु हा कार्यावरून वाढलेला ओळखावयाचा असतो.

रात्री जागरण:–

हे एक वात वृद्धीचें कारण समजले जाते. दिवसापेक्षां रात्रीचा काल शीत असतो. व या शीत गुणामुळें वाताच्या वाढीला मदत होते. शीत या वात कालांत जागरण केले म्हणजे वात वाढतो. रात्रीं निद्रा घेतली म्हणजे शरीराचे व्यापार कमी होतात, व जी झींज होते ती थांबते. दिवसाच्या व्यापारांत जी धातूंची झीज झालेली असते ती रात्रीच्या झोपेनें भरून निघते; व शिवाय या काली देहव्यापार बंद केल्यानें नवीन झीज होत नाहीं. देह धातूंत संघटना अथवा वाढ होऊं लागते. याचे उलट रात्रीच्या जागरणानें होतें. दिवसाच्या व्यवहारांत धातूंची जी झीज झालेली असते ती रात्रीच्या जागरणामुळे भरून निघत नाहीं. धातू उपाशी राहतात. शिवाय जागरण म्हटले म्हणजे हातपाय कान, डोळे यांचे कांहींना कांहीं व्यापार चालूंच राहतात. त्यांत विघटना अथवा व्यय चालूच राहतो. अशा रीतीनें रात्रीं जागरणामुळें देहाचे दुहेरी नुकसान होते. दिवसाची झीज भरून येत नाहीं ती नाहींच, पण आणखी त्यांत धातूंची झीज मात्र चालूच राहते. धातूंना उपवास घडतो, शिवाय श्रम करावे लागतात. शरीरांतील संचित बल खर्च होते, झीज जास्त होते. यालाच वात वाढला असें म्हटले जाते. रात्री जागरण, गुणानें रूक्ष व शीत आहे असें म्हटले जाते. रूक्ष व शीत हे दोन गुण प्रामुख्यानें वाताची वाढ करितात. रात्री जागरणाच्या उलट गुणधर्म दिवसा झोंपण्याचे असतात. दिवास्वापानें स्निग्ध, गुरु हे गुण वाढतात. दिवसाच्या व्यापारांत जेवढा क्षय होणें अवश्यक असते तो झोंपल्यानें होत नाहीं तो वाचतो त्यानें कफ वाढतो.

भीति, शोक, चिंता:–

या मनोविकारांचा परिणाम देहावर होतो. मन प्रसन्न असले म्हणजे देहही प्रसन्न राहतो. चिंता नसली म्हणजे देह पुष्ट होतो. मनाला चिंता लागली कीं त्याचा परिणाम देहावरही होतो. मन कार्याला लागते. मनोव्यापार सुरूं झाले कीं धातूंचीही झीज सुरूं होते. मनाच्या व्यापारांचा परिणाम ते ज्याच्या आश्रयानें राहते त्या देहधातूवरही होतो. आश्रय बिघडला की आश्रयीही बिघडतो. आश्रयी बिघडला कीं आश्रयही बिघडतो. रसादि सार अथवा ओज जितक्या जास्त प्रमाणांत निर्माण होईल तितक्या प्रमाणांत मन शांत व प्रसन्न राहूं शकते. मनाचा आहार ओज अथवा तेज हें आहे. ओजाचे स्थान हृदय हे आहे. मनोविकारांचा परिणाम हृदयावर व हृदयाश्रयी सार धातूंवर होतो. अति चिंता केली तर या चिंतनांत रसक्षय होतो. मनोव्यापारांतही झीज असते. अत्यंत सार द्रव्यांवर मन व बुद्धीचे व्यापार अवलंबून असतात. मनोविकारांत ही सार अथवा तैजस् द्रव्ये खर्ची पडतात. भीति, शोक, चिंता यांत ओज खर्ची पडते. सार घटक शरीर धातुपासून च्युत होतात व शरीरस्थ क्लेदांत त्यांची भर पडते. त्यापासून अनेक व्याधि निर्माण होतात. सार द्रव्यें जितक्या प्रमाणांत देहांत वाढतील तितक्या प्रमाणांत, बुद्धी, स्मृति धारणा याचे व्यापार वाढतात, आत्मज्ञान होते. यांचा ऱ्हास झाला कीं, बुद्धी व्यापार मंदावतात, विकृत होतात. यासाठीं ओजाची अथवा सार धातूंची अवश्यकता असते. पण ध्यान शोक यानें हृदय, ज्यास्त चलन होते, ओज खर्ची पडते. विघटना करणें ही वाताचीच क्रिया मनोदोषामुळें जास्त जास्त होते. मन प्रसन्न, शांत असले म्हणजे तोंडाला रुचि असते. अन्न गोड लागते, जास्त जाते, चांगले पचते. सार अंश जास्त प्रमाणांत निर्माण होतात. देहाची पुष्टी व मनाची तुष्टी होते. उलट मनाला त्रास असला म्हणजे त्याचा परिणाम हृदयावर जसा होतो तसा तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पचनावरही होतो. जिन्हेला अन्न गोड लागत नाहीं-अन्न जात नाहीं-गेले तरी पचत नाहीं. सार निर्माण होत नाहीं, धातूंना सार द्रव्यें कमी पडतात, उपासमार होते. शिवाय अधिक भर म्हणजे जी सार द्रव्यें जवळ असतात तीही खर्ची पडतात— वियोजन होते. वियोजन कार्य वाताच्या वृद्धीचेंच द्योतक असते.

इ) कालः—

कालामुळे वात वा तो. वात, पित्त, कफ हे तीनही सर्वव्यापी आहेत; त्याप्रमाणें ते सर्व काल व्यापून आहेत. ते भूतकालीं होते. चालूं कालीं आहेतच आणि भविष्य कालीही असणारच. तें सकाळीं आहेत, दुपारीं आहेत, सायंकाळीं, रात्रींही आहेत. सदा सर्वदा ते आहेतच. दर एक क्षणाला हे तिघेही आहेत. काल जसा अनादि अनंत आहे, तसेच वातपित्त कफ हे अनादि अनंत आहेत. दर एक क्षणाला उत्पत्ति स्थिति व लय ही चालूं असते. पण दर एक क्षणाला हे सूक्ष्म रूपानें घडणारे बदल आपल्या जाणिवेंत येतीलच असें नाहीं. पण वैद्यकीय व्यवहार चालण्यासाठीं ज्या काळीं त्यांचा उत्कर्ष अधिक तो काळ त्यांचा असें म्हटले जाते. ज्या काळीं वाताचे गुण आणि क्रिया अधिक आढळून येतात तो काळ वाताचा असे समजले जाते. त्या वेळीं कफ पित्त नाहींत असें नाहीं. तें असतातच पण त्यांचा उत्कर्ष त्या कालीं नसतो इतकेच.

सूर्य उगवल्यापासून तो मावळे-पर्यंतचा काल त्यास दिवस असें म्हणतात. त्या दिवसाचे तीन भाग केले तर शेवटचे चार तास, व त्याचप्रमाणें रात्रींचे शेवटचे चार तास हे वाताचे तास असतात. मानवी देहांत असणारा व सतत गमनशील जो रस धातु आहे त्यावर बाह्य वातावरण, ऋतु, दिवस, रात्र यांचे ही परिणाम घडतात. सकाळीं हा रस जसा असतो तसा तो दुपारीं असत नाहीं. दुपारचा सायंकाळला नसतो. थंडीच्या दिवसांत जसा हा असतो तसा तो उन्हाळ्यांत नसतो. उन्हाळ्यांत जसा असतो तसा तो पावसाळ्यांत नसतो. ऋतुमान वा दिवस याप्रमाणें शरीर बदलत असते. आपण सकाळीं उठलो म्हणजे आपले मन प्रसन्न असते—काम करण्यास उत्साह वाटतो. याचे कारण या काली शरिरांत वावरणारा रस हा बल व उत्साह-वर्धक असते. याचे उलट सायं-कालची परिस्थिती असते. सायं-काळीं आपण थकतो, शरीर व मन दमून जाते, याचे कारण सायंकालीं आपले शरिरांतील रसांत फेरबदल झालेले असतात. पोषक घटकांचा ऱ्हास या रसांत झालेला असतो. त्यामुळे शरिराचे बल अथवा प्रतिकारशक्ति कमी झालेली असते. यासाठीं सायंकाल वाताचा, वातवृद्धीचा काल असें म्हटले जाते. या कालांत शरिरांत नाश अथवा झीज म्हणजे वियोजन हे वात कार्य जास्त झालेले असते.

ऋतुचक्राप्रमाणें ग्रीष्मकालांत वात वाढतो. या कालांत शरीर रसांत बलवर्धक घटक पुष्कळच कमी झालेले असतात. अग्नि व देह हें दोनीही क्षीण झालेले असतात. याचे कारण बाह्य वातावरण हे असते. या कालीं सूर्याच्या प्रखर तेजामुळे शरिरांतील पोषक रसाचा संहार केला जातो. शरीर कृश व दुर्बल बनते व वात वाढतो. या कालीं मिळणारा आहार हा ही लघु व रूक्षच असतो. सर्वत्र लघु व रूक्ष गुणांची वाढ झालेली असते; त्याचा परिणाम मानवी देहावरही तसाच होतो. रात्रीं या काली लहान असतात, त्यामुळे मानवाला विश्रांतीही थंडीच्या कालाइतकी याकाली मिळत नाहीं यामुळें देहबल या कालीं कमी झालेले असते. याचे कारण सर्व बाह्य वातावरणच तसे असते. यामुळे या कालांत वात वृद्धी पावतो.

एक वैद्य व एक डॉक्टर पाहिजे !

१) आयुर्वेद विषयांचे अध्यापन व आयुर्वेदीय रुग्णालयांत काम करण्यासाठीं एक आयुर्वेद पदवीधर पाहिजे.

२) तसेंच बायोफिजिक्स व बायोकेमिस्ट्री वगैर पाश्चिमात्य विषय शिकविण्यासाठीं व संस्थेंतील दवाखान्यांत काम करण्यासाठीं एक एम्. बी. बी. एस्. पाहिजे.

तरी पगाराच्या अपेक्षेसह ता. ५-४-५४ पर्यंत खालील पत्त्यावर अर्ज करावेत.

प्रमुख, सामुदायिक वैद्यक महाविद्यालय, सातारा शहर.

CC-0. In Public Domain. Gangotri Collection

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

With Best Wishes From -

Ayurvedeeya Arkashala Ltd.

S A T A R A.

CALENDAR 1954.

Months.	Sun.	Mon.	Tues.	Wed.	Thurs.	Fri.	Sat.
JAN.	31					1	2
	3	4	5	6	7	8	9
	10	11	12	13	14	15	16
	17	18	19	20	21	22	23
	24	25	26	27	28	29	30
FEB.		1	2	3	4	5	6
	7	8	9	10	11	12	13
	14	15	16	17	18	19	20
	21	22	23	24	25	26	27
	28						
MAR.		1	2	3	4	5	6
	7	8	9	10	11	12	13
	14	15	16	17	18	19	20
	21	22	23	24	25	26	27
	28	29	30	31			
APR.					1	2	3
	4	5	6	7	8	9	10
	11	12	13	14	15	16	17
	18	19	20	21	22	23	24
	25	26	27	28	29	30	
MAY	30	31					1
	2	3	4	5	6	7	8
	9	10	11	12	13	14	15
	16	17	18	19	20	21	22
	23	24	25	26	27	28	29
JUNE			1	2	3	4	5
	6	7	8	9	10	11	12
	13	14	15	16	17	18	19
	20	21	22	23	24	25	26
	27	28	29	30			

Months.	Sun.	Mon.	Tues.	Wed.	Thurs.	Fri.	Sat.
JULY					1	2	3
	4	5	6	7	8	9	10
	11	12	13	14	15	16	17
	18	19	20	21	22	23	24
	25	26	27	28	29	30	31
AUG.	1	2	3	4	5	6	7
	8	9	10	11	12	13	14
	15	16	17	18	19	20	21
	22	23	24	25	26	27	28
	29	30	31				
SEP.				1	2	3	4
	5	6	7	8	9	10	11
	12	13	14	15	16	17	18
	19	20	21	22	23	24	25
	26	27	28	29	30		
OCT.	31					1	2
	3	4	5	6	7	8	9
	10	11	12	13	14	15	16
	17	18	19	20	21	22	23
	24	25	26	27	28	29	30
NOV.		1	2	3	4	5	6
	7	8	9	10	11	12	13
	14	15	16	17	18	19	20
	21	22	23	24	25	26	27
	28	29	30				
DEC.				1	2	3	4
	5	6	7	8	9	10	11
	12	13	14	15	16	17	18
	19	20	21	22	23	24	25
	26	27	28	29	30	31	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

सुखी मातृपद

म्हणजेच मातेचे व बालकाचे

आरोग्य

मातृपदाची चाहूल लागतांच मातृत्वाची जबाबदारी सुरु होत असते आणि बालकाची आरोग्यपूर्ण वाट होईपर्यंत ती संपत नाही.

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक टॉनिक

गर्भवतींनी नियमितपणें यूटोन घेतल्यानें प्रकृति उत्तम राहाते, गर्भाचें नीट पोषण होते व गर्भस्राव वा गर्भपात यांचे भय राहात नाही. अनियमित मासिक पाळी, प्रदरह. गर्भाशय-विकारांवर हि गुणकारी.

स्तन्यशोधन

दुग्धशोधक, दुग्धवर्धक

मुलाला आईनें दूध मानवलें नाहीं तर तें बाळसें धरीत नाहीं. त्याची प्रकृति वारंवार बिघडते. मातेनें स्तन्यशोधन नियमित घेतल्यास दुधांतील दोष दूर होतात.

शिशुजीवन

बालकांचें आरोग्यरक्षक

मुलांच्या दमा, सोकला या विकारांवर गुणकारी टॉनिक. वारंवार सर्दी, पडसें होऊन श्वासाचा उपद्रव होतो तेव्हां शिशुजीवनचा अवश्य उपयोग करावा.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

श्रेष्ठ, गुणकारी आयुर्वेदीय औषधांचे निर्माते

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनी महाराष्ट्र मित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वार्षिक वर्गणी ३ रु.] [किरकोळ अंक ८ आणे.

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

राजयक्ष्मा विशेषांक

फेब्रुवारी १९५४.

: प्रमुख संपादक : : कार्यकारी संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य व. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

—आयुर्मीमांसा—

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १७ वें] फेब्रुवारी १९५४. [अंक २ रा.

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व व्यवहार "व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा." या पत्त्यावरच करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—सेवा—

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते. अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधें वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान–

दि ऑल इंडिया करियाणा स्टोअर्स

पायधुणी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

सूचना:– मीमांसेनें चालू महिन्यांत राजयक्ष्मा या विषयावर ६४ पानी खास अंक काढला असल्यानें मार्च महिन्याचा अंक बंद राहील.

–संपादक

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अ शा श क्ति शा ली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा

उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा.

शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.

सूचिपत्र मागवा.

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापक:– अरविंद केमिकल वर्क्स,

छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

-संपादकीय-

आयुर्मीमांसेच्या वाचकवर्गास हा राजयक्ष्मा विशेष अंक सादर करण्यास अत्यंत आनंद होत आहे. या अंकांत आयुर्वेदीय कल्पनेनुसार क्षय रोग होण्यास कोणकोणतीं कारणें जबाबदार असतात व हा रोग जडतो कसा याचा साकल्यानें विचार केला आहे. आपल्या राष्ट्रांतील विचारवंत लोकांना हा विचार पटला व क्षय रोग होऊंच द्यावयाचा नाहीं अशी मोहीम त्यांनीं अमलांत आणण्याचें मनावर घेतल्यास क्षय रोग प्रतिबंधनाला याचा निश्चयानें उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं असा भरवसा वाटतो. चालू कालांत क्षय रोगाचा प्रसार फार वाढत्या प्रमाणांत आहे व त्याला सद्यःकालीं अखिल भारतीय स्वरूप आलें आहे. अशा वेळीं या रोगावर संपूर्ण आयुर्वेदीय पद्धतीनें काय काय उपचार करणें शक्य आहे ही देशी वैद्यकाची बाजू जनतेला व सरकारला समजावी हाही एक हेतु हा अंक काढण्यांतआहे. क्षय रोगाचा प्रसार थांबवावयाचा असेल तर जनतेला सकस व भरपूर अन्नाचा पुरवठा व्हावयास पाहिजे. ब्रह्मचर्य पालनाचे नियम व नैतिक वर्तन सुधारलें पाहिजे. तसेंच लोकांतील मलमूत्रादि वेगावरोधासारख्या जडलेल्या दुष्ट संवयी दूर करण्याची खटपट केली पाहिजे. जनतेंत शांततेचें, प्रसन्नतेचें वातावरण निर्माण झालें पाहिजे. भीति, शोक, चिंता यामुळें हा रोग जडण्यास मदत होते. लोकांच्या मनोविकारांत, आहारांत, आचारांत असें परिवर्तन घडून आणल्याखेरीज या रोगाला प्रतिबंध बसणें शक्य नाहीं. याचें आयुर्वेदीय पद्धतीनें विवरण या अंकांत केलें आहे. तसेच क्षय रोग जडला तर त्याची लक्षणें कोणतीं असतात. त्यावर सामान्यतः चिकित्सा काय स्वरूपाची करतां येते याचेंही मार्गदर्शन केलें आहे.

विद्यार्थीवर्ग, वैद्यवर्ग, व आयुर्वेदाचे चहाते लोक, यांना हा अंक खास उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. विशेषतः क्रमिक पुस्तकांची संख्या फार मोठी नड आहे. अशा रीतीनें क्रमिक पुस्तकें आयुर्वेदीय विद्वानांकडून लिहून घेऊन ती नड भागविण्याचें कार्य मीमांसा आज कित्येक वर्षे करीत आहे. त्याच पद्धतीचा हा एक अंक आहे. आयुर्वेदीय अभ्यासु जगांत हा अंक यशस्वी ठरेल, व असे इतर अंकही काढण्यांत मीमांसेला प्रोत्साहन मिळेल अशी आशा करतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

—संपादक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाविद्यालय वार्ता

आयुर्वेद प्रसारक मंडळीचा वाढदिवस व वार्षिक स्नेहसंमेलन :-

आयुर्वेद प्रसारक मंडळी व तिच्या अंगभूत सर्व संस्थांचा ४१वा वाढदिवस ता. १५ जानेवारी १९५४ रोजीं मुंबई राज्याचे पुरवठा मंत्री नामदार श्रीमान् यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें संस्थेच्या जागेंत मोठ्या समारंभानें झाला. या शुभ प्रसंगीं अनेक शुभ संदेश आले होते. संस्थेचे प्रमुख श्री. वैद्य गो. आ. फडके यांनीं संस्थेची माहिती अध्यक्षांना सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना उपदेशपर शब्द सांगण्यास विनंति केली. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत संस्थेच्या कार्याचा गौरव केला व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांनीं आपल्या देशबांधवांची सेवा करावी असा उपदेश केला. त्याचबरोबर आपल्या भारतभूच्या परिसरांत असलेल्या देशांच्या हालचाली व त्याचे भारतावरले परिणाम विद्यार्थ्यांनीं विचारपूर्वक पाहून मनन करून त्याची माहिती आपले समाजास द्यावी अशीहि विनंति केली. व्यक्तिगत नैतिक उन्नतीबरोबरच सामाजिक उन्नतीहि साधावी अशी सूचना अध्यक्षांनीं केली.

विद्यार्थी-शासित-मंडळातर्फे बरेच कार्यक्रम योजलेले होतें. पण अत्यंत प्रिय व तळमळीचे असे विद्यार्थी रा. भाई खाडये यांच्या अकस्मित निधनामुळें बरेचसे कार्यक्रम स्थगित केले गेले. जे कार्यक्रम झालेले होते, त्यांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना समारंभाचे अध्यक्ष श्री. रा. यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें पारितोषिकें देण्यांत आली. श्रीमान् रा. यशवंतराव चव्हाण यांनीं आपला बहुमोल वेळ खर्च करून संस्थेला जें मार्गदर्शन केलें त्याबद्दल संस्था त्यांची फार ऋणी आहे.

अशा तऱ्हेनें संस्थेचा वाढदिवस व वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटानें यशस्वी झालें.

संस्थेस थोरांच्या भेटी :-

सातारा जिल्ह्याचे कलेक्टर श्री. पी. बी. पाटील यांनीं ता. ५-१-५४ रोजीं व मुंबई प्रांताचे न्यायप्रमुख श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर यांनीं ता. २३-१-५४ संस्थेस भेट देऊन संस्थेची आस्थेवाईकपणें चौकशी केली व संस्थेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजयक्ष्मा

: लेखक :
गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

अनुक्रमणिका

		पान
१.	राजयक्ष्म्याचीं नांवें व स्वरूप	१
२.	राजयक्ष्म्याचीं कारणें	४
३.	क्षयरोगाची संप्राप्ति	६
४.	क्षयरोगाचीं पूर्वरूपें	२३
५.	क्षयरोगाचीं लक्षणें	२८
६.	राजयक्ष्म्याचें साध्यासाध्यत्व	४१
७.	चिकित्सा	४४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रास्ताविक.

राजयक्ष्मा या विकाराचें आयुर्वेदीय पद्धतीनें, निदान व चिकित्सा यांचे वर्णन आयुर्मीमांसेचा "राजयक्ष्मा विशेष अंक" या सदराखालीं प्रसिद्ध होत आहे याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. क्षय रोगाचीं कारणें, पूर्वरूपें, रूपें व चिकित्सा शिकविण्याची वेळ माझेवर अनेक वेळां आली. पण शिकवण्यापूर्वी किंवा नंतर त्यासंबंधीं कांहीं टिपणें करून ठेवण्याचें माझे हातून आतांपर्यंत कधींच झालें नाहीं.

चालू अधिवेशनांत "राजयक्ष्मा" हा रोग शिकविण्याची पुनः मला संधी लाभली. त्या संधीचा फायदा घेऊन क्षय रोगाचें संपूर्ण निदान व चिकित्सा या वेळीं लिहून काढली, व ती आज आयुर्मीमांसेकडून ग्रंथ स्वरूपानें प्रसिद्ध होत आहे.

आयुर्वेदीय अध्यापकाला विषय शिकवावयाचा म्हणजे फार मोठी अडचण असते. सूत्राखेरीज त्याचें फारसें विवेचन आढळत नाहीं, व जें विवेचन असतें त्यानें अध्यापकाचें व विद्यार्थ्यांचें समाधान होईलच असें नाहीं. मात्र विद्यार्थ्यांचें त्या विषयासंबंधीं पुरेंपूर समाधान करण्याची जबाबदारी अध्यापकावर असते. अशा तऱ्हेनें कचाट्यांत सांपडलेला अध्यापक, विद्यार्थी वर्गाचें काय समाधान करूं शकतो तें या अंकांत पहावयास मिळणार आहे. क्षय रोगाचीं कारणें, संप्राप्ति, पूर्वरूपें व रूपें संप्राप्तिनुरूप कशीं कशीं होतात, व त्याप्रमाणें चिकित्सा आयुर्वेदानें कशी केली आहे याचा साग्र वृत्तान्त विद्यार्थी-वर्गापुढें मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकद्वारें मीं केला आहे.

माझा हा प्रयत्न क्षयरोगाचा आयुर्वेदीय पद्धतीनें अभ्यास करणाऱ्या माझ्या विद्यार्थ्यांस आवडेल अशी मी अपेक्षा करतों. माझ्याप्रमाणें आयुर्वेदाचे जे भाग्यवान अध्यापक असतील त्यांनाही कदाचित् या पुस्तकावरून फायदा होण्याची शक्यता आहे. अधिक विद्वान वैद्यवर्ग यांनीं हा ग्रंथ कदाचित् वाचला तर ते यांतील माझ्या चुका शोधून काढतील व मला अगत्यपूर्वक कळवतील व त्या योगें माझ्याहि ज्ञानांत भर पडणार आहे. "आपण चूकूं" अशी भीति न बाळगतां, चुकल्यानें शहाणे होऊं हा जबर आशावाद मीं मनाशीं बाळगला आहे.

आयुर्वेदीय पद्धतींत जीं सूत्रें आहेत तेवढीं वाचून, किंवा त्यांचा केवळ अर्थ सांगून विद्यार्थीवर्गाची जिज्ञासा तृप्त होण्यासारखी नाहीं. त्यासाठीं त्या सूत्रांचा विस्तार तो विषय पिंजून पिंजून विद्यार्थ्यांपुढें झाला पाहिजे म्हणजे विद्यार्थ्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनांत शंका रहात नाहीं, तो विषय त्याला चांगला पटतो. असा प्रत्येक विषयाचा विस्तार आयुर्वेदीय क्षेत्रांत होणें अगत्याचे आहे. त्या दृष्टीनें माझा हा अल्पसा प्रयत्न आहे.

आयुर्वेदीय जगतांतील प्रमुख कार्यकर्ते सध्यां आयुर्वेदीय संशोधनामागें लागले आहेत. त्यांनीं आयुर्वेदीय वाङ्मय प्रसिद्ध करणें, क्रमिक पुस्तकें तयार करणें, हेंहि एक कार्य पत्करलें आहे. त्या कार्यास माझ्या या लेखाचा कांहीं उपयोग होईल काय असाहि एक विचार माझ्या मनांत सहज येऊन गेला. उपयोग होणार असेल तर मी अधिक अभ्यास करून क्षयरोगाप्रमाणें इतरहि अनेक रोगांची निदानें व चिकित्सा विद्यार्थीवर्गासाठीं लिहिण्याचें धाडस करणार आहे. पण ...

पण कांहींहि असो. आपल्याला या वेळीं जे विचार सुचतात ते ग्रंथरूपानें लिहून काढण्यांत काय वावगें आहे ? ते कोणास पटोत वा न पटोत आपण सदसद्विवेक बुद्धीनें आपला मार्ग क्रमला पाहिजे ग्रंथ व ग्रंथाचा अर्थ ही पहिली पायरी. व नंतर त्याप्रमाणें रोगी देहावर औषधांचे काय काय परिणाम होतात तें पाहणें ही संशोधनाची वरची व श्रेष्ठतम पायरी आहे. जिवंत मानवी देहावर त्याचे जे जे परिणाम घडतात त्याच एका कसोटीवर संशोधन अवलंबून आहे, व ही संशोधनाची बाजू प्रत्यक्ष हजारों रोगी एका तऱ्हेचे मिळाले म्हणजे मग सिद्ध होणार आहे. आयुर्वेदाला राजमान्यता मिळाली, आतां आयुर्वेदीय रुग्णालयें निघालीं. तशीच आयुर्वेदीय पद्धतीनें क्षयरोगाचीं इस्पितळें निघतील. तीं निघालीं म्हणजे तेथील अनुभवावरून आयुर्वेदीय निदान व चिकित्सा पद्धतींचा खरा कस लागणार आहे रोगी हा खरा निष्कर्ष आहे. त्यांत आयुर्वेद श्रेष्ठ ठरला पाहिजे. पण ही वरची पायरी लाभण्यापूर्वी आयुर्वेदीय वाङ्मयांत क्षयरोगासंबंधीं काय काय आहे तरी ? जें लिहिलें आहे त्याचा अर्थ अशा पद्धतीनें लावला तर तो प्रत्यक्ष चिकित्सेंत जमेल काय याचा विचार या लेखरूपानें केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे तें वाचक वर्गच ठरविणार. आयुर्मीमांसाकारांनीं या विषयास संपूर्ण दोन अंकांची जागा एकाच वेळीं दिल्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. वाचक वर्गांनीं या ग्रंथाबद्दल निःसंकोचपणें आपला अभिप्राय कळवावा.

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय,
सातारा शहर.
माघ शु. ७ शके १८७५.

वाचकांचा नम्र,
गो. आ. फडके,
आयुर्वेदाचार्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजयक्ष्मा.

१ राजयक्ष्म्याचीं नांवें व स्वरूप.

राजयक्ष्मा क्षयः शोषो रोगराडितिच स्मृतः। वा.

राजयक्ष्मा, क्षय, शोष, व रोगराज हे चार पर्याय शब्द आहेत. त्यांची निरुक्ति पुढील प्रमाणें आहे.

१. राजयक्ष्माः—

नक्षत्राणां द्विजानांच राज्ञोऽभूद्यदयं पुरा।
यच्च राजाच यक्ष्माच राजयक्ष्मा ततो मतः॥ वा.

ब्राह्मणांचा आणि नक्षत्रांचा जो राजा चंद्र त्याला हा पूर्वी झाला होता म्हणून या रोगाला कांहीं लोक राजयक्ष्मा असें म्हणतात. "पूर्वी दक्ष नांवाचा प्रजापति होऊन गेला. त्याला पुष्कळ कन्या होत्या. त्यानें आपल्या या सत्तावीस कन्या चंद्राला दिल्या. परंतु त्यांपैकीं रोहिणीशींच चंद्र रत होऊन राहिला, तेव्हां इतर कन्यांनीं आपली ही तक्रार आपल्या बापाला सांगितली. तेव्हां दक्षानें चंद्रास बोलावून सर्वांशीं समतेनें वागण्यास सांगितलें. चंद्रानें बरें आहे म्हणून सांगितलें. पण त्या बोलण्याचा अनादर करून चंद्र कांहीं सर्वांशीं समतेनें वागला नाहीं. त्यामुळे दक्षप्रजापतीचा क्रोध निश्वासरूपानें मूर्तिमान होऊन सुटला व त्यानें यक्ष्मरूपानें रोहिणीशीं अति आसक्त झालेल्या चंद्रांत प्रवेश केला. त्या रोगानें चंद्र क्षीण व निष्प्रभ झाला. गुरुवचनाचें अतिक्रमण आपल्या हातून झालें हा आपला दोष त्याला उमगला व तो परत दक्षप्रजापतीला शरण गेला. त्यानंतर देवांचे वैद्य अश्विनीकुमार यांनीं चंद्राची चिकित्सा केली व तो रोगमुक्त झाला. पुढें चंद्राला बल प्राप्त होऊन तो आकाशांत सुशोभितपणें विराजमान झाला. गुरुप्रसाद व अश्विनीकुमारांची चिकित्सा हीं त्याला लाभली म्हणून चंद्राचें पुनरुज्जीवन झालें." या पुराणांतील राजयक्ष्म्याच्या कथेवरून अनेक बोध घेता येतील. हा विकार कर्मदोषज आहे असें यांत दाखविलें आहे. स्त्रीशीं अति राहिल्यामुळें हा रोग होतो. गुरूचा अपमान केल्यामुळें हा होतो. तसेच या उलट गुरुप्रसाद लाभला तर त्यानें हा बराही होऊं शकतो. बरें होण्यास देवांचे वैद्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्विनीकुमार यांसारखे चिकित्सक असले म्हणजे हा बरा होतो. चंद्र म्हणजे सोम. शरिरांत सोम म्हणजे ओज आहे त्याचा क्षय झाल्यास राजयक्ष्मा होतो. अशा अनेक गोष्टी या कथेंत रूपित केल्या आहेत.

२. क्षयः–

क्रियाक्षयकरत्वाच्च क्षय इत्युच्चते पुनः ।
देहौषधक्षयकृतेः क्षयस्तत्संभवाच्च सः ॥ सु.

यांत देहधातूंचा क्षय होतो, तसेंच हा रोग बरा करण्यासाठीं योजलेल्या औषधांचाही क्षय होतो, म्हणून या व्याधीला क्षय असें म्हणतात. यांत क्रिया म्हणजे चिकित्सेचा क्षय होत असतो, किंवा क्रिया म्हणजे शारीरिक, वाचिक, व मानसिक कर्म, त्यांचा नाश या रोगांत होतो म्हणून याला क्षय असें म्हणतात. क्षय शब्दानें थोडक्यांत या रोगाची धातुक्षय ही संप्राप्ति सांगितली आहे.

३. शोषः–

रसादिशोषणाच्छोषो- । वा.
संशोषणाद्रसादीनां शोष इत्यभिधीयते । सु.

यांत रसादि धातूंचा शोष होतो म्हणून या व्याधीला शोष असें म्हणतात. शरीरांतील द्रव द्रव्यांचा नाश यांत होतो व द्रवाचीं स्थानें ओठ, जिव्हा, तालु, गल हीं सर्व शुष्क होतात.

४. रोगराट् तेषु राजनात्:–

रोगांमध्यें हा विशेष शोभून दिसतो त्यामुळें याला रोगराज असें म्हणतात. रोगांचा हा राजा आहे म्हणून यास रोगराज म्हणतात. निरनिराळे व्याधी, निदान, पूर्वरूप, रूप, उपशय आणि संप्राप्ति या पद्धतीनें आपण पाहिलें तर सर्व व्याधींत हाच विकार शोभून दिसतो. राजा जसा बहुपरिवारयुक्त व दैदीप्यमान असतो, त्याप्रमाणें हा रोग आहे. त्याच्या पुढें व मागें पुष्कळ व्याधी होतात. असा, व्याधींत सुशोभित दिसणारा हा विकार असल्यामुळें त्याला रोगराज असें म्हणतात. या नांवांपैकीं, क्षय, व शोष हे दोन पर्याय या रोगांत कोणती संप्राप्ति घडते याचे सूचक वा द्योतक आहेत. धातु क्षीण होतात म्हणून याला क्षय म्हणतात. धातूंतील द्रवांशांचें शोषण होतें व त्यामुळें सर्व शरीर जलांशविरहित होत जातें, शरीर सुकतें. अशी शुष्क होण्याची क्रिया यांत होत असते, असें शोष शब्दानें सुचविले आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजयक्ष्म्याचें स्वरूपः—

राजयक्ष्म्यासारख्या महान् रोगाचें स्वरूप थोडक्यांत निवेदन करणें अवघड आहे. यासाठीं त्याची कल्पना विविध दृष्टिकोनांतून करीत गेल्यास कदाचित् त्याचें स्वरूप आकलन होण्याची शक्यता आहे. त्याच्या स्वभावाचें वर्णन सुश्रुतांनीं पुढील प्रमाणें केलें आहे.

अनेकरोगानुगतो बहुरोग पुरोगमः ।
दुर्विज्ञेयो दुर्निवारः शोषो व्याधिर्महाबलः ॥ सु. उ.

अनेक रोगानुगतः —

राजयक्ष्मा हा राजाप्रमाणें आहे. राजाच्या मागोमाग व बरोबर जसे अनेक आश्रित लोक असतात त्याप्रमाणें या रोगाच्या आश्रयानें अनेक व्याधी असतात. राजयक्ष्मा हा एक विकार झाला कीं त्याच्या मागें अनेकविध व्याधि उपद्रव म्हणून येऊन रुग्ण देहाला त्रास देत राहतात. कण्ठ दुखणें, छातींत दुखणें, अग्निमांद्य, मुखाला दुर्गंधी असे अनेक व्याधी उपद्रव म्हणून यांत होत असतात.

बहुरोगपुरोगमः —

या रोगाच्या पुरोगामी म्हणजे पूर्वरूपें म्हणून अनेक व्याधी होत असतात. राजाची स्वारी यावयाची म्हणजे त्याच्यापुढें भालदार, चोपदार, वाजंत्री, शिंगें असा लवाजमा असावयाचा मग त्याच्यामागें राजेसाहेब असावयाचे. याप्रमाणें या रोगाचें आहे. पीनस, श्वास, कास इत्यादि अनेक रोग क्षयाचे पूर्वावस्थेंत येत असतात. प्रथम कांहीं दिवस घशाचा क्षोभ कासरूपानें होत असतो, किंवा कित्येकदां जुलाब होणें ही तक्रार प्रथम पुष्कळ दिवस असते, व पुढें त्यांतूनच क्षयरोग उमटतो. साधा थंडीताप म्हणून प्रथम येतो व पुढें त्याच्यामागें क्षयरोग येतो. असे अनेक व्याधी प्रथम क्षय होण्यापूर्वीं होत असतात. खोकला, अतिसार, अपचन, ओकाऱ्या, गोंवर, डांग्या खोकला, सान्निपातिक ज्वर, विषमज्वर असे अनेक व्याधी क्षयरोगाचे पुरोगामी व्याधी असल्यामुळें हे विकार क्षुल्लक आहेत म्हणून यांची अवहेलना करणें बरें नाहीं. पूर्वरूपांत उद्भवणाऱ्या अशा रोगांपासून शरीरास पूर्णपणें रक्षिलें पाहिजे. हे व्याधि पूर्णपणें बरे होईपर्यंत व रोग्याची प्रकृति या रोगांतून बरी होऊन पूर्णपणे पूर्ववत् आरोग्यसंपन्न व बलशाली होईपर्यंत पथ्यपाणी व चिकित्साक्रम चालूं ठेवला पाहिजे. कारण या पूर्व रोगानें प्रथम शरीर क्षीण केलें जातें व मग क्षयोत्पादक दोषांना शरिरांत प्रवेश करण्यास वा पूर्वसंचित दोषांना प्रकुपित होण्यास आयतें तयार रान सापडतें व मग या भूमींत क्षयरोगाची वल्ली भरगच्च पसरू शकते. यासाठीं पूर्वरूपावस्थेत जे बारीक वा किरकोळ रोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसतात ते पूर्ण बरे करणें आवश्यक असतें. शक्तिक्षय निर्माण करणाऱ्या रोगांतून रोगी बरा होत जात असतांना, रोग्याची जी तब्बेत खालावली आहे ती पूर्ववत् आरोग्यसंपन्न होईपर्यंत उपक्रम करणें हा क्षयरोग वेळींच थोपविण्याचा मानवी हातांतील एकमेव उपाय आहे.

दुर्विज्ञेयः –

क्षयरोग दुर्विज्ञेय म्हणजे समजण्यास अवघड आहे. त्याचें आकलन होणें इतर रोगांइतकें सोपें नाहीं. त्यांत जीं लक्षणें होतात तीं त्रिदोषांमुळें उत्पन्न होणारीं आहेत. शिरःशूल हें एक लक्षण घेतले तरी तें इतरत्र वातामुळें होत असतें. पण क्षयांतील शिरःशूल हा तीनही दोषांच्या प्रकोपामुळें उद्भवत असतो. दोषांच्या अंशांश कल्पनांमुळें हीं लक्षणें उत्पन्न होत असतात. वात कफाला व पित्ताला उदीरित करितो, व सर्व देह व्यापादित करितो. पण दिसणारे कफपित्त हे स्वतः स्वयंप्रेरित आहेत, का वातामुळें ते आले आहेत याची वारंवार शंका येते. वात, पित्त, कफ यांचे संयुक्त वैषम्य यांत आढळतें.

दुर्निवारः–

राजयक्ष्मा हा विकार जडला म्हणजे त्यापासून मानवाला मुक्त करणें हें महा कठीण कर्म आहे. कारण यांत त्रिदोष दुष्टी असते. त्रिदोष शमन करणारीं औषधें फार थोडीं आहेंत. त्यांतल्या त्यांत जो बलवान दोष आहे त्याची चिकित्सा करावी लागली तर ती चिकित्सा दुसऱ्या दोषाला विरुद्ध जाते. यामुळें एक संभाळावें तर दुसरें अंगलट येते. वातशमनार्थ बृंहण चिकित्सा करूं लागलों तर कफ वाढतो. कफानें अडथळा आल्यामुळे बृंहण वा वातशमन होत नाहीं. कफनाश करावा तर धातुक्षय होत जाऊन वायु वाढतो. कफक्षयामुळें वाताबरोबर पित्तही वाढते. यामुळे या रोगांत कोणात्याही एका दोषाला चिकित्सा करून शमविणें अवघड आहे म्हणून याला दुर्निवार असें म्हटलें आहे. याचमुळे हा व्याधि कठीण अतएव महाबलवान म्हटला आहे.

२ राजयक्ष्म्याचीं कारणें

राजयक्ष्मा हा विकार मुख्यतः पुढील चार कारणांनीं होत असतो.

अयथाबलमारंभं वेगसंधारणं क्षयम् ।
यक्ष्मणः कारणं विद्याच्चतुर्थं विषमाशनम् ॥ च. चि. ८

साहस, वेगावरोध, शुक्रक्षय व विषमाशन या चार विप्रकृष्ट कारणांमुळें राजयक्ष्मा होतो. या कारणांचा सविस्तर विचार संप्राप्ति प्रकरणांत यावयाचा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवायशोकस्थाविर्य व्यायामाध्वोपवासतः ।
व्रणोरःक्षतपीडाभ्यां शोषानन्ये वदन्ति हि ॥ सु. ३–४१

अतिव्यवाय, शोक, वार्धक्य, अतिव्यायाम, पायीं प्रवास फार करणें, उपवास, व्रण, उरःक्षत या आठ कारणांनीं शोष विकार होतो. यांचा समावेश वरील चार कारणांत होवूं शकतो. हीं सर्व कारणें वात प्रकुपित करणारीं आहेत.

संसर्ग :—

राजयक्ष्मा हा एक सांसर्गिक विकार आहे. तो एका रोग्यापासून दुसऱ्या रोग्यांत पसरूं शकतो. सांसर्गिक व्याधी पुढील प्रमाणें प्रसार पावतात.

प्रसंगाद्गात्रसंस्पर्शान्निश्वासात्सहभोजनात् ।
एकशय्यासनाच्चैव वस्त्रमाल्यानुलेपनात् ॥
कुष्ठं ज्वरश्च शोषश्च नेत्राभिष्यंद एव च ।
औपसर्गिक रोगाश्च संक्रामन्ति नरान्नरम् । मा. नि. ४९

कुष्ठ, ज्वर, नेत्राभिष्यंद याप्रमाणें शोष हा हि एक औपसर्गिक विकार आहे. या रोगाचे जनक–दोष संसर्गानें पसरतात.

क्षय रोगाचा संसर्ग होण्याचे मार्गः–

१. गात्रसंस्पर्शात् -

त्वचेवाटें क्षयरोगाचे दोष शरिरांत प्रवेश मिळवूं शकतात. क्षय रोग्याचा संपर्क झाला तर असें होण्याची शक्यता असते. अगदीं बाल्यावस्थेंत किंवा त्वचा अत्यंत सुकुमार असेल, किंवा त्वचेवर एकादा व्रण असेल (फुटका कान वगैरे) तर त्यांतून हे दोष आंत जाऊन वास्तव्य करतात, व योग्य असें शरिरांत वातावरण मिळतांच प्रकुपित होऊन क्षयरोग निर्माण करतात.

२. निश्वासात्।

श्वासावाटें हा विकार जडूं शकतो. नाक, घसा, श्वसन मार्ग या वाटें क्षयोत्पादक दोष प्रवेश करतात. क्षयी माणसाच्या उच्छ्वासावाटें वायुरूप दोष बाहेर पडतात किंवा क्षयाचा रोगी खोकला म्हणजे त्या खोकल्यावाटें वायुरूप दोष बाहेर पडतात. या दोषाचा प्रवेश श्वासावाटें दुसऱ्याच्या प्राणवह स्रोतसांत झाला तर उपसर्गानें दुसऱ्याला हा रोग सुरूं होतो. विशेषतः ज्या लोकांना, पडसें खोकला, दमा असे विकार झाले आहेत, व या विकारांमुळें ज्यांचें प्राणवह स्रोतस पूर्वींच बिघडलें आहे व त्यामुळें त्या स्थानांतील प्रत्यनीक बल कमी झालें आहे अशांना या रोगाचा संपर्क बांधण्याची अधिक शक्यता असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. सह-भोजनात्

अन्नपानांतील पदार्थ स्वच्छ, पवित्र नसतील, त्यास क्षयजनक दोषांचा संसर्ग झाला असेल तर असे दुष्ट खाद्य, पेय पदार्थ पोटांत गेल्यामुळें क्षय रोगाचा प्रसार होतो. त्यांतल्या त्यांत, च्छर्दि, अपचन, अग्निमांद्य, अतिसार अशा रोगांनीं अन्नवहस्रोतसें बिघडलीं असतील, हतबल झालीं असतील, तर या दुष्ट अन्नाबरोबर आलेले दोष या स्रोतसांतून रसद्वारां, शरिरांत प्रवेश मिळवितात व योग्य काळीं वाढतात.

राजयक्ष्म्याचा प्रारंभ कांहीं रोगांतून होत असतो. हे रोग प्रथम होतात व त्यांतून क्षयरोग उद्भवतो.

१) ज्वर :- विषमज्वर, सान्निपातिक ज्वर या ज्वरानंतर क्षय रोगाला प्रारंभ होतो.

२) अतिसार :- प्रथम अतिसार होतो व अतिसारानें धातू क्षीण होतात व हा रोग प्रगट होतो.

("ज्वरातिसाराभ्यां शोषस्योत्पत्तेः"। डल्हण)

३) प्रथम पांच प्रकारांपैकीं कोणता तरी एक कास होतो व त्याची योग्य चिकित्सा झाली नाहीं म्हणजे त्यांतून क्षय होतो.

"क्षयायोपेक्षिताः सर्वे।" वा. नि. ३

४) श्वासांतून राजयक्ष्मा होतो.

५) प्रमेहाचा उपद्रव म्हणून 'शोष' होतो.

६) पांडुरोगांतील अलस हा जो भेद आहे त्यांत क्षय जोडीला निर्माण होतो.

७) प्रतिश्याय :-

साधें पडसें प्रथम येतें त्यांतून क्षयरोग होतो.

८) अग्निमांद्य :-

रोगाः सर्वेऽपि मंदेऽग्नौ।

प्रथम अग्निमांद्य असतें पुढें तें क्षयांत रूपांतरित होतें.

३ क्षय रोगाची संप्राप्ति.

प्रकुपित झालेले दोष शरिरांत प्रथम कसकसा व कोठें कोठें संचार करतात व कोणता देहदेश कोणत्या पद्धतीनें व्यापादित करितात, आणि शेवटीं या सर्व प्रक्रियांचा परिणाम क्षयरोगांत कसा होतो हें संप्राप्तिवरून कळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तैरुदीर्णोऽनिलः पित्तं कफं चोदीर्य सर्वतः ।
शरीरसंधीनाविश्य तान् सिराश्च प्रपीडयन् ।
मुखानि स्रोतसां रुध्वा तथैवातिविवृत्य च ।
सर्पन्नूर्ध्वमधस्तिर्यग्यथास्वं जनयेद् गदान् ॥ वाग्भट.

साहस, वेगावरोध, शुक्रक्षय आणि विषमाशन हीं क्षयरोगाचीं चार कारणें आहेत. हीं सर्व कारणें प्रथम वायूलाच प्रकुपित करणारीं आहेत. या कारणांनीं कुपित झालेला वायु पित्त कफांचें उदीरण करितो. म्हणजे वातप्रकोपाचा परिणाम बृंहण करणारा जो कफ त्यावर होतो व पचनावर होतो. पोषणासाठीं पदार्थ शरीरघटकांनीं आपल्याकडे घेणें (विसर्ग) व त्यांचें रूपांतर करणें (आदान) ह्या कफपित्तांच्या क्रिया या वातप्रकोपामुळें बिघडतात. शरीर घटकांचें पोषण करणारे अंश, (कफ) व त्यांना स्वरूप देणारे– पचन करणारे अंश (पित्त) यांना प्राकृतिक कार्यापासून च्युत करून त्यांना भलत्याच स्थानीं कार्यास लावलें जातें, कफपित्ताचें उदीरण– उत्क्लेशन केलें जातें व या कफपित्तांना शरीरभर फिरविलें जातें. सर्व संधींत हे दोष नेले जातात. दोन सजीव परमाणू जोडणारा जो भाग त्याला संधी असें म्हणतात. प्रत्येक शरीराचे अवयवांत अपरिसंख्येय परमाणू आहेत. त्या सर्व ठिकाणीं व सर्व सिरांमधून हे दुष्टी करितात. सर्व देहव्यापी जो रस तो प्रथम या दोषांनीं विकृत होतो. असा सर्व शरीरव्यापी हा विकार आहे. दुष्ट दोषांनीं अथांग शरीर व्यापिलें असलें तरी त्यांचा अनिष्ट परिणाम शरीरस्थ कोणत्या तरी स्रोतसावर घडतो. एका वेळीं एक किंवा अनेकही धातूवह स्रोतसें दोषांमुळें दुष्ट होण्याची शक्यता असते. त्यांत प्रमुख दुष्टी स्रोतसांच्या मुखांच्या रोधाची असते. स्रोतसें म्हणजे धातूत्पादन करणारे सजीव व सूक्ष्म असे या देहांतीलं घटक. ते एका मार्गानें आहार घेतात व त्या घेतलेल्या आहाराला धातूरूप देऊन दुसऱ्या अयनानें त्या धातूचें शरीरभर वहन करितात. शरीरांत जे सप्तधातू आहेत, त्या प्रत्येक धातूची स्वतंत्र स्वतंत्र अशीं स्रोतसें मानलीं आहेत व त्या त्या धात्वग्निकडून शरिरांत पचन होत असतें. रसधातूचा अग्नि रस पचवितो. रक्त धातूचा अग्नि, आहाररसाचें पचन करून त्याला रक्तरूप देतो. मांसधात्वग्नि मांसरूप देतो. याप्रमाणें सप्तधातूंचे सप्त अग्नि कार्य करून धातुपचन शरिरांत करीत असतात.

यथास्वेनोष्मणा पाकं शारीरा यान्ति धातवः ।
स्रोतसांच यथा स्वेन धातुः पुष्यति धातुना ॥ च. चि.

तीं तीं स्रोतसें आपापला आहार, आहाररसांतून घेऊन धातुपोषण करीत असतात, किंवा कफपित्तांच्या प्रकोपामुळें, रस हा आहार घेऊन त्याला रक्ताग्निकडून

CC-0. In Public Domain. Panini Kanya Maha Vidyalaya Collection.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्तरूप दिलें जातें व रक्तपोषण केलें जातें. स्रोतसद्वारां रक्ताचें सूक्ष्म अंश घेऊन मांसपोषण होतें. याप्रमाणें पूर्व धातूवर पुढला अथवा पर धातु पुष्ट होत असतो. असा धातुपोषणक्रम शरिरांत चालूं असतो. राजयक्ष्म्याच्या संप्राप्तींत पहिली क्रिया दुष्ट दोषांकडून या स्रोतसांवर घडते. स्रोतसांच्या प्रवेश अथवा आहार आंत नेणाऱ्या द्वाराचा दुष्ट दोषांकडून रोध केला जातो.

कफप्रधानैर्दोषैर्हि रूद्धेषु रसवर्त्मसु।
क्षीयन्ते धातवः सर्वे ततः शुष्यति मानवः॥ सु. उ.

दोषदुष्टीचा परिणाम रसादि स्रोतसांवर होऊन तीं स्रोतसें रुद्ध अथवा संकुचित होतात. अन्नवह स्रोतसांत अन्न घातल्यावर त्या अन्नाचें पचन होतें, रूपांतर केलें जातें, व त्यांत त्या अन्नाचें बाह्य जगांतील भौतिक स्वरूप पालटून त्याला शारीररूप देण्याचें प्राथमिक कार्य आंतड्यांनीं पचनांत होत असतें. त्यांत सार व किट्ट भागांचें विभजन होतें. व जो सार, व अत्यंत सूक्ष्म भाग त्याला रस असें म्हणतात. अन्न घटकांना असें सूक्ष्मत्व आल्याखेरीज त्याला रसधातु हें रूप प्राप्त होत नाहीं. व त्यांचें ग्रहणीमार्फत शोषणही होऊं शकत नाही. या शोषणक्रियेंत विवेक असतो. कित्येक घटकांना आंतड्यांतून रसांत प्रवेश मिळतो. पण ज्यांना मिळतो ते अत्यंत सूक्ष्म असतात. जे स्थूल घटक असतात त्यांना रसांत जाऊं दिले जात नाहीं.

आहाररस ग्रहणीमार्फत शोषण केल्यानंतर तो अन्नरसवाहिनीवाटें हृदयाकडे जातो व हृदयामार्फत त्याची विल्हेवाट वा व्याप्ति सर्व धातूंकडे होत असते. मग हा रस रक्तांत प्रवेश करतो; पण प्रवेश होण्यापूर्वी त्याला अधिक सूक्ष्म व्हावें लागतें. अन्नापेक्षां रस धातु हा सूक्ष्म आहे, पण त्यापेक्षांहि रक्त धातु सूक्ष्म आहे. रसाला रक्तरूप येण्यास अधिक सूक्ष्म व्हावें लागतें. त्याचें पचन व रूपांतर व्हावें लागतें. असें रूपांतर म्हणजे अधिक सूक्ष्मत्व आल्याखेरीज रसाला रक्तरूप लाभत नाहीं. रक्तापेक्षां मांस सूक्ष्म, मांसापेक्षां मेद सूक्ष्म, सर्वांत सूक्ष्म म्हणजे शुक्रधातु हा होय. रसाला रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र या सहा भट्ट्यांतून गेल्याखेरीज शुक्रता येत नाहीं. शुक्ररूप यावयाचें म्हणजे अधिक सूक्ष्म सूक्ष्मतर सूक्ष्मतम बनावें लागतें. म्हणजे त्या त्या स्रोतसांत रसाला प्रवेश मिळूं शकतो. नाहीं तर हा रस सारखा फिरतच असतो. त्याला सूक्ष्मत्व नसेल तर दर एक स्रोतसांत त्याला प्रवेश लाभणार नाहीं. त्याला पुढलें पुढलें सार वा सूक्ष्मरूप येणार नाहीं. रसापेक्षां रक्तवह, रक्तापेक्षां मांसवह स्रोतसें दूर दूरतर आहेत. सूक्ष्म सूक्ष्मतर आहेत. हें सूक्ष्मत्व अथवा दूरत्व स्थलापेक्षां परिणामावर अवलंबून असतें. सर्वांत शुक्रवह स्रोतसें दूर व सूक्ष्म आहेत. म्हणजे रसाचा सर्वांत सूक्ष्म सार भाग म्हणजे शुक्र धातु हा होय.

CC-0.In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजयक्ष्म्यांत स्रोतसांचा रोध असतो. म्हणजे ज्या द्रव्यांना पुढील धातुरूप, सूक्ष्मरूप यावयाचें तें येऊं शकत नाहीं. आहार रस असूनही त्याचें ग्रहण करण्याची क्रिया स्रोतसांकडून होऊं शकत नाहीं. रसरक्तादि स्रोतसांचा रोध असतो म्हणजे क्षयांत रसरक्तांचा प्रवाह बंद नसतो; रसरक्त वाहण्याची क्रिया चालूंच असते, पण विशिष्ट स्थानांतील रसादि धातुवह स्रोतसांची क्रिया–पुढील पुढील सूक्ष्म सूक्ष्म सार भाग निर्माण करणें व त्याला सजीव असें धातुरूप देणें ही क्रिया–थोड्याफार अंशानें मंदावते – रुद्ध होते, त्यामुळें रसावरोवर आलेल्या आहारांतील अंशांना त्या त्या स्रोतसांकडून तें तें धातूरूप प्राप्त होण्याची पुढली गती मिळत नाहीं. अन्नवटकाला रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र रूपापर्यंत जावयाचें असतें. व तें तें धातुरूप कांहीं काळ लाभल्यावर पुढें मलता घेऊन–वियोजन होऊन– त्याची शरिरावाहेर विल्हेवाट होत असते. शरिरांत शिरल्यापासून शरीररूप म्हणजे धातुरूप लाभणें, व पुढें मल म्हणून शरिरा-वाहेर जाणें यांत एक प्रकारची गति आहे. या गतीला राजयक्ष्म्यांत अडथळा होतो. अन्न कुटून, दळून, चावून कितीही सूक्ष्म केलें तरी त्याला धातूरूप येण्याचें दृष्टीनें तें स्थूलच ठरतें. दोषांमुळें द्रव्याला सूक्ष्मत्व येत नाहीं; त्यामुळें त्या त्या धातूंत द्रव्याला रोध होतो. रसवह स्रोतसें सर्व शरीरभर आहेत त्यामुळें हा रोध सर्व शरीरभर होईल, किंवा या दुष्ट रसाच्या प्रभावामुळें, अथवा एकाद्या स्थानीं पूर्वींचेंच वैगुण्य असेल तर त्या स्थानींच फक्त रसवह स्रोतसांत रोध उत्पन्न होईल. यामुळें रोधास प्रारंभ कदाचित फुप्फुसांत होईल, कदाचित कंठांत होईल, किंवा शिर स्थानापासून होईल, संधींत होईल, आंतड्यांत होईल. शरीरस्थ कोणत्याहि स्थानीं या रोधाला प्रारंभ होईल. किंवा दोष वलवान असेल तर एकाच वेळीं एकापेक्षां अधिक स्थानीं होईल, अथवा एकामागून दुसऱ्या स्थानीं ही रोधव्याप्ती होत जाईल. रसाप्रमाणें कधीं रक्तवह स्रोतसांचा रोध एकदेशीं वा अधिकदेशीं होईल. याप्रमाणें विविध धातूंच्या स्रोतसांत, क्षयकृत दोषांमुळें स्रोतोरोधाला प्रारंभ होईल. शरीरघटक रसरक्तादि धातूत्पादनांत सतत गुंतलेले आहेत. त्यांच्या क्रियेंत दुष्ट दोषांमुळें व्यत्यय येतो.

कफप्रधान दोषांनीं रसवह स्रोतसांत रोध होतो असा उल्लेख सुश्रुतांनीं केला आहे. कफप्रधान द्रव्यें आंतड्यांत पचली, ग्रहणीकडून शोषली गेली तरी त्यांना क्षयरोगांत रसरूप येत नाहीं. कफ स्थूल असतो त्यामुळें त्याचे परमाणू स्रोतसांत अडकून रोध करतात. अभिष्यंद निर्माण करतात. वातप्रधान दोषांनीं धातूंचा क्षय होतो. त्यामुळें स्रोतसें वातानें रूक्ष व संकुचित होतात. पित्तप्रधान दोषांनीं स्रोतसांत दाह व पाक होतो. क्षय रोगांत तीनीही दोषांचें प्राबल्य असेल तर अभिष्यंद, दाह, व संकोच ह्या तीनही प्रक्रिया घडतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षयांतील स्रोतोरोधाची कल्पना, व त्या स्रोतोरोधाचे परिणाम पुढील सूत्रांत चरकाचार्यांनीं वर्णन केले आहेत.

स्रोतसां सन्निरोधाच्च रक्तादीनां च संक्षयात् ।
धातूष्मणां चापचयाद्राजयक्ष्मा प्रवर्तते ॥ च. चि.

स्रोतसांच्या संरोधामुळें, रक्तादिधातूंचा क्षय, व जोडीला धात्वग्नीचा नाश यामुळें राजयक्ष्मा होतो.

धातुक्षयः–

राजयक्ष्म्यांत धातूत्पादक स्रोतसें रुद्ध अथवा संकुचित होतात. त्यामुळें जे पदार्थ घेऊन धातूत्पादन व्हावयाचें ते पदार्थच धातूकडे मार्गावरोधामुळें येऊं शकत नाहींत. धातूपोषक अथवा बृंहण पदार्थ खाऊनही त्या द्रव्यांना स्रोतोरोधामुळें धातूंत प्रवेश मिळत नाहीं. त्यामुळें धातू क्षीण क्षीण होत जातात. जो धातु पोषणासाठीं रस धातूकडे येतो तो स्वतः अप्रबल असल्यामुळें दोष दुष्टीमुळें स्रोतसांचे मुखांत निर्माण झालेला रोध दूर करूं शकत नाहीं. त्यामुळें धातूकडे पोषक रस येण्यास अडचण होते व पोषणाभावीं धातूंचा ऱ्हास होतो. स्रोतोरोधाचा धातूक्षय हा एक मोठा परिणाम आहे. आहारांत धातुपोषक द्रव्यें नसतील तर शरीर क्षीण होईल, क्षय होईल. पण पोषक द्रव्यें खावयास मिळत असूनही या स्रोतोरोधामुळें क्षय होतो. तसेंच धातूंचे पोषणापेक्षां धातूंची झीज अथवा नाश अधिक झाला तरीही धातु क्षीण होतील. अभिघातानें व्रण झाला तर या व्रणांतून रक्ताचा स्राव होऊन रक्तधातूचा क्षय होईल. अतिव्यवायामुळें शुक्र धातूचा क्षय होतो. वारंवार गर्भधारणा, प्रसूती, मुलाकडून दीर्घकाल स्तनपान, अत्यार्तव यांत स्त्री देहांतील धातूंचा क्षय होत असतो. अतिव्यायामाचा परिणाम मांस व मेद या धातूंवर होतो. अति चिंता अथवा विचार यानें रसक्षय होतो. भीति, शोक चिंता यामुळें ओजक्षय होतो. अशी स्रोतोरोधाखेरीज धातुक्षय घडवून आणणारीं अनेक कारणें असतात. पण हे धातुक्षय ते ते धातुवर्धक आहार देऊन व भरपूर विश्रांति देऊन भरून येऊं शकतात.

या सर्व प्रकारच्या धातुक्षयाचे प्रकारांत स्रोतोरोधजन्य धातुक्षयाला फार मोठें महत्त्व क्षय रोगांत असतें. स्रोतोरोध व धातुपोषक सार भाग कमी उत्पन्न झाल्यामुळें राजयक्ष्म्यांत धातुक्षय मुख्यतः होत असतो. यामुळें या रोगांत झालेला धातुक्षय फक्त धातुसमान द्रव्यें देऊन भरून येत नाहीं. स्रोतोरोध असतो तो दूर करणारीं द्रव्यें द्यावीं लागतात. नुसता मांसक्षय, समान द्रव्यें अथवा मांस देऊन भरून निघेल पण क्षय रोगांतील मांसक्षय भरून काढण्यास त्या मांसाबरोबर स्रोतोरोध दूर करणारें द्रव्य जे मद्य ते दिलें पाहिजे म्हणजे स्रोतोरोध दूर होईल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व धातुक्षय भरून येईल हें चिकित्सकाला समजावें म्हणून क्षयरोगाची संप्राप्ति समजणें आवश्यक असतें.

स्रोतोरोधामुळें पुढील धातुपोषक सार भाग जो प्राकृतिक स्थितींत निर्माण व्हावयाचा तो निर्माण होत नाहीं किंवा कमी निर्माण होतो. उदाहरणार्थ मांसपचनांत स्थूल भाग मांस, मल भाग रक्त मल व सूक्ष्म भाग मेद हा असतो. हा सूक्ष्म अथवा सार भाग मेद हा मेद पुष्ट करितो. आमाशय अथवा पचनमार्गांत अन्न पचून आहार रस निर्माण होतो. पण क्षयरोगांत स्रोतोरोध असल्यामुळें आंत्रांतून रसाकडे जितका रसाचा झिरपा व्हावयाचा तितका होत नाहीं. रसपोषक सार भाग पचनांत कमी निघतो. तसेंच प्रत्येक धातूंत पचन असतें. प्रत्येक पचनांत सार भाग निर्माण होतो, हा सार भाग धातूंचें सार राखतो, पुढील धातु पुष्ट करतो. पण राजयक्ष्म्यांत धातुपाकांत सार भाग कमी निर्माण होतो त्यामुळें धातु असार बनूं लागतात.

दोषैर्मन्दानलत्वेन सोपलेपैः कफोल्वणैः ।
स्रोतोमुखेषु रुद्धेषु धातूष्मस्वल्पकेषु च ।
विदह्यमानः स्वस्थाने रसस्तांस्तानुपद्रवान् ।
कुर्यात् । अ. हृ. नि. ५

व धात्वग्नि क्षीण होतात. धातुक्षीणतेमुळें व दोषप्रभावामुळें धातूंचेकडे आलेल्या रसाचें पचन होऊं शकत नाहीं. अन्तःकोष्ठांत यदाकदाचित थोडें फार पचन नीट झालें व त्यांत आहाररस निर्माण झाला तरी हा आहाररस खाणारे जे धातु त्यांच्या ठिकाणचा अग्नि मंद असल्यामुळें आलेला रस पचत नाहीं, सार अंश निर्माण होत नाहीं, व हा रस विविध स्थानांत अडतो. कदाचित् हा उरःस्थानांत अडेल, कदाचित् कंठांत अडेल, कदाचित् ग्रहणींतही अडेल. धात्वग्नि मंद असतील तेथें अडेल, स्वप्रभावामुळें अथवा खवैगुण्यामुळें तो शरिरांत विविध स्थानीं अडण्याचीं शक्यता असते. असा रस त्या त्या देहदेशांत पचला नाहीं तर तो रस अपक्व राहतो. हा रस धातूंनीं पचन न केल्यामुळें नुसता स्वस्थ रहात नाहीं; त्याचें स्वतःचेंच पचन सुरू होतें. तो सडतो, नासतो, आंबतो, विदग्ध होतो व त्यामुळें त्यांत तीक्ष्ण, ऊष्ण, सूक्ष्म, व्यवायी, विकाशी असे जे गुण प्रथम नव्हते ते त्यांत निर्माण होतात, व त्या दुष्ट रसाचा फैलाव होण्यास अधिकच मदत होते. असा विदग्ध पावलेला रस अभिसरणाच्या गतीप्रमाणें पुढें रक्तमांसादि धातूंकडे जाऊं लागतो व त्या त्या पुढील पुढील धातूंत त्याला आश्रय मिळाल्यामुळें, त्या त्या धातूंत या रोगाचा प्रसार होत जाऊन राजयक्ष्म्याचे पुढचे पुढचे धातूंतील विविध असे उपद्रव निर्माण होण्यास प्रारंभ होतो. तो अधोभागीं देहदेशांत गमन करतो किंवा तिर्यग्गमन होतो व त्याची विल्हेवाट करण्याची जबाबदारी शरीरावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडते. मग यामुळेंच कास, श्वास, प्रतिश्याय, अतिसाररूपानें असे दोष बाहेर काढण्याचे मार्ग शरीराला शोधावे लागतात. किंवा त्यांचें पचन– रूपांतर करून ते दोष हतबल करण्यासाठीं कायाग्नीला या दोषांकडे आणावें लागतें. यालाच क्षयांतील ज्वर असें म्हणतात. रक्तवह स्रोतसें रुद्ध झालीं, रक्तपोषक सार भाग मांसाकडे जाण्याचें थांबलें म्हणजे या रक्ताला विलोम गती मिळते व तें रक्त मग खोकल्यावाटें वा च्छर्दिवाटें रक्तपित्तरूपानें या रोगांत बाहेर पडूं लागतें. स्रोतोरोधाचा परिणाम जसा पुढच्या धातुक्षयांत होतो, तसाच परिणाम रुद्ध झालेल्या मागील रसावर होतो. रोधामुळें मागील धातुपोषक अंश रस-रूपानें वाढतात. या वृद्धीमुळें स्रोतसें विकसित होतात. रसाचा पुढें जाण्याचा मार्ग रुद्ध झाला म्हणजे रसाला विलोम गति लाभते व तो मागें मागें सांठत जातो व असा सांठला म्हणजे मागील मागील स्रोतसांचा भाग फुगीर होतो.

"तथैव अतिविवृत्य च ।"

मग या रसाला शरीराबाहेर काढून टाकण्यासाठीं बहिर्मुख स्रोतसांचीं द्वारें -लक्षणद्वारें देहांतील वैद्याला उघडावीं लागतात. धातूमध्यें झालेल्या स्रोतोरोधाला असा दुसरा मार्ग काढून द्यावा लागतो. यासाठीं त्या दुष्ट दोषांना शरिराच्या अधो वा तिर्यग् भागांत गमन करावें लागतें. यामुळें ऊर्ध्व देहांत, अधर देहांत, तिर्यग् देहांत राजयक्ष्म्याचीं विविध लक्षणें प्रगट होतात. या सर्व संप्राप्तीला राजयक्ष्मा असें म्हणतात.

अनुलोम क्षय

क्षय रोगाची संप्राप्ति कित्येक वेळां प्रथम रसवह स्रोतसांवर घडते. रसवह स्रोतसें रुद्ध होतात, त्यामुळें रस धातूच्या पाकाचीं लक्षणें सुरू होतात. पुढें दोषांचें प्राबल्य वाढत गेलें तर रसाचा पुढील धातु जो रक्त त्या रक्तवह स्रोतसांचा रोध होतो. त्यामुळें रक्तक्षय व त्याची क्षीणतेचीं लक्षणें सुरू होतात. हेच दोष पुढें वाढत गेले तर परिणाम मांसवह स्रोतसांवर होऊन मांसधातूच्या क्षयाला प्रारंभ होतो. याप्रमाणें प्रथम रसक्षय त्यानंतर रक्तक्षय, पुढें मांसक्षय, त्याच्यानंतर मेदःक्षय असा क्रमानें पुढील पुढील धातूंचा क्षय होऊं लागणें याला अनुलोम क्षय असें म्हणतात.

क्रमपरिणामपक्षाप्रमाणें रसवह स्रोतसांचा रोध झाला तर रसाकडून रक्ताचें पोषण नीट होत नाहीं, रक्तक्षय होतो, रक्तक्षीणतेमुळें मांसक्षय होतो. असे पूर्वधातुक्षयाचे परिणाम पुढील परधातुक्षीणतेवर अनुलोम प्रकारांत होतात असें म्हटलें तरी चालेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षयी माणसांत जे धातु सारवान किंवा बलवान असतील त्या धातूंच्या क्षयास प्रथम प्रारंभ कधींच होत नाहीं. उलट शरिरांत जे धातु अबल किंवा असार असतील त्या धातूंवर क्षयकर दोषांचा परिणाम प्रथम होतो व ते क्षीण झाले म्हणजे मग सरते शेवटीं सारवान धातूवर परिणाम होऊं लागतो. एकाद्या माणसांत रक्त, मांस हे धातु असार असतील व अस्थि मज्जा हे धातु सारवान असतील तर दोषदुष्टीचा परिणाम असार धातूंवर प्रथम होऊन रक्त व मांस या धातूंच्या क्षयाचीं लक्षणें प्रथम दिसतील व शेवटीं अस्थि व मज्जा या सारवान धातूंच्या क्षयाचीं लक्षणें आढळून येतील. यासाठीं दोषांचा सामान्यतः परिणाम कोणत्या धातूवर प्रथम होणार हें धातूंचें सारासारत्व पाहून वैद्याला जाणतां येतें.

क्षय होतांना पुढच्या अथवा पर धातूचा क्षय होण्यास पूर्व अथवा मागील धातूचा अगदीं संपूर्ण क्षय होण्याची जरूरी नसते. उलट शरीर जिवंत असेपर्यंत कोणत्याच धातूचा पूर्ण क्षय कधींच होत नाहीं. जीवन चालूं ठेवण्यास किमान आवश्यक तेवढे धातु त्या शरिरांत असतातच. यासाठीं क्षय म्हणजे संपूर्ण क्षय असें मानतां येत नाहीं.

अवशन, विषमाशन हें कारण असेल तर रसक्षयापासून प्रारंभ होईल व मग पुढल्या रक्त वा मांसक्षयाला प्रारंभ होईल, किंवा जो असार असेल त्याचीं लक्षणें होतील. व्यायामामुळें प्रथम मेदक्षय होईल व पुढें अस्थिक्षय होईल तर त्याला अनुलोम क्षय असें म्हणतां येईल.

विलोम क्षयः–

प्रथम एका धातूंत क्षय झाला तर त्याचा परिणाम त्याच्या मागील अथवा पूर्व धातूच्या क्षयांत होणें याला प्रतिलोम अथवा विलोम क्षय असें म्हणतात.

अतिव्यवायिनो वाऽपि क्षीणे रेतस्य नंतरम् ।
क्षीयन्ते धातवः सर्वे ततः शुष्यति मानवः ॥ सु. उ.

अति व्यवायाचा परिणाम म्हणून शुक्रक्षय होतो. प्रथम परिणत शुक्रधातु बाहेर पडतो, पण पुढें तसाच व्यय चालूं ठेवला तर परिणामापद्यमान शुक्र धातूवर बाहेर पडण्याची पाळी येते. मग याचा परिणाम शुक्राचा पूर्वधातू, मज्जाधातु, यावर होतो. मज्जा धातूला प्रथम परिणत व मग परिणामापद्यमान घटक शुक्रधातूकडे पाठवावे लागतात. यामुळें मज्जाधातूवर जास्तच कर्षण पडते. मज्जाधातूच्या क्षयाचा परिणाम अस्थीवर होतो. कारण मज्जापोषण करणें हें अस्थीचें कार्य आहे. अस्थीचें जास्त कर्षण झाल्यास मज्जाक्षयानंतर अस्थिक्षय होतो. याप्रमाणें पूर्व पूर्व धातूवर क्षयाच्या संप्राप्तीचा परिणाम होत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाणें याला प्रतिलोम क्षय असें म्हणतात. समुद्र आटूं लागला म्हणजे त्यास येऊन मिळणाऱ्या नद्याहि आटतात. नदीला खालीं–पुढील गतीकडे तुंबाडा असला म्हणजे वर पाणी अधिक प्रमाणांत राहूं शकतें. खालीं पाणी कमी झालें कीं वरील नदीप्रवाहांतील पाणीहि लवकर कमी कमी होते. नरसिंहवाडीला पंचगंगेला पूर आला म्हणजे वर कृष्णा नदी सांगली-मिरजेकडे तुडुंब भरून असते, पण पंचगगा ओसरली कीं वरील कृष्णेचें पाणीही कमी होतें. तसेंच शुक्रक्षय झाला कीं, शुक्रांत परिणत होणाऱ्या मज्जादि धातुवाहिन्यांतील धातूंचा ऱ्हास होऊं लागतो. शुक्र धातु सर्व शरीरांत व्याप्त आहे व त्यांतच इतर धातु परिणत होत असतात. जलाशयांतील पाणी आटूं लागलें म्हणजे त्यांत वास्तव्य करणारे मत्स्य, कूर्मादि जलचर प्राणी किंवा त्या जलाशयांतील कमलिनी आणि कमळें जशीं शुष्क होतात, त्याप्रमाणें शुक्रावर अवलंबून असणारे पूर्वधातूही क्षीण होत जातात. अशा रीतीनें मागील मागील धातूंवर परिणाम होत गेला म्हणजे त्याला विलोम अथवा प्रतिलोम क्षय म्हणतात.

राजयक्ष्म्यांतील कोष्ठस्थ पचनः–

या रोगांत कोष्ठस्थ पचनही बिघडून गेलेलें असतें. स्रोतोरोध, धात्वग्निमंदता, धातुक्षय यांचा परिणाम पचन करणाऱ्या अवयवांवरही झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण कायाग्नि हा ग्रहणीच्या आश्रयानेंच असतो व ग्रहणी हा अवयव धातूंचाच बनलेला आहे. इतर शरीरस्थ धातूंचे व्यापार जसें बिघडतात तसें ग्रहणीघटित मांस धातूचेहि व्यापार बिघडतात. त्यामुळें कोष्ठस्थ अन्नपचनांत विकृति होते.

तस्मिन् काले पचत्यग्निर्यदन्नं कोष्ठसंश्रितम् ।
मलीभवति तत् प्रायः कल्प्यते किंचिदोजसे ॥ च. चि. ८

प्राकृतिक अन्नपचनांत कांहीं सारांश व कांहीं किट्टांश निर्माण होतो. अन्नाचा सारांश म्हणजे आहार रस, आणि किट्टांश म्हणजे विष्ठा व मूत्र. राजयक्ष्म्यांतील दोषवैषम्यामुळें अग्निही विषम होतो आणि पाकांत सार भाग कमी प्रमाणांत निर्माण होतो व किट्ट भागच जास्त प्रमाणांत निघतो. प्राकृतिक स्थितींत अग्नि सम असला म्हणजे द्रव्यस्वभावानुरूप सारांश कमी अधिक प्रमाणांत निर्माण होत असतो. भात हें द्रव्य खाल्लें गेलें तर तें अत्यंत सारवान द्रव्य असल्यामुळें कोष्ठस्थ पचनांत त्यापासून सार भागच अधिक निघतो व मलिन भाग अत्यंत अल्प निघतो. याचे उलट पावटे, चवळी, यव असें अन्न खाल्लें गेलें कीं त्यांचे पचनांत आंतड्यांत तेजोभूत असा सार भाग कमी तयार होतो व हिणकस असा मल भाग जास्त तयार होतो. कारण हा त्या द्रव्याचा स्वभावच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साळींत अल्पमलत्व व यवादिकांत बहुमलवर्धकत्व हे गुण आहेत. राजयक्ष्म्यांतील पचनांत अग्निविकृतीमुळें उलटेंच घडते. अग्नीचा विचित्र स्वभाव असा बनतो कीं त्या पाकांत भरपूर दूध, मध, साखर, साळी अशीं सारवान द्रव्यें पोटांत घातली तरी त्यांची पाकनिष्पत्ती सार रसांत होत नाहीं. उलट त्या पाकांत मलमूत्रच अधिक तयार होतात. यवादि मलोत्पादक द्रव्यें घातलीं तर अधिकच किट्ट निर्माण होतें.

तदा जन्तुर्यद्यदाहारजातमाहरति तत्तदस्य मूत्रपुरीषमेवोपजायते भूयिष्ठं नान्यस्तथा शरीरधातुः ॥ च. नि. ६

पाकांत सार भाग रस जो निर्माण होतो तो धातुपोषणास पुरेसा नसतो. रसाजवळचा जो धातु रक्त त्याचें सुद्धां पोषण यांतून होऊं शकत नाहीं; मग रक्तापुढील मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र हे दूर दूरचे जे धातु आहेत त्यांचें पोषण होणें अशक्यच असतें. केवळ सार भाग जो निष्पन्न होतो त्याच्या झिरप्यावर धातु कसेंबसें जीव धरून असतात, इतकेंच.

अवष्टंभः स शकृता केवलं वर्तते क्षयी । वा. नि. ५

पोषक सारभागाची उत्पत्ति कोठ्यांतच कमी होत असल्यानें, धातूंचे पोषण आतां रसावर फारसें होत नाहीं. त्या देहांतील धातु मलावरच जगतात. प्राकृतिक स्थितींत सारांशावर धातु पुष्ट होत होते. आतां विकृत अथवा आपत् काळीं हिणकस मलिन आहार घेऊन धातु जीवन कंठीत असतात. सुगंधी आंबेमोहोर तांदुळ खाण्याची पूर्वी संवय अनेकांना होती पण आपत्ती काळांत, धान्याचें नियंत्रण बसल्यावर उकडा व अत्यंत घाणेरडा असा तांदूळ खाऊन त्यांना देह जगवावा लागला. आपत्तीचे काळांत आहार बदलला तर त्यांतही जगण्याची खटपट या जिवंत शरिरांत चालते; त्यांतूनही कांहीं उपयुक्त भाग घेऊन जीवन जगविलें जातें. प्राकृतिक स्थितींत आहाररसापासून रस, रक्तादि धातु जसे पुष्ट होतात, तसेच पाकांत जे किट्ट निर्माण होतें त्यापासून स्वेद, मूत्र, केश, नखादि शारीरमल पुष्ट होतात.

"किट्टात् स्वेदमूत्रपुरीषवातपित्तश्लेष्मणः कर्णाक्षिनासिकास्यलोमकूप प्रजननमलाः केशश्मश्रुलोमनखादयश्चावयवाः पुष्यंति ॥" च. सू. २८

राजयक्ष्म्यांत किट्टच जास्त प्रमाणांत निर्माण होत असल्यानें शरिरांतील सर्व मल अधिकच वाढतात व या मलावरच शरीर जगतें.

'सर्वधातुक्षयार्तस्य बलं तस्य हि विड्बलम् ॥"

प्राकृतिक स्थितींत मानवाचें बल दोष, धातु व मल या त्रयींवर अवलंबून असतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राकृतिक कफाच्या कार्यांत शरिराला बल देणें (बलकृत्) हें एक प्रमुख कार्य असतें. हें कफाचें बल व सप्त धातूंच्या आश्रयानें असणारें धातुबल यांचा राजयक्ष्म्यांत क्षय झालेला असतो व आतां त्यापुढील अवस्थेंत क्षयी रोगी केवळ पुरीषाच्या बलावर जगत असतो; प्राकृतिक स्थितींत पुरीष मानवाचें देहधारण करीत असतो.

अवष्टंभः पुरीषस्य । वा.
पुरीषमुपस्तम्भं वाय्वग्निधारणं च । सु.

पुरीष हा निःसार असला तरी देहाला बल देत असतो. पुरीष कटु रसाचा असतो व या कटु रसांतून शरिराला पाहिजे तेवढे वायवीय अंश मिळत असतात. त्याचप्रमाणें आग्नेय अंशही शरिराला या पुरीषांतून घेतां येतात. अग्नीचें स्थान मुख्यतः ग्रहणींत आहे. मधुर, अम्ल व कटु असे तीन अवस्थापाक झाल्यावर, त्या किट्टांतून शरिराला उपयोगी पडणारे वायूचे व अग्नीचे अंश शरिराच्या काटकसरी व्यापारांत पक्वाशयाकडून घेतले जातात, ते परत रसांत मिसळतात व शरिराच्या व्यापारांत त्यांचा उपयोग केला जातो.

मलप्रवृत्ति अधिक वा वारंवार झाली, किंवा अतिसाराच्या अवस्थेंत शीघ्र गतीनें आंतड्यांतील पदार्थ गुदाकडे नेले गेले तर त्या मलावाटें पित्ताचें अंशही शरिरांतून बाहेर पडतात. त्यामुळें अग्नीचे अंश कमी पडून अग्नि अबल होतो, पण प्राकृतिक स्थितींत अग्नीला बल देणें हें एक पुरीषाचें कार्य आहे.

त्याचप्रमाणें उपस्तंभ म्हणजे आशयाला बल देणें हें एक महत्त्वाचें पुरीषाचें कार्य आहे. पुरीषामध्यें घेतलेल्या अन्नाचा मल भाग असतोच, शिवाय त्याचे जोडीला इतर धातूंचे स्थूल व पार्थिव मल, ज्यांचें निःसरण या मार्गानें होणें शक्य व इष्ट आहे तेहि मल, पक्वाशयांतून पुरीषावाटें बाहेर पडत असतात. रसाचा मल कफ हा तोंडांत व आमाशयांत असतो. तो बोधक व क्लेदक कफ या नांवानें संबोधिला जातो. पचनक्रियेंत तो अन्नाशीं मिश्रित होतो, पचन क्रियेंत भाग घेतो व अन्नांत शैथिल्य निर्माण करतो, मार्दव आणतो. पाकानंतर याच पक्व कफाचे अंश अन्नांतील किट्टाबरोबर संमिश्र होतात व ते पुरीष म्हणून बाहेर पडतात.

रक्ताचा मलहि, ज्याला पित्त म्हणतात, तो पचन करण्यास आंत्रांत येतो. आम पित्ताचा वर्ण नील असतो, पच्यमान पित्ताचा वर्ण हारित आणि पक्व पित्ताचा वर्ण पीत असतो. प्राकृतिक स्थितींत पुरीषाला पित्ताचा वर्ण पीत हाच आलेला असतो. अतिसारांत आंतड्याची गति शीघ्र झाल्यानें अपक्व किंवा पच्यमान पित्त, विरेचनावाटें बाहेर पडतें व त्यामुळें मलाला पिवळट, हिरवट हे वर्ण येत असतात. हे वर्ण रक्त धातूच्या पित्त या मलाचे आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांसधातूचे मलही आंतड्यांत येतात. तोंडांत रसमल कफ असतो. त्याचप्रमाणें जिव्हा, दंतमूल, ओष्ठ यांचें ठिकाणीं मांसमल (मलः खेपु) ही असतो. आंतडीं हीं प्रत्यक्ष मांसाचींच आहेत; त्यांचें स्वतःचें धातु म्हणून पचन सुरू असतें, तीं झिजतात. त्यापासून मल होतो. हा मल आंतड्यांत सांठतो व तो पुरीषाबरोबरच बाहेर टाकला जातो.

मेदाचा मल स्वेद याचीं निर्गमनद्वारें हीं त्वचेंतील रोमकूपें जरी असलीं तरी, त्याचें विवेचन मूत्रपुरीषाबरोबर आंतड्यांतच होतें.

अस्थिधरा कला व पुरीषधरा कला यांचा अन्योन्य निकट संबंध आहे. अस्थिधातु क्षीण झाला असतां, तिक्त रसयुक्त क्षीर, घृताचे वस्ति देतात. म्हणजे अस्थीसाठीं चिकित्सा पक्काशयावर करावी लागते. यावरून पक्काशय व अस्थिधरा कला यांचा निकट संबंध असावा असें अनुमान निघतें. मज्जामल स्निग्ध असतो व तो त्वचा, नेत्र व पुरीष या तीन मार्गांनीं बाहेर पडतो. पुरीषाला जो स्निग्धपणा असतो, तो मज्जाधातूच्या मलाचा असतो, व त्यामुळें मलविसर्जनाची क्रिया अपानाकडून व्यवस्थित होत असते.

अशा रीतीनें अन्नाचा स्थूल व घन मल पुरीष, या बरोबर शरीर धातूंचेही स्थूल आणि घन मल पक्व होऊन बाहेर पडत असतात. पक्वाशय अथवा स्थूलांत्र यांचा शेवटचा भाग, (गुदाच्या अलीकडचा भाग) हा मलधारण करणारा आहे. या भागाचें मलनिस्सरणक्रियेवर, आंत्रांतील वरील भागांची निस्सरणक्रिया जशी अवलंबून असते त्याचप्रमाणें शरीरस्थ धातूमलांचेंहि बहिर्गमन अवलंबून असतें. मल धारण करण्याची क्रिया कमी अधिक झाली तर त्याचा परिणाम शरीरस्थ सर्व धातूंवर, धातूंचे मलांवर होतो. मलनिःसरण जास्त प्रमाणांत, वारंवार, शीघ्र गतीनें झालें तर त्याचा परिणाम कफवातपित्तादिक धातुमलांवर होतो. हे धातूंचे मलही अधिक प्रमाणांत अधोमार्गानें बाहेर पडतात. दोष, धातुप्रमाणें शरीरधारणाला या मलांचीही कांहीं प्रमाणांत आवश्यकता असते. कांहीं काल हे मल शरीरव्यापार करतात, व मग कृतार्थ होऊन पुरीषमार्गानें शरीराबाहेर पडतात. पण मलविसर्जन अधिक प्रमाणांत झालें, तर धातूंचे जे हीन- मलीन भाग शरिरांत शरीरव्यापार चालण्यास आवश्यक आहेत ते ही या अतिसरणांत येतील. तसेंच अद्याप ज्या धातुघटकांना पक्वता अथवा मालिन्य यावयाचें आहे तेही तीव्र अतिसाराच्या अवस्थेंत पक्वाशयाकडे वाताकडून आणले जाऊन मलावाटें बाहेर पडतील, व त्यामुळें या अतिसाराचा परिणाम तीव्र धातुक्षयांत होईल. पक्वाशय हा मल धारण करतो. शरीरस्थ धातूंचे मल कमी अधिक प्रमाणांत पक्वाशयाकडे येणें हा गोष्टि त्यावर अवलंबून असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मलांच्या निर्गमनावर धातूंची शरीरस्थिति अवलंबून असते. धातूंत उत्पत्ति, स्थिति, व लय हीं चालूं असतात. मल लवकर लवकर निघून जाऊं लागला म्हणजे धातूंचें संरक्षण नीट होणार नाहीं. धातूंचेंही लवकर लवकर विघटनेकडे– मलाकडे– आकर्षण होईल. व त्यामुळे देहांतील धातुबल ही कमी होईल. यासाठीं पुरीषाकडे शरीरबल धारण करणें हेंहि एक कार्य असतें. त्याच्या कार्यावर धातु-बल व दोषबल हें अवलंबून असते.

क्षयी मनुष्यांत दोष, व धातुबल हीं क्षीण झालेलींच असतात व तो केवळ मलाचे बलावर तग धरून असतो. या स्थितींत त्याला अधिक काल जगतां यावें म्हणून त्याच्या या मलबलाचें रक्षण करणें आवश्यक असतें, धातूंवर सर्वस्वीं बल अवलंबून असतें, पण धातू क्षीण झाले असतां विट् हे एकमेव बल उरतें.

पुरीषं यत्नतो रक्षेच्छुष्यतो राजयक्ष्मिणः ।
सर्वधातुक्षयार्तस्य बलं तस्य हि विट्बलम् ।। वा. चि.

अशा स्थितींत जर त्याला अतिसार सुरूं झाला, तर पुरीष अधिक प्रमाणांत निघून जाईल. पक्काशयाचे धातूंचें मल धारण करण्याचें कार्य होणार नाहीं. धातूंना लवकर लवकर मलीनत्वाकडे यावें लागेल व त्यामुळें शरिरांत राहून धारण करण्याची ज्याची कामगिरी आहे असेहि घटक बाहेर पडतील.

"शोषी मुंचति गात्राणि पुरीषस्रंसनादपि ।।"

आणि क्षयी मनुष्य विरेचनानें लवकर मरेल. या साठीं ज्याचें धातुहेतुक बल क्षीण झालें आहे अशा क्षयी माणसास विरेचन देऊं नये. शक्य तों जें शेष, विट्बल राहिलें आहें त्याचें रक्षण करावें.

राजयक्ष्म्याची कारणानुरूप संप्राप्ति :–

राजयक्ष्म्याचीं मुख्यतः चार कारणें आहेत.

साहसं वेगसंरोधः शुक्रौजः स्नेहसंक्षयः ।
अन्नपानविधित्यागश्चत्वारस्तस्य हेतवः ।। वा.

साहस, वेगावरोध, शुक्र व ओज या स्निग्ध द्रव्यांचा क्षय आणि अन्नपान-विधीचा त्याग, ही क्षयाचीं चार कारणें आहेत. या कारणांपैकीं जें कारण घडलें असेल त्याप्रममाणें क्षय रोगाचा प्रारंभ, लक्षणें व चिकित्सा यांत फरक पडत असतो. यासाठीं या चार कारणांचा व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या क्षय रोगाचा थोडा भिन्नत्वानें विचार करावा लागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. साहस :-

आपली शक्ती किती आहे याचा अंदाज न घेतां एकदम शक्तीबाहेरची क्रिया करण्यास धजणें याला साहस असें म्हणतात.

युद्धाध्ययनभाराध्वलंघनप्लवनादिभिः
पतनैरभिघातैर्वा साहसैर्वा तथाऽपरैः ।
अयथाबलमारंभैर्जन्तोरुरसि विक्षते ।
वायुः प्रकुपितो दोषावुदीर्योभौ प्रधावति ॥ च. चि.

आपलें बल न पहातां बलवानाबरोबर कुस्ती खेळणें, अतिशय बडबडणें, फार मोठमोठ्यानें पाठांतर करणें, फार मोठें ओझें अथवा वजन उचलणें, पर्वत, डोंगर, यांचें उल्लंघन करणें, फार दूरपर्यंत पोहणें, फार मार्गक्रमण करणें, पडणें, मार बसणें, याप्रमाणें इतरही,- ज्यांत शरिराला एकदम श्रम होतात अशा- अन्य साहसांमुळें राजयक्ष्मा होतो. अतिश्रम, अतिव्यायाम यांचा परिणाम उरःस्थानावर होतो. हृदय फुप्फुस यांना अधिक काम करावें लागतें. एकदम त्यांच्यावर ताण पडतो. किंवा त्यांतील धातू फुटून त्यात क्षत पडतें.

"तस्यातिमात्रेण कर्मणोरः क्षण्यते ।"
तस्योरःक्षतमुपप्लवते वायुः । च. चि.

उरःस्थान क्षीण होतें. त्यांत क्षत होतें. तत्रस्थ धातुक्षयामुळें वायु वाढतो. या वायुवाढीचा परिणाम उरःस्थ कफावर व पित्तावरही होतो. वातवृद्धीमुळें उरःस्थानांतील कफाचें उदीरण होतें. वायु रूक्ष, लघु असल्यामुळें, व घर्षणांत धातुक्षय होत असल्यामुळें, हा क्षय टाळावा, वाताच्या गुणाचे दुष्परिणाम टाळावेत म्हणून तेथें कफाचें- स्निग्ध द्रव्याचें- उदीरण होतें, पाचक शक्तीचेंही उदीरण होतें. उरःस्थ धातु परिमाणूंचे व्यापार बदलून जातात.

"स वायुः तत्रावस्थितः श्लेष्माणमुरःस्थमुपसंगृह्य पित्तंच दूषयन् विहरत्यूर्ध्वमवस्तिर्यक् च ।" च.

उरस्थ धातूंत वात प्रकुपित झाल्यामुळें तेथें पोषणासाठीं जो रस येतो, तो तेथें पचला जात नाहीं. तेथील रसवह स्रोतसें दोषांनीं लिप्त होतात. रसाचें रूपांतर रक्तधातूंत होण्याची प्रक्रिया प्रतिबद्ध होते व त्यामुळें पुढील पुढील धातु क्षीण होतात. हा रुद्ध झालेला रस सर्व शरीरभर पसरतो, व त्या त्या स्थावचीं ज्वर, कास श्वासादि लक्षणें निर्माण करतो. त्यामुळें मनुष्य क्रमाक्रमानें शुष्क होतो. साहसाचा परिणाम जास्त प्रमाणांत

(१) फुप्फुसावर होतो- प्राणवह स्रोतसांवर होतो;
(२) संधींवर होतो;
(३) मांस व मेद या धातूंवर होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें क्रमाक्रमानें अस्थि, मज्जा व शुक्र या पुढील धातूंवर परिणाम झाला तर अनुलोम क्षय होतो. रक्त व रस यांवर झाला तर प्रतिलोम क्षय होतो. श्रमांचा परिणाम जसा फुप्फुस व हृदय यांवर होतो, त्याप्रमाणें तो मांस, मेद, स्नायू, संधी या धातु व उपधातूंवर होतो म्हणून यांचे ठिकाणीं संप्राप्तीस प्रारंभ होऊन दोष सर्व शरीरभर पसरून क्षयाचीं लक्षणें होतात.

२. वेगावरोध :-

वेगांपैकीं मुख्यतः अधोवात, पुरीष व मूत्र यांचे वेग वारंवार धारण करीत गेल्यास त्याचा परिणाम क्षय रोगांत होतो.

> ह्रीमत्वाद्वा घृणित्वाद्वा भयाद्वा वेगमागतम् ।
> वातमूत्रपुरीषाणां निगृण्हाति यदा नरः ।
> तदा वेगप्रतीघातात् कफपित्ते समीरयन् ।
> ऊर्ध्वं तिर्यगधश्चैव विकारान् कुरुतेऽनिलः ॥ च.

सर्वसामान्यतः कोणी वेगधारण करीत नाहीत. पण, राजदरबारांत, सभेमध्यें, प्रवासांत असतांना, मलमूत्रादिकांचे वेग धारण केले जातात. तसेंच, वेग आला असतां कित्येक वेळां आळसामुळें वेगावरोध केला जातो; किंवा भीतीमुळें वेग कोंडून धरला जातो. अशी वारंवार संवय झाली म्हणजे त्यापासून अनेक व्याधि होतात त्यांत राजयक्ष्मा हा एक विकार आहे.

वेग निर्माण करणारा वायु अपान हा आहे. त्याच्या पुरःसरणाच्या गतीला अडथळा बळेंच निर्माण करावयाचा म्हणजे त्यापेक्षां प्रतिरोधी शक्ती जास्त उपयोगांत आणावी लागते. यासाठीं, प्राण व व्यान या दोन वायूंना जास्त कार्य करावें लागतें. अपानामुळें जो विकास होत असतो तेथें व्यानाला, संकोच करावा लागतो व त्या स्थानीं अधिक प्रमाणांत रसरक्तांचा पुरवठा करण्यासाठीं प्राणवायूलाही कार्य अधिक करावें लागतें, व त्यामुळे अपानाची क्रिया प्रतिलोम होऊं शकते. या क्रियेंत जीवनशक्तीचा बराच प्रवाह खर्ची पडतो, त्यामुळे वात प्रकुपित होतो, व हा प्रकुपित वायु कफपित्तांचें उदीरण करून सर्व देहदेशांत पसरतो व राजयक्ष्म्याचीं लक्षणें निर्माण करून रोग्याला शुष्क करतो.

वेगविधारण या कारणानें होणाऱ्या क्षयाचें प्रारंभस्थान फुप्फुस हें नसून, पक्वाशय स्थूलगुद, वा मूत्राशय, हे अपानाच्या कक्षेंतील अवयव हें असतें. या कारणानें वातप्रकोप होतो. पुरीषाचा वेग धारण केला, तर मलरूपी टाकाऊं द्रव्यांचा संचय पक्काशयांत होत राहणार व त्याचा स्पर्शही तेथील त्वचेला होत जाऊन एकसारखा प्राणप्रकोप होत राहणार. पुरीष हा कटु, तीक्ष्ण, ऊष्ण गुणांचा असतो. या गुणांचा परिणाम पक्वाशयस्थ अंतस्त्वचेस भोगावा लागणार व त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथील स्रोतसें दुष्ट होणार, त्या अवयवाला पुरीषरोधामुळें ताण बसणार, व तेथील धातुघटक वातप्रकोपानें कृश, व पातळ होणार. पोषणासाठीं आलेल्या कफाचा विनियोग, व रूपांतर करणाऱ्या पित्ताचा विनियोग त्या घटकांना करतां येणार नाहीं, त्यामुळें तत्रस्थ धातूचें पचनकार्य होणार नाहीं. रस दुष्ट होऊन तो सर्व शरीरभर संचार करणार त्यामुळें इतर लक्षणेंही निर्माण होणार, धातूंचें पोषण नीट न झाल्यामुळें क्षय होणार. वेगावरोध या कारणांत पक्वाशय वा बस्ति यांत प्रथम विकृती होते, त्याचा परिणाम रसधातूवर होतो. जे पदार्थ बाहेर टाकावयाचे तेच या वेळीं शोषले जाऊन रसांत मिश्र होतात, व त्यामुळें प्रथम रस बिघडतो. पुरीषमलाच्या दुष्टीचा परिणाम रस, मांस, व मज्जा या धातूंच्या क्षयांत होतो. या कारणांत दुष्टीचें कारण अपानाची स्वाभाविक अधोगती होऊं दिली नाहीं व त्याची प्रतिलोम वा ऊर्ध्व गति निर्माण केली हें असतें. यासाठीं यांत अपानाचा प्रथम प्रकोप व त्या नंतर इतर वायूंचा प्रकोप होतो.

079434

३. **शुक्र व ओज यांचा क्षय :—**

अतिव्यवायानशनाच्छुक्रमोजश्च हीयते ।
ततः स्नेहक्षयाद्वायुर्वृद्धो दोषावुदीरयन् ॥ च.

अतिव्यवायामुळें शरिराचा अत्यंत सार भाग जो शुक्र तें शरिरांतून प्रथम बाहेर पडतें, व पुढें शुक्र क्षीण झाल्यानंतर त्याचा परिणाम मागील धातु जो मज्जा त्यावर होतो. पुढें परिणामापद्यमान शुक्राबरोबर रक्तहि बाहेर पडूं लागतें. शुक्रक्षय व रक्तप्रवृत्ति यामुळें शरीरस्थ सर्व सूक्ष्म सूक्ष्म परमाणूंचे संधी शिथिल होतात. रूक्षत्व वाढतें व शरीर अत्यंत दुर्बल बनतें. धातुक्षयामुळें वायु वाढतो, तो कफ पित्तांनाहि प्रकुपित करून मांस व रक्त या धातूंचा शोष होऊं लागतो व सर्व शरीरभर लक्षणें निर्माण होतात.

अतिव्यवायामुळे प्रथम अपानाचा प्रकोप होतो व नंतर इतर वायूंचा प्रकोप होतो. शुक्रधातु सर्वशरीरव्यापी असल्यामुळें सर्वशरीरव्यापी जो व्यान त्यावरहि परिणाम होतो. हृदय, उर, हे बलाचे अवयव दुर्बल होतात. शुक्र स्थानांपैकीं मुष्क, वृषण यांवर परिणाम होतो. शुक्रक्षयामुळें त्याच्या पूर्वीचे धातु मज्जा, अस्थि, मेद क्षीण होत गेले तर प्रतिलोमक्षय होतो. शुक्र-क्षयामुळें जर ओजःक्षय झाला तर त्याला अनुलोम क्षय असें म्हणतात.

अनशन, व्यवाय, शोक, क्रोध, भीति, चिंता अतिश्रम यामुळें ओजक्षय होतो. धातूंचे सारत्व कमी होतें. स्निग्ध व सार द्रव्यांच्या क्षयामुळें वात प्रकुपित होतो व त्यामुळें धातुक्षय व अग्निमांद्य, स्रोतोरोध ही पुढील क्षयाची संप्राप्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घडते. ओजावर शरीर, इंद्रियें व मन यांचें कर्मसामर्थ्य अवलंबून असतें. ओजक्षयामुळें हृदय दुर्बल बनतें, बल व उत्साह कमी होतो, व राजयक्ष्म्याचीं इतर लक्षणें सुरू होतात.

४. अन्नपानविधित्याग, अथवा विषमाशन :-

आहार सेवन करण्यासंबंधीं जे नियम शास्त्रांत सांगितले आहेत त्या नियमांनुरूप अन्न सेवन केलें गेलें नाहीं, तर वात पित्त कफ हेहि विषम होतात. अकालीं जेवण जेवल्यामुळें, पोटांत जें अन्न गेलेलें असतें त्याचें पचन करण्यास प्राकृतिक वात पित्त, कफ हे उपस्थित नसतात. त्यामुळें त्या अन्नाला पोटांत पडून रहावें लागतें, पचनांस विलंब लागतो, किंवा तें अन्न पचतही नाहीं. पचन करणारा जो अग्नि आहे तोही विषम होतो व त्यामुळें अन्नपचनांत विकृती निर्माण होते. पचन उलटें होतें. पाकांत सार अंश निर्माण न होतां मलांशच जास्त निर्माण होतो; त्यामुळें मनुष्य दुर्बल होतो. विषमाशनामुळें उत्पन्न झालेले दोष शोषाचीं लक्षणें निर्माण करतात. यांत मुख्यतः स्रोतसांचा रोध असतो व रोधामुळें पुढले पुढले धातु क्षीण होतात.

विविधान्यन्नपानानि वैष्यम्येणसमश्नतः।
जनयन्त्यामयान् घोरान्विषमान्मारुतादयः॥
स्रोतांसि रुधिरादीनां वैषम्याद्विषमं गताः।
रुध्वा रोगाय कल्प्यन्ते पुष्यन्ति न च धातवः॥ च.

विषमाशनजन्य वैषम्यामुळें प्रकुपित झालेले दोष प्रथम अन्नवहस्रोतसांतून उन्मार्गी होऊन रस व रक्तवह स्रोतसांचा रोध करतात आणि मग यक्ष्मा निर्माण करतात. यांत प्रथम लक्षणें पचनमार्गाचीं आढळतात व प्रथम रोध रसाचा होतो. पुढें इतर धातु क्षीणता पावतात. त्यामुळे यांत अनुलोमक्षय झालेला पहावयास मिळतो.

कारणभेदामुळें राजयक्ष्म्याचे चार भेद जरी पडले तरि प्रत्येकांत तीन्हीहि दोष दुष्ट असतात; व प्रत्येकांत स्रोतोरोध, धातुक्षय व अग्निमांद्य हीं असतातच. यामुळें सामान्य संप्राप्तिनुसार, त्रिदोष नाशक, स्रोतोरोधनाशक, धातुवर्धक, अग्निवर्धक असे उपाय केले म्हणजे भागले असतें. पण कारणभेदानें विशेष भेद पडतो. प्रत्येक कारणानुरूप प्रारंभस्थान भिन्न भिन्न असतें. व या आरंभभेदामुळें लक्षणांत व चिकित्सेंत थोडा फरक पडतो. अन्नपानविधित्याग याचा परिणाम प्रामुख्यानें अन्नवह स्रोतसांवर होत असल्यानें, या कारणापासून झालेल्या राजयक्ष्म्यांत अरुचि, च्छर्दि, अग्निमांद्य, अशीं लक्षणें दिसतील व यांत, कर्षण न होईल अशा बेतानें, वमन विरेचन, देऊन प्रथम शुद्धि करावी लागेल. कोष्ठस्थ अग्निदीपक चिकित्सा, बृंहण चिकित्सेपूर्वी करावी लागते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेगावरोधजन्य क्षयांत अपानाची विलोमगति झाली असल्यानें, त्याला प्रथम अनुलोमित करावे लागणार व बहुतेक सर्व क्रिया नाभीच्या खालच्या भागांत करावी लागणार.

याप्रमाणें कारणभेदाप्रमाणें संप्राप्तिभेद, व संप्राप्तिभेदाप्रमाणें चिकित्सेंतही भेद पडणार. अतिव्यवाय हें कारण असेल तर शुक्रल द्रव्यें, वृष्य द्रव्यें, स्निग्ध बस्ति यांचा उपयोग करावा लागेल. अति व्यायाम साहस यांचा परिणाम उरःस्थानावर होतो. ह्यासाठीं जीवनीय द्रव्यें, मांसधातुपोषक असे अंश पोटांत जावे लागतात. अशा रीतीनें कारणभेदाप्रमाणें, लक्षण भेद, व चिकित्साभेद, थोड्या प्रमाणांत निर्माण होतो.

३. क्षय रोगाचीं पूर्वरूपें

क्षयरोगाला प्रारंभ निरनिराळ्या तऱ्हेच्या लक्षणांपासून होतो. सामान्यतः पुढीलप्रमाणें पूर्वचिन्हें आढळून येतात.

(१) **पडसें, सर्दी, शिंका, खोकला, दमा** :– अशीं प्राणवह स्रोतसाचीं चिन्हें कित्येक रोग्यांत पूर्वकालीं आढळतात. साधें पडसें, शिंका, खोकला येणें, याला कित्येक वेळां महत्त्व दिलें जात नाहीं; पण नाक, घसा, कंठ, उर, हृदय हे अवयव या रोगांनीं प्रथम हतबल झाले म्हणजे मग त्यांतून राजयक्ष्म्याची प्राप्ति होण्याची कित्येक वेळां शक्यता असते. यासाठीं हे अवयव बलवान राखण्याची आवश्यकता असते. त्यांच्यांत झालेली क्षुल्लक विकृति पूर्णपणें बरी करून त्या अवयवांची प्रतिकारशक्ति सतत कायम ठेवण्याची आवश्यकता असते.

वारंवार पडसें येणें यांतून क्षय रोग उद्भवतो. नाकावाटें प्राकृतिक स्थितींत मल बाहेर पडत असतो. तो मांसधातूचा मल होय. शरिरांतील मांसधातूच्या पचनांत आधिक्य निर्माण झाले किंवा विकृति निर्माण झाली व त्या विकृतींत मलाचीच उत्पत्ती अधिक होऊं लागलीं असा या पडशाचा अर्थ आहे.

शिरस्थानांत रसवह स्रोतसांचा रोध व्हावयास लागला, व त्या रोधांतील संचित– विकृत– रस, नाकावाटें पडसें या स्वरूपानें बाहेर चालला. यासाठीं डोक्यांतील पचन "सुधारा" अशी ही सूचना आहे.

वारंवार शिंका येणें– हें चिन्ह प्राणवायूच्या अधिक अधिक होत असलेल्या कार्याचें द्योतक आहे. नासा ह्या इंद्रियांत प्राणाचें स्थान आहे. क्षोभकारक वायवीय मल तत्रस्थ प्राणाचा प्रक्षोभ करतात व त्यामुळें शिंक या रूपानें त्या मलाला नाकावाटें बाहेर टाकावें लागतें.

पडसें, शिंका याचप्रमाणें कास व श्वास हीं प्राण प्रकोपाचीं चिन्हें आहेत. उर व कंठ येथील रसवहस्रोतसांत रोधास प्रारंभ झाला कीं त्याचा परिणाम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथम प्राणवायूवर होतो व तो उरःकंठांतील आलेले दोष बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्नाला लागतो. शिर, उर व कंठ कफाचीं स्थानें आहेत. त्यांत फाजील कफ वाढला तर त्यापासून प्राणाच्या गतीला अडथळा होतो व कास, श्वास हे विकार होतात. पण या कफाचे फाजील वाढींत उरस्थ किंवा कंठस्थ घटकांवर किंवा त्यांचे स्वतःचे पचनादि व्यापारांवर इतकासा परिणाम झालेला नसतो. पण हीच कफवाढीची विकृती वाढत गेली किंवा जास्त दिवस टिकली तर उरःस्थ स्रोतसांवर परिणाम घडतो. तेथें आलेल्या रसाचा रोध होतो, रसांतून आलेले घटक फुप्फुस धातुघटकांना घेतां येईनासे होतात व आत्मसात् न झाल्यानें ते धातुघटक क्षीण होतात. रसपचन तेथें नीट होत नाहीं व त्यामुळें प्राणक्षोभ होऊन क्षयज कास श्वासाला प्रारंभ होतो.

(२) प्रसेक, अरुचि, हृल्लास च्छर्दिः– हीं कित्येक वेळां क्षयाचीं पूर्वरूपें असतात. हीं सर्व उदान वायूच्या क्षोभाचीं चिन्हें आहेत. आमाशय, हृदय, जिव्हा या स्थानीं ज्या विकृत कफाची वाढ झालेली असते, ती शरीराबाहेर काढून टाकण्याच्या शरीरस्थ उदान वायूच्या प्रयत्नाला ह्या रूपानें आरंभ होतो. स्रोतोरोधास प्रारंभ होऊन जो रुद्ध झालेला रस तो वाढतो. ज्याचा स्वीकार व पचन शरीरस्थ घटकांना होत नाहीं तो रस शरीरधातूंना अधिक तापदायक होऊं नये म्हणून बाहेर काढून टाकण्याचा हा प्रयत्न सुरू होतो.

अरुचीमुळें पोटांत अन्न जात नाहीं, त्यामुळें शरीरधातु क्षीण होण्यास प्रारंभ होतो. ओकारीमुळें पोटांत गेलेलें अन्न उलटून बाहेर येतें, त्यामुळें शरिराची उपासमार होतेच. शिवाय ओकारी या क्रियेंत शरिराची शक्तीहि क्षीण होते. हीच क्रिया दीर्घ काल होत राहिली तर वात प्रकुपित होऊन स्रोतोरोध व तद्जन्य पुनः धातुक्षय, अग्निमांद्य–ही क्षयाचीं परंपरा अधिकच जोरांत आगते.

(३) अग्निमांद्यः— कित्येक रोग्यांचा क्षयरोग होण्यापूर्वी अग्नि मंद होतो, भूकच लागेनाशीं होते, अन्न पोटांत जात नाही. जर घातलें तर त्याचें अग्नीच्या मंदतेमुळें पचन होत नाहीं. विषमाशन, वेळीं अवेळीं झोंप घेणें, जागणें यांचा परिणाम समानावर होऊन या पूर्वरूपाला प्रारंभ होतो.

(४) देहसदनः–कोणतेंहि काम करण्यांस बल, उत्साह अलिकडे नाहींसा झाला आहे, उठले कीं कमजोरी वाटते, वजन कमी कमी होऊं लागलें आहे अशा तक्रारी राजयक्ष्म्याच्या पूर्वरूपांत कित्येक वेळां आढळतात.

बलभ्रंश, वजन घटणें, ह्या व्यान प्रकोपाच्या तक्रारी आहेत. याचप्रमाणें छातींत धडधडणें (हृद्रव) नाडीचा वेग वाढणें, धाप लागणें, बारीक चोरटा ताप येणें, सर्वांग रसरसून अंगाला दाह होणें, हीं लक्षणें क्षयाचीं पूर्वरूपें आहेत. हीं सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यानवायुच्या क्षोभाचीं आहेत. पायीं अति प्रवास होणें, श्रम करणें, अति खेळणें, अति व्यायाम, भीति, शोक, हर्ष, ध्यान, चिंता हीं व्यानप्रकोपाचीं कारणें असतात. या कारणांमुळें परिणाम व्यानावर होतो व हीं चिन्हें दिसूं लागतात. अश्नतोऽपि बलक्षयः । अन्न खात असूनही बलक्षीणता येते. इतर उत्पन्न होणाऱ्या दोषांच्या प्राथमिक कोणत्याहि तक्रारी नसतात. पचन नीट होऊन अन्नरस तयार झाला तरी स्रोतोरोधामुळें रक्तादि धातूंचें पोषण होत नाहीं व हें लक्षण निर्माण होतें.

(५) **मलावरोधः**– शौचास साफ होत नाहीं. ही तक्रार पूर्वरूप म्हणून सांपडते, किंवा याचे उलट अतिसार, संग्रहणी या तक्रारींतून क्षयास प्रारंभ होतो. वेगावरोधाचा परिणाम म्हणून अपानवायूचा प्रकोप होऊन राजयक्ष्म्याचा हा प्रारंभ असतो.

कित्येक स्त्रियांत प्रथम मासिक रजः स्राव बंद होतो. किंवा अनियमित होतो व मग हा रोग झालेला आढळून येतो.

(६) **तोंड व हातपाय यांवर सूजः**– पूर्वरूपांत किंचित सूज कित्येक रुग्णांत आढळते. विशेषतः ज्या स्त्रियांना प्रसूतीनंतर क्षयरोगास प्रारंभ होतो त्यांत हें लक्षण प्रथम झालेलें पहावयास मिळतें. रक्तधातूचे दौर्बल्यानें, पांडुरोगानें मेदोधातूच्या क्षीणतेनें सिरा दुर्बल होतात, शाखेंत दोषसंचय होतो आणि हें लक्षण निर्माण होतें.

(७) **डोळे पांढरे होतात** :– कफ वृद्धीचे हें लक्षण आहे. स्रोतोरोधामुळें कफ संचय झाला तर त्याचा परिणाम नेत्रांवर होऊन हें लक्षण निर्माण होतें. प्राकृतिक नेत्रांत लाली असते. रक्त कमी पडल्यानें नेत्रांत शुष्कता येते.

(८) **स्त्री–प्रियताः**–

पूर्वरूपांत कामवासना वाढते व स्त्रीशीं संभोग करण्याची अति इच्छा निर्माण होते. शरिरांत शुक्र धातूची वाढ झाली म्हणजे स्त्रीकामता हें लक्षण होतें. पण क्षयी माणसांना क्षयाच्या पूर्वरूपांत हें लक्षण धातुक्षय असूनही निर्माण होतें. दोषांनी मेढ्र, मुष्क यांतील व्यान व अपानाचो क्षोभ होतो, यामुळें हें लक्षण निर्माण होतें. यांत स्त्रीसंभोगातहि वीर्य अल्पच स्रवतें, व स्त्रीसेवेनंतर प्राकृतिक स्थितींत जें मनःस्वास्थ्य लाभावयाचें तेंही लाभत नाहीं. उलट आणखी अपान व व्यान यांचा प्रकोप होऊन आणखी स्त्रीची वासना निर्माण होते. व त्या दोषचक्रांत विचारा प्राणी सांपडतो व बुडतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(९) मद्य व मांसप्रियताः–

मांसाहार करावा, मद्य प्यावें अशी उत्कट इच्छा पूर्वरूपांत होते शरिरांतील मांसाचे घटक कमी होतात, ही उणीव भरून निघावी म्हणून मांस किंवा मांस-वर्धक पदार्थ खाण्याची इच्छा होते. नुसता मांसक्षय असेल तर मांस खाण्याची इच्छा होईल व मांस खाऊन तो क्षय भरून येईल. पण राजयक्ष्म्यांत मांसप्रियते-बरोबरच मद्यप्रियताही असते. शरिरांत स्रोतोरोध झालेला आहे, तो रोध दूर व्हावा व खाल्लेल्या मांसांच्या परमाणूंचें पचन, विद्रावण शोषण, व आत्मीकरण व्हावें यासाठीं ही मद्यप्रियता असते. यासाठीं पूर्वरूपांत रोग्याच्या काय आवडी-निवडी आहेत याचा नीट अभ्यास केला पाहिजे व त्याचा काय अर्थ आहे तो वेळींच जाणला गेला पाहिजे म्हणजे पुढील रोगाची वर्धिष्णु अवस्था टाळतां येईल.

(१०) मूर्धगुंठनः–

डोक्यासभोंवतीं कांहीं तरी वस्त्र गुंडाळून घेण्याची इच्छा होते. हातरुमाल किंवा स्कार्फ गुंडाळून घेऊन बसावें असें वाटतें. डोक्याला वाऱ्याचा स्पर्श असह्य होतो म्हणून हें लक्षण होतें. किंवा डोक्यांत स्रोतोरोध होऊन दोषसंचय होऊं लागलेला असतो, तो असह्य होऊन ही इच्छा उत्पन्न होते

(११) नख, केश यांची वाढ :–

डोकें, दाढी, मिशांचे केस अलिकडे झपाट्यानें वाढूं लागले आहेत, ही साधी गोष्ट चाणाक्ष माणसाच्या लक्षांत आली व ती त्यानें वैद्याला निवेदन केली, तर याचा अर्थ काय आहे हा प्रकाश वैद्याचे डोक्यांत चटकन पडला पाहिजे. नखें, व केस हे अस्थिधातूचे मल आहेत. हे मलच अधिक निर्माण होतात; सार भाग कमी निर्माण होतो, असा याचा अर्थ आहे. मलानें मल पुष्ट होतात, म्हणून ही वाढ आहे. या शरिरांत धातूंचें पोषण कमी होऊं लागले आहे. धातू धातूंना खातात, पण त्या पाकांत मलच उत्पन्न होतो. विशेषतः अस्थिधातूवर झालेला हा परिणाम पूर्वरूपांत दिसून येतो.

(१२) स्वच्छपणाः–

क्षयरोगाच्या पूर्वरूपांत स्वच्छतेचें प्रमाण वाढलेलें असतें. मनुष्य आपले कपडे, बैठक घर यांची अधिक स्वच्छता करतो. स्वयंपाकाची भांडी, जेवणाची भांडी, पाणी पिण्याची भांडी, कप, बशा, चमचे, दिव्यांच्या कांचा स्वच्छ असूनही त्याला मलिन दिसतात. मालिन्य त्याच्या शरिरांत भरलेलें असतें, त्याच्या देहांतील सर्व शरीरगामी रस हा मलप्रधानच असतो, त्यामुळें नेत्रेंद्रियाकडे मलीन रस गेल्यामुळे त्याला सर्व मलीनच दिसते. कामलेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मलीन पित्त नेत्रेंद्रियांकडे गेले म्हणजे त्या रोग्याला पांढरे शुभ्र पदार्थही पिवळेच दिसतात, त्याप्रमाणें याच्या नेत्रस्थ धातूंतील मलवृद्धीमुळें स्वच्छ पदार्थही मळकट दिसतात.

(१३) मक्षिकापातः-

ज्याच्या शरिरांत राजयक्ष्म्याच्या संप्राप्तीला प्रारंभ झाला आहे अशा मनुष्याच्या अंगावर, नाकाकडे, तोंडाकडे माशा फार येतात. मलवृद्धीमुळें त्या आकर्षिल्या जातात. तो भोजनाला बसला असतां त्याच्या जेवणावर, पिण्याच्या पदार्थांत माशा पडतात. त्याच्यामुळें त्या आधीं आकर्षिल्या जातात, व मग जवळच असलेल्या अन्नपानावर त्या बसतात, पडतात. त्याच्या अंगावरील केस वाढले असल्यानें तेही अन्नांत पडण्याची शक्यता असते. त्वचेवरील मेदमज्जामल वाढतात. त्यामुळें हवेंतील धुरळा केर, कसपटें त्याच्या अंगांवर येऊन त्या मलामुळें चिकटून बसतात. त्याच्या हालचालीनें कांहीं खालीं पडतात.

(१४) हात पाहतोः-

आपल्या हातावरील सामुद्रिक रेषा वारंवार पाहण्याची त्याला संवय लागते. आपलें जीवन कसें आहे एवढें समजून घेऊन त्याला भागत नाहीं. त्याचे धातू आंतून क्षीण-निःसार होऊं लागल्यामुळें त्याला आपलें जीवन निःसार वाटतें व आपल्या भवितव्यांत काय आहे हें पाहण्याची त्याला वारंवार उत्कंठा होते. दैवीं काय आहे हें तरी पाहावें असें त्याला वाटतें. हें मानसिक लक्षण आहे.

(१५) दंड मापण्याची इच्छाः-

उजव्या हाताच्या अंगठा व तर्जनीमध्यें डाव्या दंडाचे किंवा डाव्यानें उजव्या दंडाचें वारंवार माप घ्यावें असें त्याला वाटतें. पूर्वी त्याचे दंड चांगले भरगच्च फुगीर, पिळदार होते. धातुक्षीणतेस सुरुवात झाल्यामुळें दंड पिळपिळीत बनतात. ते कमी झाले कीं काय या जिज्ञासेनें तो वारंवार पाहतो.

आरशांत त्याला आपला चेहरा भेसूर झाल्यासारखा (प्रत्यक्ष नसतांना) दिसतो. क्षयाच्या पूर्वावस्थेंत राजयक्ष्माकर दोषांची विशिष्ट तऱ्हेचीं स्वप्नें पडतात. या स्वप्नज्ञानावरूनही पुढें होणाऱ्या रोगाची सूचना मिळते. पतंग, सरडा, सर्प, माकड, त्याच्या अंगावर घाव घेत आहेत व त्याला जेरीस आणून त्याचा पराभव करीत आहेत; अशा तऱ्हेचीं स्वप्नें त्याला पडतात. पूर्वी अंगांत ताकद होती त्या वेळीं त्यांचा पराभव त्याला सहजच करतां येत होता, पण धातुक्षीणतेला प्रारंभ झाल्यामुळें स्वप्नांत देखील अशा क्षुद्र जीवांपासून त्याला उपद्रव होऊं लागला असें स्वप्न, शरीरधातुक्षीणतेचें द्योतक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वप्नांत आपण केसांच्या पुंजक्यावर चढलों आहोंत, किंवा राखेच्या ढिगाऱ्यावर, हाडांच्या राशीवर, कचरा, भुसकट कोंडा यांच्यावर चढलों आहोंत अशीं स्वप्नें पडतात. शरिरांतील मलवृद्धीमुळें हीं स्वप्नें असतात.

शरिरांतील धातु शुष्क होऊं लागल्यामुळें स्वप्नेंही तशींच पडतात. नदी, तळीं, विहिरी, स्वप्नांत कोरड्या पडलेल्या दिसतात. आपण स्वप्नांत एका गावांस गेलों होतों, त्या गावांत कोणीं माणसेंच नव्हतीं, सर्व गांव निर्जन झालें आहे असें स्वप्न पडतें; किंवा, डोंगर, तारे पडताहेत, झाडें पेटत आहेत अशा तऱ्हेचीं स्वप्नें पडतात. मनोवह स्रोतसें दोषांनीं भरल्यामुळें अशीं स्वप्नें पडतात. त्यांत जो दोष उत्कट असेल व ज्या स्वरूपाचा असेल त्याप्रमाणें हीं स्वप्नें असतात.

५. क्षय रोगाचीं लक्षणें.

राजयक्ष्म्याची मुख्य संप्राप्ति लक्षांत घेतली म्हणजे लक्षणें कसकशीं निर्माण होतील याची कल्पना येते. यांत बलक्षय हें प्रमुख लक्षण असतें. दिवसेंदिवस आपली ताकद कमी कमी होत चालली आहे, आपलें शरीर झिजत झिजत चाललें आहे, किंवा वजन घटत चाललें आहे, हें चिन्ह पूर्वरूपांत असतें. तसें लक्षणावस्थेंतही असतें. बलक्षयाचें कारण ओजक्षय व शुक्रक्षय हें आपण पूर्वीं संप्राप्तींत पाहिलेंच आहे, पण दोषांनीं स्रोतोरोध केल्यामुळें धातूंना आहार मिळेनासा होतो. आहारांत धातुपोषक घटक असूनही या रोधामुळें धातूंना तो आहार लाभूं शकत नाहीं व त्यांची उपासमार होते व धातु क्षीण होतात.

धातूंचा क्षय शरीर जिवंत ठेवण्यासाठीं चालूंच असतो व आहार अल्पसा मिळूनही अग्निमांद्यामुळें त्याचें रूपांतर होत नाहीं, व नाक, घसा, स्वेद, च्छर्दि, अतिसार या रूपानें शरिराची झीज चालूंच असते म्हणून शरीर झिजतें.

बल हें सप्तधातूंचे सारत्वावर अवलंबून असतें. धातूंचें सारत्व राजयक्ष्म्यांत कमी होतें. विशेषतः बलाचे धातु ओज, शुक्र, मज्जा व मांस हे होत. त्यांचें सारत्व ढांसळत चालल्यानें बलक्षीणत्व व देहक्षीणत्व निर्माण होतें. रसादि सोमप्रधान धातूंचा ऱ्हास हें प्रमुख लक्षण राजयक्ष्म्यांत पहावयास सांपडते.

क्षय हें एकच लक्षण राजयक्ष्म्यांत नसतें. क्षयरोग म्हणजे अनेक लक्षणांचा समुदाय आहे. तीन सहा अथवा अकरा लक्षणांचा संघात हा असतो. असा संघात असला म्हणजे " राजयक्ष्मा " हें नांव रोगराज म्हणून शोभून दिसतें.

जायन्ते व्याधयश्चातः षडेकादश वा पुनः ।
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
येषां संघातयोगेन राजयक्ष्मेति कथ्यते ॥ च. चि. ८

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषांचें बल कमी अथवा अधिक असेल त्याप्रमाणें लक्षणें थोडीं अथवा अधिक निर्माण होत असतात. रोगकारक दोषांचें बल मध्यम असेल तर षड्रूप राजयक्ष्मा होतो, त्यांत पुढीलप्रमाणें लक्षणें असतात.

भुक्तद्वेषो ज्वरः श्वासः कासः शोणितदर्शनम ।
स्वरभेदश्च जायेत षड्रूपे राजयक्ष्मणि ॥ सु. उ. ११

दोषांचें बल उत्तम असेल तर सहापेक्षांही अधिक लक्षणें निर्माण होतात. राजयक्ष्म्याचीं अकरा लक्षणें पुढीलप्रमाणें वाग्भटांनीं वर्णन केलीं आहेत.

पीनसश्वासकासांसमूर्धस्वररुजोऽरुचिः ।
ऊर्ध्वं विड्भ्रंशसंशोषाववश्छर्दिश्च कोष्ठगे
तिर्यक्स्थे पार्श्वरुग्दोषे संधिगे भवति ज्वरः ।
रूपाण्येकादशैतानि जायन्ते राजयक्ष्मिणः ॥ वा. नि. ५

दोषांचें बल अल्प असेल तर किमान तीन लक्षणयुक्त अथवा त्रिरूप राजयक्ष्मा निर्माण होईल. खांदे, बरगड्या तापणें, हातपायांची आग होणें सर्वांगीं ज्वर अशीं तीन लक्षणें यांत दिसतील.

अंसपार्श्वाभितापश्च संतापः करपादयोः ।
ज्वरः सर्वांगगश्चेति लक्षणं राजयक्ष्मणः । माधव नि. १०

त्रिरूप, षड्रूप, किंवा एकादशरूप संप्राप्तींत वर जी लक्षणें सांगितलीं आहेत. त्यांत फेरबदल होण्याची शक्यता असते.

" कासो ज्वरो रक्तपित्तं त्रिरूपं राजयक्ष्मणि ॥ "

असें त्रिरूप राजयक्ष्म्याचें वर्णन भोजानें केलें आहे.

" कासो ज्वरः पार्श्वशूलं स्वरवर्चोगदोऽरुचिः ॥ "

असें भिन्न वर्णन षड्रूप राजयक्ष्म्याचें चरकाचार्यांनीं केलें आहे. एकादशरूप वर्णनांत चरक, वाग्भट, व सुश्रुत या तिघांत भिन्न भिन्न लक्षणसमुदाय आढळतात. कारण व स्थान भेदानें या लक्षणांत थोडा फार फरक पडतो, पण दिवसें दिवस शरीर व बल कमी कमी होत जाणें व त्याबरोबर तीन, सहा, किंवा अकरा लक्षणें असणें हें राजयक्ष्माचें महत्वाचें स्वरूप आहे. यांपैकीं एक लक्षण, जरी वाढत्या दौर्बल्याबरोबर आढळलें, तरी प्रथम हा राजयक्ष्मा नाहीं ना याची शहानिशा वैद्यानें करून घेतली पाहिजे. कोणत्याही रोगाचा परिणाम म्हणून शक्तिक्षय होईल. पण राजयक्ष्मा, ग्रहणी व वातजप्रमेह या तीन रोगांत धातुक्षय हे प्रमुख लक्षण असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षय रोगाचीं प्रमुख लक्षणें:—

(१) ज्वर:-

त्रिरूप किंवा एकरूप जरी राजयक्ष्मा धरला, तरी त्यांत ज्वर हें लक्षण बहुधा आढळून येतेंच. राजयक्ष्म्याचे ज्वरांत खांदे, पाठ बरगड्या तापणें, तळहात व पाय यांची आग होणें, सर्वांग गरम लागणें हीं पित्ताचीं लक्षणें होतात. किंवा हें राजयक्ष्म्याच्या ज्वराचें स्वरूपच समजलें जातें. या रोगाची संप्राप्ति शरिरांत चालूं आहे याचें द्योतक ज्वर हें लक्षण आहे. क्षयांत ज्वर हा निरनिराळ्या तऱ्हेचा आढळून येतो. तो सन्निपात ज्वराप्रमाणें तीव्र स्वरूपाचा असेल, किंवा संतत, सतत किंवा अन्येद्यु: या तीन विषमज्वरांप्रमाणेंही आढळेल.

सायंकाळीं अंगावर थोडा थंडीचा काटा येऊन थोडासा शारीरोष्मा वाढत असेल व ही तक्रार अनेक दिवसांची आहे असा वृत्तांत मिळाला तर तो बहुधा राजयक्ष्म्याचा ज्वर आहे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. हा वातप्रधान ज्वर समजावा. रुद्ध वातप्रधान दोष सायंकाळच्या वाताचे कालीं ज्वर निर्माण करतात. तसेंच दिवसाच्या काळांत शरीर बल जे धातु त्यांचा ऱ्हास जास्त प्रमाणांत सायंकाळीं होतो व या धातूंच्या पचनांत देहोष्मा वाढतो व ज्वर येतो. हा ज्वर अन्येद्यु: विषमज्वरासारखा असतो. कित्येक वेळां राजयक्ष्म्यांतील ज्वर सारखा असतो व तो सन्निपात ज्वर अथवा संतत विषमज्वराप्रमाणें असतो, पण सन्निपात ज्वरांतील परिदग्धा खरा जिव्हा, भ्रम, प्रलापादि लक्षणें प्राय: यांत आढळत नाहींत. सन्निपात अथवा संतत विषमज्वरापेक्षां धातुक्षय हें लक्षण क्षयज्वरांत अधिक महत्त्वाचें असतें. कित्येक वेळां क्षयाचा ज्वर वरीलप्रमाणें तीव्र वेगाचा नसतांना मंद वेगाचा असतो. कफ पित्तप्रधान दोषांमुळें ज्वर वेग मंद असतो; पण सतत ज्वर म्हणजे सारखा ताप असतोच. सकाळीं कमी होतो पण पूर्ण कमी होत नाहीं. सायंकाळीं थोडा वाढतो. अशा मंद व रेंगाळणाऱ्या ज्वरांत रोगी सांपडलेला असतो. यांत घाम येतो व घामानें अंग अगदीं चिकट होऊन जातें. असा ज्वर क्षयी माणसाचा धातुक्षय करणारा अतएव कष्टसाध्यच असतो. हा संतत विषम ज्वरासारखाच दिसतो पण यांत कास, श्वास, अंस –पार्श्वशूल हीं उर:स्थानाचीं क्षयाचीं लक्षणें जोडीला असतात. याला प्रलेपक ज्वर म्हणतात.

तथा प्रलेपको ज्ञेयो शोषिणां प्राणनाशन: ।
दुश्चिकित्स्यतमो मंद: सुकष्टो धातुशोषकृत् ।। सु.

क्षय रोगांत कित्येक वेळां ज्वर कफकालीं म्हणजे सकाळींच वाढलेला आढळतो, व सायंकाळीं उष्मा कमी असतो. अशी उलटी वेळ ज्वराची आढळते. असा ताप येणें हें सतत संभव व विरुद्ध लक्षण समजावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्वरः पौर्वान्हिको यस्य शुष्ककासश्च दारुणः।
बलमांसविहीनस्य यथा प्रेतस्तथैव सः। च. इं.

राजयक्ष्म्यांतील ज्वराची प्राप्ती प्रायः स्रोतोरोधामुळें होते. कोणत्याही क्षयजनक कारणांनीं निर्माण झालेले दोष, शरीरस्थ एकाद्या स्थानांतील रसवह स्रोतसांत रुद्ध झाले म्हणजे, त्यांचा विकृत पाक होऊं लागतो. ते अधिक सूक्ष्म व रजोगुणी व अधिक बलशाली होऊन सर्व शरीरभर संचार करितात. ते जेव्हां आमाशयांत प्रवेश करून तेथील अग्नीला बाहेर काढतात तेव्हां ज्वर येतो.

स्रोतोरोधामुळें, व धातुपोषकसारभाग कमी उत्पन्न होत राहिल्यानें, धातूंचें पोषण कमी पडल्यामुळें जो वात प्रकुपित होतो त्या वातामुळें ज्वर येतो. तसेंच पोषण नाहीं, धातूंची झीज मात्र चालूंच असते. या झिजेनेंही वाताची वृद्धी होते. हा वात ज्वरोत्पादक असतो. धातुपाकांत ऊष्मा निर्माण होतो. तोही वाताबरोबर ज्वरोष्मा वाढविण्यास मदत करतो. क्षयाचे ज्वरांत खांदे, हातपायांची आग, दाह हीं जीं पित्ताचीं लक्षणें होतात, तीं कफ क्षीणतेमुळें वा धातुपाकामुळें निर्माण होत असतात. आहाररसाचें रूपांतर स्वधातूंत करणारा अग्नि मंद असला तरी विघटना करणारा अग्नि मात्र क्षयरोगांत वाढलेलाच असतो. त्यामुळें ज्वर-वेग तीव्र व संतत असतो. वातवृद्धीमुळें कफस्थानांतील कफ चलित झाला तर शैत्य व कफाचीं लक्षणें ज्वरांत आढळतात.

दोष संधींत गेले म्हणजे क्षयरोगांत ज्वर येतो असें विधान आहे.
"संधिगे भवति ज्वरः।

कफाच्या स्थानांपैकीं संधी या कफस्थानांत दोष जातात. तेथें अनुकूल वातावरण– अन्न, काळ लाभतांच प्रस्फुट होतात, आमाशयाचा आश्रय करतात अग्नीला बाहेर काढतात व ज्वर निर्माण करतात. दोन शरीरपरमाणू ज्या कफानें जोडले जातात त्या स्थानाला संधी असें म्हणतात. असे संधी या देहांत सर्वत्र व असंख्य आहेत. राजयक्ष्माजनक दोषांची व्याप्ति अशी असंख्य स्थानीं अथवा अखिल शरीरव्यापी झाली म्हणजे दोषांचा पसारा फार मोठा झाला व यामुळें आमाशय या अग्निस्थानाकडे एकसारखा हा दोषप्रवाह येत राहणार. त्यांत खंड पडला तर ज्वरही खंडित येणार. ज्या काळीं दोष अधिक प्रमाणांत येणार त्या काळीं ज्वर वाढणार. कफकाळीं दोष आले तर कफकाळीं ज्वरवेग येणार, वातकाळीं आले तर वातकालीं ज्वर चढणार. सर्व संधी म्हणजे अथांग शरीर. सर्व शरीरव्यापी धातु म्हणजे रसधातु. तो जितक्या अंशानें दोषांकडून व्याप्त होईल तितक्या प्रमाणांत ज्वर राहणार. शरिरांतील संधिस्थित कफ वातानें चलित झाला तर, कफज्वर येईल. कफाबरोबर रसांतील पित्त प्रकुपित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालें तर कफपित्तप्रधान ज्वर येईल. श्रम अथवा शरिराची हालचाल जास्त झाली तर त्याचा परिणाम संधींवर होतो व हालचालीनें ज्वर वाढतो. विश्रांतीनें ज्वर कमी होतो. हालचाल किंवा श्रमानें व्यानावर परिणाम होतो–हृदय व फुप्फुस यांवर होतो. हे अवयव धातूंचेच बनलेले आहेत. त्यांतील धातूंची झीज अधिक होते. धातुक्षयामुळें वात वाढतो. हा वात कफ व पित्त यांना दुष्ट करून ज्वर निर्माण करतो. अग्नीबरोबर आलेल्या दोषांचें पचन करण्यास धातूही यांत समर्थ नसतात. धातु व त्यांचे अग्नि समर्थ असलेच तर ज्वरवेग थांबतो. दोषांचे बल वाढलें कीं पुनः ज्वर येतो. याप्रमाणें सान्निपातिक अथवा, विषमज्वराप्रमाणें राजयक्ष्म्याचा ज्वर येत असतो. दोषांची व्याप्ती जितक्या अधिक क्षेत्रांत, किंवा दोषांचें बल जितकें अधिक, त्यावर क्षयांतील तापाचें स्वरूप व प्रमाण अवलंबून असतें.

क्षयांतील ज्वर तीव्र व अविसर्गी असेल तेव्हां, सन्निपात ज्वर व संतत विषम ज्वर यांपासून त्याचें निदान करावें लागते.

	सान्निपातिक ज्वरांत	क्षयज्वरांत
१ ज्वर वेग	तीव्र व अविसर्गी.	तीव्र व अविसर्गी.
२ अरुचि, कास, श्वास	असतात.	हीं लक्षणें असतात.
३ जिव्हा	परिदग्धा, खरा.	आरक्त व शुष्क.
४ नाडी	सन्निपाताची.	वातप्रधान, द्रुत गती.
५ भ्रम प्रलाप	असतात.	प्रायः नसतात.
६ बलक्षय	कमी असतो.	अधिक असतो.
७ दिवस मर्यादा	द्विगुणा सप्तमी ते एकादशी ज्वरमुक्ती अथवा मृत्यू	अनिश्चित काळ. रेंगाळत चालतो.
८ उपद्रव	ज्वराचें रूपांतर क्षयज्वरांत होईल.	क्षयाचे उपद्रव सुरू होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषज्वर जीर्ण झाला म्हणजे क्षयज्वरासारखा कित्येक वेळां आढळतो. त्यावेळीं निदान करणें अवघड जातें. त्यांतील साम्य भेदः–

	जीर्णज्वरांत	क्षयज्वरांत
१ देहधातु	अबल झालेले असतात.	अबल होऊं लागतात.
२ ज्वरकर दोष	अबल.	अबल वा बलवान्.
३ ज्वरवेग	मृदु.	मृदु वा तीव्र.
४ लंघनानें	ज्वर वाढतो.	ज्वर वाढतो.
५ क्षुधा	क्रमानें येते.	क्रमानें जातें.
६ अरुचि	अन्नाची इच्छा.	अरुचि असते.
७ भ्रम, प्रलाप, निद्रा नाश	८-१५ दिवसापूर्वी येऊन गेलेलीं असतात.	प्रायः नसतात.
८ गौरव, कास, श्वास	ज्वराबरोबर कमी होतात.	वाढत जातात.
९ ज्वर आम, पच्यमान	अवस्थेंतून निघालेला असतो.	या अवस्था नसतात.
१०	योग्य चिकित्सा न झाल्यास त्यांतून क्षय उत्पन्न होतो.	

(२) कासः–

कास अथवा खोकला हें एक क्षयाचें प्रमुख लक्षण आहे. क्षयजनक दोषांनीं शरिरांतील. उर कंठ हे ऊर्ध्व मार्ग पकडले असा याचा अर्थ आहे. दुष्ट रस उर, कंठस्थानीं आल्यावर, उरःस्थ धातुघटकांकडून या रसाचें पचन न होतां तो तसाच राहतो, व उरस्थ स्रोतसांचा रोध होतो; व त्यामुळें कासास प्रारंभ होतो. कास हें लक्षण कफप्रधान दोषांचें आहे. विषमाशनामुळें निर्माण झालेल्या दोषांपैकीं कफप्रधान दोषांचे अंश रसाबरोबर फुप्फुसांत येतात, प्राणवायूच्या प्राकृतिक क्रियेला अडथळा येतो, व प्राणवायु उदानानुगत होऊन कास निर्माण होतो. या क्रियेंत कांहीं दोषभाग बाहेर पडतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उरस्थ धातु क्षीण होतात, तेथें वात प्रकोपामुळें क्षत होतें. त्या भागांत असणारा कफ व पित्त दुष्ट होतात, उरःस्थ धातूंतील पचन बिघडते व मग हा प्रकुपित वायु कफपित्तांसह शरीरभर अधिकच धुमाकूळ घालतो. उरःस्थान अधिक दुर्बल झाल्यामुळें वाताचें गमन प्राकृतिक होऊं शकत नाहीं. कंठ हे कास उत्पन्न करणारें स्थानही जास्तच बिघडतें व खोकला जास्तच वाढत जातो.

"ततः क्षणनाच्चैवोरसो विषमगतित्वाच्च वायोः, कंठस्य चोध्वंसनात् कासः सततमस्य संजायते। स कासप्रसंगात् उरसि क्षते शोणितं ष्ठीवति। शोणितागमनाच्च दौर्बल्यमुपजायते॥ चरक नि.

खोकून खोकून फुफुसांतील रक्तवाहिन्या फुटतात, रक्त वाहूं लागते व रक्तस्रावामुळें अधिकच दौर्बल्य येतें.

रसाचे धातूंकडून पचन न झाल्यामुळें, तो रस ऊर्ध्वमार्गानें टाकण्याचा प्रयत्न केला जातो या प्रयत्नाला कास असें म्हणतात.

कंठ, उर, यांच्या स्थितीप्रमाणें कास हें लक्षण विविध स्वरूपाचें असतें. क्षयाची संप्राप्ति उरःस्थानांतच पण स्रोतसांचे पासून दूर असल्यास प्राणप्रकोप होत राहतो व कास येतो. हा कास शुष्क असतो. कितीही खोकले तरी त्यांतून कफ पडत नाहीं. पण जेव्हां प्रत्यक्ष उरस्थ स्रोतसांत संप्राप्ति सुरू होते त्या वेळी प्रथम हा खोकला वातप्रधान अतएव शुष्क असतो. खोकून खोकून छाती, पाठ, बरगड्या, पोट, डोकें हीं दुखतात, घसा कोरडा पडतो, मोठमोठे कासाचे आवेग येतात; पण फारसा कांहीं कफ प्रथम नसतो. प्रायः हा खोकला पहाटें व सायंकाळीं म्हणजे वाताचे काळीं येतो. वाताचे जोडीला प्राणवहस्रोतसांत कफ येतो तेव्हां (श्लेष्माणं उपसंगृह्य) कफ पुष्कळच पडूं लागतो. प्रथम हा अत्यंत चिकट वातड असतो. पित्तही जोडीला आलें म्हणजे मग पांढरेपणा जाऊन त्यांत हिरवट, पिवळट, तांबूस रंगाचे कफाचे बडके पडूं लागतात. फुप्फुसांतील धातूंचा पाक होऊं लागला कीं त्या कफाला एक प्रकाची घाणही येऊं लागते.

रसः स्रोतःसु रुद्धेषु स्वस्थानस्थो विवर्धते।
स ऊर्ध्वं कासवेगेन बहुरूपः प्रवर्तते।
पिच्छिलं बहलं विस्रं हरितं श्वेतपीतकम्।
कासमानो रसं यक्ष्मी निष्ठीवति कफानुगम्। च.

कास हे ऊर्ध्वगामी क्षयांत प्रायः आढळणारें लक्षण आहे. कासावाटें बाहेर पडणारा दोष थुंकून न टाकतां तो गिळला गेला तर पचनमार्गांत दोषदुष्टी सुरू होऊन अधोगामी राजयक्ष्माला प्रारंभ होतो. अधोगामी क्षयांत प्रारंभीं हें लक्षण नसतें. पुढें पुढें उरस्थानांत रसवृद्धि झाली कीं याला प्रारंभ होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) श्वासः-

श्वास हें लक्षण पूर्वरूपावस्थेंत असतें, तसेंच रूपावस्थेंतही असतें. वातप्रकोपामुळें हें लक्षण होतें. धातुक्षय कोणत्याही कारणानें वा शरिरांत कोठेंही झाला तरी त्याचा परिणाम प्राणवहस्रोतसांच्या दुष्टींत होतो. विघटना व्हावयाची म्हणजे पचन वाढावयाचें, त्या स्थानीं जास्त क्रिया चालावयाची. त्यास बाह्य प्राणद्रव्यांची गरज अधिक लागते, व ती भागविण्यासाठीं प्राणवह स्रोतसांना अधिक कार्य करावें लागते. हें कार्य श्वास या स्वरूपानें व्यक्त होतें. रूपावस्थेंत जेव्हां प्राणवह स्रोतसांत, फुप्फुसांत प्रत्यक्ष संप्राप्ति घडते तेव्हां वातकफांनी प्राणवह स्रोतसांचा मार्ग रुद्ध होतो व प्रतिलोमत्वामुळें प्राण व उदान यांच्या गतीला अडथळा निर्माण होऊन श्वास लागतो.

वातश्लेष्मविबद्धत्वादुरसःश्वासमृच्छति। च. चि.

उरस्थानांतील रसवहस्रोतसें रुद्ध झाल्यामुळें श्वसनाला अडथळा येतो; किंवा प्रत्यक्ष ज्या वेळीं उरःस्थान दुर्बल होतें, तेथील धातुघटकांचा नाश होतो, पाक व व्रण होतो त्यावेळीं बाह्य प्राणाचें आंत गमन वा अंतर–वायूचें बाह्य गमन ह्या प्राण–उदानाच्या क्रिया पुरेशा होत नाहींत. शेष–अवयवांकडून तें काम करून घ्यावें लागते. व तें करावयाचें म्हणजे राहिलेल्या फुप्फुसघटकांना, शरीरांतर प्राणाची गरज भरून काढण्यासाठीं जलद गतीनें काम करावें लागतें. त्यामुळें श्वास हें लक्षण उत्पन्न होतें.

यः प्राणवहस्रोतांस्यन्वेति तेन श्वासः जायते च. नि. ६

जितक्या प्रमाणांत फुप्फुसघटकांचा पाक झाला असेल तितक्या प्रमाणांत श्वास लागत असतो. ज्वर, कास, रसक्षय, ओजःक्षय, रक्तक्षय हीं कारणें श्वास हें लक्षण निर्माण करण्यास सहाय्यभूत होतात.

(४) प्रतिश्यायः-

शुक्र व ओजःक्षय हें क्षयाचें कारण असतां, प्रतिश्याय हें लक्षण असतें. साहसजन्य राजयक्ष्म्यांत हें आढळत नाहीं. कारण साहस करणारा पुरुष प्रायः मांससार असतो. नाकावाटें बाहेर पडणारा मल प्रायः मांसमल असतो. मांससार माणसांत प्रतिःश्याय हें लक्षण नसतें. मांस धातु असार व शिथिल होऊं लागला म्हणजे हें लक्षण निर्माण होतें. राजयक्ष्म्यांत धातुमल वाढतात. मांसधातूचे मलवृद्धीमुळें या रोगांत पडसें हें लक्षण असतें. याला कारण तीनही दोष असतात. स्रोतोरोधामुळें प्रतिलोमगति प्राप्त झालेली असते; त्यामुळें रसाला पुढील धातूंत प्रवेश मिळत नाहीं. शिवाय पित्त व कफ यांचा उत्क्लेश झाल्यामुळें वाताच्या प्राबल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शरिरांतील विविध बाह्य स्रोतसांवाटें त्यांचें गमन सुरूं होतें. त्यांपैकीं नासा हें एक बहिर्मुख स्रोतस आहे, त्यांतून उत्क्लेशित झालेल्या दोषांचा स्राव सुरूं होतो. प्राकृतिक कफ, पित्त, रसरक्तादि धातु शरीर धारणेला आवश्यक असतात. ते वातासहवर्तमान नाकावाटें बाहेर पडतात. त्यामुळें शरीर कृश होतें, डोकें जड होतें, दुखतें, नाकाला वास बरोबर समजत नाहीं, आवाज बसतो, अरुचि निर्माण होते व खोकला, ताप, इंद्रियदौर्बल्य अशीं अनुषंगिक लक्षणेंही क्रमाक्रमानें उत्पन्न होतात. चरकांनीं राजयक्ष्म्यांतील प्रतिश्यायाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:-

घ्राणमूले स्थितः श्लेष्मा रुधिरं पित्तमेव वा ।
मारुताध्मातशिरसो मारुतं श्यायते प्रति ।
प्रतिश्यायस्ततो घोरो जायते देहकर्शनः ।
तस्य रूपं शिरःशूलं गौरवं घ्राणविप्लवः ।
ज्वरः कासः कफोत्क्लेशः स्वरभेदोऽरुचिःक्लमः ।
इंद्रियाणामसामर्थ्यं यक्ष्माचातः प्रवर्तते ॥ च. चि. ८

(५) रक्तपित्तः-

पित्तात् रक्तस्य चागमः

ज्वराप्रमाणेंच रक्तपित्त हें लक्षण पित्तामुळें होणारें व महत्वाचें आहे. प्रारंभीं हें लक्षण कदाचित थोडकें असेल. केवळ थुंकींतून जो कफ पडतो तो लालसर (लोहित) असेल. पण धातुपाक जसा जास्त होईल तसें हें लक्षण तीव्र स्वरूपाचें असेल. पण पाकांत मोठी रक्तवाहिनी फुटली तर रक्ताचा लोंढाच्या लोंढा तोंडांत येईल. थुंकतां थुंकतां, तोंडातून काढतां काढतां रोगी बेजार होईल. फुप्फुसांत रक्त सांठून तो गुदमरेल. पाण्यांत बुडून ज्याप्रमाणें मरण येते त्याप्रमाणें प्राणवह स्रोतसांत रक्त भरून जीव कासावीस होऊन मरण येईल. दैववशात् रक्तस्राव थोडा झाला-संधान झालें तर- क्रमाक्रमानें कमी रक्त बाहेर पडेल व पुढें सकफ ग्रथित कृष्ण, पूतिल असेंहि रक्त येऊं लागेल. तशा स्थितींतही कांहीं दिवस रोगी काढेल. रक्तपित्ताचा स्राव कित्येक वेळां ओकारींतून होतो. आमाशयांकडील रक्तवाहिनी फुटून रक्त आमाशयांत येईल व उदान प्रेरणेनें तें वांतीवाटें बाहेर पडेल. याचप्रमाणें या रक्तपित्ताचा स्राव मूत्रावाटें वा गुदावाटेंहि या रोगांत होण्याची शक्यता असते साहसजन्य किंवा शुक्र, ओजक्षयजन्य राजयक्ष्मा असला म्हणजे प्रायः ऊर्ध्वमार्गांत रक्त येतें. रोग्याला प्रथम खोकला सुरूं होतो, व पुढें खोकून खोकून फुप्फुसाला क्षत पडतें. त्यांतून रक्ताचा स्राव सुरूं होतो.

स कासप्रसंगात् उरसि क्षते शोणितं ष्ठीवति । चरक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उरस्थानांत ज्या रसवाहिन्या येतात त्यांत रोध झाल्यामुळें वाहिन्यांतील रस विदग्ध होतो. त्यांत तीक्ष्णता, ऊष्णता, जी प्रारंभीं नसते ती निर्माण होते. त्यामुळें आधीच उरस्थ रसवाहिन्या रोधामुळें गुरु व फुगीर झालेल्या असतात, त्यांतच तीक्ष्णता, ऊष्णता हे पित्ताचे गुण वाढले म्हणजे त्याचा परिणाम वाहिन्यांवर होऊन त्या वाहिन्या फुटतात व त्यांतून रक्तपित्ताचा स्राव सुरूं होतो. खोकला हें लक्षण नसतांनाही कित्येक वेळां फुप्फुसांतून रक्तस्राव क्षयांत आढळतो. तेथें रसाची विदग्धता हें कारण असतें.

विषमाशन हें क्षयाचें कारण असतां उत्क्लिष्ट झालेला श्लेष्मा जर रक्त-वाहिन्यांत संचित झाला तर तो पुढें विदग्ध होतो. त्यांत क्षाराचे गुण निर्माण होतात. विदग्धः क्षारतां व्रजेत् ।
व त्यामुळें सकफ रक्तपित्ताचा स्राव होऊं लागतो.

अभिसन्ने शरीरे तु यक्ष्मिणोर्विषमाशनात् ।
कण्ठात् प्रवर्तते रक्तं श्लेष्माचोत्क्लिष्ट संचितः ॥ च.

विषमाशन हें कारण असतां कित्येक वेळां ओकारीवाटें रक्ताचा स्राव क्षय रोगांत आढळून येतो.

" च्छर्दनं रुधिरस्य च । "

या रक्तस्रावाची कल्पना चरकांनीं पुढीलप्रमाणें दिली आहे.

रक्तं विबद्धमार्गत्वान्मासादीन्नानुपद्यते ।
आमाशयस्थमुत्क्लिष्टं बहुत्वात्कण्ठमेति च ॥ च. चि.

रक्ताचा मांसादिकांकडे जाण्याचा जो मार्ग असतो तो क्षयोत्पादक दोषांनीं रुद्ध केल्यामुळें रक्ताला पुढील गति मिळत नाहीं, ते तसेंच सांठतें व तें स्थान त्याला अपुरें पडून तें पाझरतें, (प्रस्रवणजलमिव ।) आणि आमाशयांत येऊन तेथून च्छर्दि रूपानें बाहेर पडतें. रक्ताच्या गमनाला अडथळा आल्यामुळें त्याला अन्य मार्ग काढावा लागतो. तें मागें सांठत सांठत शेवटीं पचन मार्गांत फुटतें, व आमाशयांत आलें कीं वांती होऊन ऊर्ध्व मार्गानें बाहेर पडतें. ग्रहणीकडे पाझरून सांठलें तर गुदावाटें अधोमार्गानें बाहेर पडतें.

(६) पार्श्वशूल :– संरुजति पार्श्वे ।

पार्श्वशूल हें लक्षण प्रत्येक क्षयी माणसांत असतेंच असें नाहीं. पार्श्वस्थानांत वात वाढल्यामुळें हें लक्षण निर्माण होतें. वाताचे रूक्ष, खर, दारुण हे गुण वाढल्यामुळें हें उत्पन्न होतें. श्वास घेतांना किंवा बाहेर सोडतांना बरगड्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुखतें, किंवा कित्येक वेळां पार्श्व भागांत सारखेच दुखत असतें. वातामुळें उरस्थ घटकांच्या कांहीं भागाचा संकोच व कांहींचा विकास होऊन हा शूल सुरू होतो.

पार्श्वशूलंत्वनियतं संकोचायामलक्षणम् । च.

भीति, शोक, चिंता अशा कर्षणजन्य कारणांमुळे, अथवा अनशन, अति-व्यवाय, ओजक्षय या कारणांनीं जेव्हां क्षय होतो त्या वेळीं प्रायः पार्श्वशूल हें लक्षण आढळतें.

(७) **शिरःशूल** :— राजयक्ष्मा या रोगांत डोकेंदुखी हें लक्षण ज्या वेळीं वातप्रधान दोष शरिरांत ऊर्ध्वभागीं गमन करितात त्या वेळीं होणारें आहे. क्षयरोगजनक कारणांनीं वात प्रकुपित होऊन तो कफाचा उत्क्लेश करून कफानें शिर हें इंद्रिय स्थान भरून टाकतो तेव्हां शिरःशूल हें वाईट लक्षण निर्माण होतें. शिरस्थ रसवाहिन्या कफानें भरतात, त्यामुळें डोकें जड होतें, याला वात कारणी-भूत असल्यानें डोकें दुखतें. कफाबरोबर पित्तही येत असल्यानें डोकें तापतें. अशीं क्षयज शिरःशूलांत तीनहीं दोषांचीं लक्षणें असतात.

शिरःशूलं ससंतापं यक्षिमणः स्यात्सगौरवम् । च.

त्या वेळीं हें लक्षण तीव्र स्वरूपाचें आहे असें समजावें. मज्जाधातूच्या क्षयामुळें शिरःशूल जेव्हां असतो त्यावेळीं डोक्याचा विशेषतः मागील भाग पश्चात् मस्तिष्क हा दुखतो. डोळे ओढल्यासारखे व शुष्क वाटतात, डोकें पोकळ झालें आहे असें वाटतें, डोळ्यापुढें अंधारी येते, झोंप येत नाहीं, विचार सुचत नाहींत, शौचास साफ होत नाहीं. हीं मज्जा क्षयाचीं लक्षणें सोबत असतात.

शुक्रक्षयांत सर्व डोकें दुखतें डोळ्यांची आग होते, मस्तक तापतें. हीं लक्षणें असतात.

(८) **स्वरभेदः**—

स्वरभेद हें लक्षण सर्व प्रकारच्या क्षयांत आढळणारें लक्षण आहे. बोलण्याच्या क्रियेंत जो अस्वाभाविक निनाद येतो त्याला स्वरभेद म्हणतात. हा वाक् इंद्रियाचा विकार आहे. ओज, शुक्र, मज्जा, रस, मांसधातु या धातूंच्या क्षयाचा परिणाम स्वरेंद्रियावर घडतो. उदान वायूच्या दौर्बल्यामुळें स्वरोत्पादन हें कार्य क्षीण होतें.

क्षयात् कषेत् ।
धूमायतीव चात्यर्थम् ॥ वा.

स्वरयंत्राचे ठिकाणीं ताडन केल्यासारखी संवेदना होते व त्यांतून धूर निघाल्यासारखें वाटतें. धातुक्षयामुळें होणारें हें लक्षण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(९) कंठोध्वंसः-

घशांत व स्वरयंत्रांत व्रण उत्पन्न होतो याला कारण प्रायः साहस हें असतें. उपद्रव म्हणून ज्यावेळीं हा निर्माण होतो, त्यावेळीं वातप्रकोप हें कारण असतें. धातुक्षयामुळें वात प्रकुपित होऊन हें लक्षण निर्माण होत असतें.

(१०) अरुचिः-

हें रसनेंद्रियाचें लक्षण आहे. आप्यप्रधान गुणांनीं हें इंद्रिय तयार झालें आहे. (आप्या जिव्हा) जिव्हेच्या ठिकाणीं स्पर्शनेंद्रिय, व रसनेंद्रिय हीं दोन्हीं असतात. त्यांपैकीं रसनेंद्रिय हें अरुचींत विकृत होते. रसक्षय, स्रोतोरोध यामुळें हें लक्षण निर्माण होतें. आस्यवैरस्य ही अरुचीच्या पुढली अवस्था आहे. यांत द्रव्याच्या रसाचें ज्ञानच होत नाहीं, किंवा जें होतें तें विकृत होतें–मधुर रसाचें पदार्थ कडु लागतात. अरुचि मध्यें रसज्ञान असते. पण एकाच रसाच्या निरनिराळ्या रसांतही जे सूक्ष्म सूक्ष्म भेद असतात ते जिभेला समजत नाहींत. त्यामुळें खालेल्या द्रव्याबद्दल जी लालसा उत्पन्न होत असते. ती होत नाहीं. रसाचें स्थूल ज्ञान असतें पण सूक्ष्म ज्ञान नसतें. त्यामुळें रसाच्या रुचीनें जो आल्हाद मिळावयाचा तो मिळत नाहीं. रुचीचा सबंध मनाशीं असतो. आनंद मन, हृदय यांना मिळत असतो. यामुळें अरुचीजनक दोष जिव्हेंत असतात तसेंच ते हृदयांतही असतात. अरोचकांत जिव्हासंश्रित जे दोष असतात ते शारीरिक दोष असतात व हृदयसंश्रित जे दोष असतात ते मानसिक किंवा उभयाश्रयी असतात.

राजयक्ष्म्यांत अरुचि हें चिन्ह, पूर्वरूपांत, रूपांत, आणि उपद्रवांतही असतें. त्यामुळें पोटांत जे अन्न जावयाचें तें जात नाहीं. त्यामुळें शरीर क्षीण होण्यास मदत होते

(११) अग्निमांद्य, अपचन, च्छर्दि, प्रसेकः-

पूर्वरूपांत अग्निमांद्य असतें, रूपांतही असतें. कफप्रधान दोषांनीं आमाशयाकडील स्रोतसें रुद्ध झालीं म्हणजे, हीं लक्षणें निर्माण होतात. आमाशय ज्या धातूंपासून बनला आहे त्यांचें पोषण दुष्ट रसानें झाल्यामुळें, त्यांचें प्राकृतिक कार्य होत नाहीं. वातप्रकोपाचा परिणाम समानावर होऊनही अग्निमांद्य हें लक्षण निर्माण होतें. त्यामुळें पोटांत अस्वस्थपणा निर्माण होतो. पोटांत वात कोंडतो, शौचास साफ होत नाहीं, तोंडाला पाणी सुटते, मळमळतें किंवा कित्येक वेळां ओकारीही सुरू होते. मार्गांत रुद्ध झालेले दोष विलोम होऊन रसाबरोबर आमाशयाकडे आले म्हणजे आमाशयांत गौरव, अपचन, अग्निमांद्य हीं लक्षणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्माण होतात. हे दोष आमाशय, व त्यांतील उदान वायु यांचा क्षोभ निर्माण करून प्रसेक व च्छर्दि हीं लक्षणें निर्माण करितात. वेगावरोधजन्य राजयक्ष्म्यांत च्छर्दि हे लक्षण असतें. विषमाशनजन्य क्षयांत प्रसेक हें लक्षण असतें.

(१२) विड्भ्रंश, संशोषः–

वेगावरोधजन्य राजयक्ष्म्यांत मलावष्टंभ हें लक्षण असतें. बाकी इतर तीन कारणांमुळें होणाऱ्या क्षयांत विड्भ्रंश हें लक्षण आढळतें. प्रकुपित झालेल्या वाताचा परिणाम पक्वाशय व गुद हे अवयव, व त्यांवर नियंत्रण ठेवणारा अपान वायू यांवर होऊन त्यांचा क्षोभ होतो व त्यामुळें वारंवार शौचास होतें.

उपद्रवाचे अवस्थेंत स्रोतोरोधाचा परिणाम म्हणून दोष साक्षात् ग्रहणी, पक्वाशय यांकडे येऊन त्यामार्गानें बाहेर पडूं लागतात, व अपानाचा क्षोभ होऊन अतिसार हा उपद्रव निर्माण होतो. यामुळें रोग्याचा शक्तिपात फार होतो. कारण त्याचें मलवल कमी कमी होतें.

कारणभेदानुरूप लक्षणभेदः–

कोणत्याहि कारणामुळें झालेल्या राजयक्ष्म्यांत कास, स्वरभेद, अरोचक, पार्श्वशूल, शिरःशूल व ज्वर हीं सामान्य लक्षणें प्रायः असतातच; पण कारण–भेदामुळें कांहीं विशेष लक्षणेंहि आढळतात.

साहसजन्य राजयक्ष्म्यांत अंसावमर्द, अंगमर्द, च्छर्दि, प्रसेक, प्रतिश्याय हीं लक्षणें नसतात. जृंभा, उरोरुजा, वर्चोभेद कंठोध्वंस, शोणितकफष्ठीवन हीं विशेष लक्षणें असतात.

वेगावरोधजन्य क्षयांत प्रतिश्याय हें लक्षण असतें आणि जोडीला अंगमर्द, मुहुच्छर्दि, वर्चोभेद हीं विशेष लक्षणें असतात. शुक्रक्षयजन्य क्षयरोगांत, अंसावमर्दन हें लक्षण नसून अंससंताप हें लक्षण असतें व श्वास हेंही लक्षण आढळतें.

विषमाशनजन्य राजयक्ष्म्यांत अंगमर्द हें लक्षण नसतें. उलट प्रसेक, आणि 'च्छर्दनं रुधिरस्य' हीं इतर प्रकारांत न सांपडणारीं लक्षणें या प्रकारच्या क्षयांत आढळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारणभेदात् लक्षण भेदः–

साहसजन्य	वेगावरोधजन्य	शुक्रक्षयजन्य	विषमाशनजन्य
×	प्रतिश्याय	प्रतिश्याय	प्रतिश्याय
कास	कास	कास	कास
स्वरभेद	स्वरभेद	स्वरभेद	स्वरभेद
अरोचक	अरोचक	अरोचक	अरोचक
पार्श्वशूल	पार्श्वशूल	पार्श्वशूल	पार्श्वशूल
शिरःशूल	शिरःशूल	शिरःशूल	शिरःशूल
ज्वर	ज्वर	ज्वर	ज्वर
×	अंसावमर्दन	अंससंताप	अंससंताप
×	अंगमर्द	अंगमर्द	×
×	मुहुच्छर्दि	×	च्छर्दि
वर्चोभेद	वर्चोभेद	वर्चोभेद	×
×	×	श्वास	×
×	×	×	प्रसेक
×	×	×	च्छर्दनं रुधिरस्य
जृंभा	×	×	×
उरोरुजा	×	×	×
शोणितकफष्ठीवन	×	×	×
कंठोध्वंस	×	×	×

६ राजयक्ष्म्याचें साध्यासाध्यत्व

लिंगेष्वल्पेष्वपि क्षीणं व्याध्यौषधबलाक्षमम्।
वर्जयेत् साधयेदेव सर्वेष्वपि ततोऽन्यथा॥ वा.

जो राजयक्ष्मी मनुष्य अत्यंत क्षीण झाला आहे त्याला या रोगाची लक्षणें जरी थोडी असली तरी तो अचिकित्स्य म्हणून सोडून द्यावा. कारण अशा क्षीण झालेल्या मनुष्याला व्याधीचें बल, तीव्रता व तसेंच औषधाचें बल सहन करण्याचें सामर्थ्य उरलेलें नसतें. ज्या रोग्याला व्याधीबल, व औषधबल सहन करण्याचें सामर्थ्य आहे त्याची चिकित्सा करावी. मग सर्व लक्षणें जोडीला असलीं तरी चालतील. पण व्याधी व औषधक्षम रोगी असला पाहिजे, म्हणजे तो बरा होऊं शकतो. व्याधीची तीव्रता व औषधाचें वीर्य सहन करण्यास दोषबल व धातुबल चांगलें असावें लागतें. हें बल ज्या रोग्यांत असतें त्याला औषध देऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरा करण्याची शक्यता असते. पण दोष व धातुबल क्षीण होऊन केवळ ज्याच्या शरिरांत विट्बल फक्त उरलें आहे अशा क्षीण मनुष्याला रोगाचें व त्यावर योजलेल्या औषधांचें वीर्य सहन होत नाहीं. अतएव क्षीणबली मनुष्य चिकित्सेला वर्ज्य समजावा.

महाशनं क्षीणमाणमतिसारनिपीडितम् ।
शूनमुष्कोदरं चैव यक्ष्मिणं परिवर्जयेत् ॥ सु उ.

क्षयरोगी जो खातो पुष्कळ पण त्यामानानें पुष्ट होत नाहीं; उलट जो क्षीण क्षीण होत चालला आहे, असा वर्ज्य करावा. कारण, अग्नि चांगला आहे पण त्याचा तीक्ष्ण पाक होत असल्यानें खावें तें फस्त होतें आहे. असें वातानुगुण पित्त आंत्रांत असेल व कफाचा क्षय झाला असेल अशा ठिकाणीं बृंहण पदार्थ क्षयरोग बरा व्हावा या कल्पनेनें पोटांत घातले असले तरी त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तीक्ष्णाग्निमुळें जें खावें त्याची राखच होत असेल, सार भाग निर्माण होत नसेल तर अशा ठिकाणीं बृंहणचिकित्सा करून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं जें पोटांत घालावें तें भस्मसात् होऊन जाणार. यासाठीं असा रोगी वर्ज्य करावा.

तसेंच ज्या क्षयी माणसाला अतिसार झाला आहे असा रोगीही सोडावा कारण उपद्रवाचे अवस्थेंत निर्माण झालेला अतिसार मारक ठरतो. दोषबल, धातुबल हीं क्षीण झालेलीं असतांना केवळ पुरीषबलावर क्षयरोगी जगत असतो. अशा स्थितींत अतिसारावाटें पुरीषक्षय होत गेला म्हणजे जें त्याचें विट्बल शेष आहे तेंहि संपुष्टांत येत जाणार. असा रोगी लवकरच मरण्याची शक्यता असते.

शून मुष्कोदरं :– ज्याच्या वृषणाला सूज आली आहे असा रोगी अचिकित्स्य आहे. कारण मुष्क ह्यांत शुक्रधरा कला असते. त्या कलेवर क्षय रोगाच्या दोषांचा परिणाम झाला असेल तर त्यानें अत्यंत मोठें मर्म गांठलें व सर्वांत श्रेष्ठ धातु गांठला असें आहे. यासाठीं असा रोगी बरा होऊं शकणार नाहीं. मुष्काला व उदराला सूज आहे असा रोगीही वर्ज्य करावा. एकाच वेळीं उदराच्या मांसधरा त्वचेखालीं पाणी सांठलें आहे व त्या पाण्याचा प्रवाह उदरांत अधिक झाल्यामुळें त्याच्या दाबानें मुष्काकडील द्वारें खुलीं झालीं आहेत व त्या पाण्याला गति मुष्कांत मिळाली असा त्याचा अर्थ आहे. असा रोगी बरा होऊं शकत नाहीं. कारण उदरांत पाणी सांठतें, तें पूर्णावस्थेंत पोचलें असतां, वेध करून काढावें लागतें. वेधकर्मानें केलेला व्रण भरून येणार नाहीं. तसेंच विरेचनावाटें पाणी काढावें म्हटलें तर क्षयी मनुष्य अशा उपद्रवावस्थेंत अविरेच्य असतो, मलक्षयानें लवकरच तो प्राण सोडण्याची शक्यता असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुक्लाक्षमन्नद्वेष्टारमर्ध्वश्वासनिपीडितम् ।
कृच्छ्रेण बहुमेहन्तं यक्ष्मा हन्तीह मानवम् ॥

ज्याचे नेत्र शुक्ल म्हणजे पांढरे झाले आहेत असा रोगी वर्ज्य करावा. हें लक्षण रक्तादि वर्णकृत धातुक्षयाचें– पांडुरोगाचें द्योतक आहे.

अन्नद्वेषी क्षयी मनुष्यास बृंहण करतां येत नाहीं म्हणून तो वर्ज्य आहे. अन्नप्रीति असेल तर पोटांत विविध तऱ्हेचे घृतमांसादि कल्प देऊन बृंहण करतां येतें पण अन्नद्वेषच असेल तर कांहींच चालणार नाहीं.

तसेंच ज्याला ऊर्ध्व श्वास लागला आहे असा रोगी वर्ज्य करावा. ऊर्ध्व-श्वास हा हृदयदौर्बल्य व फुप्फुसांतील धातुनाशाची पराकाष्टा पोंचली याचा द्योतक असतो. तो असाध्य आहे.

ज्याला कष्टानें पुष्कळ लघ्वी होते असा रोगी वर्ज्य करावा. कारण क्षयरोगाच्या दुष्टीचा परिणाम मेद, क्लेद व बस्ति यांच्यावर झाला असा याचा अर्थ आहे. ह्यांत मूत्रक्षय व धातुक्षय हीं दोनींहीं आहेत असा याचा अर्थ आहे. बस्ति विकृत झाला आहे त्यामुळें लघ्वीला अडतें. मेह हा क्षयांतील मोठा उपद्रव आहे. धातुक्षयजन्य मेह बरा करतां येत नाहीं.

ज्वरानुबंधरहितं बलवन्तं क्रियासहम् ।
उपक्रमेदात्मवंतं दीप्ताग्निमकृशं नवम् ॥

ज्वराचा सारखा त्रास ज्याला नाहीं असा रोगी बरा करणें शक्य असतें. कारण ज्वरांत धातु क्षय होत जातो तो या रोग्यांत होत नसतो.

बलवान व क्रियासह रोगी असावा. म्हणजे ज्याचें देहबल चांगलें आहे व जो क्रिया करून घेण्यास समर्थ आहे असा रोगी असावा. अल्पक्षीण झालेले धातु लवकर बलशाली होऊं शकतात. तसेच रोगी आत्मवान पाहिजे. जितेंद्रिय असला म्हणजे पथ्यपालन, ब्रह्मचर्यपालन करूं शकतो. व यामुळें हा रोग बरा होण्यास सुलभ जाते.

दीप्ताग्नि मनुष्याची चिकित्सा करणें सोपें असते कारण त्या ठिकाणीं फक्त बृंहण करणारीं औषधें दिलीं म्हणजे भागतें. अग्निमांद्य असेल तर प्रथम अग्नि प्रदीप्त करावा लागतो व मग जोडीला बृंहण द्रव्यें द्यावीं लागतात. बृंहण द्रव्यें प्रायः गुरु असतात, तीं अग्नि मंद करतात. म्हणून अग्नि चांगला आहे असा रोगी चिकित्सेला चांगला. नवीनच रोग जडलेला रोगी असावा. म्हणजे कालकृत् बल त्याला बरें करण्यास उपयोगीं पडतें. वर्ष झालें असेल तर तीनीही कालांतून तो आलेला आहे. ऋतु काल बदलले तरी त्याचा कांहीं उपयोग संप्राप्ति बदलण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला नाहीं असाच याचा अर्थ आहे. सर्वच दोष जास्त प्रमाणांत बिघडले म्हणजे कोणत्याच कालांत बरें वाटत नाहीं. जसजसा काल अधिक वाढेल तसतसा धातुक्षय वाढलेला असतो, संप्राप्ति पुढें पुढें चालूं असते; यासाठीं नवीनच रोगी असावा.

क्षयरोग जडला म्हणजे जास्तींत जास्त एक सहस्र दिवस रोगी जगतो. परंतु तरुण, बलवान, आत्मवान रोगी, व उपचार करणारा वैद्यही चांगला असेल तर त्यांतूनही क्षयरोगी बरा होण्याची व दीर्घ काल जगण्याची शक्यता असते.

७ चिकित्सा

१. प्रतिबंधक चिकित्साः—

क्षय रोग ज्या ज्या कारणांनीं होतो तीं तीं कारणें लक्ष्यांत घेऊन त्यापासून अलिप्त राहिले पाहिजे, म्हणजे क्षय रोग हा मुळांत होणारच नाहीं. कोणकोणत्या कारणांनीं हा विकार होतो याचा यापूर्वीं विचार झालाच आहे. तीं कारणें वर्ज्य केलीं पाहिजेत.

(१) साहस वर्ज्य करावेंः—

आपल्या शक्तीबाहेरचें कोणतेंहि काम करूं नये. म्हणजे बलहानि होणार नाहीं, व राजयक्ष्माजनक दोष उत्पन्नच होणार नाहींत.

साहसं वर्जयेत् कर्म रक्षञ्जीवितमात्मनः।
जीवन् ही पुरुषं स्विष्टं कर्मणः फलमश्नुते ।। च. नि. ६

सध्यां धांवण्याच्या पोहण्याच्या, सायकलीवर बसण्याच्या, विमान हांकण्याच्या, डोंगर चढण्याच्या शर्यती होत असतात. पण त्यांचा अभ्यास न ठेवतां कित्येक वेळां उच्चांक गाठण्याची कित्येकांना तृष्णा लागते, व मग हे लोक या रोगाला बळी पडत असतात.

(२) वेगावरोध करूं नये.

रोगाः सर्वेऽपि जायन्ते वेगोदीरणवारणैः।

अधोवात, मलमूत्रादिकांचा आलेला वेग लगेंच पोंचविला पाहिजे. ही आरोग्याची व दीर्घकाल जगण्याची गुरुकिल्ली आहे. कांहीं तरी कामांत गुंतल्यामुळें वेळच्या वेळीं शौचास न जाणें, किंवा अन्य कांहीं प्रतिष्ठेच्या भावनेला बळी पडून वेगधारण केलें जातें. यामुळें फाजील ताण गुद, पक्काशय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंत्र यांवर पडतो, व हीं गात्रें दुर्बल होतात. त्यांचें आरोग्य बिघडूं न देणें हें आपल्या हातचें असतें. शरीरयंत्र दीर्घकालपर्यंत चालण्यास त्या शरिरांत उत्पन्न होणाऱ्या मलांचा निचरा शरीराबाहेर योग्य तऱ्हेनें व योग्य वेळीं होणें आवश्यकच असतें. यासाठीं वेगाचा अवरोध कधींच करूं नये म्हणजे क्षयरोग होणार नाहीं व मलावष्टंभजन्य कोणतेच इतरही व्याधी होणार नाहींत.

सर्वमन्यत् परित्यज्य शरीरमनुपालयेत ।
तदभावे हि भावानां सर्वाभावः शरीरिणाम् ॥ च. नि. ६

(३) शुक्रक्षय होऊं देऊं नये.

ब्रह्मचर्यपालन हें मोठें आरोग्यरक्षक व दीर्घकाल जीवन चालूं ठेवणारें आहे. ब्रह्मचर्याचा ऱ्हास विविध तऱ्हेनें होत असतो. कामोत्तेजक चित्रें, वाङ्मय, नाटकें, कादंबऱ्या यांचे वाचनानें वीर्यस्खलन होतें. सिनेमा, नाटकें यांत अनेक हावभाव कामुकतेचे केले जातात व हीं पाहणें यांचा परिणाम आपल्या मनावर व आपल्या वासनांवर झाल्याखेरीज रहात नाहीं. स्त्रीदर्शन, स्पर्शन, श्रवण, वाचन, यामुळें रेतःस्राव होतो. यासाठीं या सर्व गोष्टी वर्ज्य केल्या पाहिजेत, व या विषयांचें सेवन कोणीं करावें, कोणीं करूं नये याचें शिक्षण समाजाला मिळालें पाहिजे म्हणजे क्षय रोगासारख्या अनेक महान् व्याधींपासून समाजाचें रक्षण होईल.

पुष्कळ तरुणांना स्वप्नांत वीर्यस्खलन होत असतें. याला स्वप्नावस्था असें म्हटलें जातें. आहार, विहार, मनाचें स्वास्थ्य व वेगावरोध यांवर स्वप्नावस्था होणें वा न होणें ही गोष्ट अवलंबून असते. दही, गूळ, साखर, उडीद, पावटे असे शुक्रल पदार्थ अधिक खाल्ले तर त्यापासून शुक्रविरेचन होतें. मलमूत्रांचा वेग आला आहे अशा वेळीं निद्रिस्त राहिल्यानें त्या मलमूत्रांचा दाब या दोहोंमध्यें असलेल्या शुक्राशयावर पडतो व याच वेळीं दोषज स्वप्न पडतें, व त्यांत वीर्य-स्खलन झालेलें असतें.

कित्येक तरुणांना मुद्दाम मुष्टिमैथुन करून वीर्यपतन करून घेण्याची घाणेरडी व आत्मघातकी संवय लागलेली असते. ती त्यांची संवय त्यांना नीट समजाऊन सांगून दूर केली पाहिजे म्हणजे त्यांच्या शरिराचा नाश टळेल.

कित्येक लोक तर अति स्त्रीसंग करून आपल्या देहाचा ऱ्हास करून घेत असतात. यासाठीं ब्रह्मचर्यपालनाचे नियम समाजाला, त्यांतील तरुण वर्गाला समजावून दिले तर भावी पिढी क्षयरोगी होणार नाहीं. क्षयरोग होऊं न देण्यास व झाला असतां तो बरा होण्यास ब्रह्मचर्यपालनाची अत्यंत जरूरी आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या वीर्यांत मोठें सामर्थ्य असतें. रोजच्या रोज असंख्य धातुघटक काम करून मरत असतात व त्यांची जागा दुसरे नवे अधिक जोमाचे घटक घेत असतात. हे नवीन घटक उत्पन्न होण्यासाठीं या वीर्याची जरूरी आहे. त्याशिवाय जनन कार्य होणार नाहीं. स्वतः निरोगी व दीर्घायुषी राहण्यास या शुक्राची आवश्यकता आहे. या शुक्रावर वृद्धीचे व्यापार ज्ञान व आत्मोन्नती अवलंबून असतात. शुक्रक्षयानें सर्व शरीर दुर्बल होतें, व कोणत्याच इंद्रियांत जोर रहात नाहीं. यामुळें वाटेल ती रोगबीजें आपला प्रभाव दाखविणें शक्य असतें. यासाठीं शरिराचे जे अत्यंत सारभूत व श्रेष्ठ द्रव्य शुक्र त्याचें पालन केलें पाहिजे. म्हणजे क्षय रोगाची उत्पत्तीच होणार नाहीं.

आहारस्य परं धामं शुक्रं तद्रक्ष्यमात्मनः ।
क्षयो ह्यस्य बहून् रोगान्मरणं वा नियच्छति ॥ च. नि.

(४) विधिपूर्वक अन्नसेवनः-

प्रत्येक मनुष्य सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंपेपर्यंत पोटासाठीं खटपट करीत असतो. पण या पोटांत कोणते अन्न, किती प्रमाणांत, कोणत्या वेळीं व कसें घातलें पाहिजे याची शास्त्रीय माहिती विचारांत घेऊन त्याप्रमाणें अन्नसेवन करणें हें त्याला फारसें अवगत नसतें. या त्याच्या अज्ञानामुळें व आळसामुळें ज्या अनेक व्याधी होतात त्यांपैकीं क्षय रोग हा एक मोठा व्याधी आहे. कधीं सकाळीं, कधीं दुपारीं, कधीं मध्यरात्रीं जेवावयाचें, कधीं जेवावयाचेंच नाहीं अशा खाण्यापिण्यांतील अनियमितपणामुळें म्हणजे विषमाशनामुळें क्षयरोग होत असल्यामुळें तो टाळावयाचा असेल तर माणसानें आपली जेवणाची जी वेळ आहे त्यावेळींच जेवलें पाहिजे. म्हणजे आंतड्यालाही एक प्रकारची नियमितपणाची संवय लागते. अकरा वाजतां जेवावयाचा परिपाठ असेल तर अकरा वाजतां नेमकी भूक लागते. त्यावेळीं पचन करण्यास आमाशयस्थ वात, पित्त, कफ तयार असतात. ते पचनासाठीं अन्न यावें म्हणून वाटच बघत असतात. अशा वेळीं अन्न जर घातलें नाहीं तर त्यांची निराशा होते, ते कमकुवत होतात. आमाशयही अबल होतो. ते ज्या वेळीं अनुपस्थित असतात अशा वेळीं अन्न पोटांत घातलें तर त्या अन्नाचें स्वागत करणार कोण ? त्याला दीर्घ काळ तिष्ठत राहावें लागतें. मग त्यापासून अन्न आंबते, सडतें, नासतें. अनेक विकार निर्माण करितें. त्या दुष्ट अन्नाचा परिणाम त्या आशयावरच झाल्याखेरीज रहात नाहीं. त्याचे धातु विस्कळित होतात. त्याचें क्रियासामर्थ्यहि नष्ट होतें व त्यामुळेंच राजयक्ष्माजनक दोषांची शरिरांत पैदास होत असते. यासाठीं राजयक्ष्मा टाळावयाचा असेल तर शास्त्रोक्त विधिपूर्वक अन्न सेवन करणें अत्यावश्यक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिताशीस्यान्मिताशीस्यात्कालभोजी जितेन्द्रियः ।
पश्यन् रोगान् बहून् कष्टान् बुद्धिमान् विषमाशनात् ।। च. नि.

(५) क्षयरोगाचा संपर्क टाळणें:-

क्षय रोगाचा प्रसार उपसर्गानें होत असतो. क्षयरोग्याचा संबंध आला कीं, क्षय रोग जडतो. यासाठीं क्षयी रोग्यापासून दूर राहिले तर क्षय रोगच होणार नाहीं. क्षयरोग्याच्या खोकल्यांतून श्वासावाटें क्षयरोग होत असतो. यास्तव ज्या ठिकाणीं क्षयी रोग्याचे श्वासोश्वास चालू आहेत त्या स्थानापासून दूर राहिले पाहिजे. खोकल्यांतून पडलेला क्षयी रुग्णाचा कफ वाळतो, व तो मातीशीं मिश्र झालेला असतो. तो धूळीकणांबरोबर हवेंत वावरतो व श्वासाबरोबर नाकातोंडांत, घशांत जातो व तेथें आपल्या वास्तव्याला प्रारंभ करतो. यासाठीं स्वच्छ मोकळ्या हवेंत राहण्याचा परिपाठ ठेवला तर क्षयरोग होणार नाहीं. कफ-प्रधान दोषांचा नाश सूर्य किरणांनीं होत असतो. यासाठीं सर्व कपडे उन्हांत तापवावेत म्हणजे क्षयरोग्याचा संपर्क बाधणार नाहीं. भरपूर मोकळी हवा, सूर्य-प्रकाश यामुळें क्षयरोगाचा प्रतिबंध होत असतो. यासाठीं, हवा, पाणी, अन्न, वस्त्र, कोणत्याही स्वरूपानें क्षयरोग्याचा संबंध येऊं न दिला तर क्षयरोग जडणार नाहीं.

दीर्घकाल मुदतीचे ज्वर, विषमज्वर, देवी, गोंवर, डांग्याखोकला, कास, प्रतिश्याय, अग्निमांद्य, अतिसार, अशा धातु क्षीण करणाऱ्या व्याधींतूनच राजयक्ष्मा आपलें डोकें वर काढत असतो. यासाठीं हे व्याधी पूर्ण बरे होऊन शरीरसामर्थ्य पूर्ववत् येईपर्यंत चिकित्सा चालू ठेवणें अगत्याचें असतें. त्यांची चिकित्सा मध्येंच सोडली तर विकृत अवयव पूर्ववत् कार्यक्षम झालेले नसतात, व त्यामुळें या रोगास प्रारंभ होतो. यासाठीं हे व्याधी पूर्ण बरे होईपर्यंत रोग्यानें चिकित्सा घेणें, व वैद्यानें चिकित्सा करणें क्षयरोग प्रतिबंधाच्या दृष्टीनें आवश्यक असतें. कित्येक स्त्रिया बाळंत झाल्यानंतर लवकरच घरांतील कामधंदे करूं लागतात. त्यांच्या अंगांत पूर्ववत् सामर्थ्य आलें आहे किंवा नाहीं याचा त्या विचारच करीत नाहींत. त्यामुळें त्या बिचाऱ्या क्षयरोगाच्या तावडींत सांपडतात.

क्षयरोग हा धातुक्षीणतेनें होत असतो. त्यासाठीं सकस व भरपूर अन्नाचा पुरवठा होणें आवश्यक असतें. असें पोषक अन्न मिळालें नाहीं तर क्षयरोग होतो.

पोषक अन्न, भरपूर मोकळी व स्वच्छ हवा, ब्रह्मचर्यपालन, शरिराचें सामर्थ्य कोणत्याहि तऱ्हेनें खालावूं द्यावयाचें नाहीं अशी वागणूक व कोणत्याहि दीर्घ व क्षीणता निर्माण करणाऱ्या व्याधीची संपूर्ण चिकित्सा केली जाणें या गोष्टी आपल्या देशांत झाल्या तरच क्षय रोगाचें प्रतिबंधपरिपालन होऊं शकेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) आहार चिकिसा :-

क्षयी रोग्याचें गेलेलें बल येण्यासाठीं, व क्षीण झालेला देह परत बलवान व पुष्ट होण्यासाठीं त्याला द्यावयाचा आहार पौष्टिक असा असला पाहिजे. बृंहण करणारीं द्रव्यें प्रायः पचण्यास जड असतात. त्यामुळें जाठराग्नि मंद होण्याची भीति असते यासाठीं त्याबरोबर अग्निदीपक द्रव्यें योजावीं लागतात. रोगी नीट आहार घेत असेल तर त्याला आग्रह करून बळजबरीनें अन्न घालण्याची जरूरी नाहीं. कदाचित् त्याला तें अन्न आवडलें नाहीं तर तें पोटांत घालूनही अंगीं लागण्याची शक्यता नसते.

क्षयी माणसाला नेहमींचें जेवण देण्यास हरकत नाहीं. शिवाय त्यांत विविध प्राण्यांच्या मांसापासून केलेले पदार्थ व निरनिराळीं औषधी द्रव्यें घालून सिद्ध केलेलीं घृतें विशेषतः असावींत.

(१) धान्यें:-

भात, गहूं, मूग यांचे पदार्थ क्षयी माणसानें खाण्यास हरकत नाहीं. मात्र हीं धान्यें, एक वर्षांचीं जुनीं असावींत. नव धान्यांपासून अग्नि मंद होतो व कफ वाढण्याची भीति असते.

(२) मांस:-

क्षयी माणसास निरनिराळ्या चतुष्पाद प्राण्यांचीं व पक्ष्यांचीं मांसें खावयास देणें हितकर असतें. त्यांत मोर, कावळा, घुबड, गिधाड, भास, हे पक्षीं विशेष चांगलें. मयूरमांस विषनाशक, क्षयरोगघ्न, शुक्रल, वृष्य व रसायन असतें. तें क्षयी माणसास द्यावें. बाकीचे पक्षी प्रतुद, आणि विष्किर आहेत. हा त्यांचा स्वभाव लक्षांत घेऊन योजना करावयाची असते.

शेळीचें मांस क्षयरोगनाशक आहे. या मांसाचा रस क्षयी माणसास सर्वदा पथ्यकर असतो. गाढव, उंट, हत्ती, घोडा, रेडा यांचीं मांसें शरीर पुष्ट करणारीं आहेत. त्यांचाही क्षयी माणसानें आहारांत अग्निबल पाहून उपयोग करण्यास हरकत नाहीं. सर्पमांस व गंडूपद (दानवी) ही क्षयरोगघ्न आहेत. त्यांचाही क्षयरोग्याच्या आहारांत समावेश करण्यास हरकत नाहीं.

वाघ, सिंह, मांजर, कोल्हा, मुंगूस या प्राण्यांचीं मांसें क्षयी माणसाला विशेष हितप्रद असतात.

मांसभक्ष्यक प्राण्यांचीं मांसें विशेष बृंहण करतात. कारण या प्राण्यांनीं एकदां आपल्या देहपुष्टीसाठीं अन्य प्राण्यांच्या मांसाचा आहार घेतलेला असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized By Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो त्यांच्या जाठराग्नीकडून व धात्वग्नीकडून पचून त्यांना त्यांच्या मांस धातूचें स्वरूप आलेलें असते.

असें पूर्वपाचित मांस, पचण्यास व शरीर मांसाची वृद्धि करण्यास सुलभ असतें. यासाठीं मांसभक्षक प्राण्यांचीं मांसें देणें अधिक श्रेयस्कर असतें.

क्रव्यादांप्रमाणें प्रसह–मांसें हींही आहेत. वाघ, सिंह, हे क्रव्याद म्हणजे मांसभक्षक प्राणी आहेतच. त्यामुळें त्यांचें शरीर मांसल व मांसवर्धक आहेच. शिवाय यांचा स्वभाव बळेंच हिंसा करावयाचा आहे. बळजबरीनें ते दुसऱ्यावर हल्ला चढवून– अन्य प्राण्यांचा घात करून क्रूरतेनें भक्ष्य मिळवत असतात. हा त्यांचा स्वभावही त्यांच्या मांसांत उतरतो. हीं प्राण्यांचीं मांसें मांसवर्धक आहेतच. शिवाय हीं स्रोतसांत जाऊन बसलेला कफ बळेंच काढून टाकून स्रोतसांचे मार्ग मोकळे शुद्ध करतात, त्यामुळें रसवहनाला निरोध येत नाहीं. व त्यामुळें शरीरही पुष्ट होते. राजयक्ष्म्याची संप्राप्ती हीं मांसें दूर करतात.

प्रसह प्राण्यांच्या मांसांचे गुण वाग्भटाचार्यांनीं पुढीलप्रमाणें दिले आहेत.

औष्ण्यात् प्रमाथिभावाच्च स्रोतोभ्यश्च्यावयंति ते ।
कफं शुद्धैश्च तैः पुष्टिं कुर्यात् सम्यग् वहन् रसः ॥ वा. चि. ३।१५६

मांस खाऊं घालण्याचा प्रकार:–

वरील वर्णन केलेलीं प्राण्यांचीं मांसें, क्षयरोगघ्न व शरीर बृंहण करणारीं आहेत. तरी परंतु तीं कित्येक रोग्यांना आवडत नाहींत. नकोशीं वाटतात. यासाठीं तीं त्याला न समजतील अशा (जुगुप्सित) पद्धतीनें द्यावीं लागतात. नाहींतर ती त्याला समजलीं, व त्यांची त्याला किळस आली तर, त्याला मळमळ, हृल्लास ओकारी, अरुचि हीं लक्षणें सुरू होतील, व त्यांचें बल, ओज वाढण्याचें बाजूला राहून, त्याचा उलट क्षयच होत जाईल.

रोगी शाकाहारी असेल तर हा मोठा प्रश्न पुढें येतो, यासाठीं त्याला न समजतील अशा युक्तीनें तीं त्याच्या पोटांत गेलीं पाहिजेत.

रोगी मांसाहारी असेल तर पुष्कळ सोपें असतें. त्याला जें मांस प्रिय असतें त्या त्या प्राण्याचे सदृश मांसाचे नांवाखालीं अन्य प्राण्यांचें मांस त्याला देतां येतें. उदाहरणार्थ तित्तिर पक्ष्यांचें मांस आणलें आहे असें सांगून त्याला काकमांस द्यावें. वर्मि नांवाचा सर्पाकार दीर्घ मासा असतो. तो वर्मि मासा आज आणला आहे असें सांगून त्याला सर्प मांस द्यावें. आकृति, रुचि, रस, गंध, स्पर्श ज्याशीं जुळतीं आहेत असें पाहून या युक्तीचा अवलंब करावा लागतो. अशा रीतीनें क्षयरोगांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांसधातूच्या क्षयामुळें जें कृशत्व आलेलें असतें तें दूर करण्यास मांसासारखे दुसरें द्रव्य नाहीं. तें देऊन क्षयरोग बरा करतां येतो. यासाठीं क्षयी रोग्याला मांसाहारी करणें त्याचा रोग दूर करण्याचें दृष्टीनें आवश्यक असतें.

मांस आणून ते कुटून शिजवून त्याचा खिमा "वेसवार" करून त्यांत पिंपळी, सुंठ, धने, जिरे, हिंग, लसूण, आलें, सैंधव, डाळिंबाचा रस असा मसाला घालून तुपाची फोडणी देऊन खावयास दिलें जातें; किंवा मांस शिजवून त्याचा क्वाथ– मांसरस तुपाची फोडणी व वरील मसाल्याचे पदार्थ घालून तयार करून दिला जातो. भात, गहूं यांची रोगाच्या आवडीचीं विविध पक्वान्नें, मांस असे विविध, व चित्रविचित्र पदार्थ तयार करून घालणाऱ्या कुशल सूपशास्त्रज्ञाची क्षयरोग बरा करण्याच्या दृष्टीनें जरूरी असते. त्यामुळें रोगी ते पदार्थ आवडीनें खातो; व त्याचें शरीर पुष्ट होऊन क्षयरोग निवारण होण्यास मदत होते.

राजयक्ष्म्यांत शेळीचा उपयोगः–

शेळींचें दूध, तूप, लोणी, रक्त, मांस हे सर्व पदार्थ क्षयरोगनाशक आहेत. शेळी या प्राण्याला क्षयरोगाची बाधा होत नाहीं. उलट या प्राण्याच्या सहवासानें माणसाला झालेला क्षयरोग मात्र बरा होतो.

अजाशकृन्मूत्रपयोघृतासृक्
मांसालयानि प्रतिसेवमानः।
स्नानादिनानाविधिना जहाति
मासादशेषं नियमेन शोषम् ॥ सुश्रुत संहिता उ. ४१

शेळीचें मूत्र, दूध, तूप, रक्त, मांस, शेळीचें गृह या सर्वांचा यथासंभव स्नानपान–निवासादिकांसाठीं उपयोग केला असतां एका महिन्यांत क्षयरोग संपूर्णपणें बरा होतो. अशा रीतीनें शेळी हा प्राणी क्षयरोग निवारण्यास उपकारक आहे.

(३) घृतः–

स्नेहन करणाऱ्या सर्व स्निग्ध द्रव्यांत जें सर्वश्रेष्ठ द्रव्य तूप त्याचा क्षयरोग्यानें पुष्कळ प्रमाणांत आहारांत उपयोग केला पाहिजे. तूप हें स्निग्ध, धातुवर्धक, आयुष्यवर्धक, ओजवर्धक व क्षयरोगनाशक असें श्रेष्ठतम द्रव्य आहे. हें प्राणिजन्य द्रव्य असल्यानें इतर वनस्पतिजन्य तेलांपेक्षां शरिराशीं लवकर सात्म्य होऊं शकतें. प्राणिजन्य मज्जा, वसादि स्नेह द्रव्यें तुपाप्रमाणेंच स्निग्ध, पौष्टिक व वातनाशक आहेत. पण तीं अधिक गुरु आहेत, पचण्यास कठीण जातात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुपाचें तसें नाहीं. तूप हें अल्प अग्नि असतांनाही दिलें तरी तें सहज पचून शरिरांत शोषलें जातें व शरीरभावास सुलभतेनें जाऊं शकतें. इतर स्नेहांना विलंब लागतो व तुपाच्या योग्यतेचे ते होऊंच शकत नाहींत. इतर स्नेह अग्निमांद्य निर्माण करतात पण घृत अग्नि प्रदीप्त करतें. तें ओजोसमान द्रव्य आहे, राजयक्ष्मी माणसांत ओज कमी निर्माण होतें, मलच देहांत अधिक निर्माण होतात. अशा वेळीं अत्यंत सार द्रव्यें देणें आवश्यक असतें. दुधावर अग्निसंस्कार करून त्यांत पाचक द्रव्य तक्र घालून दुधाचें दही होतें. दह्यावर मंथनानें संस्कार होतो व त्याचें लोणी बनतें. या सार द्रव्यावर अग्निसंस्कार करून त्याचें घृत बनत असते, म्हणून तें अत्यंत सारतम द्रव्य होतें. अग्निसंस्कारानें कित्येक वेळां द्रव्यें गुरु होतात, अग्निमांद्य निर्माण करतात; पण तूप त्याचे उलट आहे. तूप हें अग्नि प्रदीप्त राखतें. राजयक्ष्म्यांत ओज कमी निर्माण होतें, तसेंच धातूंपासून धातू उत्पन्न होण्याची क्रिया कमी कमी होत जाते. त्यामुळें ओजोत्पत्तिही कमी होते. तुपापासून शरीरधातूंचें जनन कार्य समृद्ध होण्यास मदत मिळते. धातूंची उत्पत्ति ज्या शारीरकला करतात त्या क्षयरोगांत थकून जातात. त्यांचेकडे धातूत्पादनासाठीं लागणारें साहित्य असतें, पण स्वतःमध्येंच त्या द्रव्यांचें रूपांतर करण्याचें सामर्थ्य नसतें धातूत्पादक कलांना लागणारें हें जननसामर्थ्य तुपापासून लाभतें. तूप हें शुक्रधातुवर्धक आहे. त्यांत ज्या स्थानचें किंवा ज्या धातूंतील जननसामर्थ्य क्षीण झालें असेल त्या धातुसमान द्रव्यांचा घृतावर संस्कार करून घृतांची शक्ति वाढविली जाते, व यामुळें त्या त्या धातूंतील धातुवर्धनाचें कार्य तुपाकडून करून घेतलें जातें. यासाठीं तूप संस्कृत अथवा सिद्ध करून त्या त्या अवस्थेनुसार राजयक्ष्म्यांत वापरलें जातें.

सिद्ध घृत करतांना जीं जीं औषधें वापरलीं जातात त्या त्या औषधांच्या गुणांचे परिणाम घृतावर होतात. घृत स्वतः स्निग्ध, गुरु, मंदादि गुणाचें आहेच. शिवाय त्याबरोबर आलेल्या द्रव्यांचे गुणही तें आपल्याबरोबर घेतें. त्यामुळें शरीरधातूंचा नाश न होतां त्या त्या क्रिया त्या सिद्ध घृताकडून करून घेतां येतात.

राजयक्ष्म्यांत प्रथम वातप्रकोप असतो, व त्याच्यामुळें कफपित्ताचा प्रकोप होतो. वातशमनाबरोबर कफपित्तांचेंही शमन, संस्कार केलेलें घृतच करूं शकतें. दोषांचा रोध दूर करण्याच्या क्रियेंतही शक्तिक्षय होईल. शोधन क्रियेंतही होईल. अशा सर्व अवस्थेंत धातुक्षय व बलहानि होऊं न देतां, त्या क्रिया तुपाकडून करून घेतां येतात. यासाठीं राजयक्ष्म्याच्या सर्व अवस्थेंत प्रायः घृतकल्पच श्रेष्ठ असतात. घृत हें रसायन आहे. रसापासून शुक्रापर्यंत सर्व धातूंवर, ओजावर कार्य करण्याची त्याची योग्यता आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवस्थेनुरूप विविध घृतकल्पः–

(१) जीवन्त्यादि घृतः–

राजयक्ष्म्याच्या अकराही लक्षणांचा समुदाय नाश करणारें आहे. यांत धातुबलवर्धक, कास, श्वास, पार्श्वशूलादि सर्व लक्षणें कमीं करणारीं द्रव्यें घातलेलीं आहेत.

(२) बलाघृतः– (वा. चि.)

दशमूलाचा काढा, दूध, मांसरस, यांत बलाकल्क घालून हें तूप सिद्ध केलेलें असतें. स्रोतोरोध दूर करून मांसधातूची पुष्टी करण्यास उपयोगी पडतें. तें मधुर बल, ओजवर्धक, उरःक्षत भरून आणणारें आहे.

(३) षट्पलघृतः– (वाग्भट चिकित्सा)

राजयक्ष्म्यांत पचनमार्गापासून प्रारंभ झाला असतां किंवा पचनावयवांचीं लक्षणें अधिक झाली असतां हें वापरावयाचें असतें. ग्रहणीमधील स्रोतोरोध दूर होऊन (रसवह स्रोतसांचा मार्ग यानें खुला होतो.) आहाररस धातूंना मिळूं लागतो. आतड्यांचा अशक्तपणा, पोटांत ग्रंथी लागणें, उदर, प्लीहावृद्धि, अग्निमांद्य, अतिसार, ग्रहणी, व त्याबरोबर श्वास, ज्वरादि लक्षणें असतां तींही कमी होतात. अन्नपानविधित्यागजन्य राजयक्ष्म्यांत याचा उपयोग करावयाचा असतो.

(४) अश्वगंधा घृतः- (वा. चि.)

व्यवायजन्य राजयक्ष्म्यांत या घृताचा उपयोग करावयाचा असतो.

(५) मांससर्पिः–

साहसिक राजयक्ष्म्यांत, किंवा अतिव्यायाम याचा परिणाम म्हणून उरःस्थान अबल झालें असतां मांससर्पिचा उपयोग करावयाचा. कासश्वासादि सर्व ऊर्ध्वगामी राजयक्ष्म्याचीं लक्षणें यानें कमी होतात. फुप्फुसें, श्वासनलिका, हृदय, कंठ या कफस्थानांना बलप्राप्ति होते.

(४) मद्यपानः–

पिब्बेच्च सुतरां मद्यं जीर्णं स्रोतोविशोधनम् ।
मद्यं तैक्ष्ण्यौष्ण्यवैशद्यसूक्ष्मत्वात्स्रोतसां मुखम् ।
प्रमथ्य विवृणोत्याशु तन्मोक्षात्सप्तधातवः ।
पुष्यंति धातुपोषाच्च शीर्यते शोषः प्रशाम्यति ।। च. चि. ८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षयरोग बरा करण्यास मद्य अत्यंत उपकारक आहे नुसत्या मांसानें किंवा घृतानें क्षयरोगाचें निवारण होणार नाहीं. मांसकल्प, घृतकल्प हे स्थूल कल्प आहेत. त्यांच्यांत धातुवर्धनाची योग्यता खास आहे. पण क्षयांत जो स्रोतोरोध असतो तो दूर करण्याच्या दृष्टीनें हे कल्प कमकुवतच ठरतात. जीर्ण मद्य हें तीक्ष्ण, उष्ण, व्यवायि, विकाशि सूक्ष्म अशा गुणांचें असतें. त्यामुळें सूक्ष्म सूक्ष्म स्रोतसांत सुलभतेनें गमन करून, त्या सूक्ष्म स्रोतसांचे मार्ग तें खुले अथवा मोकळे करते. स्रोतोरोध दूर करणाऱ्या द्रव्यांत मद्य हें अग्रगण्य आहे. स्रोतसांचे मार्ग मोकळे झाले म्हणजे मांस, तूप यासारखे पौष्टिक पदार्थ त्या त्या धातूंपर्यंत पोचण्यास, व धातूंशीं एकजीव, आत्मसात होण्यास अवसर सांपडतो. धातूंत प्रवेश मिळू शकेल असे सूक्ष्मत्व अन्नाला देण्याचें कार्य मद्यानें घडतें. जे पदार्थ सूक्ष्मसूक्ष्मतम होऊं शकत नाहींत, त्यांचें विद्रावण, विभजन, पचन करून त्यांना पुढील पुढील धातुसदृशरूप देऊन शरीर-सात्म्य भावाला नेण्याचें कार्य मद्याचें आहे. यामुळें " अश्नतोऽपिबलक्षयः "। ही अवस्था राहात नाहीं मांसादि पौष्टिक आहार अंगीं लागतो. शरीर पुष्ट होतें, बल वाढतें, ओज वाढतें. असे अनेक उपयुक्त गुण मद्याचे आहेत. त्यांचा उपयोग क्षयरोगांत करून घ्यावा लागतो.

दोषांच्या आधिक्यानुसार विविध तऱ्हेचीं जुनीं झालेलीं औषधी मद्यें वापरावयाचीं असतात.

माध्वीक, मार्द्वीक, वारुणी, वारुणी मंड, सीधु, आसव, अरिष्ट हे मद्यकल्प राजयक्ष्म्यांत मांस खाऊन त्यावर अनुपानार्थ वापरले जातात.

३. राजयक्ष्म्यांतील औषधी चिकित्सा :—

क्षयरोग बरा करण्यासाठीं रोग्याच्या अवस्था-भेदानुरूप निरनिराळीं औषधीं द्रव्यें वापरलीं जातात. सुवर्ण, अभ्रक, मौक्तिक, प्रवाल हीं त्यांत मुख्य आहेत.

सुवर्ण कल्प.

पूर्व-वैद्यांचा राजयक्ष्मा बरा करण्याचा खात्रीलायक उपाय म्हणजे सुवर्ण हा होय. सुवर्ण हें सर्व धातूंत श्रेष्ठ आहे. तें मधुर, मधुर विपाकी, स्निग्ध, शीत, गुरु, बल्य, वृष्य व रसायन आहे. क्षयरोग्याच्या पाकप्रणालींत सारांश हा कमी प्रमाणांत व किट्टांश जास्त प्रमाणांत निर्माण होत असतो. त्यामुळें धातूंचें सारत्व कमीं झालेलें असतें. अशा वेळीं धातुसारत्व प्रस्थापित करणारें व ओजवर्धक द्रव्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे सुवर्ण हें आहे. राजयक्ष्माकर दोषविषाचा परिणाम शरीरधातूपाकप्रणालीवर व ओजाच्या दश गुणांवर विपरीत होत असतो. अशा वेळीं ओजवृद्धी करणारें व जीवन सत्र चालूं ठेवणारें एकमेव व सर्वश्रेष्ठ रसायन म्हणजे सुवर्ण हेंच आहे.

परंतु तें खनिज आहे. मानवी अग्नीला लवकर व सहजासहजीं न पचणारें आहे. तें सहज पचनीं पडावें, शरीरधातूंस शल्यरूप न होतां तें आत्मसात् व्हावें यासाठीं त्याला सूक्ष्म–परम सूक्ष्म केलें जातें. पारा, गंधकाच्या सहाय्यानें त्याचें भस्म केलें जातें. त्याला असें सूक्ष्मत्व आल्यावर त्याचा वापर केला जातो. सुवर्णाचे भस्म, पर्पटी कल्प, सिंदूर कल्प, पोटली कल्प, व इतर संयुक्त कल्प बनविले जातात व त्यांचा अवस्थेनुरूप क्षय रोगांत उपयोग करावयाचा असतो.

(१) **सुवर्णभस्म**:- राजयक्ष्म्याच्या कोणत्याहि अवस्थेंत हें उपयोगी पडतें. पण अत्यंत बलक्षय, मांसक्षय, उरःक्षत, महाश्वास, अशी पराकाष्ठेला अवस्था पोचली असतां तें तरी काय करणार? या रोगांत सुवर्णभस्म अत्यंत सूक्ष्म प्रमाणांत वापरावयाचें असतें. एक गुंज सुवर्ण भस्म घेऊन त्यांत पांचशें गुंजा साखर मिश्र करून खलून ठेवावें व या मिश्रणांतील २ ते ५ गुंजा सकाळीं व सायंकाळीं द्यावें. असें अत्यंत सूक्ष्म प्रमाणांत सुवर्णभस्म देण्यास प्रारंभ करावा. त्यापासून अपाय होत नाहींना हें पाहून मग तें तसेंच तीन महिने चालूं ठेवावें किंवा क्रमाक्रमानें त्याची मात्रा, अपाय होत नसेल तर वाढवावी. लघ्वीची आग होणें, ज्वरवेग अधिक होणें, तोंड येणें, उलटचा, जुलाब सुरूं होणें व सर्वांगावर बारीक बारीक फोड उठून कातडीं जाऊं लागणें हीं सुवर्णभस्म पचनीं न पडल्याचीं लक्षणें आहेत. कित्येक रोग्यांत सुवर्णभस्मानें स्वप्नावस्था होण्याचा अति त्रास होऊं लागतो. अशीं तापदायक लक्षणें होत नाहींत असें पाहून सुवर्णभस्म सूक्ष्म प्रमाणांत देण्यास प्रारंभ करावा. रोज संध्याकाळीं बारीक ज्वर येणें, शक्ती क्षीण होत जाणें, वारंवार कोरडा खोकला, हातापायाची आग होणें, हीं लक्षणें प्रारंभीं असतां सुवर्ण भस्माचा चांगला उपयोग होतो, व त्यामुळें पुढली आपत्ति टळते. सुवर्णभस्म अशा वेळीं अत्यंत अल्प मात्रेंत सकाळीं व सायंकाळीं अशा दोन रसायनकालीं वावडिंगाचें चूर्ण चार गुंजा व तूप व मध याबरोबर द्यावयाचें. यानें बहुतेक क्षयरोग व त्याची अनुषंगिक ज्वरादि सर्व लक्षणें क्रमाक्रमानें कमी कमी होत जातात. सामान्यतः लक्षणें कमी होण्याचें दिसूं लागण्यास एक महिना तरी लागतो. हीच चिकित्सा पुढें वर्ष दोन वर्ष सतत चालूं ठेवावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) सुवर्णपर्पटी :- (पारा, गंधक, सुवर्ण यांची पर्पटी)

राजयक्ष्म्यांत सुवर्णपर्पटी हा एक उत्कृष्ट कल्प आहे. विशेषतः याचा उपयोग, लघ्वंत्र, ग्रहणी, पक्वाशय या पचनमार्गाच्या क्षय-लक्षणांत केला जातो. आंत्र व पक्वाशयाचें कार्य, रस व मल कांहीं कांहीं काळ धरून ठेवणें हें असतें. रसाचें ग्रहणीकडून शोषण होण्यास व मलाचें अवष्टंभन- देहधारण हें कार्य होण्यास याची आवश्यकता असते. त्यांपैकीं कोणतेही एक किंवा दोन्हींही कार्यें बिघडलीं असतां सुवर्णपर्पटी वापरावयाची असते. ग्राहकत्व व अवष्टंभन हें कार्य क्षीण झाल्यामुळें रोग्याला मोठमोठे जुलाब होतात. रोगी अत्यंत क्षीण, दुर्बल, कृश बनतो. क्षयरोगाच्या अशा अवस्थेंत सुवर्णपर्पटी हें एक उत्कृष्ट औषध आहे. अन्नपानविधित्याग व वेगावरोध यामुळें सुरूं झालेला अनुलोम क्षय यांत सुवर्णपर्पटी उपयोगी पडतें.

गर्भारपण व त्यानंतर प्रसूती यांची जबाबदारी देहावर पडल्यामुळें कित्येक स्त्रियांना क्षय जडतो. बाळंतपणानंतर, बारीक ताप, भूक न लागणें. पोटांत दुखणें, अशक्तपणा, अरुचि, अतिसार, हातापायावर सूज, पांडुत्व व मांसबल-क्षीणत्व हीं लक्षणें झाली असतां सुवर्णपर्पटी देण्यास प्रारंभ करावा. कित्येक रुग्णांत अशा स्थितींत सुवर्णपर्पटी हें दिव्य औषध ठरतें पर्पटी चालूं केली असतां रोग्याचा आहार केवळ दुग्ध हाच ठेवावा. म्हणजे अधिक चांगला फायदा होतो.

ज्वर, कास, हातापायांच्या तळव्याची आग, तहान, लघवीची आग, शौचाची आग. अशीं पित्तप्रधान लक्षणें असतां दुग्धाहारावर रोग्यास ठेवणें जास्त चांगलें असतें. याचेच उलट पोटांत जाड्य, अरुचि, अग्निमांद्य, अतिसार, पोट फुगणें, अशी कफप्रधान लक्षणें असतां सुवर्णपर्पटी देत असतां रोग्यास ताक हा आहार ठेवावा. दूध चांगलें खरपूस तापवून एका मडक्याला आंतून पंचकोल-चूर्ण लेपाटावें, व त्यांत तें दूध विरजावें व दुसरे दिवशीं पाव भाग पाणी घालून लोणी निघेपर्यंत खूप घुसळावें. लोण्यासकट तें स्निग्ध तक्र रोग्याला आहार म्हणून द्यावें. हा क्रम सतत महिनाभर तरी चालूं ठेवावा. सात आठ दिवसांत रोग्याच्या प्रकृतींत सुधारणा बहुधा आढळून येते. या तक्रप्रयोगानें, रोग्याला चांगली भूक लागते, पचन सुधारतें, जुलाब कमी कमी होऊं लागतात, पांडुत्व सूज कमी कमी होतात, व हुषारी येते असाच क्रम पुढें दोन चार महिने चालूं ठेवावा म्हणजे प्रकृती परत ढासळावयाची भीति नसते.

रोग्याला नुसत्या दुधावर ठेवावयाचें असल्यास तें महिना दीड महिना तरी ठेवावें लागतें, या वेळांत पर्पटी देत असतां पचन सुधारतें. जाग, रसरस हीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सार्वदेहिक लक्षणें कमी कमी होऊं लागतात. पांडुत्व, कृशत्व, हीं लक्षणेंही नाहींशीं होतात. पुढें तशींच पर्पटी चालूं ठेऊन रोग्याला दूध, भात हें पथ्यास द्यावें. याप्रमाणें तीन चार महिनें हा क्रम पुढें चालूं ठेवावा.

सुवर्णपर्पटी व दुग्धाहार, किंवा तक्राहार यामुळें पचन मार्गाची स्थिति सुधारते, ग्रहणीला बलप्राप्ति होते, व पाचक पित्त निर्माण होण्याची क्रिया क्रमाक्रमानें सुधारते. पहिली दोषदुष्टी पक्वाशयांतून बाहेर पडून, पक्वाशयशुद्धी होते, व नवीन जोम येऊं लागतो. ग्रहणींतील स्रोतसांचा रोध नाहींसा होऊन, अन्नरस ग्रहण करण्याचें कार्य ग्रहणीकडून होऊं लागतें, व रस वाढला म्हणजे हृदय, फुप्फुसादि सर्व अवयवांचा जोर वाढतो. सर्व धातु वाढून शरीर पुष्ट होते, बल, वर्णही सुधारतात.

यकृतवृद्धि, गुल्म, उदर, अग्निमांद्य, अतिसार, ग्रहणी शोथ, आनाह, आध्मान, ज्वर, हीं पचनमार्गांतील लक्षणें क्षयी रुग्णांत अधिक असतां, व या मार्गाच्या दुष्टीमुळें बल व मांस यांचा क्षय असतां, चिकित्सेसाठीं पर्पटी हा उत्कृष्ट कल्प आहे.

(३) स्वर्णसिंदूर अथवा पूर्ण चंद्रोदयः-

सुवर्णसिंदूर, अथवा पूर्चंद्रोदय, यालाच मकरध्वज असेंही म्हणतात. क्षय रोगांत, सुवर्णसिंदूराची मात्रा कित्येक वेळां वापरण्याची अवस्था येते. हृदय, फुप्फुस, उरःस्थान, शिर, या कफस्थानांत राजयक्ष्म्याचीं लक्षणें अधिक असतां ही मात्रा वापरावयाची असते. अग्निसंस्कारामुळें सिंदूरकल्प, लघु, तीक्ष्ण, सूक्ष्म, बनलेले असतात. त्यामुळें विशेषतः नाभीच्या, आमाशयाच्या वरील ऊर्ध्वस्थानांत त्यांची क्रिया होत असते. सुवर्णसिंदूर हा कल्प या कारणास्तव ऊर्ध्वग राजयक्ष्म्यांत वापरण्याचा कल्प आहे. ज्वरावरोवर, कोरडा खोकला, खोकल्याचे वारंवार आवेग येणें, ढास येऊन जीव कासावीस होणें व त्यामुळें अशक्तपणा, अन्न नकोसें होणें, झोंप न येणें हीं लक्षणें होत असतां हा कल्प वापरावा. कास, श्वास, शिरःशूल, पार्श्वशूल, स्वरभेद, हीं लक्षणें असतां हा रस जरूर वापरावा. यानें उरःस्थानांतील कासादि लक्षणें हमखास कमी झालीं व पाहिजेत. क्षयामुळें होणाऱ्या उरःक्षतांतही हा वापरतां येतो. स्वर्णसिंदूर हा कल्प अत्यंत सूक्ष्मस्रोतोगामी, आशुकारी व उरस्थानाला बल्य असा कल्प आहे. सुवर्णाच्या साक्षित्वामुळें हा कल्प विषघ्न, व बल्य झाला आहे.

सुवर्णसिंदूराचें प्रमाण अत्यंत अल्प ठेवावें लागतें. एक गुंज सुवर्णसिंदूर घेऊन त्यांत चारपांच गुंज मृगशृंग भस्म, अथवा जेष्ठमधाचें चूर्ण अथवा साखर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिसळून, तास दोन तास, खलवत्त्यांत खूप खलावें, व या मिश्रणांतील २ गुंजा मिश्रण एका वेळीं तूप मधांतून द्यावें. अशा रीतीनें अल्प मात्रेंत व महागुणदायी हा कल्प आहे. साहणेवर मधांत थोडा उगाळून दिला तरी चालतो.

अतिव्यवाय, साहस यांचा परिणाम म्हणून उरःस्थान व त्यांतील अवयव क्षीण झाले असतां, त्यांना बल देण्याचें कार्य सुवर्णसिंदूरानें होतें. हा बल्य, वृष्य, व रसायन कल्प आहे.

(४) सुवर्णमालिनी वसंतः–

हा हिंगळयुक्त सुवर्ण कल्प आहे. राजयक्ष्म्याचीं सर्व प्रकारचीं लक्षणें असतां उपयोगी पडणारा हा कल्प आहे. ऊर्ध्वं, अधः, तिर्यग् अशी सर्व तऱ्हेची संप्राप्ति दोषांनीं निर्माण केली, व त्यामुळें सर्व मार्गांचीं लक्षणें झालीं असतां, हा कल्प वापरतां येतो. विशेषतः ज्वर हें लक्षण प्रधान असतां याचा उपयोग करावा. रोज मंदज्वर, व त्याबरोबर बलक्षय मात्र अधिक होत चालला आहे, असें आढळतांच हा वसंत द्यावा; व रोग्याला दूध, तूप, असा बृंहण करणारा आहार द्यावा. राजयक्ष्म्याचा परिणाम संधींत शूल, शोफ, या स्वरूपानें दिसत असतां वसंत उपयोगी पडतो. प्रवाहिका, अतिसार यांतही देतां येतो. स्रोतसांत रुद्ध होऊन बसलेल्या कफप्रधान दोषांचें विलयन करणें हें यांतील मिरी, हिंगुळाचें कार्य आहे, त्याबरोबर सुवर्ण असल्याने क्षयकर दोषांचें विषकारित्व नष्ट होतें, स्रोतसांना ओजाची प्राप्ती होते, परत धातूत्पादनाची परंपरा वृद्धिगत होते व धातूंना बल लाभते. योनीस मौक्तिकामुळें सोम धातूचा लाभ होतो, रस वाढतो, व तो वाढला म्हणजे शरिराला पुष्टी व तुष्टी लाभते. अशी क्षयरोगाची संपूर्ण संप्राप्ति बदलून टाकून धातुसाम्य प्रस्थापित करणारा सुवर्णमालिनीवसंत हा अपूर्व कल्प आहे. स्वर्णसिंदुरापेक्षा हा कल्प, स्थूल, व गुरु आहे. याची क्रिया त्याच्याप्रमाणें झटपट दिसत नाहीं. गुण दिसण्यास वेळ लागतो. सामान्यतः महिना दीड महिना तरी हा कल्प द्यावा लागतो, म्हणजे रोग्याच्या लक्षणांत, उतार पडलेला आढळून येतो. व तसाच पुढें तो कांहीं महिनेहि ठेवावा लागतो. हा कल्प चालू केला असतां अग्नि मंद होण्याची भीति नाहीं. यांतील मिऱ्यामुळें अग्नि वाढत जातो. विशेषतः कफाचा अभिष्यंद, व त्याचबरोबर धातुक्षय हीं लक्षणें असतां, चिकित्सा करणें अवघड असतें.

बृंहण करणारीं द्रव्येंच फक्त दिलीं, तर तीं कदाचित् कफ व त्यामुळें अभिष्यंद वाढवतील; अग्निमांद्यही वाढेल; अग्निमांद्य व अभिष्यंद दूर करणारीं चिकित्सा धातूंचा क्षय करील. यासाठीं, बृंहण व दीपन अशी उभयविध चिकित्सा सुवर्णमालिनी वसंतानें साधते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षयाचा परिणाम म्हणून आंत्रांवर शोथ व उदर अशी संप्राप्ति निर्माण झालेली कित्येक वेळां आढळते. अशा वेळीं मांसधरा त्वचेंत जल संचित होत असतें. हा जलसंचय-कफस्राव होण्याची प्रवृत्ती बंद करण्याची क्रिया सुवर्णमालिनी वसंतानें साधते. स्रोतोरोध दूर होतो, अग्निदीपन कार्यही होतें. यासाठीं क्षयामुळें ग्रंथी, उदर, कफोदर, अभिष्यंद, जलसंचय हीं लक्षणें असतां हा वसंत वापरावा व रोग्याला दुधावर ठेवावें. उरःस्थानांत फुप्फुसावरील आवरण करणाऱ्या पेशींत कित्येक वेळां राजयक्ष्म्यामुळें जलसंचय होत असतो व त्यांत शुष्क कास, पार्श्वशूल, अंसशूल अशीं लक्षणें ज्वराबरोबर चालूं असतात. अशा अवस्थेंत दशमूलाचे काढ्याबरोबर **वसंत** द्यावा. पार्श्वशूल फार असल्यास त्या बरोबर सीतोपलादिचूर्ण व मृगशृङ्ग भस्म वापरावें. राजयक्ष्म्यामुळें शिरःशूल हें लक्षण असतां सुवर्णमालिनीवसंत उपयोगी पडतो. संधी या कफस्थानांत दुष्ट कफाचा संचय असतांही हा **वसंत** वापरून हा संधीशोफ व दुखी कमी होते. स्रोतोरोध व कफसंचय दूर करणें व नवीन कफ निर्माण न होऊं देणें व त्याबरोबर रसधातूची वाढ करणें हें प्रमुख कार्य या सुवर्ण कल्पाचें आहे

क्षयरोगाचा परिणाम किंवा इतर ज्वरांचा परिणाम कित्येक वेळां हृदयावर व हृदयाभोंवतालच्या पेशींवर होत असतो. रसवह स्रोतसांचा रोध दोषांमुळें होऊन रस सांठतो, त्यामुळें हृदयाच्या क्रियेंत व शरिरांत फरक पडूं लागतो, अशा ठिकाणीं सुवर्णमालिनीवसंत वापरावा, तो हृद्य आहे. संकोच-विकास करण्यास येणारा कफाचा अडथळा दूर करून हृदयाला बल देण्याचें कार्य हा **वसंत** करतो. यासाठीं हा व्यानकालीं वापरावा.

(२) अभ्रक भस्म.

क्षय रोगांत अभ्रक भस्म वापरण्याची मोठी प्रथा आर्य- वैद्यकांत आहे व हें भस्म क्षयरोगांत चागलें उपयोगी पडतें. तें सप्त धातूंना, सर्व अवयवांना, इंद्रियांना व तद्वारां मनाला बृंहण करणारें असें श्रेष्ठ रसायन आहे. अनुलोम प्रतिलोम सर्व प्रकारच्या क्षयांत अभ्रक भस्माचा उपयोग होतो. क्षयरोगास नुकताच प्रारंभ होत आहे असें दिसतांच अभ्रक भस्म दिल्यानें पुढील क्षय रोगाचा भीषण प्रसार थांबविता येतो. अभ्रकाच्या योगानें फुप्फुस, श्वास-नलिका यांच्या घटकधातूंना बल मिळतें व बल प्राप्ती झाली असतां दोषांचा पुढील प्रसार थांबविणें धातूंना शक्य होतें.

क्षयरोगाच्या पुढील पुढील अवस्थेंतही अभ्रक भस्म उपयोगी पडतें. क्षयाचा ज्वर व कासश्वासादि लक्षणें अभ्रकानें कमी होतात आणि गेलेली शक्ती व मांस क्रमाक्रमानें मिळू शकतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानसिक त्रास, चिंता, भीति, शोक इत्यादि कारणांमुळें पुष्कळ वेळां ओजक्षयाचीं लक्षणें होऊन राजयक्ष्म्याला प्रारंभ असतो. अशा ठिकाणीं अभ्रक भस्म ओजवर्धक व बल्य म्हणून क्षय रोगांत उपयोगीं पडतें. अभ्रकभस्माचें प्रमाण अत्यंत अल्प ठेवलें जातें. $\frac{१}{२००}$ ते $\frac{१}{१००}$ गुंज इतक्या सूक्ष्म प्रमाणांत अभ्रकाचा उपयोग केला जातो.

(३) मौक्तिक, व प्रवाल.

मात्रा ५ ते १० गुंजा

राजयक्ष्म्यांत, मौक्तिक व प्रवाल यांचीं दारण म्हणजे घोटून घोटून पुष्कळ वेळ खल केलेलीं भस्में–चंद्रपुटीं–पुष्कळ वेळां वापरलीं जातात. प्रवाल व मौक्तिक दोन्हींही जलीय, सोम गुणाची वाढ करणारीं व ओजवृद्धी करणारीं आहेत. तीं जीवन, स्तंभन, रक्त पित्तप्रसादन अशीं शीत वीर्याचीं कार्यें करणारीं आहेत. पित्तशमनाबरोबर कफही वाढूं न देणारीं आहेत. रसक्षय या भस्मांनीं लवकर भरून निघतो. हृदयाचो गति जास्त वाढणें, छातींत धडधडण्याचा त्रास रोग्याला फार होणें, चिडखोरपणा, दुर्बलपणा फार वाटणें, भीति वाटणें हीं रसक्षयाचीं लक्षणें हृदयावर होत असतां या भस्मांचा उपयोग करावा. तात्काळ रसक्षय भरून काढणारीं हीं दोन भस्में आहेत.

रसवृद्धीबरोबर या भस्मांनीं दुष्ट कफाची वाढ मात्र होत नाहीं हा यांचा विशेष आहे.

रसवृद्धीबरोबर रक्त व पित्त यांचा प्रकोप यांनीं तात्काळ शमन होत असतो. राजयक्ष्म्यांत ओकारींतून अथवा क्षत होऊन फुप्फुसांतून कंठावाटें, कासाबरोबर रक्ताचा स्राव होत असतो. अशा वेळीं पित्तप्रशमन व रक्तप्रसादन करून शीतवीर्यामुळें रक्तस्तंभन करण्याचें कार्य मौक्तिक व प्रवाल उत्कृष्ट तऱ्हेनें करतात. मूत्रपिंडांवाटें, गुदावाटें, योनीवाटें, नाकावाटें कोणत्याहि मार्गानें राजयक्ष्म्यांत रक्तस्राव होत असेल तर हीं भस्में वापरावींत. तसेंच सर्वांगाची आग, तळपायाची आग, डोळ्याची आग, घशाची आग, लघ्वीची आग दाह हीं पित्तप्रकोपाचीं लक्षणें असतां मौक्तिक अथवा प्रवाळ यांचा मोरावळ्यांतून चांगला उपयोग होत असतो. ज्वरवेग तीव्र वाढत असेल, किंवा फार वाढला नसतांही त्या ज्वराचा त्रास रोग्याला जास्त होत असेल अशा ठिकाणीं मौक्तिक प्रवाळ दुधाबरोबर वापरावींत. तृष्णा, कास, अतिसार, च्छर्दि, निद्रानाश, हीं पित्ताचीं लक्षणें जास्त असतां दाडिमपाकाबरोबर यांचा उपयोग चांगला होत असतो. पित्तशमन करीत असूनही हीं अग्निमांद्य निर्माण करीत नाहीत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) मृगशृंग भस्म.

क्षयरोगांत मृगशृङ्गभस्म हें एक उत्कृष्ट औषध आहे कास, श्वास, पार्श्वशूल, हृत्शूल, रक्तपित्त, उरःक्षत, अशीं विशेषतः ऊर्ध्वगामी राजयक्ष्म्याचीं लक्षणें असतां मृगशृङ्ग वापरावयाचें असतें. हृत्शूल कमी करणारें आयुर्वेदांतील हें एक श्रेष्ठ औषध आहे. हृदयाला व फुप्फुसाला शृङ्गभस्मानें बल मिळतें, व त्यामुळें खोकण्यास जोर मिळतो, कफ टाकणें सोपें जातें. त्याचबरोबर या भस्मानें उरस्थानांत नवीन कफ उत्पन्न होऊं दिला जात नाहीं. याचें प्रमाण ४ ते ८ गुंजा गाईचें तूप व मध याजबरोबर दिवसांतून दोन वेळां व्यान व उदानकालीं, असें ठेवावें. राजयक्ष्म्यांत कित्येक वेळां प्रवाहिका हा अत्यंत तापदायक उपद्रव होत असतो. अशा ठिकाणीं शृङ्गभस्माचा उपयोग होत असतो. शृंग हे पक्वाशयालाही बल्य आहे, व नवीन दुष्ट कफ निर्माण होण्याची प्रवृत्ति थांबविणारें आहे.

(४) लाक्षणिक चिकित्सा:–

(१) कास :–

काकडशिंगी, शतावरी, बला, दूध, यांनीं सिद्ध केलेलें घृत थोडें पिंपळीचूर्ण व मध घालून द्यावें.

वासालेह चाटवावा. सितोपलादि चूर्ण तूप मधांतून चाटवावें. तालीसचूर्ण मधांतून द्यावें वर्धमान पिंपळीचा काढा दुधांतून द्यावा.

कुमारीआसव व द्राक्षासव समभाग प्रमाणांत २ तोळे तितकेंच पाणी घालून पिण्यास द्यावें. कफ सुटत नसल्यास यवक्षार व पंचलवणें तुपांतून चाटण्यास द्यावींत.

मकरध्वज मिश्रण मधांतून चाटवावें. त्रिजातक किंवा एलादिवटी तोडांत धरण्यास द्याव्यात.

(२) पार्श्वशूल : शिरःशूल :–

यांत उपनाह स्वेद द्यावा. मासे, कासव, खेकडे हे जलीय प्राणी आणून त्यांच्या मांसानें शेक द्यावा. म्हणजे बहुधा हे शूल थांबतात.

बडिशेप, जेष्ठमध, कोष्ठ, तगर, यांचे लेप तूप घालून छातीवर व डोक्यावर घालावेत. बला, रास्ना, तीळ, जेष्ठमध यांचा लेपही उपयोगी पडतो.

दशमूल सिद्धबलाघृत पिण्यास द्यावें. त्याचें नस्य करावें. रिंगणी, पुष्करमूळ, गोखरू, गुळवेल यांचा क्वाथ द्यावा. पंचसूताची मात्रा मधांतून चाटवावी. दशमूलारिष्ट, महारास्नादि कषाय, किंवा कुमारी आसव १ तोळा समभाग पाणी मिश्र करून पिण्यास द्यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) ज्वरः–

राजयक्ष्म्याच्या ज्वरांत रोग्याला संपूर्ण विश्रांति घेणेंस लावावें. ज्वरघ्न काढ्यांनीं सिद्ध केलेलीं घृतें रोग्यास द्यावीं म्हणजे क्षयाचा ज्वर थांबतो.

कमळांचा काढा द्यावा, किंवा केळीच्या कंदाचें पाणी ५ तोळे पाजावें. यानें क्षयी माणसाचा ज्वर लवकर आटोक्यांत येतो.

प्रवाळ भस्म चंद्रपुटी, गुळवेल सत्त्व, मौक्तिक भस्म यांचें मिश्रण द्यावें.

अमृतारिष्ट २।२ तोळे रोग्यास समभाग पाणी घालून पिण्यास द्यावें.

शतावरी, खारीक, मनुका, अश्वगंधा, उपळसरी यांचें दूध सिद्ध करून द्यावें.

(४) रक्तपित्तः–

राजयक्ष्म्यांतील रक्तपित्तांत वासाघृत मुख्यतः वापरावयाचें असतें. खोकला असून त्याबरोबर रक्त पडत असतां वासाघृत विशेष उपयोगी पडते. शतावरी, ज्येष्ठमध, द्राक्षा यांनीं सिद्ध केलेलें शेळीचें दूध पिण्यास द्यावें.

कामदुघाः– ८।८ गुंजा दूध खडिसाखरेंतून ३।३ तासांनीं द्यावी. अंतर्बाह्य सर्व शीत उपचार करावेत. बोलपर्पटी द्यावी. लाक्षा चूर्ण दूध साखरेंतून द्यावें.

(५) अरुचि : क्षुधानाशः–

यांत दोन वेळा दंतधावन करावयास लावावें. व कवलग्रह व धूम यांचा उपयोग करावा. दालचिनी, नागरमोथा, वेलदोडे, घने यांचे चूर्णाचा मुखधावन व कवलग्रह यांसाठीं उपयोग करावा.

यवानी, खाडव, तालिसादि चूर्ण यांचा उपयोग स्वतंत्रपणें, व अन्न-पानादिकांत करावा. म्हणजे रोग्याला अन्नपान घेण्याची इच्छा निर्माण होऊन जिव्हेला रुचि उत्पन्न होईल.

रोग्याला रुचकर आवडतीं पक्वान्नें करून खाऊं घालावींत. दालचिनी, वेलदोडे, नागकेशर, तमालपत्र, व पंचकोलमिश्रित अन्न दिल्यानें अन्नावर रुचि निर्माण होते.

(६) मलावरोधः–

राजयक्ष्म्यांत मलावरोध असतां तीव्र विरेचन देणें योग्य नसतें. अशा ठिकाणीं राजवृक्ष–बाहवा–यानें सिद्ध केलेलें दूध रोग्यास पिण्यास द्यावें. किंवा बाहव्याचा काढा मध घालून द्यावा. हरीतकीसिद्ध घृत द्यावें. तैल, दूध, तूप, मध, घृतमंड यांचा मात्रावस्ति द्यावा. रोग्याला अपान कालीं दूध तूप किंवा लोण्याची विरघळ यवक्षार घालून द्यावी. या क्रियांनीं मलाचें अनुलोमन बलक्षय न होतां व्यवस्थित होऊं लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(७) अतिसारः–

राजयक्ष्म्यांत अतिसार हें लक्षण पुष्कळ वेळां तापदायक असतें. अशा वेळीं सुवर्णपर्पटीचा मुख्यतः उपयोग करावा. रोग्याचा सर्व आहार बंद करून त्याला फक्त ताकावर ठेवावें. ताबडतोब अतिसार बंद करावयाचा असल्यास अगस्ति-सूतराज या अफू कल्पाचा उपयोग करावा. किंवा जातिफलादिवटी द्यावी.

प्रवाहिका हा उपद्रव त्रास देत असल्यास सांवराचें शिंग पाण्यांत उगाळून तूप गूळ घालून गरम करून चाटण वारंवार द्यावें. शंखोदर रस द्यावा.

(५) राजयक्ष्म्याची बाह्य चिकित्साः–

(१) अभ्यंगः–

चंदनबलाक्षादि तैल, नारायण तैल, महासुगंधी तैल, तूप, वसा, मज्जा हे स्नेह रोगाच्या त्वचेला बेतानें लावावेत. अभ्यंग करीत असतां फार जोरानें चोळूं नये. सुख होईल अशा बेतानें अभ्यंग करावा. अभ्यंगानें त्वचेकडे रसरक्तांचा पुरवठा अधिक होईल. त्वचेवाटें स्नेह शोषले जातील, त्वचेचें बृंहण होईल. त्वचेंत आलेल्या सर्व वातवाहिन्यांचा क्षोभ कमी होऊन त्याचा परिणाम इतर स्थानांतील प्रकुपित झालेल्या वायूवर इष्ट असा होईल. त्वचा हें प्राणस्थान आहे. स्नेहानें वातशमन झाल्यामुळें इतरत्र प्रकुपित पावलेला प्राणवायु प्रशम पावेल. त्यामुळें कास, श्वास हीं प्राणप्रकोपाचीं लक्षणें कमी होतील. अभ्यंगाचा परिणाम व्यानावर होईल. व्यानाच्या क्रिया व्यवस्थित होतील, सर्व शरिरांतील रसरक्ताभिसरण सुधारेल. समान, अपान यांवरही याचप्रमाणें अप्रत्यक्ष परिणाम होतील. त्वचा हें फार मोठें वातस्थान असल्यानें त्यावर स्नेह लावल्यामुळें सर्वत्र वातशमन करण्यास मदत होते. त्वचेचे आरोग्य सुधारेल, निद्रा येत नसेल तर ती अभ्यंगानें येऊं लागेल.

(२) अवगाहनः–

अभ्यंगानंतर रोग्याला सुखोष्ण अशा दूध, तेल, तूप, पाणी यांनीं भरलेल्या डोणींत बसवावें. यामुळें कटीखालील अवयवांतील वाताचें शमन होईल. पक्वाशय गुद, बस्ति, शुक्रमार्ग, योनीमार्ग यांतील वातप्रकोप कमी होऊन या स्थानाला बल मिळेल. वेगावरोध, शुक्रक्षय, अतिव्यवाय यामुळें हीं स्थानें अबल होऊन त्यांत वातप्रकोप असतां या अवगाह स्वेदाचा अधिक चांगला फायदा होतो, व त्यामुळें अपानाच्या क्रिया व्यवस्थित होऊं लागतात.

(३) उत्सादनः–

अंगाला उद्वर्तन किंवा उटणीं लावावींत. शतावरी, पुनर्नवा, जीवंती, अश्वगंधा, बला, ज्येष्ठमध, माष, तिळ, अतसी हीं द्रव्यें वाटून त्यांत दहि व मध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालून त्वचेला लावावींत. यांतील औषधें त्वच्य, व बल्य आहेत. यानें शरिराची कांति सुधारेल व शरीर पुष्ट होईल. शरिराला स्थिरत्व आणणें व त्वक्प्रसादन ही क्रिया उद्वर्तनाची असते.

(४) स्नानः-

जीवनीय गणांतील औषधें घालून पाणी तापवावें व या पाण्यानें रोग्याला स्नान घालावें. क्षीरीवृक्षांच्या साली, चंदन, वाळा पाण्यांत घालून तें पाणी शिजवून ऋतुमानाप्रमाणें तें पाणी ऊष्ण राखून त्यानें क्षयी माणसास स्नान घालावें. स्नानामुळे ज्वर कमी होण्यास मदत होते. स्नान हें वृष्य व आयुष्यवर्धक आहे. त्यामुळें भूक लागते. क्षयी माणसांत मलांची उत्पत्ति अधिक असते, सर्वांग मलीन होत असतें. स्नान घातल्यानें कंडू-मल नाहींशी होतात. पापांचा नाश होतो, ऊर्जा व बल यांची वृद्धि होते.

(५) वस्त्रें व अलंकारः-

रोग्याला स्वच्छ कपडे परिधान करण्यास द्यावेत. त्यामुळें त्याचें मन प्रसन्न राहतें, हुषारी वाढते, व त्वचेचें आरोग्य वाढतें. ऋतुमानाप्रमाणें ते लघु, गुरु असावेत. त्याचा बिछानाही स्वच्छ व मृदु, असावा. यामुळें रोग्याला सुख वाटतें. अंगावर सुवर्णाचे दागिने घालावेत. सुवर्ण हे क्षयरोगनाशक आहे. मौक्तिक, प्रवाळ यांचे हार कंठांत घालावेत. त्यामुळें हृदयाला-उरःस्थनाला बल मिळतें पित्तप्रकोप दाह, कमी होतो. जाई, पारिजातक, मोगरा, गुलाब, चाफा अशा सुगंधी व हृद्य पुष्पांच्या माला त्यानें धारण कराव्यात. यामुळें मन प्रसन्न राहतें, आनंद वाटतो, पित्ताचें शमन होतें व शरीर पुष्ट होण्यास मदत मिळते.

(६) रमणीय पदार्थांचें दर्शन- श्रवण :-

रमणीय द्रव्यांचें त्याला दर्शन घडावें. रमणीय स्थलांचे देखावे, चित्रपट त्याला दाखवावे. सुवार्ता त्याला सांगाव्यात. प्रिय मधुर व सुस्वर गाणीं त्याला ऐकवावींत. सुस्वर वाद्यांचे आवाज त्याला श्रवण करावयास लावावेत. त्याला प्रिय वाटेल अशी त्याची करमणूक व्हावी. सर्व इंद्रियांवाटें त्याला सुख मिळावें म्हणून शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध हे पांच इंद्रियांचे अर्थ त्याला सुखानें भोगतां यावेत, अशी सर्व साधनसामुग्री त्याला असावी. त्यामुळें त्याचें आरोग्य वाढण्यास व रोग बरा होण्यास फार मोठा उपयोग होत असतो. या अर्थसेवनांत त्याचें मन रमलें म्हणजे त्याला कांहीं काळ कां होईना रोगाचा विसर पडतो. या रोगांतून आपण बरें होऊं, असा आशावाद निर्माण होतो. व रोगाची एकसारखी मनाला जी चिंता लागलेली असते ती या बाह्योपचारानें नाहींशी होते व चिंता नाहींशी झाली म्हणजे शरीर पुष्ट होण्यास फार मोठी मदत होत असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाण्यापिण्यास उत्तम उत्तम पौष्टिक पदार्थ आहेत, अंगावर घालण्यास आवडतीं वस्त्रें आहेत, अलंकार आहेत. पण मनांत चिंता असली तर, ते पौष्टिक अन्न कांहीं अंगीं लागत नाहीं. पण तेंच मन आनंदी राहिलें म्हणजे दुःखाचा विसर पडतो. पोटांत अन्न अधिक व रुचीनें जातें, तें पचतें व शरिरास पुष्टीकर होते. यासाठीं रोग्याला आनंद होईल, सदा उत्साह वाटेल असें सर्व वातावरण सदा तेथें पाहिजे. म्हणजे धातुवृद्धी व ओजवृद्धी होण्यास व रोगांतून मुक्त होण्यास मनोबल लाभूं शकतें.

वेगावरोध, विषमाशन, साहस, अब्रह्मचर्य या बरोबर शोक, क्रोध, चिंता, असूया हींही मानसिक कारणें त्यानें वर्ज्य करणें अगत्याचें आहे.

(६) दैवी चिकित्साः—

राजयक्ष्म्यावर दैविक उपचार चरकाचार्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितले आहेत.

हर्षणाश्वासनैर्नित्यं गुरूणां समुपासनैः ।
ब्रह्मचर्येण दानेन तपसा देवतार्चनैः ॥
सत्येनाचारयोगेन मांगल्यैरप्यहिंसया ।
वैद्यविप्रार्चनाच्चैव रोगराजो निवर्तते ॥
यया प्रयुक्त्या चेष्टया राजयक्ष्मा पुरा जितः ।
तां वेदविहितामिष्टिमारोग्यार्थी प्रयोजयेत् ॥ च. चि. ८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

घरचा राजा

बालक म्हणजे घरचा राजाच होय.
"आफालि" ग्राईप मिक्श्चरच्या मदतीनें
तुम्हीं त्याला निरोगी ठेवूं शकतां.
ही बाटली तुम्हांस केमिस्टांकडे मिळूं शकेल.

"आफालि"

ग्राईपमिक्श्चर

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST GM. 53.1

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

R. No. B. 3225
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुखी मातृपद

म्हणजेच मातेचें व बालकाचें

आरोग्य

मातृपदाची चाहूल लागतांच मातृत्वाची जबाबदारी सुरु होत असते आणि बालकाची आरोग्यपूर्ण वाढ होईपर्यंत ती संपत नाहीं.

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक टॉनिक

गर्भवतींनी नियमितपणें युटोन घेतल्यानें प्रकृति उत्तम राहाते, गर्भाचें नीट पोषण होते व गर्भस्राव वा गर्भपात याचें भय राहात नाहीं. अनियमित मासिक पाळी, प्रदर इ. गर्भाशय-विकारांवरहि गुणकारी.

स्तन्यशोधन.

दुग्धशोधक, दुग्धवर्धक

मुलाला आईचें दूध मानवलें नाहीं तर तें बाळसें धरीत नाहीं, त्याची प्रकृति वारंवार बिघडते. मातेनें स्तन्यशोधन नियमित घेतल्यास दुधांतील दोष दूर होतात.

शिशुजीवन

बालकांचें आरोग्यरक्षक

मुलांच्या दमा, खोकला या विकारांवर गुणकारी टॉनिक. वारंवार सर्दी, पडसें होऊन त्रासाचा उपद्रव होतो तेव्हां शिशुजीवनचा अवश्य उपयोग करावा.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

श्रेष्ठ, गुणकारी आयुर्वेदीय औषधांचे निर्माते

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्रमित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आगाशे प्रेस महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

एप्रिल] [१९५४

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारी संपादक :
व. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत.....

शुद्ध आयुर्वेदापुढील समस्या — वै. खानापूरकर जोशी
नागवेली — वै. गो. आ. फडके
अथ पित्तम् — वै. गो. आ. फडके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वार्षिक वर्गणी ३ रु.] [किरकोळ अंक ८ आणे

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

—आयुर्मीमांसा—

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १७ वें] एप्रिल १९५४. [अंक ३ रा.

वार्षिक वर्गणी ३ रुपये • किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.
* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.
* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्या बद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.
* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.
* सर्व व्यवहार "व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा." या पत्त्यावरच करावा.

—संपादकीय—

मुंबई सरकारचें हार्दिक अभिनंदन :—

मुंबई सरकारचा आयुर्वेदासंबंधींचा स्नेहपूर्ण दृष्टीकोन जाहीर होत आहेच. सरकारनें या वर्षी प्रांतांतल्या आयुर्वेद शिक्षण संस्थांना भरपूर ग्रँटस् दिल्या आहेत असें शुभवृत्त हातीं आलें आहे. या देणगीबद्दल आम्ही सरकारचें हार्दिक अभिनंदन करीत आहों !

भिषग्विलास मासिकाचा योगशास्त्र विशेषांक

कै. वै. पंचानन गुणेशास्त्री हे आयुर्वेदाचे मूर्तिमंत प्रतीक होते. त्यांचे मार्गदर्शनाखाली, भिषग्विलासानें केलेली प्रगति, वैद्यवर्गाचे ध्यानी आहेच. त्यांचे तृतीय पुण्यतिथीनिमित्त भिषग्विलास मासिकाने त्यांना केलेले नम्र वंदन पाहून पूर्वस्मृती जागृत होतात. विशेषतः योगशास्त्रावर विशेष अंक काढून भिषग्विलासानें विशेषच साध्य केलें आहे. मान्यवर अधिकारी लेखकांनीं लेख लिहून विशेष अंक आकर्षक केला आहे; आत्यंतिक सुखाची साधना देह निरोगी झाल्यावर होऊं शकतें; त्या साधनेचें विविध मार्गदर्शन या अंकांत सहज दिसतें. अत्यंत सोप्या साध्या भाषेंत अनभिज्ञ वाचकांना योग परिचय करून दिल्याबद्दल भिषग्विलासकार अभिनंदनास पात्र आहेत; नामवंत लेखकांना त्यांचे लेखन सहाय्याबद्दल धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच होतील! अंक परिपूर्ण व संग्राह्य झाला आहे, यांत तिळमात्र संशय नाहीं.

वर्गणीदारांस विनंतिः—

मीमांसेच्या वर्गणीदारांना वर्गणी संपल्याबद्दल स्वतंत्र सूचनापत्रें धाडीत आहोंत. कृपा करून ज्यांचेकडे वर्गणी बाकी येणें आहे त्यांनी सत्वर वर्गणी पाठवून सहकार्य चालूं ठेवावे अशी विनंति आहे.

— व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिप्राय

"मी मां से"च्या राजयक्ष्मा विशेष अंकाबद्दल श्री. वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर, अध्यक्ष महाराष्ट्र प्रांतिक वैद्य मंडळ यांनीं पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे.

"आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा, या संस्थेनें गेली १७ वर्षें आयुर्मीमांसा मासिकाद्वारें आयुर्वेदाच्या प्रसाराचें कार्य फारच उत्कृष्ट तऱ्हेनें चालूं ठेवलें आहे. 'राजयक्ष्मा विशेषांक' हे एक त्या कार्याचें आदर्श प्रतीक आहे राजयक्ष्मा रोग विषयक पंचनिदानपूर्वक पूर्ण आयुर्वेदीय चिकित्सा अवस्थाभेदानें वर्णन करून फडकेशास्त्री यांनीं हें एक त्या विषयापुरतें सुंदर पाठ्य पुस्तकच विद्यार्थ्यांचे हातीं देण्याजोगें तयार केले आहे, असे म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. विद्यार्थ्यांप्रमाणें वैद्यवर्ग आणि जिज्ञासू सामान्य वाचक वर्गाचे दृष्टीनेही हा अंक फारच उपयुक्त ठरणार आहे. आचार्य फडके शास्त्री यांनी परिश्रमपूर्वक आयुर्वेद वाङ्मयांत ह्या अंकाचें द्वारें उपयुक्त अर्शाच भर घातली आहे, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढें थोडेच आहेत."

आयुर्वेद जगत्-

अकोला जिल्हा वैद्य संमेलनाचें १ ले अधिवेशन मु. मानोरा ता. मंगरुळनाथ येथें ६-७ मार्च १९५४ रोजीं यशस्वी रीतीनें पार पडलें. अध्यक्षस्थानीं वैद्यराज श्री. वा. कृ. दाणी B. A. हे होते. संमेलनाचें उद्घाटन मध्यप्रांत सेवासंघाचे उपाध्यक्ष श्री. आयुर्वेदभूषण नरहर लक्ष्मण जोशी (कोडोलीकर) यांचे हस्तें झालें. संमेलनांत, भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर, मध्यप्रांत आयुर्वेद युनानी बोर्डाचे सभासद, अकोला यांचे दुःखद निधनाबद्दल दुखवटयाचा ठराव संमत झाला. अध्यक्षांनीं आपले भाषणांत आयुर्वेदाची त्रिदोष-पद्धती, दिनचर्या, ऋतुचर्या यांचें सर्वश्रेष्ठत्व प्रतिपादन करून भारतीय जीवनांत आयुर्वेद हा एक आधारभूत स्तंभ आहे हें पटवून दिलें.

—सेवा—

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते. अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधें वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोअर्स

पायधुणी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें मुख्य केंद्र

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा

उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते

सूचिपत्र मागवा.

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः- अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)

अर्कशाला औषधांबद्दलचे आपले अनुभव ग्राहक, वैद्य व विक्रेते यांनीं कळवीत असावे ते मार्गदर्शक ठरतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदापुढील समस्या

: लेखक :
वैद्य, खानापूरकर जोशी

★

हल्लीच्या सातारा, नगर, पुणे, मुंबई इत्यादि ठिकाणच्या आयुर्वेद शिक्षणसंस्था आज ५-२५ वर्षे जो तनमनधनें सतत उद्योग करीत आहेत त्यामुळें आयुर्वेदाच्या जिवंतपणास थोडासा तरी हातभार लागला आहे. थोडासा म्हणण्याचे कारण म्हणजे या सर्व संस्थांमधून आयुर्वेदावरोबर आलोपाथीचे शिक्षण दिले जातें आयुर्वेदास मान्यता देण्याचा सरकारनें उपक्रम आरंभिल्यापासून या संस्थांतील शिक्षणास फारच महत्व आले आहे.

परंतु या उपक्रमामुळें अगर पूर्वीच्या मिश्रशिक्षणापासून आयुर्वेदास प्रत्यक्ष पोषक अशा गोष्टी काय घडल्या अगर घडत गेल्या हे पडताळून पहावयाचे झाल्यास वरील संस्थांमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनीं प्रत्यक्ष चालविलेले दवाखाने पहा म्हणजे आपोआप कळून येईल कीं शेकडा ८० ते ९० टक्के लोक विलायती औषधेंच वापरतात, आणि इंजेक्शनें भरमसाट करतात. तेव्हां वरील संस्थांमधून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनावर आयुर्वेदापेक्षा आलोपाथिक शिक्षणाचाच प्रभाव जास्त पडतो हे कोणासही कबूल करावें लागेल.

आणि म्हणून आयुर्वेद शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अलोपाथीचे मुळीच शिक्षण देऊं नये व हें शिक्षण न दिल्यास ते विद्यार्थी सर्वच्या सर्व आयुर्वेदिक औषधेंच वापरतील व त्यामुळें आयुर्वेदाचे उद्धारास बरीच चालना मिळेल अशी शुद्ध आयुर्वेदप्रेमी म्हणविणारे लोकांची कल्पना झाली अगर होत गेली आहे. परंतु हल्लीचे काळांत आलोपाथीचे ज्ञान आयुर्वेदाप्रमाणें सूत्रबद्ध नसल्यामुळें सविस्तर, सुटसुटीत व समजण्यास सोपे आहे. तसेच विलायती औषधांचे व इंजेक्शनांचे वाङमय– प्रसिद्धीकरण इतके व्यापक व अवाढव्य आहे कीं आमचे साध्या पुस्तकी ज्ञानावरून वैद्यकी करणारे लोक इतका अलोपाथिक औषधांचा व इंजेक्शनचा वापर करतात कीं ते एखाद्या चांगल्या तज्ञ डॉक्टरलाही औषधें व इंजेक्शने वापर करण्याच्या बाबतींत मागे पाडतील. तर मग आमच्या या वरील संस्थांमधून ज्या विद्यार्थ्यांना आयुर्वेदाबरोबरच अलोपाथीचे तुटपुंजे ज्ञान दिले जाते अगर यापुढे सव्यसाची ज्ञान दिले जाईल ते विद्यार्थी आयुर्वेदिक औषधांपेक्षा आलोपाथिक औषधेंच वापरतील यात काय संशय? विलायती औषधें प्रमाणबद्ध, सुटसुटीत, घेण्यास सुलभ व दिसण्यांत सुंदर अशी असल्यामुळें तिकडेच विद्यार्थ्यांचा ओढा सहाजिक होऊं शकतो.

रोग्यांच्या दृष्टीनें जरी आयुर्वेदिक औषधें लिंबू, आले, मध व दूधसाखर या सारख्या अनुपानांतून घ्यावी लागत असल्यामुळें घेण्यास रुचकर, स्वादिष्ट व गोड असली तरी काढा तयार करणें, लिंबू, आले यासारखे जिन्नस गोळा करणें वगैरे गोष्टींचा लोकांना त्रास वाटतो व यापेक्षा विलायती औषध अगर डॉक्टरनें दिलेल्या बाटलींतील औषध-ते जरी रुचकर नसले तरी वाकडे तोंड करीत का होईना-तेच बरे वाटू लागले आहे. शिवाय विलायती औषधांच्या संशोधनाच्या प्रगतीनें अशी कांहीं औषधें निर्माण झाली आहेत कीं एकच गोळी घेतली कीं डोके दुखणे थांबते, एकच इंजेक्शन केले कीं ताप थांबतो, दुखावाही थांबतो, एकच गोळीने झोप लागते. मरणोन्मुख असलेला श्वासाचा रोगी एका इंजेक्शनांत पूर्ववत, जसे कांहीं आपणास पूर्वी कांहींच झाले नव्हते असा होऊं शकतो. ज्या दोषी तापाच्या रोग्याचा ताप आजपर्यंत मुदत संपल्याशिवाय थांबूच शकत नाहीं. असे म्हणत होतो तोही ताप कांहीं विशिष्ट गोळ्या दिल्या असतां अगदी घालवूं शकतो. अशी जादूप्रमाणें काम करणारीं औषधें पाश्चात्य वैद्यकशास्त्रवेत्त्यांनीं शोधून काढल्यामुळें त्या औषधांकडे विद्यार्थ्यांचा व लोकांचा कल झुकणे अगदीं सहाजिक आहे. तेव्हां अशा धकाधकीच्या मामल्यांत शुद्ध आयुर्वेदीयापुढें मोठाच पेच उत्पन्न होणें सहाजिक आहे.

हल्लीचे आरोग्यमंत्र्यांनीं शुद्ध आयुर्वेदाबद्दल मोठी आस्था बाळगून त्यास प्रोत्साहन देण्याचे धाडस केले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. आणि त्यामुळें शुद्ध आयुर्वेदाभिमान्यांचे कर्तव्य-बुद्धीस फारच मोठा वाव दिला आहे. तेव्हां शुद्ध आयुर्वेदाची जबाबदारी केवळ शुद्ध आयुर्वेदाभिमान्यांवर आहे असे न म्हणता मिश्र अभिमान्यांनीही यावेळीं शुद्ध आयुर्वेदाबद्दल अभिमान बाळगावा व आपले संस्थांमधील विद्यार्थ्यांचे मनामध्यें आयुर्वेदाबद्दलचे प्रेम कसे उत्पन्न करता येईल व आयुर्वेदाचा प्रभाव त्यांचे मनावर कसा ठसेल याकडेच सर्व प्रयत्न कारणीं लावावेत. नाहींपेक्षां आतां शुद्ध आयुर्वेदाभिमान्यांनीं पाहून घ्यावे, आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं, असे म्हणत स्वस्थ बसू नयें. सर्वांनींच अटोकाट प्रयत्न करून आयुर्वेदीय शिक्षणाचा व आयुर्वेदीय औषधांचा प्रभाव प्रत्यक्षांत रोग्यांवर पाडून दाखवून सरकारचे पुढे प्रत्यक्ष प्रमाण ठेवावयास पाहिजे. असे करून दाखविल्यास अगर दाखविता आल्यास विद्यार्थीवर्गाचे मनावर अलोपाथीचा विशेष प्रभाव पडलेला दिसणार नाहीं, व ते तीं औषधें फारशी वापरणार नाहींत.

दोन समस्या

शुद्ध आयुर्वेदाभिमानी लोकांपुढे आतां २ प्रकारच्या समस्या उभ्या आहेत. एक म्हणजे विद्यार्थ्यांना शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण कसे द्यावे व दुसरी म्हणजे शुद्ध आयुर्वेदीय औषधांचे गुण तात्काल प्रभावीपणानें दिसण्यासाठीं त्यांचे संशोधन करण्याची पराकाष्ठा करणें.

१) पहिल्या समस्येसंबंधी बोलावयाचें म्हणजे शुद्ध आयुर्वेदाचे शिक्षण देणारी मंडळी तरी कोठे आहेत? सर्व ग्रंथ सूत्रबद्ध आहेत; आणि त्यांचे निर्विवाद असे विवरण करून सांगण्याची पात्रता किती लोकांची आहे? आज २५-३० वर्षे आयुर्वेद शिक्षणसंस्था चालवूनही त्रिदोषासारखे विवाद्य विषय आज जसेच्या तसे शिल्लक आहेत. सर्व भारत भूमीतील विद्वान वैद्यांचीं मंडळें नेमूनही तो व तशा सारखे प्रश्न अनिर्णीत आहेत. चरक, सुश्रुत, वाग्भट यासारखे ग्रंथ शिकवीत असतां अडचणींचे डोंगरच पुढे उभे राहणार आहेत. तेव्हां या अध्यापनाबाबत ज्यांनीं ज्यांनीं आजपर्यंत देह झिजविला त्यानींच याची संगति लावून देणें श्रेयस्कर ठरणार आहे व त्यांनीं आपल्या शक्त्यनुसार शुद्ध अंतःकरणानें या गोष्टीला मदत करणें अत्यंत आवश्यक आहे. आणि या सर्व अडचणींतून मार्ग कसा काढावयाचा तें ते ठरवितीलच.

२) दुसऱ्या समस्येसंबंधीं बोलावयाचे म्हणजे प्रभावी आयुर्वेदीय औषधें उजेडांत आणणें व त्यांचे संशोधन करून त्यांचे निरनिराळे कल्प बनविणें व हे कल्प आयुर्वेदीय रुग्णालयांतून अनुभवून त्यांचे प्रसिद्धीकरण करणें

या दुसऱ्या भागामध्ये तीन प्रकारचे लोक येतील. (१) शिक्षणसंस्थांमधून चालवली जाणारी रुग्णालयें (२) सांगली येथील सांभारे घराणें, येडूर येथील वझे घराणे अशासारखी पिढ्यान्पिढ्या चालत आलेली वैद्यक घराणी (३) एखाद्याच विशिष्ट रोगावर विशिष्ट वनस्पती वापरून ते ते रोग दूर करणारे लोक. अशा इतस्ततः पडून राहिलेल्या लोकांची नामावळी तयार करून त्यांचेकडून माहिती मिळविणे.

या तीन्ही प्रकारच्या लोकांनीं शुद्ध अंतःकरणानें अनुभव आलेल्या गोष्टी स्पष्टपणे जनतेपुढे व सरकापुढे मांडणें, व त्यांचे संशोधन करण्याची पराकाष्टा करणें. सदर संशोधन सरकारनें काढलेल्या संशोधन शालांतून मुख्यतः व्हावयास पाहिजे. तसेच आयुर्वेदिक रुग्णालयांतून त्याचे अनुभव घ्यावयास पाहिजेत. त्याचप्रमाणें आम्ही वैद्यमंडळीनीं आपापल्या दवाखान्यांतून पारखून सरकारास त्याची दखलगिरी द्यावयास पाहिजे. अशा रीतीनें सर्वांनी शुद्ध आयुर्वेदाचा अभिमान धरून आयुर्वेदाच्या पुष्टीस सर्वतोपरी हातभार लावल्यास आयुर्वेदीय प्रभावी औषधें जगापुढें येणें फारसे अवघड होणार नाहीं. केवळ आतां शुद्ध आयुर्वेदाची सोज्वळ पताका घेणाऱ्यांनींच सर्व पाहून घ्यावे असे म्हटल्यास आपण आपल्या शास्त्रास सर्वस्वी मुकू.

सरकारचे कर्तव्यः-

सरकारनें शुद्ध आयुर्वेदास मान्यता दिली म्हणजे सरकारची सर्व जबाबदारी संपली असे तिनें समजू नये. सरकारनें घिटाईनें आयुर्वेदास मान्यता दिली याबद्दल आम्ही तिचे सहस्रशः आभार मानतो व त्याबद्दल तिला धन्यवाद देतो. परंतु विलायती औषधांप्रमाणें आयुर्वेदिक औषधे असल्याबद्दल सिद्ध करून [illegible] हें काम फक्त आयुर्वेदशास्त्रवेत्त्यांचेच आहे असे न मानता संपूर्णपणें पाठिंबा द्यावा आयुर्वेदीयांचे धोरणास [illegible] मदत करता येईल तितकी मदत करावी येवढेच आज येथे सांगून हा लांबलेला लेख पुरा करतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री.

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिती बम्बई

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिती की द्वितीय सभा दि. २९।१।५४ को बुद्ध भवन औट ड्रेम रोड, फोर्टमें मे० अध्यक्ष श्री. वै. वामनरावजी दीनानाथ की अध्यक्षतामें दो पहरके २ बजे संपन्न हुई। सभामें समिती के सातों सदस्य उपस्थित थे। सर्व प्रथम गत सभाका कार्य विवरण संमत किया गया।

इसके अनन्तर पाठ्यक्रम समिती की प्रथम सभा में नियुक्त की हुई उपसमिती की ओरसे आया हुआ विवरण चर्चा के लिये रखा गया और उसपर निम्न लिखित विचार संमत हुअे।

अ) समितीके संचालनार्थ आवश्यक नियम और उपनियम।

आ) राजमान्य गुरुकी पात्रता और उनके लिये आवश्यक आवेदन पत्र।

इ) राजमान्य गुरुके पास अध्यापनावश्यक साधन सामग्री।

ई) विद्यालयों की पात्रता और उनके लिये आवश्यक साधन सामग्री और आवेदन पत्र।

उ) विद्यार्थिओंके प्रवेश पात्रताके लिये गव्हर्नमेंट संस्कृत कॉलेज बनारस की प्रथमा परीक्षाके समकक्ष अन्य संस्कृत परीक्षाअें तथा बम्बई प्रांतकी S. S. C. परीक्षाके समकक्ष अन्य बोर्ड और विश्वविद्यालयोंकी परीक्षाअें। यह सब कार्यवाही अन्तिम निर्णय के लिये सरकारके पास भेजी जायगी और उसके पश्चात वह प्रकाशित की जायेगी।

WILCO
STRONGHOLD OF PROTECTION

४० वर्षांच्या

प्रामाणिक सेवेमुळें लोकादरास पात्र झालेल्या

वेस्टर्न इंडियाची

पॉलिसी

वर्षप्रतिदेच्या सुमुहूर्तावर घेऊन स्वतःची व कुटुंबियांचीं पुढील तरतूद आगाऊ करून ठेवा.

सविस्तर माहिती मागवा.

मॅनेजर,

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Refresher Course for Ayurvedic Medical Practitioners.

A four-week Refresher Course from 3-5-1954 to 29-5-54 will be held under the auspices of the Faculty of Ayurvedic & Unani Tibbi Systems of Medicine, Bombay, at the following Institutions in the mediums mentioned in the bracket:-

1) R. A. Podar Medical College (Ayur.), Worli, Bombay 18 (Hindi.).

2) Ayurved Mahavidyalaya, Poona (Marathi),

3) Ayurved Vidyalaya, Jamnagar (Saurashtra) (Gujarathi).

4) J. S. M. G. Ayurvedic College, Nadiad, (Gujarathi).

The Course will be open only to Vaidyas serving in Government, Municipal and District Local Board Institutions, Subsidised Medical Practitioners and Vaidyas who have been registered or enlisted under the Bombay Medical Practitioners' Act, 1938.

Fees for the whole Course, which consists of 80 lectures are Rs. 30/—.

Applications for admission to, and further enquiries regarding the Refresher Course may be made directly to the Teaching Institutions concerned.

विद्यालय वार्ता व संस्थावृत्त

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय वार्ता:-

विद्यार्थी शासित मंडळातर्फे पदवी परीक्षेस जाणाऱ्या विद्यार्थांना निरोप समारंभ वैद्यवर श्री. ब्रोडस यांचे अध्यक्षतेखाली थाटानें ता. १०।३।५४ रोजीं पार पडला. अध्यक्षांनीं आपले भाषणांत वैद्यांवर पडणारी सामाजिक जबाबदारी समजावून दिली, व आपले कृतीनें रुग्णांना सुखदान द्यावें असें सांगितलें; उत्तम व आदर्श वैद्याचें जीवन जगा असा आदेश त्यांनीं दिला.

आमदार श्री. व्ही. एन्. पाटील M. A., L. L. B. यांचें "माझें मुंबई असेंब्लींतील कामकाज" या विषयावर ता. १६।२।५४ रोजीं भाषण झालें. वक्त्यांनीं असेंब्लींतील कामकाजाच्या पद्धतींची माहिती श्रोत्यांना दिली. विरोधीपक्षही विधायक काम कसें करून दाखवतो, तें सोदाहरण समजावून दिलें; त्यांचे व्याख्यानाबद्दल विद्यार्थी शासित मंडळ त्यांचे फार आभारी आहे.

उदात्त सज्जनांचा संस्थेवर स्नेहवर्षाव !

१ सातारा येथील सुप्रसिद्ध देशभक्त नागरिक श्री. भाऊसाहेब सोमण यांचे आणि संस्थेचे नेहमीच स्नेहपूर्ण संबंध आहेत; सातारा येथील मारवाडी समाजानें त्यांना निधी जमवून थैली अर्पण केली होती. त्या रकमेचा विनियोग आरोग्यदानाचे दृष्टीनें मारवाडी समाजाचे वतीनें श्री. भाऊसाहेब सोमण यांनीं करावयाचें ठरवलें. संस्थेच्या 'क्ष' किरण यंत्राला कांहीं पैशाची गरज आहे असें कानीं येतांच त्यांनीं त्वरेनें ५०१ रुपये या कामासाठीं संस्थेचे स्वाधीन केले! या त्यांच्या दानाबद्दल संस्था श्री. भाऊसाहेब सोमण यांना धन्यवाद देत आहे, व त्यांना सुखी दीर्घायुष्य चिंतित आहे.

२ डॉ. सी. जी मलकाणी यांनीं आपले पत्नीचे स्मरणार्थ संस्थेकडे रक्कम ठेवली आहे. या रकमेंतून रुग्णालयांतले सर्व रुग्णांना दि. २७।२।५४ रोजीं दुग्धपान देण्यांत आले.

डॉ. एच्. पी. पटवर्धन L. M. & S. यांनीं आपले मातापित्यांचे स्मरणार्थ अत्यंत उपयुक्त अशा १४ ग्रंथांचें दान संस्थेच्या ग्रंथालयास केले आहे. या ग्रंथांमुळें संस्थेचें संग्रहालय आकर्षक झालें आहे. त्यांच्या या देणगीबद्दल संस्था त्यांची फार आभारी आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागवेली

: लेखक :
गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

नांवें:-

तांबूलपत्र, तांबूलवल्ली, तांबूली, नागवल्ली, पानें, विड्याचीं पानें.

वर्णन:-

ह्या वेलीची लागवड करितात. व याचे स्वतंत्र असे पानमळे असतात. उष्ण हवा व भरपूर पाणी या ठिकाणीं हे अधिक असतात. कोंकणापेक्षा देशावर सांगली मिरज, पंढरपूर या ठिकाणीं देशभागावर हे जास्त आढळतात.

औषधी उपयुक्त भाग:-

यांची पानें, ताजी, रसरशीत, व तिखट असलेलीं, औषधासाठीं निवडून घ्यावीत. विड्यासाठीं याचीं पक्की पानें जास्त चांगली. कारण यांतील उपयुक्त भाग पिकलेल्या पानांत जास्त येत असतो.

कल्प:-

याचे स्वतंत्र असे कल्प नाहींत. निरनिराळ्या द्रव्यांना भावना देण्यासाठीं याचा उपयोग केला जातो. मुख्यतः अग्निदीपनासाठीं त्याच प्रमाणें श्वासकासासाठीं करावयाच्या औषधांना याच्या रसाच्या भावना देतात. रसायन शास्त्रांत हीं उपयोगी पडतात.

ग्रंथोक्त गुण:-

तांबूलं विशदं रुच्यं तीक्ष्णोष्णं तुवरं सरम्।
वश्यं तिक्तं कटुक्षारं रक्तपित्तकरं लघु।
बल्यं श्लेष्मास्यदौर्गंध्यमलवातश्रमापहम्॥
भावप्रकाश. नि.

तांबूलपत्रं तीक्ष्णोष्णं कटु पित्तप्रकोपणम्।
सुगंधी विशदं तिक्तं स्वर्यं वातकफापहम्।
स्रंसनं कटुकं पाके कषायं वन्हिदीपनम्।
वक्त्रकंडुमलक्लेददौर्गंध्यादि विनाशनम्॥
सुश्रुत संहिता. सूत्र. स्था.

रस:-

तिखट, कडु, तुरट, व क्षार हे चार रस यांत आहेत. मुख्य तिखट रस आहे.

वीर्य:-

नियमाप्रमाणें याचें वीर्य तिखट आहे.

विपाक:-

याचा विपाक कटु होतो.

गुण:-

विड्याचीं पानें, तीक्ष्ण, विशद, सर, अशीं असतात.

दोषांवर कार्यें:-

यांतील रस, वीर्य विपाक व गुण हे सर्व कफाच्या उलट असल्यानें त्यांचे कफनाशक असें कार्य घडते. त्याच प्रमाणें सर्व गुण वातवर्धक असले तरी त्यांत मुख्यतः वीर्य हें कार्यकारी असल्यानें त्याचें कार्य होऊन वातशामक असें कार्य घडतें. त्याच प्रमाणें ऊष्ण तीक्ष्ण सर, क्षार हें सर्व गुण पित्ताचे वाढीला मदत करणारे असल्यानें पानें पित्तवर्धनाचें कार्य करतात.

धातूवर कार्यें-:

समान गुणांनीं रक्त धातू वाढविण्याचें याचें महत्वाचें कार्य आहे. त्याच प्रमाणें इतर धातूवर नाशक असेंच कार्य घडते

मलावर कार्यें:-

स्वेद वाढविणें, व मुखमल कमी करणें हें कार्य याचे आहे

याचें कार्यक्षेत्र:-

मुख्यतः कंठस्थान, श्वासमार्ग, फुप्फुसें व पचनाचें महास्रोतस हीं कार्याची मुख्य ठिकाणें होत.

विशद:-

विड्याचे पानांतील विशद हा गुण तर फार महत्वाचा आहे. विशद म्हणजे स्वच्छ. हा गुण पिच्छिल या गुणाच्या उलट आहे पिच्छिल गुण हा संधान करणारा असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" पिच्छिलो जीवनो बल्यः संधानः श्लेष्मलो गुरुः ।
विशदो विपरीतोऽस्मात् क्लेदाचूषणरोपणः ॥
सुश्रुत संहिता.

या गुणाचा उपयोग आपणांला व्रणांत उपयोगी पडतो. क्लेदानें भरलेल्या व्रणावर विडयाचें पान बांधलें असतां व्रण क्लेदरहित होऊन भरून येण्याचे मार्गास लागतो.

सुगंधीः-

विडयाचे पानांत सुगंधी हा एक चांगला गुण आहे. दुर्गंधी याचे उलट सुगंधी हा गुण आहे. हृल्लास, मळमळ, अरुचि, च्छर्दि या गोष्टी एका दुर्गंधी या शब्दानें दर्शविल्या जातात. आणि सुगंधी द्रव्यें सुखकर, प्रिय रुचकर अशी असतात, व तो दुर्गंधीचा नाश करतात. यामुळें ज्या ठिकाणीं अरुचि, मळमळ, ओकारी हीं लक्षणें असतात अशा ठिकाणीं याचा उपयोग केला जातो. खूप श्रीखंड, अगर बासुंदीपुरीचें जेवण होऊन त्याचा पुढें वीट आला आहे अशा वेळीं भोजनोत्तर तांबूल भक्षण करणें ही गोष्ट शास्त्रीय आहे. त्याचप्रमाणें रुग्णावस्थेंत किळसवाणी औषधाची चव झांकण्यासाठीं उदाहरणार्थ जुलाब होण्यासाठीं एरंडेल तेल घेतल्यावर, पुष्टीसाठीं मांसरस अगर कोंबडयाचें अंडे घेतल्यावर मळमळ ओकारी व यामुळें बलहानि होण्याचा संभव असतो. म्हणून अशा वेळी रोग्यांना विडा खाण्यास द्यावा.

कित्येक लोकांना मुखदुर्गंधी असते. अशा लोकांनीं तांबूल भक्षण करावा. त्याचप्रमाणें ज्यांच्या तडक्यांतून पुष्कळ चिकट व दुर्गंधीयुक्त कफ पडत असतो अशा वेळीं विडयाच्या पानाचा रस अनुपान म्हणून वापरावा. यांतील तिक्त, कटु, रसामुळें मुखाची शुद्धि होते. कफ कुजल्यामुळें अगर मांस धातूंत विदग्ध पित्त साठल्यामुळ कूज होऊन दुर्गंधी येत असते. ही वाढलेली पित्ताची आम्लता, विस्रता कमी करण्याचें कार्य विडयाचे पानांतील क्षार रस करीत असतो. अम्लता व क्षार यांच्या संयोगापासून माधुर्य येऊन पित्तशमनाचें कार्य होतें. मुखरोगाचें कारण मांसधातूंत दुष्टी, मांसाहार, तत्समान आहार यामुळें होत असते. त्याचा परिणाम मांस धातूंत विदग्ध पित्त निर्माण करण्यांत होत असतो अशा वेळीं क्षार वापरल्यानें विदग्ध अशा अम्ल पित्ताचें शमन होत असतें.

स्वर्यः-

कफप्रधान कंठरोगांवर याचा उपयोग होतो. सर्दी अगर पडसें यामुळें आवाज बसला असेल अशा वेळीं याचा रस पोटांत द्यावा. अगर कोमट पाण्यांतून गुळण्या करण्यास द्यावें. पानें गरम करून छातीवर बांधावीत. यामुळें घुसमट कमी होते व घशांतील कफाचा जोर कमी होतो. यांतील उष्ण, तीक्ष्ण गुणांनीं कफ पातळ, विलीन व सुटा होतो व आवाज सुधारतो. यासाठीं पाच सहा पानांचा रस गुळण्या करण्यास द्यावा.

" वन्हीदीपन..... रुच्य, सर, स्रंसन..... "

रुच्य हें कार्य सुगंधीं गुणानें घडते. कटु तिक्त गुणानें तोंडांतील जिभेवरील कफ, बुळबळितपणा नाहींसा होऊन हें कार्य घडते. त्याच प्रमाणें यांचे रसानें लालास्राव वाढतो. " कटुः स्रावयत्यक्षिनासास्यम् । " व कटु तीक्ष्ण गुणानें, उष्ण वीर्यानें प्रत्यक्ष पाचक पित्त वाढविण्याचेंहा कार्य यानें होत असतें. त्याचप्रमाणें आमाशयांत अन्न दीर्घ काल राहून तें जर नीट पचलें नाहीं, तर तें कुजण्यास प्रारंभ होतो, व अन्न सडण्यापासून निरनिराळे वायु निर्माण होतात .व त्याच प्रमाणें त्या अन्नात एक प्रकारची विदग्धावस्था प्राप्त होऊन (शुक्तपाक, द्रव्यपाक) त्यांत अम्लता येत असते. अशा विकारास आयुर्वेदांत अम्लपित्त अशी संज्ञा आहे. अशा पित्ताचें शमन करण्याचें कार्य याचे रसानें घडतें. यांत असलेला क्षार गुण हा याला कारणीभूत आहे. " क्षारो हि याति माधुर्यं अम्लेन सह " अम्लाचा नाश क्षारानें होतो म्हणुन हें कार्य डतें. अशा अम्लपित्ताच्या पासून अजीर्ण, अरुचि, हातापायाची आग, अंग रसरसणें, डोकेंदुखी, अर्धशिशी, सूर्यावर्त अशा प्रकारचे विविध इंद्रियांचे विकार होत असतात. अशा सर्व विकारांत विडयाचे पानांचा रस चांगला उपयोगी पडतो. यासाठीं अम्ल पित्तारी हा पाठ चांगला आहे. यांत सुंठ व सोनकाव ही दोन द्रव्यें असतात. व यांना विडयाचे पानांच्या पुष्कळशा भावना दिलेल्या असतात, व याचा उपयोग अम्लपित्तजन्य सर्व लक्षणांत चांगला उपयोग होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्रंसन:-

यानें पाचकपित वाढल्यानें त्याचें स्वाभाविक कार्य सर हेंहीं वाढतें. त्यामुळें स्वाभाविकपणें शौचास साफ करण्याचे कार्य नीट चालतें.

सर:-

यापेक्षां दुसरा सर गुण यांत आहे. यांत सर याचा अर्थ व्यवायि शरिरांत लवकर पसरणें, फिरणें असा आहे. यामुळें विडयाच्या पानाच्या रसानें शरिरांत लवकर शिरण्याचें कार्य होतें. म्हणून यानें भावित जीं द्रव्यें असतात तीं शरिरांत लवकर, फार जलद शोषिलीं जातात, व याचें कार्य जलद होतें. शरिरांत गेल्यावर स्वाभाविक अवस्थेंत रक्त धातू वाढविणें, पित्त वाढविणें, हें कार्य याचें जलद होत असतें. या गुणामुळेंच हीं पानें बल्य अशी म्हटली जातात. यांत साक्षात धातू वर्धक असा कोणताही गुण नाहीं. किंवा यानें बृंहण असें कार्य होत नाहीं. केवळ ज्या ठिकाणीं रक्त कमी पोचलें जातें व त्याचा परिणाम दौर्बल्यांत होतो, कफ वृद्धीचा परिणाम म्हणून आलस्य, गौरव, शैथिल्य हे ज्या ठिकाणीं वाढलें असतील अशा ठिकाणीं कफ नाश करून तात्काळ उत्तेजन देण्याचें कार्य यानें होतें. केवळ लवकर लवकर पित्त वृद्धि करून धातूंचें पचनाचें कार्य जलदी जलदी केलें जातें. अभिसरण पित्ताचें अभावामुळें मंदावून रहात नाहीं. तात्पुरता कां होईना रक्त प्रवाह यानें वाढविला जातो. हें कार्य सारखे चालूं ठेवल्यास त्या पासून रक्तपित्त, क्षय, असे धातूनाशाचे व पित्तवृद्धीचे विकार जडतील. म्हणून हें द्रव्य जरी बल्य असलें तरी तात्पुरतें असतें, टिकाऊं स्वरूपाचें नसतें. म्हणून कफ वृद्धीतच याचा बल्य असा उपयोग केला जातो.

औषधी उपयोग म्हणून हें द्रव्य श्वास, कास, कफज्वर, कंठविकार, व कांहीं अम्लपित्ताचे व्याधि अग्निमांद्य अशा कफप्रधान विकारांत वापरलें जातें. शीतप्रधान ज्वरांत, किंवा शीतपूर्वक ज्वरांत, थंडीतापांत याचा उपयोग होतो. पाळी भरण्यापूर्वी याचा रस पोटांत गेला असल्यास थंडी ताप भरत नाहीं. जरी आला तरी त्यापासून मागाहून फारशी पीडा होत नाहीं. कारण यांत असलेले उष्ण व्यवायि, तीक्ष्ण गुण हे थंडी कमी करणारे, व हिवतापाचे विष मारक असे आहेत. अशासाठीं पुष्कळ वैद्य थंडीतापास विडा देतात, व याचेंच गुण वाढावेत म्हणून खारकेची बींही उगाळून पानांला लावतात. यापासून थंडी ताप राहतो. याच प्रमाणें, सर्दी, पडसे, अंगदुखी, अशा विकारांतही याचा उपयोग चांगला होतो.

पूर्वकाळीं वेशभूषेला फार महत्व होतें. त्यांत ओठ लाल करणें हे लोकवशतेचें साधन मानले जात होतें. म्हणून याला वश्य असें म्हटलें जातें. त्याचप्रमाणें पानें ही कामोत्तेजक आहेत. म्हणून त्यांना वश्य अशी संज्ञा मिळाली आहे.

वसंत मिश्रण

सुवर्णयुक्त टॉनिक

४० गोळ्या किंमत ४ रुपये

पोस्टानें मागवा.

नित्योपयोगीं अर्कशाला औषधें

एग्युमिक्श्चर

कोणत्याहि ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, एग्यूमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें यणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथ पित्तम् . . . ।

: लेखक :
गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

पित्त शब्दाची निरुक्तिः–

'तप' या धातूपासून पित्त हा शब्द झाला आहे. तप या धातूचा अर्थ तापणें, किंवा तापविणें असा आहे.

पित्ताचें स्वरुपः–

देहाचे जीवन-व्यापार चालण्यास वात, पित्त व कफ या तिघांचीही अवश्यकता असते. बाह्य जगतांतील पांचभौतिक द्रव्यें शरिराला वारंवार घ्यावीं लागतात. व तीं घेतल्यानंतर त्यांचें रूप पालटन त्यापासून स्व-रूपाची द्रव्यें निर्माण करावीं लागतात. बाह्य जगतांत ज्या रूपांत, हीं द्रव्यें वावरतात तशींच तीं शरिरांत चालत नाहींत. त्यांचें बाह्य जगांतील स्वरूप पार पालटन टाकावें लागतें. जीं शरिराशीं जमतील, शरीर व्यापार चालण्यास अनुकूल होतील अशीं नव्या बनावाचीं द्रव्यें या शरीर-रूपी यंत्रांत निर्माण होत असतात. देहव्यापार चालण्यास, हवा, पाणी, व अन्न हीं तीन प्राणद्रव्यें लागतात. तीं शरिरांत जातात, आणि या शरीर यंत्रांतून मलिन वायु, मूत्र, विष्ठा, स्वेद हीं द्रव्यें बाहेर पडतात. असे मल निर्माण करणारा कारखाना म्हणजे शरीर होय. बाह्य यंत्रांचे आधारें असे मल निर्माण करणाऱ्या यंत्राचा शोध परमेश्वराचें अनुकरण करणाऱ्या मानवाला अद्यापि तरी लागलेला नाहीं. भाकरी, भात, आमटी, असें आपण जें अन्न म्हणन खातो, तें जसेंच्या तसेंच या देहांत सांपडत नाहीं. उलट त्याचें रस, वर्ण, गंध, रूप हीं कधींच पहावयास मिळणार नाहींत. रक्त, मांस, अस्थि, मज्जा शुक्र असे धातू या देहांत पहावयास मिळतील. बाह्य जगतांतील पांच-महाभौतिक द्रव्यें अन्नरूपानें घेऊन, त्यापासून हे शरिरांतील विविध घटक निर्माण करण्याची देह म्हणजे एक अद्भूत रसायनशाला आहे. त्यांत नको असलेलीं द्रव्यें बाजूला करावीं लागतात. जुने संयोग मोडून अनुकूल असे नवीन संयोग घडवून आणावे लागतात, व बाह्य जगतापासून भिन्न अशीं नवीन द्रव्यें निर्माण करावी लागतात.

भूमींत रोवलेल्या गुलाबाच्या कांडीला अंकुर फुटतात. पानें येतात, फांद्या येतात, त्याला अंगावर काटे येतात, नयन मनोहर, सुगंधी, हृदय आकर्षण करून घेणारी त्या गुलाबाला फुलेंही येतात. तीं आली कशीं व कोणीं आंणलीं ? जगांतील हवा, पाणी, माती, सूर्य प्रकाश हीं प्राणद्रव्यें मानवाप्रमाणें त्यालाही लागतात. तीं तें घेतें. व नवीन संघयोजना करून त्यापासून आपली हिरवीं पानें व गुलाबी फुलें बनवितें. हवा, पाणी, सूर्यप्रकाश, माती यांत तीं आपणाला कधींच पहावयास मिळत नाहींत. पण ती त्याला मिळाली नाहींत तर त्याला आपलीं अंगें निर्माण करतां येणार नाहींत. म्हणजे झाडाचीं अंगें, हवा, पाणी माती यांत होतीं पण तीं निराळ्या रूपांत होतीं. तें रूप पालटून नवीन रूप देण्याचें चित्त सामर्थ्य या गुलाबाच्या कांडींत आहे. तशीच शक्ति, अथवा सामर्थ्य उत्पत्ति पासून अंतापर्यंत दर एक मानवांत असते.

"वातपित्तश्लेष्मण एव देहसंभव-हेतवः। एभिरेव संभवस्थितिप्रल-येष्वप्यविरहितं शरीरं भवति।"

सु. सू. २१।४

व यामुळेंच बाह्य जगतांतील अन्नरूपानें घेतलेल्या पांचभौतिक द्रव्यांचें प्रमाण व समुदाय पालटून त्यापासून दुसरे शरीराला उपयुक्त असे रस रक्त मांसादि विशेष संघात देहांत होऊं शकतात. हे रूपांतर करण्याचें जें सामर्थ्य या देहांत आहे त्याला "पित्त" असें म्हणतात.

पित्ताचें गुणः–

पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं
लघुविस्रं सरं द्रवम् ।

वा.

पित्त हें पांचभौतिक आहे. त्यांत अग्नीचें आधिक्य आहे. यामुळें त्याला स्वतंत्र स्थान प्राप्त झालें आहे. ऊष्णता, पचन, प्रभादि स्वतंत्र कार्यें त्याचीं यामुळेंच दिसून येतात. अग्नीच्या ऊष्ण व तीक्ष्ण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुणाबरोबर. त्यांत द्रव, व सस्नेह हे दोन गुण जलाचे आले आहेत. लघु व सर दोन गुण वाताचे पित्तांत पहावयास मिळतात. विस्र हा पृथ्वीचा गुण पित्तांत येतो. पित्त हें संयुक्त द्रव्य बनले आहे.

सस्नेहः–

पित्त सस्नेह म्हणजे किंचित स्निग्ध आहे कफ हा सर्वांत स्निग्ध आहे. कफाच्या मानानें पित्त हें पुष्कळच कमी स्निग्ध आहे. स्निग्ध गुणामळें स्नेहन व मार्दव येतें. पित्ताच्या व कफाच्या स्निग्ध गुणामुळें, आमाशयांतील अन्नाला स्निग्धपणा येतो. त्यामुळें अन्नाचे संघात विस्कळित व मृदु होतात. "स्नेहोमार्दव जनयति।"

च. शा.

पित्ताचा हा स्निग्ध गुण आमाशयाप्रमाणें लघ्वंत्र, ग्रहणी, पक्वाशय, रसरक्तवाहिन्या, त्वचा इत्यादिकांत पहावयास मिळतो. त्यामुळें त्यांतून वायूचें गमन कार्य सुलभतेनें होऊ शकतें. अन्न, वात, मूत्र, पुरीष, रस, रक्त यांचें गमन त्या त्या मार्गांतून बिनबोभाट होतें. ते ते अवयव मृदु राखिले जातात. त्यामुळें त्या त्या अवयवांची झीज होत नाहीं. असें, धातु घटकांचें संरक्षण करण्याचें कार्य स्निग्ध गुणामुळें होतें. मधुर, अम्ल, व लवण हे तीन रस स्निग्ध असतात त्यांत अम्ल व लवण हे रस पित्तभूयिष्ट द्रव्यांचे असतात. रक्तांतील पित्ताचा रस लवण हा आहे. त्यामुळें स्नेहन व मार्दव राखण्याचें कार्य शरिरांत होतें. या लवणांतील स्निग्ध गुणामुळें मलांची प्रवृत्ति सुखकर होते. सृष्टमलत्व हें कार्य पित्ताच्या स्निग्ध गुणामुळें होतें. तसेंच, प्राणादि पंच वायूंची अनुलोम प्रवृति सतत चालू ठेवण्याचें कार्य या गुणामुळेंच होत असतें.

तीक्ष्णः–

मंद या गुणाच्या विपरीत तीक्ष्ण हा पित्ताचा गुण आहे. सुईचें टोंक तीक्ष्ण असतें. शस्त्रें हीं तीक्ष्ण धारेचीं असतात. त्यामुळें छेदन, भेदन, वेधनादि शस्त्रांचीं कर्मे होऊं शकतात.

हीं आपणाला शरीरबाह्य कर्मे तीक्ष्ण द्रव्यांचीं दिसतात. पण पित्त किंवा पित्तासारखीं तीक्ष्ण गुणाचीं द्रव्यें शरिरांत गेल्यावर, तीक्ष्ण गुणाचें कार्य घडवून आणतात. मरीच, सर्षप हीं द्रव्यें तीक्ष्ण आहेत.

शोधने तीक्ष्णः।

हेमाद्रि. वा. सू.

दाहपाककरस्तीक्ष्णः स्रावणः।

सु. सू. ४९

शरिरांत विच्छेदन करणें हें कार्य पित्ताच्या तीक्ष्ण गुणामुळें घडतें. अन्न पचन होण्यास व त्याचें शोषण होण्यास, त्या अन्नसंघाताचें विच्छेदन (splitting) होणें अवश्यक असतें. तें झाल्याखेरीज अन्नाला अधिक सूक्ष्मत्व येऊं शकत नाहीं. तें द्रवांत विद्रावित होऊं शकत नाहीं. तें करण्यासाठीं त्याचें च्छेदन, भेदन करावें लागतें म्हणजे मग त्यापासून नवीन घटकसंयोग, नवीन रचना-विशेष निर्माण होऊं शकतात. मगच आहारापासून आहाररस शरिरांत उत्पन्न होणें शक्य असतें. त्यासाठीं पित्ताच्या या तीक्ष्ण गुणाची जरूरी असते.

शरिरांत धातूंची उत्पत्ति, स्थिति व लय हीं एकसारखीं चालूं आहेत. प्रत्येक घटकाला या अवस्था–त्रयींतून जावें लागतें. त्यांतील तिसरी जी अवस्था लय अथवा क्षीणावस्था, ती मलाची अवस्था असते. घटक आपलें कार्य केल्यावर झिजतात, मलिन होतात. ते मलिन झाल्यावर त्यांचें उत्सर्जन होणेंच अवश्यक असतें. धातूपासून मलिन अंश दूर करण्यास पित्ताच्या तीक्ष्ण या गुणाचा उपयोग होतो. त्यामुळें शरीरस्थ मल-संघातांचें भेदन होतें व ते विद्रावित होऊन आपापल्या मलायनांकडे जाण्यास उद्रिक्त होतात, व त्या त्या मलायनांतून मल म्हणून बाहेर पडतात. पण ते बाहेर पडण्यापूर्वी शरिरांत धातुघटक म्हणून होते. ते झिजले, क्षीण झाले. त्यांना दुसऱ्या चांगल्या घटकांपासून पित्ताच्या तीक्ष्ण गुणानें विलग केले. अंतःस्थित मलांना बाहेर काढन टाकण्याची म्हणजे प्राकृतिक शोधनाची क्रिया पित्ताच्या तीक्ष्ण गुणाची आहे. शोधन करणारीं द्रव्यें अशींच तीक्ष्ण गुणाचीं असतात. त्यामुळें शरीरस्थित दोषसंघाताचा भेद होतो.

"तैक्ष्ण्याद् विच्छिन्दन्ति।"

व त्यामुळें वमन अथवा विरेचन होण्यास मदत होते.

ऊष्णः–

पित्ताचा तिसरा पण सर्वांत महत्वाचा गुण म्हणजे ऊष्ण हा आहे. आपल्या देहाचे व्यापार प्राकृतिक चालण्यास पित्ताच्या या गुणाची आवश्यकता असते. आपल्या शरिरांत विशिष्ट व ठराविक ऊष्णता नेहमीं असते. ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमी होणें ठीक नाहीं, किंवा ती वाढणेही ठीक नसतें. विशिष्ट मर्यादित ऊष्णतामानांत आपले देह-धातु व्यापार व्यवस्थित चालतात. आपले पोट, अंग नेहमीं विशिष्ट, गरम असतात. मुखकुहर, मल, मूत्र, नाकाबाटें बाहेर पडणारा वायु हे आपणांला ऊष्ण लागतात. हा ऊष्णता पित्ताची असते. पित्तामुळें शरिरांत ऊष्णता निर्माण होते व शरीर ऊष्ण राखलें जातें. पचनांत, किंवा रूपांतरांत ऊष्णता निर्माण होते. मेदाचें रूपांतर स्वेद या अंतिम मलद्रव्यांत होत असतां, किंवा अस्थि या पुढील धातूंत होत असतां ऊष्णता निर्माण होते. कोणत्याही धातूंत बदल किंवा रूपांतर होऊं लागलें म्हणजे पाक आला व या पाकांत ऊष्णता उत्पन्न होते. आपल्या शरिरांत सारखा हालचाल असते. हातपाय ही बाह्य कर्मेंद्रियें हालतात. बोलतांनाही एक प्रकारची गती निर्माण होते. आंतड्यांची सारखी हालचाल सुरू असते हृदय व फुप्फुसें ही तर अविश्रांत संकोच विकास करून सारखी हालचाल करीत असतात व जीवनाला उपयुक्त अशी कामगिरी करीत असतात. त्यांची हालचाल म्हणजे त्यांच्या धातू घटकांची हालचाल होय. या चलन वलनाच्या व्यापारांत कांहीं झीज निर्माण होते. व या झीजेंत ऊष्णता निर्माण होते. गत्यंतर किंवा स्थित्यंतर धातु घटकांचे होत असतां कांहीं परमाणू जळतात, त्यांचा पाक होतो. व ज्वलनांत ऊष्णता निर्माण होते. रसापासून, सप्त धातु तयार व्हावयाचे म्हणजे रूपांतर अथवा पाक आला. यांत ऊष्णता, सार-किट्ट निर्मिती आली. तेथें ऊष्णता निर्माण होते. त्याचप्रमाणें दुसऱ्या बाजूनें धातूंचा नाश अथवा विघटना चालू असते. धातूंना मलरूप येत असतें. त्यांतहि एक प्रकारचें पचन असतें. या विघटनेंत ऊष्णता निर्माण होते. आहार रसांतील घटकांचें प्रमाण व रचनाविशेष पालटून धातूत्पत्ति यांत पाक असतो. त्याचप्रमाणें धातूंचे मलांत रूपांतर होत असतांनाही पाक असतो. अशा उभय वेळीं विघटना आली व त्यांत ऊष्णता निर्माण झाली. अशी विघटना किंवा पाक-प्रणाली सर्व शरीरभर दर एक सजीव परमाणूंत अविरत चालू आहे. त्यामुळें सर्व देहभर पचन व ऊष्णता यांची निर्मिती होत असते. पाक म्हणजे रूपांतर. या पाकांत ऊष्णता निर्माण होते, व ही निर्माण झालेली ऊष्णता अन्न पचनाला उपयोगी पडते. म्हणून विशिष्ट प्रमाणांत ही ऊष्णता शरिरांत राखून ठेविली जाते. शरिरांतील हें औष्ण्य राखण्याचें कार्य प्रायः त्वचा करीत असते. जास्त झालेली ऊष्णता स्वेदाचाटें बाहेर पडते. शरिरांतील ही निर्माण झालेली ऊष्णता पित्ताचें मुख्य स्थान म्हणजे रक्त धातु याच्या आश्रयानें असते. रक्त हे व्यान प्रेरणेनें सर्व शरीरभर संचार करते. व त्याबरोबर हा ऊष्माही संचार करतो. या ऊष्णतेमुळें रक्त हें वाहिन्यांत फिरत असतांना गोठत नाहीं. कफ, हीं अधिक आर्द्र राहतो, घन होत नाहीं. त्यामुळें, धातुपोषक घटकांचें व मलिन झालेल्या घटकांचें वहन कोठेंच स्तंभित होत नाहीं. तें सुखानें होतें. वाताच्या गत्यादिक क्रिया या ऊष्णतेमुळें व्यवस्थित चालतात. स्रोतसांचा रोध शैत्यामुळें होत असतो, तो रोध ऊष्णतेमुळें दूर होतो. गतिमान घटकांना शरीररसाच्या विद्रावित अवस्थेंत ठेवण्यास हा शरीरस्थ ऊष्णता उपयोगी पडते. मूत्र, स्वेद, हे पदार्थ नुसते द्रव नाहींत. त्यांत कांहीं घन द्रव्यें विद्रावित असतात. तीं द्रावण स्वरूपांत राखावीं लागतात.

शोधन कर्म करण्यापूर्वी स्नेहन व स्वेदन हीं पूर्व कर्मे करावीं लागतात. त्यांतील स्वेदन क्रियेंत कृत्रिम रीतीनें शरिराला बाहेरून ऊष्णता लावली जाते. त्यामुळें शरीरस्थ पचन वाढतें. मलिन वा विजातीय शरीरव्यापारांत आलेले वा निर्माण झालेले घटक स्वेदनानें 'द्रवीकृत्य' द्रव केले जातात. लीन पित्त, लीन कफ, मल, मलिन वायु स्वेद, मूत्र पुरीष, यांचें या स्वेदन क्रियेमुळें अनुलोमन, हें पाकानंतरचें दुसरें कार्य होत असतें.

यासाठीं शरीर व्यापार चालण्यास मर्यादित प्रमाणांत पित्ताच्या ऊष्णतेची जरूरी नेहमीं असते ही ऊष्णता कमी किंवा अधिक झाली तर स्वास्थ्य बिघडतें. ऊष्णता अधिक वाढली तर त्याला आपण ज्वर असें म्हणतो. रक्तांत हें औष्ण्य वाढलें म्हणजे भ्रम, मूर्च्छा, तृषा, स्वेद, दाह हीं लक्षण निर्माण होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखेर शोध लागला !

ग्रामिण जनतेला जर्जर करणाऱ्या

नारूच्या सांथीवर

खात्रीलायक उपाय सांपडला

नारूच्या कोणत्याही अवस्थेंत त्वरित व हमखास प्रभावी ठरलेलें

" बी. बी. सी." चें

ड्रॅक्युलॅन

त्वरित मागवा.

सोल डिस्ट्रिब्यूटर्स :-

धूतपापेश्वर सेल्स कॉर्पोरेशन लि. धूतपापेश्वर प्रासाद

मुंबई नं. ४

आयुर्वेदाश्रमाचें द्राक्षासव
हें एक रुचकर, क्षुधा वाढवणारें
आणि आरोग्यदायक पेय
आहे. कारण तें निवडक द्राक्षें व
दुर्मिळ वनस्पति आणि औषधी
यापासून तयार केलें आहे.
आपणांस तें खात्रीनें फार आवडेल.

निसर्गाची उदार देणगी

आयुर्वेदाश्रम

द्रा क्षा स व

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड; (आफालि) अहमदनगर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

सुखी मातृपद

म्हणजेच मातेचें व बालकाचें

आरोग्य

मातृपदाची चाहूल लागतांच मातृत्वाची जबाबदारी सुरु होत असते आणि बालकाची आरोग्यपूर्ण वाढ होईपर्यंत ती संपत नाहीं.

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक टॉनिक

गर्भवतींनीं नियमितपणें यूटोन घेतल्यानें प्रकृति उत्तम राहाते, गर्भाचें नीट पोषण होते व गर्भस्राव वा गर्भपात यांचें भय राहात नाहीं. अनियमित मासिक पाळी, प्रदर इ. गर्भाशय-विकारांवरहि गुणकारी.

स्तन्यशोधन

दुग्धशोधक, दुग्धवर्धक

मुलाला आईचें दूध मानवलें नाहीं तर तें बाळसें धरीत नाहीं, त्याची प्रकृति वारंवार बिघडते. मातेनें स्तन्यशोधन नियमित घेतल्यास दुधांतील दोष दूर होतात.

शिशुजीवन

बालकांचें आरोग्यरक्षक

मुलांच्या दमा, खोकला या विकारांवर गुणकारी टॉनिक. वारंवार सर्दी, पडसें होऊन श्वासाचा उपद्रव होतो तेव्हां शिशुजीवनचा अवश्य उपयोग करावा.



आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

श्रेष्ठ, गुणकारी आयुर्वेदीय औषधांचे निर्माते

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्रमित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

मे–जून] [१९५४

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारी संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत.....

अथ पित्तम् । वै. गो. आ. फडके
कावीळ वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर
क्षयज कास (क्षयांतील खोकला)
वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर
औषधी द्रव्यांची शुद्धि अर्थात् शोधनविधी
वै. पु. वि. धामणकर,
रुद्धपथ कामला लक्षणें व चिकित्सा
वै. गो. हि. जोशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांना नम्र विनंतिः-

कांहीं अपरिहार्य कारणामुळें मे व जून १९५४ असा जोड अंक काढावा लागत आहे. त्याबद्दल वाचकांनीं उदार अंतःकरणानें क्षमा करावी. पुढील अंक १ जुलै रोजीं आपले भेटीस येईल.

—संपादक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

—आयुर्मीमांसा—

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १७ वें] मे-जून १९५४. [अंक ४ था.

वार्षिक वर्गणी ३ रुपये • किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म.ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व व्यवहार "व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा." या पत्त्यावरच करावा.

—सेवा—

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते. अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधें वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोअर्स
पायधुणी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र.

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा
उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.
सूचिपत्र मागवा.
सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा
मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.
व्यवस्थापकः- अरविंद केमिकल वर्क्स,
छिंदवाडा (सी. पी.)

अर्कशाला औषधांबद्दलचे आपले अनुभव ग्राहक, वैद्य व विक्रेते यांनीं कळवीत असावे ते मार्गदर्शक ठरतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथ पित्तम् . . ।

(एप्रिल अंकावरून चालू)

: लेखक :

वै. गो. आ. फडके,
आयुर्वेदाचार्य.

४. लघु :-

गुरुच्या उलट लघु हा गुण आहे. लघु गुणानें शरिराला लंघन घडतें. लाघव प्राप्त होते. शरिराचें पोषण कफ करितो. पण त्याच्या उलट, शरिराचें अपकर्षण वात व पित्त आपल्या लघु या गुणांनीं करीत असतात. रोजच्या रोज शरीरधातूंत झीज होते व ही झीज आपण कफवर्धक पदार्थ खाऊन भरून काढतो. पण शरिराची झीज अथवा विघटना करण्यास वाताला मदत पित्त आपल्या या लघु गुणामुळें करीत असतें. पित्त वायुपेक्षां कमी लघु आहे. पित्त हें पांचभौतिक द्रव्य आहे. त्यांत लघु हा गुण वाताचाच पित्तांत आला आहे. वाताचा लघु गुण पित्तांत म्हणजे उष्ण द्रव्यांत निगडीत झाला असल्यानें तो "ऊर्ध्वगमन" या क्रियेस पोषक ठरतो. पृथ्वी-जल भूयिष्ट द्रव्यें "अधोगामी" म्हणजे विरेचन करणारीं असतात. व याचे उलट मदनफलासारखी द्रव्यें ऊर्ध्वगामी म्हणजे वायु, अग्निभूयिष्ट, अत एव वामक असतात. शरिरांत पित्त वाढलें म्हणजे ते साहजिकच वांतीचें कार्य करितें.

पित्त ऊर्ध्वगामी– नाभी, हृदय, उर, कंठ या ऊर्ध्वस्थानांत गमन करणारे आहे.

पित्त लघु असल्यामुळे स्वतः पचण्यास सोपें आहे. तसेच त्यामुळे लवकर लवकर भूक लागते. अग्नि प्रदीप्त राहतो. द्रव्याला लघुपाकी करण्यांत प्रामुख्यानें पित्त भाग घेत असतें. वायूचे गुणाशी सहकारी लघु हा गुण आहे.

५. विस्रं :-

विस्रं म्हणजे दुर्गंधी युक्त किंवा आमगंधी. सडक्या मांसाला दुर्गंध असतो. तसा दुर्गंध पित्ताला असतो. गंध हा पृथ्वीचा गुण आहे. तो पित्तांतही आला आहे. पित्ताचा हा गुण प्राकृतिक स्थितींत त्रासदायक नसतो. अन्नपचन, धातुपचन यांत हा विस्रगंध प्रतीत होतो. अन्न पचूं लागलें, व पाकांत मध्येंच तें वांतीवाटें बाहेर आलें म्हणजे त्या अन्नाला एक प्रकारची दुर्गंधी येत असतें. हा गंध पित्ताचा असतो. तसेंच मानवी रक्ताला एक प्रकारचा विस्र गंध असतो. तो प्राकृतिक असतो. मांसाला गंध असतो तसे धातूपधातूंना गंध असतात. पाकांत रसांतर होते. तसे गंधांतरहि होते. प्राकृतिक पाकांत जो गंधबदल होतो तो प्राकृतिकच म्हटला जातो. शुक्राला 'मधुगंधी' म्हटले जाते. आर्तव प्राकृतिक स्थितींत विगंधी म्हटले आहे. पण हे सर्व शारीर गंध पाहिले तर ते कांही फारसे सुरभि नाहींत. मूत्राला प्राकृतिक स्थितींत गंध, असतो. पुरीषाला प्राकृतिक दुर्गंध असतो. घामाला, तोंडातील लाळेला शरिरांतून बाहेर गमन करणाऱ्या प्रत्येक स्रोतसांतील स्रावाला एकप्रकारचा दुर्गंध असतो. हा दुर्गंध अथवा विस्र गंध शरीर व्यापारांत म्हणजे पाकांत निर्माण होतो व त्या त्या पित्ताचा तो आलेला असतो. नाक, कान, तोंड, खांक, यांतील विस्र गंधाचा उपयोग शरिराबाहेरील कीटकांना जवळ येऊं न देण्यांत होत असावा. मानवी रक्त विस्र-गंधी आहे. पण प्राकृतिक स्थितींत हा गंध कांहीं प्रतीत होणारा नाहीं. ते जेव्हां रक्त वाहिनींतून फुटून बाहेर येते त्यावेळीं हा गंध प्रतीत होईल. तसेच इतर धातूंतही गंध असतात पण ते देहांत असतांना प्रतीत होत नाहींत. त्यांचें रूपांतर मलांत झाले म्हणजे ते बहिर्मुख होतात. व मग त्यांचा गंध प्रचीतीस येतो.

विकृत स्थितींत मात्र विविध गंध प्रत्ययाला येतात. तें सर्व पित्ताच्या क्रियेचे द्योतक असतात. विकृतींत अथवा दुष्ट पाकांत प्राकृतिक पित्त नसतें. दुष्ट पित्त असतें. व त्यामुळें आपणाला विविध दुर्गंध येतात. आंबा अढींत घालून पिकला म्हणजे त्याला प्राकृतिक सुरभि गंध असतो. पण तो वेळींच खाऊन टाकला नाहीं तर तो कुजतो, नासतो. त्याचा मोहक रंग व वास जाऊन त्याला दुर्गंधी येते. याचे कारण आंबा या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्यांत जो अग्नि असतो त्या अग्निकडून त्या अंब्याच्या धातूंचेंच पचन होण्यास प्रारंभ झाला. त्या पचनास आपण नासणें अथवा सडणें असें म्हणतों. दूध प्रथम गोड गोड वासाचे असते. पण त्यांत विकृत पचन सुरू झालें कीं, त्याला इतकी कुचकट घाण सुटते कीं, त्या दुर्गंधीनें माणसाचे डोकें दुखूं लागते. पाकांत रूप, रस, गंध, स्पर्श ही बदलून जातात. तशीच क्रिया जेव्हां विकृत स्थितींत शरिरांत चालते तेव्हां त्यांत विकृत गंधही सुरू होतात. नाक, कान, तोंड, खांक यांत एक प्रकारची दुर्गंधी असते ती प्राकृतिक -घरी म्हणण्याची पाळी येते. विद्रधी झाला कीं त्याला दुर्गंधी येते. कित्येक वेळा जो वात सरतो तो अत्यंत कुजकट असतो. कान फुटतो-कानाला भयंकर घाण येते. कृमिदंतक, परिवेष्टक, यांत मुखाला दुर्गंधी अतोनात असते. श्वासोश्वासाला दुर्गंधी येते. ढेंकरा घाणेरड्या येतात. अशी अनेक उदाहरणें रुग्णांत पहावयास मिळतात. पण गंध जाऊन विस्रगंध आला कीं वैद्यक हे सांगते कीं, त्या त्या ठिकाणीं विकृत धातू पाक आहे. सडण्याची नासण्याची क्रिया चालू आहे. हें पचन करणारे पित्त प्राकृतिक नसून विकृतीक आहे. त्यांत पित्ताचे आधिक्य आहे. असा अर्थबोध सहज व्हावा म्हणून पित्ताचा विस्र गुण सांगितला आहे. पित्तवृद्धींत वा पित्तविकृतींत हा गुण अधिक वाढतो.

६. सरः-

सर हा एक पित्ताचा गुण आहे. तो स्थिर याच्या अगदीं विपरीत आहे. त्या गुणामुळें गति अथवा प्रेरणा द्रव्यांत दिसत असते. वाताचा हा गुण चल गुणानें संबोधला जातो.

स्थिरस्तद्विपर्ययः सरः।
प्रेरणे चलः।

पित्त सर आहे. म्हणजे व्याप्तीशील अथवा पसरणारे आहे. पसरणें म्हणजे गति आली. गति ही नेहमीं वायूचीच असते. पित्त सर आहे म्हणजे पित्तांत असलेला वात हा सर आहे. वाताचा गुण पित्तांत उतरला आहे. वाताची गति तिर्यक् म्हणजे आडवी असते. पण पित्ताशी हा गुण संबद्धित झाल्यामुळें त्याला उर्ध्वगतीहि प्राप्त झाली आहे. ऊर्ध्व, अधः, व तिर्यक अशा त्रिविध गति पित्त हें पांचभौतिक असल्यामुळें आपणास पहावयास मिळतात. सर गुणामुळें कोणतेही कार्य करण्यास प्रेरणा मिळते. बोलणें, चालणें, हालणें, पडणें या सर्व क्रिया वाताच्या आहेत. पण या क्रिया होण्यासाठीं पित्ताची आवश्यकता असते. पित्तामुळें त्या त्या वाताला हालचाल करण्यास प्रेरणा मिळते. हृदयाचे व्यापार, आंतड्याची हालचाल, स्पर्शज्ञान, कार्यकर्तृत्व या सर्व गोष्टी वातावलंबी आहेत. पण त्याला प्रेरणा देण्याचें कार्य पित्त करीत असते. असें पित्त असल्याखेरीज वाताची गति निर्माण होऊं शकत नाहीं. यासाठीं शरिरांतील सर्व व्यापार चालू करण्यास अप्रत्यक्षपणें पित्त कारणीभूत असते. पित्तामुळें पचन अथवा रूपांतर होते. व ही रूपांतरितावस्था वाताची गति म्हणून व्यक्त होते.

सर म्हणजे शरिरांत लवकर पसरणें. रस रक्तांपासून तो अगदीं खोल असणाऱ्या मज्जा, शुक्र या अत्यंत दूर असणाऱ्या धातूंपर्यंत पसरणारे जे द्रव्य त्याला सर असें म्हणतात. यव हे सर आहेत. यवांत वाताचा सर हा गुण आला आहे. त्याचप्रमाणें मद्य हे सर अथवा व्याप्तीशील आहे कुठल्याही स्रोतसांत त्याला जाण्यास मज्जाव अथवा अडथळा नसतो त्यामुळें ते आमाशयांत गेले कीं पाकाचीहि वाट न पहाता लवकर शरीरांतर्यामी होते. त्यामुळें (पानात् सद्यः एव गुणप्रदम् ।) द्रव्याच्या क्रिया आशुकारी झालेल्या दिसून यावयास पाहिजे असतील तर ते द्रव्य मद्याचे स्वरूपांत, आसव स्वरूपांत वापरले पाहिजे. मद्यांत सर हा गुण उत्कर्षाला पोचलेला आढळतो. पित्ताचा हा मुख्यतः गुण आहे. आशुकारिता हे यामुळें दिसून येते. विसर्प, ज्वर, असे आशुकारी विकार दुष्ट पित्ताच्या सर गुणाचे द्योतक आहेत. सर या शब्दाचा दुसरा एक अत्यंत महत्वाचा अर्थ म्हणजे हा सारक होय. पित्त सर आहे म्हणजे त्यापासून शौचास साफ होण्याची क्रिया होते. आंत्रांत अन्नाचें पचन होऊन सार किट्ट विभजन झाल्यावर मलाची शरीराबाहेर निसःरणाची क्रिया होणें अवश्यक असते. पित्ताच्या सर गुणामुळें ही निःसरणाची क्रिया नैसर्गिकरीत्या होत असते. आंत्राच्या स्नायूंची हालचाल अपान वायूच्या प्रेरणेनें होत असते. त्याला अधिक मदत पित्त करिते. वात वाढल्यामुळें शकृत्ग्रह होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शौचास साफ होत नाहीं. पित्त हे वाताला ऊष्ण, स्निग्ध, गुणांनीं विरोधी असल्यामुळें आंतड्यांतील सर क्रियेला विरोधक वायूचे कांहीं चालत नाहीं. वाताचे शमन होते, व मग अनुलोमन कार्य घडून येतें. स्तंभनाची क्रिया शीत गुणाच्या कफामुळें ही होत असते. पण पित्ताच्या ऊष्ण गुणामुळें स्तंभन कार्य होत नाहीं. उलट विकसन होण्यालाच मदत होते. म्हणजे आंत्राला गती अथवा प्रेरणा देणें ही क्रिया कोष्ठस्थ पित्तांत स्वाभाविकच असते. ही सर क्रिया करण्यास पित्ताच्या ऊष्ण गुणाबरोबर स्निग्ध हाहि गुण उपयोगी पडतो. सर ही क्रिया गती दाखविते. आंत्रांत गति निर्माण करणें ही क्रिया करणारे पित्त पचन करण्यास आलेले ग्रहणीगत किंवा कोष्ठस्थ पित्त असते. व्याप्तीशील किंवा पसरणारे पित्त हें रस अथवा रक्त या धातूंच्या आश्रयानें असते. स्थानभेदाप्रमाणें क्रियाभेद लक्ष्यांत घेतला पाहिजे. मलनिःसरणाची क्रिया, निशोत्तर, एरंडेल ही द्रव्यें करितात. त्यांना सारक असें म्हणतात. पण त्यांची ही क्रिया होण्यास पित्ताची जरूरी असते. आंत्रांत पित्ताची वाढ झाल्याखेरीज ही क्रिया होणार नाहीं. विरेचन करणाऱ्या द्रव्यास या सर गुणी पित्ताची उपस्थिती अवश्यक लागते मृदु कोष्ठी माणसाच्या ग्रहणींत प्राकृतिक स्थितींत, विरोधक वायु, आणि स्तंभक श्लेष्मा या दोघांचाही जोर अल्प असतो. व सर गुणी पित्ताचेच आधिक्य असते. त्यामुळें मृदु कोष्ठी लोकांना, दूध, ताक, ऊष्णोदक यानेही जुलाब होतात. त्यांच्या कोठयांत सर गुणी पित्त तयारच असते. त्याला आणखी सर कार्य करण्यास या द्रव्यांची प्रेरणा पुरेशी होते. त्यामुळें या लोकांना दूधानेंही जुलाब होतात. पण ज्या कोष्ठांत विरोधक वायु अथवा कफ असतो तेथें अशा सौम्य द्रव्यांची प्रेरणा पुरत नाहीं, अपुरी पडते. तेथें कुटकी, निशोत्तर जेपाळ, अशी तीव्र द्रव्यें वापरून मोठी प्रेरणा निर्माण व्हावी लागते मग विरेचन कार्य दिसते.

७. द्रवः–

पित्त द्रव आहे. द्रव हा गुण जलाचा असतो. तो पित्तांत आला आहे. उष्णोदक हें द्रव आहे. आणि उष्ण ही आहे. पित्त जसे आग्नेय गुणाचे आहे तसे जलीय गुणाचेही आहे. म्हणजे संयुक्त द्रव्य आहे. द्रव गुणाचा मुख्य उपयोग घन द्रव्यें विद्रावित करण्यास होतो द्रव गुण सर्वांत जास्त प्रमाणांत कफाचा असतो. या द्रव गुणामुळें अन्नाचे घन घटक विद्रावित होतात. शरिरांतील लहान मोठ्या वाहिन्यामधून त्या घटकांचे इतस्ततः गमन या द्रावित अवस्थेमुळें सुखानें होऊं शकते. रस, रक्त, भोज्य धातू विद्रावित अवस्थेमुळेंच व्यानाला इकडे तिकडे नेतां येतात. स्वेद, मूत्र, हेहि द्रव आहेत. म्हणजे द्रवांत शरीरस्थ मलिन घटक विद्रावित असतात. म्हणून हे मल बाहेर पडण्याचें कार्य सोपे होते. शरिरांत अशी अनेक कार्यें द्रव द्रव्याला आहेत. कफ व पित्त यांच्या द्रव गुणांत अंतर असते पित्त हे उष्ण व द्रव आहे. जे पदार्थ थंड पाण्यांत विरघळत नाहींत, किंवा कमी विरघळतात, ते त्यापेक्षां ऊष्ण पाण्यांत अधिक विद्रावित स्थितींत राहूं शकतात. पित्ताचे ही असेच आहे. मधुरप्राय आहार–घटकांचे विद्रावण शक्य तितक्या अधिक प्रमाणांत करून घेण्यास पित्ताच्या या द्रव गुणाचा उपयोग होतो शरीरस्थ, रस, व रक्त हे धातु द्रव धातु आहेत. त्यामुळें त्यांचे, वहन सुखानें होते. तसेंच त्यांत शरीरपोषक घटक व शरिराला नको असलेले, अथवा शारीर व्यापारांत हिणकस होऊन मलिन पावलेले घटक जास्तीत जास्त प्रमाणांत विद्रावित स्थितींत राखले जातात. व त्या त्या स्थलीं, त्या त्या स्रोतसांकडे नेले जातात. आणि विद्रावित स्थितीतच ते स्रोतसांतून बाहेर पडतात. बाह्य मलायनाकडे गेले म्हणजे ते घन बनतात. पण शरिरांत ते द्रव असतात. रस, रक्तांत पित्त आहे म्हणून ही क्रिया अधिक प्रमाणांत होऊं शकते. उष्णतेमुळें गति मिळते व त्यामुळें अधिक अवकाश सांपडतो. रस रक्तांत अधिक अवकाश पित्तामुळें मिळतो. एकाच गुणानें एक क्रिया होते. त्याचप्रमाणें अनेक गुणांनीही एक कार्य होण्यास मदत मिळते. पित्ताचे गुण संमिश्र गुण आहेत. त्यांत जलाचे आहेत, वायूचे आहेत. तसेच स्वतः तेजाचेही आहेत. असा संगम यांत आहे. तीनीही भूतांच्या गुणांच्या समुदायानें याकडे पाहावें लागते. ईथर, स्पिरिट, हीं द्रव द्रव्यें आहेत, पण पाणी नव्हेत. तीं लवकर पेट घेतात, ज्वालाग्राही आहेत. तसेंच पित्त हें संयुक्त द्रव्य समजावयाचें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कावीळ

: लेखक :
वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

'पश्यति पित्तोपहत: शशिशुभ्रं शंखमपि पीतम्' असें एक वचन लहानपणीं संस्कृत शिकत असतांना वाचलें; पित्ताची पीडा झालेल्या मनुष्याला चंद्राप्रमाणें पांढरा स्वच्छ असणारा शंखहि पिवळा दिसतो. असा अर्थहि त्या वचनाचा तेव्हां लावला होता. पण चक्कर येतात, पित्त झालें, जेवणास उशीर झाला कीं पित्त भडकले, मळमळतें व वांत्या होतात, पित्तप्रकोप झाला, आग वाटते, दाह होतो, तोंड कडू पडतें, घशाशीं आंबट येतें इ. सर्व गोष्टींचा संबंध घरांतील वडीलधारीं माणसें पित्ताशींच लावीत असत; त्याचप्रमाणें तेलकट पदार्थ खाऊन झाल्यावर दुधातुपाचे पदार्थ खाल्ले तर 'कोहळें' (कावीळ) होते, आजारांतून उठल्यावर तळलेले पदार्थ खाल्ले तरीहि कावीळ होते असेंहि सांगत असत. हें कोहळें किंवा कावीळ सुद्धां पित्त वाढूनच होतें व त्यामुळें डोळे, हातापायाचीं नखें, लघ्वी अगदीं हळदी सारखी पिवळीं दिसतात अशी या रोगाची कल्पना लहानपणापासून वडील माणसांनीं दिल्याचें आठनतें. परंतु पित्ताच्यामुळें होणाऱ्या वरील निरनिराळ्या गोष्टींचा परस्परांशीं मेळ कसा घालावयाचा ही दृष्टि किंवा अशी शंकाहि त्यावेळच्या बालमनाला आली नाहीं. पित्त वाढणें किंवा बिघडणें म्हणजे एखाद्या आगगाडीच्या अपघातासारखी कांहीं तरी भयंकर गोष्ट आहे व ती घडूं नये म्हणून अमुक अमुक गोष्टी आपण करतां कामा नये, एवढीच फक्त जाणीव त्यावेळीं मनाला होती व मग ती माहिती स्वतःच्या मित्रमंडळालाहि मोठ्या आस्थेवाईकपणानें दिली जात असे. जणूं त्यावेळीं आपण त्या रोगाचे स्पेशालिस्ट किंवा फार मोठे तज्ज्ञ असल्याचा अहंभावहि त्या इवल्याशा मनांत प्रकट होत होता व मग त्यावर आमच्या त्या बालपरिषदेंत कडाक्याची चर्चाहि होत असे. सारांश तेव्हांपासून एखाद्या बागुलबुवाची भीति मनानें घ्यावी तशी त्या कोहळ्या (कावीळ) ची भीति मनांत दडून बसलेली अजूनहि आपलें ठाण सोडीत नाहीं म्हटलें तरी चालेल. कोहळें हा कावीळ या शब्दाचा अपभ्रष्ट खानदेशी पारिभाषिक शब्द आहे.

याच सुमारास उर्दू भाषेचाहि थोडा अभ्यास चालू असतां 'यर्कान की बीमारीका बाअस सफरा है' असेंहि एक वाक्य आमच्या हजरत कमालुद्दीन साहेबांनीं आम्हांस पढवलें. त्यावेळीं त्याचा मराठी अर्थ त्यांना नीट सांगता आला नाहीं पण त्यांनीं त्यास 'पीलिया' रोग म्हटलें व 'सुफीद चीजें पीले रंगकी दीखतीं है इस बीमारीमें!' असें स्पष्टीकरण केल्यावर यर्कान किंवा हा पीलिया म्हणजेच 'कावीळ' होय असेंहि तेव्हांच कळलें. व सफरा म्हणजे पित्त हें त्याचें बाअस म्हणजे कारण आहे ही माहिती कळली.

सुदैवानें किंवा दुर्दैवानें वयाच्या १२।१३व्या वर्षीं तीव्र स्वरूपाच्या संततज्वरांतून बरा झाल्यावर कांहीं दिवसांनीं माझे डोळे व नखें पिवळीं दिसलीं, म्हणून कांहीं औषधें दिली गेलीं. तीं जरी सांगतां येणें आज शक्य नसलें तरी जवळ जवळ १॥-२ महिने तेल तूप खाणें बंद केलें गेलें होतें व खारका, डाळ्या मंत्रून खाण्यासाठीं दिल्या जात असत. ऊंस अगदीं आग्रहानें खाऊं घातला जात असे आणि रस चोखून टाकलेल्या त्या उसाच्या चावऱ्या पिवळ्या पडलेल्या आणि त्या द्वारें माझा रोग जात असल्याचें मला सांगण्यांत येत असे. माझ्या स्वतःच्या लक्षांत त्यावेळीं येणारी विशेष गोष्ट म्हणजे अगदीं हळदीच्या रंगाची पिवळी जर्द होणारी लघ्वी हीच होती. आणि खूप अशक्त झाल्याचा भास होऊन सवंगड्याबरोबर खेळण्याची प्रवृत्ति साफ नष्ट झाली होती हें मला चांगलें आठवतें व त्यामुळें या रोगाशीं माझा परिचय अगदीं लंगोटीमित्रासारखा आहे म्हटला तरी चालेल.

पुढें वैद्यकीय शिक्षणास प्रारंभ होऊन या रोगाचें निदान शिकत असतांना याला संस्कृत नांव 'कामला' असून कावीळ, कामीण, हळद्यारोग इ. नांवांनीं तो निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध आहे व जॉंडिस् हें त्याचें इंग्रजी नांव आहे असें कळलें आणि अशा निमित्तानें हा लंगोटी मित्र त्याच्या कुळकथेसह अधिक परिचित झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काविळीचे प्रकार.

शरिराचा रंग बदलणें ही मुख्य गोष्ट या रोगांत आहे. उन्हांत सतत काम करणारे शेतकरी बहुतेक काळ्या वर्णाचे बनलेले आपण पाहतों; इतकेंच नव्हे तर आपल्यांतून कुणीहि गौर वर्णाचा मनुष्य ८।१५ दिवस प्रवासांत गेला व त्याला उन्हातान्हांतून फिरावें लागलें तर तोही काळा पडतो हें आपणास माहीत आहे. उलट पक्षीं काळ्या वर्णाचा मनुष्यहि सुखांत व थंड छायेंत कांहीं दिवस राहिल्यावर उजळलेला आपण पाहतों. तथापि तें त्यांचें वर्णांतर कांहीं रोगयुक्त आहे असें कुणी म्हणूं शकत नाहीं. त्वचेवर बाह्य थंड वा ऊष्ण हवेचा झालेला तो परिणाम होय असेंच म्हणावें लागतें. अशा ह्या लोकांचा हा बदललेला किंवा मूळचा वर्ण कितीहि काळा अथवा गौर असला तरी त्यांत जें एक नैसर्गिक निरोगीपणाचें तेज असतें तें जोंपर्यंत नष्ट झालें नाहीं तों पर्यंत तो मनुष्य केवळ बाह्य वर्ण बदलला म्हणून रोगी ठरत नाहीं. हें त्याचे काळेंगोरेंपण आगांतुक सदराखालींच घालावें लागतें. शरीर यंत्रांत अंतस्थ बिघाड झाल्यावर जेव्हां वर्ण बदलतो तेव्हांच त्याला रोग म्हणावें लागतें. निरोगी शरिरांत असणारें तेज हें त्याच्या शरिरांतील रक्ताच्या स्थितीवर अवलंबून असतें, हें सर्वांस माहीत आहेच. लालभडक रंग हें रक्ताचें वैशिष्ठ्य, युवतीनें परिधान केलेल्या लाल-गुलाबी रंगाच्या चोळी, पोलकें वा ब्लाउझचा रंग जसा त्याचेवरून असलेल्या पांढऱ्या स्वच्छ पातळाच्या पदरांतूनहि डोकावत असतो; तशीच मानवाच्या देहांतील रक्ताची लाली ही त्याच्या त्वचारूपी आवरणांतून व्यक्त होत असते. पचनसंस्थेंत चतुर्विध आहार्य द्रव्यांच्या रसाचेंच रक्त बनतें. रसाला लाली देण्याचें कार्य यकृत नांवाच्या अवयवांतून स्रवणाऱ्या 'रंजक' पित्ताचें आहे. "रंजकं रसरंजनात्" (अ. हृ.) अशा प्रकारचें हें रक्त सर्व शरीरभर सतत फिरत असतें. व त्यामुळेंच आपलें शरीर त्या रक्ताच्या कमी अधिक लालीवरच तेजस्वी दिसत असतें. त्या रक्ताचें स्वरूप ओळखण्याचीं बाह्यस्थानें नखें आणि डोळ्यांच्या कडा प्रायः होत. यकृतांतून स्रवणारें पित्त तीक्ष्ण, द्रव, पिंवळ्या व निळसर रंगाचें दुर्गंधीयुक्त, ऊष्ण, तिखट, जळजळित व आम्ल असतें.

(पित्तं तीक्ष्णं द्रवं पूति नीलं पीतं तथैवच।
उष्णं कटुरसंचैव विदग्धं चाम्लमेवच। (च. सं.

रोगी अवस्थेंत हें पित्त जेव्हां कफकारक आहारामुळें स्रोतसांचा अवरोध होऊन अन्नरसांत न मिसळतां रक्तांतच मिसळतें; तेव्हां योग्य पित्त मिसळण्याच्या अभावीं त्या रोग्याला होणारें शौच पिवळें होत नाहीं; तें पांढरट व घर्वरित म्हणजे जाडसर अर्थात तिळाचें कूट कालवल्यासारखें होऊं लागतें. व संपूर्ण पित्त हें रक्तांत मिसळलें गेल्यामुळें देहांत संचरणारें तें सर्व रक्त डोळें, त्वचा व नखांचे द्वारें आपण पाहूं तर त्याचा नित्याचा तांबडा रंग जाऊन तेथें पिवळा रंग आलेला दिसतो. अशा ह्या प्रकाराला 'शाखाश्रयी कामला, असें शास्त्रीय नांव आहे.

" तिलपिष्टनिभं यस्तु वर्चः सृजति कामली।
श्लेष्मणा रुद्धमार्गं तत् पित्तं कफहरैर्जयेत॥
रूक्षशीतगुरुस्वादुव्यायामैर्वेगनिग्रहैः
कफसंमूर्च्छितो वायुः स्थानात् पित्तं क्षिपेत् बली।
हारिद्रनेत्रमूत्रत्वक् श्वेतवर्चास्तदा नरः।
भवेत् साटोपविष्टंभो गुरुणा हृदयेन च।
दौर्बल्यालपाग्निपार्श्वार्तिहिक्काश्वासारुचिज्वरैः।
क्रमेणाल्पेऽनुसृज्येत पित्ते शाखा समाश्रिते॥
च. सं. चि. १७॥

या वर्णनांत ह्या शाखाश्रित कामला म्हणजे काविळीचें स्पष्ट वर्णन आहे. ह्या कामलेचा रोगी डोळे, लघ्वी, त्वचा पिंवळी असलेला, मल पांढऱ्यारंगाचा असा असून पोटांत गुडगुड, मलावष्टंभ, हृदयाचे ठिकाणीं जडत्व, अशक्तता, पचनशक्ति कमी झालेला, बरगड्यांत पीडा, उचकी, श्वास, अरुचि आणि कांहींसा ज्वर या लक्षणांनीं पीडित होतो. हा एक कामला म्हणजे कावीळ रोगाचा प्रकार झाला. केवळ अति स्निग्ध व कफकारक आहारामुळें हा रोग होतो. याचेशिवाय आणखी एक प्रकार ह्या रोगाचा आहे. तो प्रकार सामान्यतः कोणत्याही रोगामुळे ज्याचे शरिरांतील रसरक्तादि धातु क्षीण झाले आहेत किंवा ज्याला पांडुरोग झाला असून अत्यंत पित्तकारक आहार जो करील अशा रोग्यासमुद्धां हा कामला म्हणजे कावीळ रोग होतो. त्याला कोष्ठाश्रयी कामला असें दुसरें नांव शास्त्रकारांनीं दिलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोष्ठाश्रयी कामलाविकारांत पित्त कोठ्यांतच अधिक असतें. अगोदरच पांडुरोगानें क्षीणता येऊन रक्त कमी झालेलें व त्यांत पुन्हा पित्तकारक आहारामुळें पित्त अधिकच वाढून तें तीक्ष्ण, ऊष्ण, जळजळीत घर्मामुळें रक्त व मांसधातूंचे ठिकाणी अधिकच दाह निर्माण करतें व त्यामुळें सर्व देह नखशिखांत पिवळा जर्द पडतो. डोळे, त्वचा, नखे, तोंड हीं पिवळी जर्द दिसतात. लाल, पिवळट रंगाचे मल मूत्र त्याला होतें. बरसातींतल्या बेडकासारखा रंग त्या रोग्याचा दिसतो. संपूर्ण तेज नष्ट होते, इंद्रियांची शक्ति नष्ट होते, दाह, अपचन, अरुचि अशीं लक्षणें उत्पन्न होतात. याची पुन्हा उपेक्षा झाली तर हेच दोष अधिक वाढून कुंभकामला रोगांत त्याचें रूपांतर होतें. या स्थितींत काळसर-पिवळट रंगाचें मलमूत्र होतें, सपाटून सूज येते, डोळे व तोंड लाल दिसतें. तगमग फार, दाह, अरुचि, तहान, मलावष्टंभ डोळ्यांवर झापड, बेशुद्धि, हीं लक्षणें होतात. जठराग्नि-अजिर्वात नष्ट होऊन रोगी लौकरच मरतो.

कावीळीवर उपचार :-

अपचन अर्थात जठराग्नीवर मर्यादेहून पचनाचा आधिक भार पडणें हेंच या रोगाचें मुख्य कारण आहे. अर्थातच अधिक खाऊन मनुष्य सुस्त व्हावा तशी स्थिति जठराग्नीची झालेली असते. 'अशा स्थितींत होणाऱ्या रोगांना वैद्यशास्त्र 'संतर्पणोत्थ रोग' अशी संज्ञा देते. व संतर्पण म्हणजे वाजवीपेक्षां अधिक तृप्ती. तृप्ती, सुस्ती येण्याइतकी झाली असल्यानें ती नष्ट होण्यासाठीं याच्या उलट म्हणजेच 'अपतर्पण' अर्थात हा बोजा हलका करणाऱ्याच सर्व गोष्टी केल्या तरच हा रोग लौकर आटोक्यांत येणें शक्य आहे अशा ह्या संतर्पणजन्य रोगावरील उपचारांची दिशा दाखवितांना भगवान चरकमुनींनीं

"शस्तमुल्लेखनं तत्र विरेको रक्तमोक्षणम् ।
व्यायामश्चोपवासश्च घर्मांश्च स्वेदनानि च॥"

च. सू. २३

म्हणजे धातूंचें व मलांचें शोषण करून त्यांना शरीराबाहेर घालवणारें रेचक, रक्तमोक्ष करणारें औषध व तंत्र वापरावें. शिवाय व्यायाम, लंघन, घुरी देणें व घाम काढणें हे उपाय निवेदन केले आहेत. रक्तांत पित्ताचें आधिक्य होणें ही गोष्ट ह्या रोगांत संभवत असल्यामुळें रक्तपित्तदोषहर असे

"विरेकं उपवासंच स्रावणं शोणितस्य च।"

॥ च. सू. २४॥

म्हणजे रेचक औषधें, लंघन व रक्तमोक्ष हे उपचार केले पाहिजेत. ही केवळ तात्त्विक चिकित्सा झाली.

१. कावीळनाशक विरेचन:-

सशर्करा कामलिनां त्रिभण्डी।
हितागवाक्षी सगुडाच शुण्ठी॥

सुश्रुत चि. ४४

साखरयुक्त निशोत्तर चूर्ण अथवा वृन्दावन फळाचें चूर्ण आणि सुंठ हे गुळांत मिश्र करून द्यावे. सपाटून रेच होऊन पित्ताचा निचरा होईल.

२. काढा:-

त्रिफळा, गुळवेल, किंवा दारुहळद व मिरे यांचा काढा थंड झाल्यावर मध घालून पिण्यास द्यावा.

३. दोषांचा निचरा झाल्यावर:-

पित्तशमन होऊन रक्तप्रसादन होण्यासाठीं
धात्री लोहरजोव्योष निशा क्षौद्राज्य शर्करा:।
लीढा निवारयन्त्याशु कामलामुद्धतामपि॥ भा.

आवळकंठी, लोहभस्म, सुंठ, मिरे, पिंपळी, हळद यांचें चूर्ण तूप मध व साखरेंतून चाटावें.

४. कुटकीचें वस्त्रगाळचूर्ण १॥ मासा, ३ मासे खडीसाखर घालून ३ ते ७ दिवस घेतल्यानें रेचन होऊन पित्त शमतें व कावीळ बरी होतें असा अनुभव आहे.

५ कडुनिंबाची साल १ तो. रात्रीं १० तो. पाण्यांत भिजत टाकून सकाळीं पाटयावर चटणी सारखी वाटून रस गाळून घ्यावा व त्यांत चिमूटभर भाजलेल्या जिऱ्याची पूड व १ चमचा मध मिश्र करून प्यालयानें पित्तशमन होऊन लघ्वी लौकर सुधारते.

६. देवडांगरीच्या फळाचें वस्त्रगाळ चूर्ण एक तांदळा इतकें हुंगावें. यानें नाकांतून खूप पिवळें पाणी वाहून जातें, व डोळे स्वच्छ होतात असा अनुभव आहे. हें शिरोविरेचन आहे.

७. पित्तविरेचक म्हणून एरंडाच्या पानांचा किंवा रक्तपित्तनाशक म्हणून अडुळशाचे पानांचा रस मधांतून द्यावा. व दूधभाताचें ७ दिवस पथ्य करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. शिलाजित ४ गुंजा ५ ते १५ तोळे गोमूत्रांतून सतत १ महिना घेत गेल्यानें सर्व दोष शमन होऊन रोग समूळ जातो.

९. सैंधव २ गुंजा व लोहभस्म १ गुंज रोज १ वेळ सकाळी फक्त १ महिनाभर गोमूत्रावरोबर घ्यावें.

१०. शाखागत कामला:-

म्हाळुंगाचा रस सुंठ, मिरे, पिपळीचे चूर्ण घालून घ्यावा म्हणजे शाखागत पित्त स्वस्थानीं येतें व त्यामुळें शौचाचा वर्ण सुधारतो. नंतर कामला रोगावरील पित्तनाशक योग वापरावेत.

काविळीच्या कोणत्याहि प्रकारांत तेल, तूप, जडान्न अगदीं कटाक्षानें वर्ज्य करावें लागतें. तसेंच डाळीहि मुळींच घेऊं नयेत.

११. डाग देण्याची क्रिया :-

तांब्याचीसळई तापवून डाव्या हाताचे मनगटाचे बाहेरील भागावर डाग द्यावा असें म्हणतात.

१२ जुना अनुभविक योग :-

रांगोळीची वस्त्रगाळ पूड करून तिचा कोथिंबिरीचे रसांत ३ दिवस खल करून लहान सुपारी एवढी गोळी करावी. व रोज १ गोळी फक्त सकाळीं पाण्यावरोबर किंवा मधांत द्यावी. ३ ते ७ दिवस दिल्यानें कावीळ संपूर्ण बरी होते.

या शिवाय खारका अथवा डाळचा मंत्र घालून देतात, हाताला चुना चोळून मंत्र घालून पाणी घातल्यानें पिवळें पाणी निघून रोग जातो असें म्हणतात पण त्यावर विश्वास नाहीं. अनुभविकांनीं अधिक माहिती द्यावी.

अखेर शोध लागला !

ग्रामीण जनतेला जर्जर करणाऱ्या

नारूच्या सांथीवर

खात्रीलायक उपाय सांपडला

नारूच्या कोणत्याही अवस्थेंत त्वरित व हमखास प्रभावी ठरलेलें

"बी. बी. सी." चें

ड्रॅक्युलॅन

त्वरित मागवा.

सोल डिस्ट्रिब्यूटर्स :—

धूतपापेश्वर सेल्स कॉर्पोरेशन लि. धूतपापेश्वर प्रासाद

मुंबई नं. ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षयज कास

(क्षयांतील खोकला)

-: लेखक :-

वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

*

इत्येषः क्षयजः कासः क्षीणानां देह नाशनः ।

अर्थ : क्षयांत उत्पन्न होणारा खोकला क्षीण -शरीरी रोग्यांचा देहनाश करतो. ह्या सूत्राकडे वारकाईनें पाहिल्यास खोकला हा विकार क्षयामध्यें होऊन क्षय झालेला रोगी अत्यंत क्षीण झाला असेल तरच त्याचे मरण्याची भीति असते, असें आपणांस दिसून येईल. खोकला हा क्षय नसतांना सुद्धां होऊं शकतो असें ही ह्या सूत्रावरून आपणांस म्हणावें लागेल व तो तसा असेल तेव्हां रोग्यास मरणाची भीति नसते असे ही वाटण्याचा संभव आहे. परन्तु

" कश्चिद्धि रोगो रोगस्य हेतुर्भूत्वा प्रशाम्यति ।
न प्रश्यामति चाप्यन्यो हेतुत्वं कुरुतेऽपिच ।"

ह्या सूत्रान्वयें एकाद्या रोगाला उत्पन्न करून स्वतः न शमणारा असा ' कास ' हा एक रोग आहे असें म्हणावें लागतें कारण " कासात्संजायते क्षयः । " म्हणजे खोकल्यापासून क्षय होतो. अर्थातच खोकल्यापासून क्षय आणि क्षयानंतर खोकला अशी दुहेरी स्थिति ह्या खोकल्याची आहे. आपणास आज फक्त क्षयांत होणाऱ्या खोकल्याबद्दल विचार करावयाचा आहे.

क्षय म्हणजे काय ?

' क्षि ' म्हणजे झिजणें ह्या धातूपासून क्षय शब्द बनला आहे. अर्थातच कुणालाही क्षय होणें म्हणजे दिवसेंदिवस त्याच्या शरिराचे घटक झिजत जाणें होय. शरीर उत्पन्न होणें, त्याचें अस्तित्व राहणें, तें वाढत जाणें, त्याचें स्थित्यंतर होणें व तें नष्ट होणें हा निसर्ग आहे.

" अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते व नश्यति । " हा क्रम वेदांसही संमत आहे. उत्पत्ती आणि अस्तित्व ह्या दोन अवस्थांनंतर वाढणें व स्थित्यन्तर होणें ह्या दोन अवस्था प्राप्त होण्यासाठीं प्रत्यहीं झिजत असणाऱ्या शरिराच्या घटकांना सतत पोषण मिळण्याची आवश्यकता असते. तें पोषण मिळणें बंद झालें अथवा मिळणारें पोषण शरिराच्या त्या त्या घटकास पचवितां आलें नाहीं तर नाश ही अवस्था क्रमप्राप्तच होय. वैद्यशास्त्राच्या तत्वास अनुसरून जेव्हां ' क्षय ' हा शब्द वापरण्यांत येतो अथवा क्षयरोग झाल्याचें निश्चित ठरविण्यांत येतें तेव्हां वरील दोन पैकीं कोणती तरी स्थिति शरिरांत असलेली दिसून येते. व म्हणून पोषणाचें अभावीं किंवा पोषण सात्म्य न झाल्यामुळें शरिराचा क्रमशः नाश घडवून आणणारा रोग म्हणजेच ' क्षय ' होय.

क्षयज कास

रसः स्रोतःसु रुद्धेषु स्वस्थानस्थो विदह्यते
स उर्ध्वं कासवेगेन बहुरूपः प्रवर्तते ॥ च. चि. ८

पचन संस्थेंत अन्नाचा उत्पन्न होणारा रस क्रमशः त्या त्या स्रोतसांतून वाहात जाऊन त्याचें रक्त, मांस इ. पुढील धातूंत रूपांतर होण्याचा नित्यक्रम त्या त्या स्रोतसांत निरनिराळ्या कारणांनीं विकृति वा अवरोध उत्पन्न होऊन जेव्हां खंडित होतो तेव्हां त्या अन्नरसास विदाहावस्था प्राप्त होते. शरीरामध्यें आमाशय हें रसाचें स्थान आहे. आणि तेंच कफाचेंही स्थान आहे. अर्थातच स्रोतसांत अवरोध उत्पन्न होऊन हा अडवला गेलेला रस पुढें मार्ग न मिळाल्यामुळें आमाशयाच्या ऊर्ध्व भागीं म्हणजेच कंठद्वारां बाहेर टाकण्याची नैसर्गिक प्रवृत्ति शरिरांत निर्माण होते. त्या वेळीं त्या दूषित रसाला कंठद्वारा बाहेर टाकण्याचें कार्य प्राण व उदान हे त्या ठिकाणचे दोन वायु करीत असतात. ह्या विकृत रसाला बाहेर टाकण्याचा प्रयत्न जेव्हां हे दोन वायु कंठद्वारां करीत असतात तेव्हां विशिष्ट प्रकारचा आवाज, फुटलेल्या काशाच्या भांड्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(संभिन्नकांस्यस्वनतुल्यघोषः)
होऊन चिकट, बुळबुळीत, फेसाळ, घट्ट, थंड, किंचित् दुर्गंधीयुक्त असें स्वरूप त्या रसाला प्राप्त होऊन तो बाहेर पडतो. त्याला आपण कफ म्हणतों.

ह्या घटनेत रसादि धातूंच्यापुढें रक्त मांस इ. धातू निर्माण होणें थांबून क्रमानें पुढील धातूंचा क्षय घडून येत असतो आद्य रस धातू दूषित होऊन वर सांगितल्याप्रमाणें कफाचें रूप धारण करून खोकल्याचे वेगानिशीं बाहेर येतो म्हणून याला क्षयज कास म्हणतां येईल.

क्षयज कासाचें स्वरूप

पिच्छिलं बहलं विस्रं हरितं श्वेत पीतकम्
कासमानो रसं यक्ष्मी निष्ठीवति कफानुगम् ॥
च. चि.

म्हणजे बुळबुळीत, पुष्कळ, दुर्गंधी, हिरव्या, पिवळ्या किंवा पांढऱ्या वर्णाचें ह्या क्षयज कासांतील कफाचें स्वरूप असते क्षय हा विकार स्रोतसांच्या अवरोधामुळें होतो. त्यांत प्रथम वात प्रकोप व त्याबरोबर पित्त दुष्टि होत असते. म्हणून हा विकार त्रिदोषात्मक असतो असें म्हणावे लागेल.

'एक एवमतः शोषः संनिपातत्मकोह्यतः' (सुश्रुत) अर्थातच् खोकल्यातून पडणाऱ्या कफांतसुद्धां ह्या तिन्ही दोषांची लक्षणें आढळल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. कफांत फेसाळपणा, त्याचा तांबूस वर्ण, तो थांडा थोडा येणें आणि वारंवार उबळी येऊन तो थोडा थोडा बाहेर पडणें हीं लक्षणें वाताचें कफांत दुर्गंधी, तो बाहेर पडताना जळजळीतपणा, त्याचा हिरवट पिवळा वर्ण ही लक्षणें त्यांतील पित्ताचें; अगदीं तार तुटणारा, बुळबुळीत, पुष्कळ व पांढऱ्या रंगाचा कफ पडणें ही लक्षणें त्यांतील कफ दोषाचें अस्तित्व दर्शवितात. कफ दोषामुळें पडणारा कफ हा शब्दप्रयोग वाचला म्हणजे आयुर्वेदशास्त्राची उभारणी ज्या वात, पित्त, कफ ह्या तीन दोषांवर आहे त्यांतील कफ दोष हा घशांतून पडणाऱ्या कफाचा कारक असला तरी तत्वतः त्या पासून तो भिन्न आहे हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. त्रिदोषकल्पनेचा उपहास करणारांना अगदीं तात्विक असें हें छोटेसें उदाहरण वाचून आपली समजूत निराधार असल्याचे पटेल असें वाटतें. वात व पित्त ह्या दोन दोषांबद्दलहि असेंच समाधान करणें शक्य आहे पण तो लेखाचा विषय नव्हे. अस्तु.

साध्यासाध्यता.

शुष्यन् विनिष्ठीवति दुर्बलस्तु ।
प्रक्षीणमांसो रुधिरं सपूयं ॥
स सर्वलिंगं भृशदुश्चिकित्स्यं ।
चिकित्सितज्ञाः क्षयजं वदंति ॥
सु उ. ५२ ॥

यद्यपि वर सांगितल्याप्रमाणें 'क्षय' रोग त्रिदोषात्मक आहे असें म्हटलें तरी पण ते तीनही दोष जोंपर्यंत आपल्या सर्व लक्षणांनीं वाढलेले नाहींत तों पर्यंतच उपचारांची टाकी त्या रोगावर लागू होण्याची शक्यता असते. सुश्रुताचार्य म्हणतात "दिवसें दिवस जो रोगी सुकत चालला आहे म्हणजे ज्याचें शरिरांतील मेद, मांस वाळलें व त्यामुळें देह ओळखूं न येण्याइतपत विद्रूप दिसूं लागला, व जो अत्यंत बलहीन झाला आहे अशा क्षयी रोग्याचा खोकला जेव्हां रक्त पू मिश्रित कफानें युक्त होईल तेव्हां तो क्षयज कास 'भृश दुश्चिकित्स्य' म्हणजे उपचार करण्यास अत्यंत कठीण म्हणजेच कष्टसाध्य अवस्थेच्याहि पलीकडे गेला आहे असें समजावें."

वार्धक्य म्हणजे म्हातारपण हाहि एक प्रकारचा 'क्षय' च आहे. कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें निसर्गधर्मास अनुसरून उत्पन्न झालेल्या, असलेल्या, वाढलेल्या व अवस्थांतर होत गेलेल्या देहाची अशी एक अवस्था येऊन पोंचतेच कीं त्या अवस्थेंत शरीरघटक योग्य पोषण मिळत राहूनहि पुष्ट न होतां धातुवृद्धीऐवजीं मलांचीच वृद्धि अधिक होत जाऊन शेवटीं तें शरीर नाश पावतें. अशा त्या अवस्थेलाच वृद्धापकालांतला क्षय किंवा जराशोष म्हणतात. व त्या रोग्याचे शरीर घटक क्षीण होतात तसतसे त्याचें शरीर तर कृश होतेंच पण वीर्य बुद्धि व इंद्रियें यांतील बलहि नष्ट होतें. अशा अवस्थेंत कफरूपी मलहि अधिक उत्पन्न होत राहातो तो अडवला जात नाहीं. तथापि तो कफ बाहेर पडतांना होणाऱ्या यातना वांचवण्यासाठीं त्या वृद्धाला मरेतों खाद्य पेय सांभाळून औषध घ्यावें लागतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा स्थितीला त्या रोगाची 'याप्य' स्थिति म्हटली आहे. 'स्थविराणां जराकासः सर्वो याप्यः प्रकीर्तितः' हे सूत्र एवढ्याच साठीं कायद्याच्या कलमासारखें सांगून शास्त्रकार मोकळे झाले आहेत.

"याप्यो वा बलिनां तद्वत् क्षतजोभिनवो तु तौ।
सिध्येतामपि सानाथ्यात्" ॥अ. हृ. नि. ३॥

हा क्षयज कास सुद्धां वर सांगितल्याप्रमाणें कृच्छ्रसाध्य असला तरी जर तो रोगी बलक्षीण झाला नसेल तर आणि त्याचप्रमाणें रोगी बरा होण्यासाठी तो स्वतः धनवान, वैद्याचें ऐकून वागणारा, स्वतः सारासार विचार करणारा, व धैर्यवान् असेल, त्याला उपचार करणारा वैद्य नामांकित गुरूजवळ अध्ययन केलेला, आपल्या कामांत तत्पर, अनुभवी व सदाचारशीलसंपन्न असेल, तसेंच त्या वैद्याजवळ औषधांचा भरपूर साठा, औषध एक परंतु त्याचेच निरनिराळे प्रकार करून देण्याची पात्रता, औषधांची केलेली निवड हटकून त्या रोगावर गुण देणारी अशी अचूक असेल, आणि त्या रोग्याच्या शुश्रुषेला रोग्यावर नितांत प्रेम करणारी शील–सदाचार–संपन्न, कर्तव्यतत्पर, व बुद्धिमान पुरुष वा स्त्री व्यक्ति असली तरच त्याचा रोग याप्य म्हणजे आमरण पथ्य पाळून व औषध घेऊन आटोक्यांत ठेवतां येतो.

असाध्य लक्षणें.

लुंच्येते इव पार्श्वेच हृदयं पततीवच।
अकस्मादूष्णशीतेच्छा बह्वाशित्वं बलक्षयः।
स्निग्धप्रसन्नवक्त्रत्वं श्रीमद्शननेत्रता।
ततोऽस्य क्षयरूपाणि सर्वण्याविर्भवन्तिच
अ. ६ नि. ३॥

सांधे जणूं काय निखळताहेत, हृदयहि स्थानभ्रष्ट झालेंसें वाटतें, कारण नसतां ऊष्णतेची पीडा असूनहि शीत पदार्थांबद्दल वा थंड हवेबद्दल तिटकारा वाटतो तर कधीं याच्या उलटहि स्थिति होते, खातों खूप पण शक्ति वाढत नाहीं, तोंडावर तेलकटपणा व तजेलाहि दिसतो, दांत, व डोळे चमकदार दिसूं लागतात. हीं सर्व लक्षणें रोग असाध्यावस्थेला पोंचल्याचीं आहेत. व या शिवाय क्षयाचीं सर्व लक्षणें म्हणजे स्वरभेद, शूल, दाह, ज्वर, अतिसार, शिरःशूल, अरुचि इ. या बरोबरच असलीं म्हणजे मग रोगाची असाध्यावस्था निश्चित समजण्यास हरकत नाहीं.

उपचार

रोगाच्या उत्पत्तीस घडणारीं कारणें दूर करणें हीच त्या त्या रोगाची खरी चिकित्सा होय. या दृष्टीनें स्रोतसांचा अवरोध होण्याचे मुळाशीं असलेलीं कारणें: मलमूत्रादि वेगांचा अवरोध करणें, वेळीं अवेळीं अनियमित प्रमाणांत वा न मानवणारें अन्न भक्षण करणें, आपल्या शक्तीस न झेपतील अशा गोष्टींत शरीरशक्तीचा व्यय करणें दूर करून काम, क्रोध, शोकादि विकारांना बळी न पडणें हेच मुख्य उपचार आहेत. हें सर्व तंत्र आरंभींच सांभाळलें तर 'क्षय' नंतर खोकला वाढण्याचें कारणच नाहीं. परंतु तें जमत नाहीं. म्हणून सर्व व्यवस्था बिघडते व मग ती सुरळीत करण्यासाठीं उपचार धुंडावे लागतात.

क्षयज कासांत पचन अव्यवस्थित, शरिराचे घटक धातु क्षीण झालेले व सर्व दोषांच्या प्रकोपामुळें शरिरांतील देहधारणक्षम प्रत्येक संस्था उध्वस्त झालेली असते; अशा स्थितींत तात्विक चिकित्सा सांगायची तर पाचक, धातुवर्धक व शामक उपाय हीच सांगतां येईल.

चरकाचार्यांचे ४ मुख्य योग.

१. खारीक, पिंपळी, मनुका, हिरडे, काकडशिंगी, धमासा.
२. त्रिफळा, पिंपळी, नागरमोथे, शिंगाडे, गूळ साखर.
३. कोरफड, कचोरा, पुष्करमूळ, तूळस, साखर, गूळ.
४. सुंठ, चित्रक साळीच्या लाह्या, पिंपळी, आवळकंठी, गूळ.

ह्या ४ ही योगांत पाचक, स्रोतः शुद्धिकर, कफनाशक, सारक अशीं औषधें आहेत. पहिल्या २ योगांत पाचक, सारक, कफनाशक द्रव्यें आहेत तर दुसऱ्यांत पाचन, स्रोतः शुद्धिकर व कफनाशक द्रव्यांचा विशेष समावेश आहेत त्यांचा यथायोग्य उपयोग केल्यानें क्षयकास नष्ट होईल.

५. सीतोपलादी चूर्ण हा योग सर्वांच्या परिचयाचा आहे. हे सर्व योग तूप आणि मधांतून घेण्याची आज्ञा आचार्यांची आहे यांतहि वातनाशक स्नेह व कफनाशक आणि स्रोतः शुद्धि करून व्रणरोपण कार्यानें श्वसनेंद्रियांचा दाह शमन करणें असा हेतु साधला आहे.

६. रोगी बलवान आहे व कफ स्राव फार होतो असें असेल तर त्याला गेळफळ दुधांतून किंवा मधांतून द्यावे म्हणजे वांत्या होतील व कफ पडून जाऊन यातना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमी होतील. अथवा वांती करणाऱ्या औषधांनी सिद्ध केलेली तांदळाची कण्हेरी तूप घालून पाजावी.

योग्य प्रकारें वमन होऊन शुद्धि झाल्यानंतर हलके पाचक औषधयुक्त अन्न द्यावें. कफनाशक आसवारिष्टें द्यावी. जांगल प्राण्याचें मांस सळईवर टोंचून विस्तवावर भाजून द्यावें. हृदयाला हितकर, पचण्यास हलकें व वात नाशक असें खाणें पिणें असावें. जठराग्नीची क्रिया मंद झाली असते अशा स्थितीत भूक लागणें कठीण परंतु तरीहि अन्नसेवन केलें किंवा क्वचित् केलें नसले तरीहि श्लेष्मयुक्त अतिसारहि अशा रोग्यास सुरू होतो, तोंड बेचव होऊन त्यास अन्नाची इच्छा होत नाहीं. अशा वेळीं अग्निदीपक आणि अतिसारनाशक व तोंड स्वच्छ करून अरुचि नाशक अशीं औषधें १ सुंठ, इंद्रजव तांदळाचें धुवणींत पाजणें २ पहाडमूळ, बेलफळ, ओवा ताकाशीं देणें ३ जांभूळ व आंब्याची आठळी, वेलफळमगज, कवठाची गर सुंठ तांदळाचे पेजे बरोबर पिण्यास देणें.

७. या शिवाय तालीसादिचूर्ण तूप मधांतून द्यावें. तें दीपक, पाचक रोचक व कास नाशक आहे.

८. हृदय हा अवयव या विकारांत अशक्त होतो हें वर आलेंच आहे अशा स्थितींत अर्जुन वृक्षाच्या त्वचेचें वस्त्रगाळचूर्ण अडुळसा रसाच्या शक्य तितक्या अधिक भावना देऊन तूप मध आणि खडिसाखरेंतून द्यावें.

९. खोकल्यानें संत्रस्त झालेला, सारखे नाक वाहात असलेला आणि आवाज जड झालेला रोगी असतां त्याला शिंका खूप येतात व चांगला वाईट वास कळेनासा होतो. अशा स्थितींत नाकाद्वारें त्याच्या श्वास मार्गाचें शोधन होणें इष्ट असतें म्हणून त्यास – मनशीळ, हरताळ, मिरे, जटामांसी, नागरमोथे व हिंगणबेट या वस्तूंचा धूर नाकानें द्यावा आणि त्या वस्तूंची चिलीम किंवा विडी ओढण्यास देऊन धूर गिळूं द्यावा.

१०. लवंगादि चूर्ण– लवंग, जायफळ, पिंपळी, जायपत्री, नागकेशर, सुंठ, वाळा, कापूर, मिरे व या सर्वांचे समभाग साखर मिश्र करून हें चूर्ण द्यावें.

११. सिद्ध औषधें–वासावलेह, अगस्ति हरीतकी अवलेह

१२. रसायनें व भस्में– सुवर्णभस्म, अभ्रकभस्म मृगशृंग, रससिंदूर, समीरपन्नग, पूर्णचंद्रोदय, यांचाहि वैद्यांचे विचारें उपयोग करावा. भस्में व रसायनें हीं वापरण्यास सुटसुटीत प्रमाण अल्प व अल्पावधींत गुणकारी असतात. तरीपण तीं तीव्र असल्यामुळें त्यांचा उपयोग फार जपून व तज्ज्ञ वैद्यांच्या साह्यानेंच करणें बरें. अवस्थापरत्वें हीं औषधें कशीं वापरावयाचीं हें लिहिण्यांत लेख विस्तारच अधिक होण्याची भीति! तीं औषधें म्हणजे एक एक विवेचनाचा स्वतंत्र विषयच होत. म्हणून फक्त येथें त्यांचा केवळ नामनिर्देश करून वाढलेला हा लेख संपवूं.

वसंत मिश्रण

सुवर्णयुक्त टॉनिक

४० गोळ्या किंमत ४ रुपये

पोस्टानें मागवा.

नित्योपयोगीं अर्कशाला औषधें

एग्युमिक्श्चर

कोणत्याहि ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, एग्यूमिक्श्चरचा उपयाग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें यणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य धामणकर यांचा अभ्यस्त विषय आयुर्वेदीय औषधीकरण हा होय. ह्या विषयाचा आराखडा त्यांनीं प्रथम आयुर्वेदीय औषधी संशोधन नामक पुस्तिकेंत मांडला. तदनंतर एक एक विधी विस्तारानें लिहून तो आयुर्मीमांसा, आयुर्वेदपत्रिका आणि आरोग्यमंदिरांत क्रमशः प्रकाशित केला. खरोखरी असें वाङमय ग्रंथरूपानें बाहेर येणें अत्यंत आवश्यक आहे. कारण अशा तऱ्हेचें पुस्तक मराठी भाषेंत तरी पहिल्यानेंच लिहिलें गेले आहे आणि आजच्या आयुर्वेदीय जगतास त्याची अत्यंत मदतही होणार आहे. म्हणून वैद्य धामणकर यांना आमची अशी विनंति आहे कीं हें पुस्तक शक्य तितक्या लौकर प्रसिद्ध करण्याची कोशीस त्यांनी करावी.

आतां वैद्य धामणकर यांनीं 'शोधनविधी' ही लेखमाला लिहावयास घेतली आहे. ह्यांत ते दर एक शोध्य पदार्थाच्या शुद्धीचे अनेक प्रकार देऊन त्यांचें वैशिष्ट्य शक्य तोंवर विशद करण्याचा प्रयत्न करणार आहेत. पूर्वीप्रमाणें हीहि लेखमाला आमचे वाचक-वृन्दास उपयुक्त ठरेल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

—संपादक.

औषधी द्रव्याची शुद्धि अर्थात् शोधनविधि

: लेखक :

वै. पु. वि. धामणकर,

धूतपापेश्वर-पनवेल.

आयुर्वेदीय औषधीकरणांत शोधनविधीला पहिल्या प्रकारचा मान मिळतो. कारण सर्वच पदार्थ नैसर्गिक स्वरूपांत आहार्य नसतात. उदा. फळें खातांना त्यामधील बी अथवा त्यावरील साल काढावी लागते. पालेभाज्या निवडाव्या लागतात, धुवाव्या लागतात; इतकेंच नव्हे तर कांहीं भाज्या शिजवून त्यांचें पहिलें पाणी काढून टाकावें लागतें. अशाच कांहीं गोष्टी औषधी पदार्थांबाबतहि करणें जरूर असतें.

स्वस्थ माणसास सोसणारा पदार्थ रुग्णास तसाच सानवेल असें नाहीं. स्वस्थ माणसाची प्रतिकारशक्ति जोरदार असते, अग्नि बलवान् असतो. त्यामुळें द्रव्यांची पारख, विभागणी, पाठवणी इ. गोष्टी योग्य मानांत व कालांत होतात. परंतु रुग्णाची पचनक्रिया-बिघडलेली असते. स्वाभाविकतया त्याची प्रतिकारशक्तीहि कमकुवत बनलेली असते. तेव्हां रुग्णास द्यावयाचा पदार्थ शरिरांत सहजीं पचेल, लवकर शोषला जाईल, अपेक्षित कार्य खात्रीनें करील व शरीरयंत्र सुधारण्यास साहाय्य करील, असाच तयार करावा लागतो. ह्यालाच शोधन असें म्हणतात. शोधन हा स्वतंत्र विधि आहे. त्यालाच कोणी संस्कारहि म्हणतात.

शोधनाची व्याख्या.

द्रव्यांतील अनवश्यक भाग दूर करणें, त्यामधील दोषांचे नियमन किंवा निर्मूलन करणें इतर गुणांचा विकास व त्यांचें वर्धन करणें, द्रव्याची कार्मुकता अपेक्षित स्वरुपाची घडविणें ह्या क्रियासमुच्चयास शोधन म्हणतात.

शोधन शब्दाचा आयुर्वेदीय अर्थ एक दोन शब्दांत व्यक्त करणें शक्य झालें नाहीं. त्याकरितां शोधन संज्ञेची स्वतंत्र व्याख्या करावी लागली. इंग्रजी भाषेबाबतसुद्धां हाच प्रकार आहे. शोधन शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां,

To Cleanse	To Polish
To Clarify	To Purify
To Dry	To Sift

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

To Distill	To Sort
To Dehydrate	To Strain
To Filter	To Unhusk
To Peel	To Wash

अशा विविध शब्दांची योजना करावी लागते. तरीसुद्धां सर्व अर्थ सुस्पष्ट होत नाहीं. त्याकरितां वरील व्याख्या समजावून घेणें हा एकच एक उपाय होय.

शोधनप्रकार व हेतु

अभ्यंतरिक व बाह्य असे शोधनाचे दोन प्रमुख प्रकार आहेत. ह्यांचेहि पुनः कायिक व रासायनिक असे दोन दोन पोटभेद पडतात. ह्या प्रकारांचे बुडाशीं अनेक हेतु असतात.

उदाहरणार्थः–

निर्भेळ	करणें	पिंपळी
निर्मळ	,,	बिब्बा
निर्जल	,,	तुरटी
निर्मद	,,	भांग
निस्तुष	,,	धोत्रा बीं
निस्नेह	,,	टंकण
निर्विष	,,	गुंज
विरल	,,	गेरू
भंगुर	,,	हिरा
शीघ्रपाकी	,,	अफू
तीव्रत्व	कमी करणें	हिंग
उग्रत्व	कमी करणें	लसूण
विषत्व	,,	कण्हेर
ताक्ष्णत्व	,,	चित्रक
चिक्कणता	,,	गुग्गुळ
चिवटपणा	,,	अभ्रक
अवसादकत्व	,,	वचनाग
पचन	सुलभ करणें	एरंड बीं
शोषण	,,	ऊद
संयोग	,,	कापूर

शोधनविधि प्रकार

१	त्वङ्निष्कासन	२	धावन
३	निमज्जन	४	निर्वापण
५	पाचन	६	पातन (उर्ध्व)
७	पातन अधः)	८	भर्जन
९	भावन	१०	विवेचन
११	शोषण	१२	सिंचन
१३	स्थापन	१४	स्वेदन

१) त्वङ्निष्कासनः–

दालचिनी, आलें, शतावरी ह्या पदार्थांच्या साली काढाव्या लागतात. त्याहि ही द्रव्यें ओलीं असतात तेव्हांच काढणें सोयीचें जातें. ह्या कामीं तीक्ष्ण शस्त्रकौशल्य, तारतम्य, आणि दक्षता ह्यांची फार जरूरी लागते अंतरसालीं काढतांना निराळी संपत्ति लागते.

२) धावनः–

परिमार्जन, प्रक्षालन हे त्याचे पर्याय शब्द होत. १ तीळ, मोहरी सारखे पदार्थ पाण्यांत टाकून त्यांतील फोलभाग, केरकचरा, माती दूर करतात. हा कायिक व बाह्य प्रकार. २ हिंग, अफू इ. पदार्थ पाण्यांत विरळून पाण्यांत विरलेला भाग तेवढाच अलग करणें व तो घेणें हा अंतरिक प्रकार. ३ हरताळ, मनशीळ इ. द्रव्यें घुण्यानें भागत नाहीं. तीं पाण्यांत विरघळतहि नाहींत. तीं द्रवांत कांहीं काळ उकळावींच लागतात. हा एक निराळाच प्रकार झाला. धावन विधींत ह्या तिन्हींचाहि अंतर्भाव होतो.

३) निमज्जनः–

ह्या विधींत काल, ऊष्णता आणि शोधन द्रव्य ह्यांचे परिणामानें शोध्य द्रव्यांत बरेचसें रासायनिक परिभवन घडून येतें. ऊष्णतामान कमी पडले तर पदार्थ सडतो, अधिक झालें तर तो उबतो. ह्या दोन्ही अवस्था अनिष्ट. तेव्हां ह्या न घडूं देण्याचो दक्षता घ्यावी. त्याकरितां पात्र पसरट घ्यावें. ऊष्ण ऋतूची निवड करावी. आणि शोध्य, शोधन द्रव्य एकत्र करून उघड्यावर सूक्ष्म वस्त्राच्छादित असे ठेवावे. संध्याकाळीं द्रव काढून द्रव्य कापडावर पसरून ठेवावें. सकाळीं नवा द्रव पात्रांत घालून त्यांत तें पुनः घालावें. पदार्थ बुडलेला राहील इतका द्रव योजावा.

वर्ज्यः– पावसाळा, दमट, कोंदट हवा, अभ्राच्छादित आकाश, दुर्दिन.

४) निर्वापणः–

आवापन, ढालन, निर्वाणपण, प्रवापण, वापण-क्षेपण, निक्षेपण, प्रक्षेपण, विनिक्षेपण असे निरनिराळे पण एकाच अर्थाचे शब्द निर्वापणकार्याकरितां योजलेले आढळतात. धातु, उपधातु, मिश्रधातु, रत्न, उपरत्न, इ. पदार्थांबाबत हा विधी करावा लागतो. पातळ होणारे पदार्थ पातळ करून मोठ्या कुशलतेनें शोधनद्रवांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओतावे लागतात. अतिमात्र ऊष्णतेवर पातळ होणारे पदार्थ अग्नीवर लाल करून शोधन द्रवांत बुझवितात.

जसद, नाग, वंग ह्याबाबत फार दक्षता घ्यावी लागते ह्या धातूंना अग्नि थोडा लागतो. पण तो सारखा आणि झटकन बसला तरच काम छान साधतें. नाहींतर पृष्ठभागीं साय जमते, धातु जळतो व फार नुकसान पोहोंचतें ह्याकरितां हे पदार्थ घमेल्यांत ऊन करण्यापेक्षां पळींत घालून पळी भट्टींत धरणें सोयीचें जातें.

लोहाचे पत्रेसुद्धां घमेल्यांत तापविण्यापेक्षां साक्षात् अग्नींत घालून फुंकलें तर फायदा होतो. अभ्रक मात्र घमेल्यांतच तापविणें चांगलें

शाधनविधींत ह्या कामीं धोका फार असतो. रस-रशींत लाल झालेला द्रव त्याविरुद्ध तपमानाचे द्रवांत ओततांना संघर्ष फार मोठा होतो. आवाजानें तर मनुष्य दचकतो. हातांतलें पात्र गळून पडतें. द्रव वर उडतो, अंगावर येतो. कांहीं द्रव द्रव्यांसह यंत्रसुद्धां वर उडतें. अशा वेळीं अपाय, अपघात होण्याचा संभव असतो.

५) पाचनः-

पाण्याच्या उष्णतेवर अगर पाण्याचे संसर्गानें शुद्ध होणाऱ्या पदार्थांकरितां हा विधि आहे.

मनशीळेसारखे पदार्थ वस्त्रांत बांधून पाण्यांत टांगतात तर मध-मेणासारखे जलांत विरणारे पदार्थ भांड्यांत अधांतरीं ठेवतात.

६) पातनः- (उर्ध्व)

डमरु यंत्रात पदार्थ घालून खालीं अग्नि देऊन पदार्थ वर उडवितात. ह्या योजनेमुळें उष्णता संसर्गानें हवेंत उडणाऱ्या पदार्थांची गति नियंत्रित होते. पदार्थ स्वच्छ होऊन हातीं लागतो. उ. कापूर, पारा, मुर्दाडशिंग इ.

७) पातनः- (अधः)

डमरुयंत्र जमिनींत पुरून खालीं पाणी (गारवा) व वर अग्नि (उष्णता) द्यायची. पदार्थ वरचे मडक्याचे बुडास आंतून लपेटलेला असतो. तो तापला कीं, जरी हलका झाला तरी शीतता प्रीतीमुळें तो थंड भागाकडे धांव घेतो. उदाहरणार्थ पारा.

८) भर्जनः-

थोड्या उष्णतेनें पदार्थ सुट्वंग, निस्नेह, अल्पस्नेह करणें. ह्या कामीं ह्या विधीचा उपयोग होतो. हिंगां-तला स्नेह कमी होतो, तर तुरटीतलें पाणी अजिबात उडतें. कांहीं वेळेस स्नेहाचे आवरण देण्याकरितांहि हा विधि योजतात. उदा गेरु. बुंद, तव्यावर पदार्थ परतून भाजणें, असा ह्याचा थोडक्यांत अर्थ आहे.

९) भावनः-

भाव्यद्रव्य भावनाद्रवांत बुडवून ठेवून सुकविणें ह्यांचें नांव भावनविधि. उदा. कापूर दुधांत खलून सावलींत वाळविला कीं तो इतर पदार्थांशी सहजीं मिश्र होतो. त्यांतल्या तीक्ष्णत्वानें घसा सोलत नाहीं. व त्याचा डयशील धर्महि पुष्कळच कमी होतो.

१०) विवेचनः-

निवडणें, पाखडणें, चोळणें, वेचणें इ. क्रिया ह्या नांवाखालीं येतात. जिरें, शहाजिरें, मोहरी, पिंपळी इ. बाबत हा विधि करणें आवश्यक ठरतें.

११) शोधणः-

आघाडा बीं, शेवगा बीं, कपाशीचें बीं, जरी ओलें मिळालें तरी तें वाळल्याशिवाय सेवनार्ह होत नाहीं. अशाकरितां पदार्थ सुकविणें एवढीच शुद्धि सांगितली आहे.

१२) सिंचनः-

पदार्थ पातळ अथवा लाल करून द्रवांत सोडणें अपेक्षित नसतें, किंवा शक्यहि नसतें अशा वेळीं तो पदार्थ घमेल्यांत उत्तम लाल करतात व त्याला ताव आणतात. मग-त्यावर सूक्ष्म छिद्रयुक्त झारीनें शोधनद्रव शिंपडतात. पदार्थ खालीवर करतात. लाल भागावर द्रव शिंपडायचा असतो. तसा भाग दिसेनासा होईपर्यंत आलटून, पालटून सिंचन सारखें चालूं असतें. असें अनेकवार करतात.

हा विधी आचरतांना घाई केल्यास औषध उसळतें, तो खकाणा घशांत जातो व गलरोग होतो. ह्याकरितां घुराळा उडणार नाही आणि कामहि साधेल असें कौशल्य ह्या कामीं उपयोगांत आणावें लागतें.

१३) स्थापनः-

जेपाळ, कुचला इ. पदार्थ विशिष्ट पदार्थांत ठराविक आर्द्रतेंत व स्थिर उष्णतेंत कांहीं काल ठेवल्यानें त्यावरील कठीण कवच सुटें होतें. शुद्धींतलाच हा एक भाग. पण त्याकरितां स्वतंत्र विधि सांगावा लागला. निमज्जनाप्रमाणेंच ह्या विधीलाहि वर्षाऋतु, दमटसर कोंदट हवा, ओली जागा, इ. गोष्टींचें वावडें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४) स्वेदनः–

पाण्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संसर्ग नको असतो, पण द्रवाचें, वाफेचें कार्य म्हणजेच बाष्पस्वेद पाहिजे असतो, अशा प्रकाराकरितां हा विधि आहे. आणि तो हेतु दोलायंत्रानें छान साधतो. उदा. गुंज.

शोधनाचे हेतु आणि ते साधण्याचे विधि यासंबंधींची माहिती आतांपावेतों आपण घेतली. ही माहिती ज्या पदार्थांचे निमित्तानें घ्यावी लागली ते पदार्थ तीन प्रकारचे आहेत. प्रत्येक वर्गांत विविध पदार्थ आहेत. तिन्ही मिळून पदार्थांची वटसंख्या १२० होते. ह्या तीन प्रकारांचेहि पुनः पोटभेद पाडून ते येथें माहितीकरितां देत आहे.

खनिजें.

धातु–: सोनें, चांदी, ताम्र, वंग, लोह, जस्त, पारा इत्यादि.

उपधातुः–मोरचूद, गेरु, कासीस, शेंदूर,मुर्दाडशिंग इ.

मिश्रधातुः– अभ्रक, हिंगूळ, कांसें, पितळ, माक्षिक मनशीळ, हरताळ.

रत्नादिः– हिरा, वैक्रांत, नीळ, राजावर्त, माणिक, गोमेद, पुष्पराग, सूर्यकांत, चंद्रकांत.

इतर खनिजें:– कलखापरी, गंधक, टंकण, तुरटी, जवखार, सज्जीखार, नवक्षार, सूर्यक्षार, मंडूर, कांत, विमल, सोमल, स्फटिक

उद्भिज्ज पदार्थ

१) कंदवर्गः– कळलावी, बचनाग, बटाटा, भुईकोहळा, लसूण, वांकेरी, शतावरी, सूरण.

२) कांडवर्गः– स्नूही

३) क्षीरवर्गः– अफू, ऊद, डिकेमाली, निवडुंग, बोळ, शिलाजतु, शिलारस, हिंग

४) डिकः– गुग्गुळ

५) पानवर्गः– भांग

६) फलवर्ग :– सुपारी, पिंपळी, बेल, बिब्बा मिरें

७) फलरजः– कपिला

८) फूलवर्गः– गांजा

९) बीजवर्गः– आघाडा, इसबगोल, इंद्रवारुणी एरंड कवच बीं, कावळी, कापूस, कुचला कोषातकी, कुटुंबिनी, गुंज, जेपाळ, जिरें, तिक्ता, तीळ, देवदाली दंती, धोतरा, निंब, पळस, पटोल, बाहवा बुंद, मोहरी महाकाल, लिंबू, वरघारा, शेवगा, सागरगोटा,

१०) मूळवर्गः– कण्हेर, चित्रक, रुई वरघारा.

११) सारवर्गः– कंकुष्ठ, कापूर, टंकण, मध, वंशलोचन.

प्राणिज पदार्थ.

अंबर, कस्तुरी, कपर्दिक, गोरोचन, नखला, प्रवाळ, मृगशृङ्ग, मोतीं, शिंप, शिलाजतु, शंख, समुद्रफेन.

एकच पदार्थ अनेक प्रकारानें शुद्ध करण्यास सांगितला आहे. त्या सर्वांचें संकलन करून प्रत्येक शुद्धिप्रकार काय हेतूनें सांगितला आहे ? शोधन संस्कारामुळें त्यांत कायिक, रासायनिकपैकीं कोणता फरक होतो ? आणि ह्या फरकांमुळें पदार्थाचे मूळ गुण व कर्म ह्यांत अंतर किती पडतें ? त्याचें स्वरूप काय ? हें जर सांगतां आलें तर कोणता शुद्धिप्रकार कोणत्या औषधी योगांत वा रोगाधिकारांत इष्ट हें आपण निश्चित ठरवूं शकूं. उदाहरणार्थ– जेपाळ, ह्यांत तैल व प्रथिन असतें, कांहींत राळहि सांपडतें.

शुद्धि प्रकारः– १) कागदी लिंबाचे फळांत ठेवणें. २) मडक्यावर थापून तैल कमी करणें व तदनंतर लिंबाचे रसांत खलून पुनः मडक्यावर थापून उन्हांत ठेवणें. ३) पंचगव्य, अम्लरस, क्षारोदक, कुमारिद्रव-स्वेदन.जपाळ शुद्धीचे हे तीन प्रकार ज्ञात आहेत. ह्यांत विधिवैचित्र्य तर आहेच, पण द्रव्यभेदहि आहे. २ ऱ्या प्रकारांत तैल कमी होतें. तें किती कमी व्हावें, ह्याच पद्धतीनें व्हावें काय ? अन्य पद्धति अनुसरली तर तिचे परिणाम काय होतील ? तसेंच ह्या विधींत जेपाळांतील प्राथिनें अक्षत राहतात, तैल कमी होतें आणि जेपाळाचा प्रतिकारक पदार्थ लिंबू, त्याची जोड द्यावी लागते. तिसऱ्या प्रकारांत तैल निर्वेध रहातें. प्रथिनें थिजतात. तेव्हां तिन्ही शुद्धींत विशेष काय हें शोधून काढलें पाहिजे. हें झालें म्हणजे विरेचन, आमपाचन, वमन इ. योगांत कोणकोणता जेपाळ घ्यावा ही योजना अचुक साधेल.

ह्याकरितां संशोधन व्हायला पाहिजे. ह्या कार्याचे दोन भाग पडतात. १) विज्ञान शालेय २) रुग्णालयीन पहिला भाग त्यांतल्या त्यांत सोपा, एकमार्गी व पुनः प्राथमिक स्वरुपाचा होय. तो निर्णित झाला तर दर वेळीं निश्चित स्वरुपाचा पदार्थ चिकित्सकास लाभूं शकेल, व त्यांचें पुढील काम सोपें होईल, असा आम्हांस विश्वास वाटत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुद्धपथ कामला

लक्षणें व अनुभवी चिकित्सा.

: लेखक :
वै. गो. वि. जोशी
लोणंद.

कामला ह्या शब्दानें डोळे त्वचा मूत्र ही ज्या विकारांत पिवळी पडतात असा विकार असा बोध होतो. आयुर्वेदीय वाङमयामध्यें कामलेचे वर्णन व चिकित्सा ही पांडुरोग चिकित्सेतच वर्णन केलेली आहे.

उदा :–

यः पांडुरोगी सेवेत पित्तलं तस्य कामलाम् ।
कोष्ठशाखाश्रयं पित्तं दग्ध्वासृङमांसमावहेत् ॥ १५
हारिद्र नेत्रमूत्रत्वक् नख वक्त्र शकृत् तथा ॥ १६
वा. नि. १३

ही एक संप्राप्ति आहे व दुसरी संप्राप्ति

भवेत्पित्तोल्वणस्याऽसौ पांडुरोगादृतेऽपिच । १८

ह्या दोन श्लोकावरून पांडुरोगांत पित्तकारक पदार्थ जास्त खाल्यामुळें उत्पन्न होणारी कामला व पांडुरोग नसतांनाही पित्तकारक पदार्थ जास्त खाल्ल्यामुळें होणारी कामला. अशा दोन कामला, निदानाध्यायांत वर्णिलेल्या आहेत व ह्या दोनही कामलांमध्यें त्वचा - मूत्र - शकृत नखे ही पिवळी पडतात व हा पित्तप्रधान व्याधि आहे असे वर्णन आहे. व त्याची चिकित्साही वेगळी आहे.

परंतु प्रस्तुत लेखांत जो विकार विचारासाठीं घेतला आहे. तो म्हणजे कफरुद्धपथ कामला होय.

फक्त वाग्भटाचार्यानीच हा विकार वर्णिलेला आहे. बाकीच्या सर्व ग्रंथकारांनीं ह्या विकाराचे पृथकत्व जाणलेले नाहीं. ह्यावरून वाग्भटाचार्याची श्रेष्ठ बुद्धीमत्ता निदर्शनास येते.

रुद्धपथकामला एक वेगळा विकार आहे. ह्या विकाराची वाग्भटाचार्यांनी दिलेली संप्राप्ति पुढील प्रमाणें आहे.

रूक्षशीतगुरुस्वादुव्यायामवलनिग्रहैः ।
कफसंमूर्च्छितो वायुः यदा पित्तं वहिः क्षिपेत् ।
हारिद्रनेत्र मूत्रत्वक् श्वैतर्चास्तिदा नर : !
दौर्बल्याल्पाग्निपार्श्वार्ति हिध्माश्वासारुचिज्वरैः
क्रमेणाल्पेऽनुषज्येत पित्ते शाखासमाश्रिते ॥ ४७
तिलपिष्टनिभं यस्तु कामलावान्सृजेन्मलम् ॥
कफरुद्धपथं तस्य पित्तं कफंहरैं र्जयेत् ॥ ४५

निदानाच्या दृष्टीनें वरील श्लोकाचा विचार केला असतां काय आढळून येते ?

कोष्ठामध्यें पित्ताची जी प्रवृत्ति नेहमी होत असते. तो मार्ग कफामुळें रुद्ध होतो. ह्या ठिकाणी कफाबरोवर समान वायुहि विघडतो. व व्यानामुळें शाखाश्रित पित्त जे कोष्ठांत येत असते तो मार्ग ह्या कफवातात्मक रोधामुळें रुद्ध होतो. तो मार्ग रुद्ध झाला म्हणजे व्यान त्रिगुणात्मक होऊन सर्व पित्त, शाखा त्वचा नेत्र वगैरे शरीरांत पसरवितो व अशाप्रकारें रुद्धपथ कामला हा विकार होतो.

पित्ताश्मरी, कोष्ठाश्रित कृमि, ग्रंथि ह्यांनींही हा मार्ग रुद्ध होऊन सदर संप्राप्ति घडणें शक्य आहे. व त्याचें व्यवच्छेदक निदान करणेही फारसे अवघड नाहीं, परंतु त्या विकाराला आगन्तु कामला असे म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सध्याच्या अॅलोपॅथिच्या संशोधनाप्रमाणें ह्या विकाराला कारण virus असावे असा त्या शास्त्रज्ञांचा तर्क चालू आहे. ह्या virus च्या योगानें यकृत व पित्तवहनलिका ह्यांना सूज येते. पित्तवह नलिका शोफामुळें रुद्ध होते. व पित्त यकृतामध्यें संचित होऊन पुढें अभिसरणांत जाऊन त्वचा – नेत्र – मूत्र ही पीत होतात. अशी संप्राप्ति आहे.

पूर्वी ह्या शास्त्रज्ञांची अशी समजूत होती की द्वादशस्थानामध्यें सूज येऊन (catarrh) पित्तवहनलिकेचे मुख बंद होते. परंतु ती कल्पना आतां चुकीची असल्याचे आढळून आले आहे. सध्या यकृत व पित्तवहनलिका ह्यांची virus नें येणारी सूज होय असे विवरण आहे.

Ref. Savil's System of Clinical medicine. page 420
Theraputic notes P. D.
International forum.
त्यासाठीं वाचकांनी वरील संदर्भ अवश्य पहावे.

लक्षणें:–

दोन तीन दिवस ९९° F. ९९·५ F. असा बारीक ताप रोग्याला सुरवातीस येतो. असा ताप ३ दिवस आल्यानंतर रोग्यास अत्यंत अग्निमांद्य उत्पन्न होते. व डोके विशेषतः पुढचे दुखते.

अितके अग्निमांद्य उत्पन्न होते की एक घाससुद्धां खाण्याची इच्छा नाहीं असे रोगी सांगतो.

अशा प्रकारें आणखी २ दोन दिवस गेले म्हणजे रोग्याची लघ्वी अधिक पिवळी होऊ लागते. मलावष्टंभ सुरू होतो.

विकार सुरू झाल्यापासून ८ दिवसांत डोळे पिवळे होऊ लागतात. अशा प्रकारें पहिल्या आठवड्यांत रोगाची प्रगति होते,

दुसऱ्या आठवड्यांत सुरवातीस रोगी घशाशी आंबट, जळजळत पित्त येते व त्यामुळे घाबर वाटते असे सांगतो. शौचास पांढरे होते, मलास दुर्गंधी येते त्याच बरोबर पोट फुगण्याची तक्रारही सुरू असते. भूक नसतेच. लघ्वी लाल होते व डोळे गडद पिवळे होतात ज्वर बारीक असतोच.

तिसऱ्या आठवड्यांत डोळे हिरवे पिवळे होतात. रोगी दुर्बल होतो. अंगाला खाज सुटते; खाज रात्री जास्त येते. यकृत् वृद्धि मऊ; २ बोटे ते ३ बोटे; त्या स्थानीं स्पर्शासहत्व येते.

अशा प्रकारें लक्षणें उत्पन्न होतात. दुसऱ्या आठवड्याच्या सुरुवातीपासून शौचास दुर्गंधी फेसकट व पांढरे होते. साफ होत नाहीं. अशी रोगी तक्रार करतो.

सामान्यतः ही अशी लक्षणें होऊन चौथ्या आठवड्यांत रोग नैसर्गिक लंघनानें व रोग्यानें पथ्य पाळले असेल तर कमी होतो. प्रथम रोग्याला भूक थोडीबहुत लागू लागते.

अग्निमांद्य कमी होणें हें चांगले लक्षण समजले पाहिजे. कारण त्यानंतर ४ दिवसांत शौचाच्या रंगांत फरक होतो. पांढरट रंग बदलून पिवळट होऊ लागतो. ह्याचा अर्थ पित्त कोष्ठांत येऊं लागले असा होतो.

अशा प्रकारें पित्त कोष्ठांत परत येऊ लागले म्हणजे विकार बरा होतो व त्वचा–नेत्र ही १५ दिवसांत पूर्वीसारखी होतात.

परंतु हा विकार चौथ्या आठवड्यांत बरा झाला नाहीं तर, शाखाश्रित पित्त वाढल्यामुळें रक्तपित्त हा विकार सुरू होतो. नाकांतून घुणा फुटून रक्त वाहू लागते. कातडीत रक्तस्त्राव होतो. त्वचा रुक्ष बनते.

हृदय दुर्बल होते, वेग कमी होतो. द. मि. ५० ते ६० अितकाही कमी होतो. व असाच विकार वाढत गेल्यास रोगी मूर्च्छित होतो व मरण ओढवते.

त्याचप्रमाणें हृदयदौर्बल्य फार आले असेल तर मूर्च्छा वगैरे लक्षणें न येता सुद्धां अचानकपणें एकाएकी रोग्याचा मृत्यू झाल्याची उदाहरणें आहेत. माझ्या स्वतःच्या माहितीत दोन रोगी असे मेलेले मी पाहिले आहेत.

अशा प्रकारें ह्या रोगाची वाढ होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवच्छेदक निदान

पांडुजन्य कामला	पित्तकारक पदार्थांनें होणारी कामला	कफरुद्ध पथ कामला	कृमि-ग्रंथि अवरोधजन्य कागला	पित्ताश्मरीजन्य कामला
१. कारणें:- पांडुरोग असतांना पित्तकारक आहार करणें.	१. निरोगी माणसांत सोमल वगैरे पित्तकारक औषधें अगर पदार्थ खाणें.	१. रुक्ष, शीत, गुरु आहार, व्यायाम, बलनिग्रह वगैरे	१. कृमि अगर ग्रंथीमुळें पित्तमार्ग अवरोध होणें.	१. पित्ताश्मरीनें मार्ग अवरुद्ध होणें
२. लक्षणें :- पांडुरोगाचीं + नख, मूत्र, त्वचा, पीत.	२. केवळ पित्तप्रकोप व कामला.	२. अग्निमांद्य, पोट फुगणें व मुख्यत: पांढरे तिळाचे पीठ कालविल्याप्रमाणें शोचास.	२. तशींच परंतु अग्निमांद्य न येतां एकाएकी कृमीमुळें होणारी तीव्रकामला. ग्रंथि, स्पर्श, अगर पुराण वृत्तांत. कांहीं महिने हळूहळू कामला होत जाणें.	२. पित्तज. शूलाचा वृत्तांत शूलामागोमाग कामला येणें.
३. यकृत् वृद्धि +	३. असेलच असें नाहीं.	३. +	३. नाहीं.	३. नाहीं.
४. चिकित्सा :- पित्तनाशक पांडुरोगाविरोधी	४ पित्तशामक	४. तीक्ष्ण, ऊष्ण, रुक्ष, कफनाशक	४. कृमिनाशक व शस्त्रक्रिया	४. पित्त नाशक चिकित्सा

साध्यासाध्यता

हृदय दौर्बल्य:-

जर फारसे नसेल तर म्हणजे श्वास हिध्मा हे उपद्रव नसतील तर कफरुद्धपथ कामला साध्य असते.

कामला मूर्च्छा:-

ही उत्पन्न झाली म्हणजे रोगी बरा होणें दु:साध्य असते. म्हणजे कष्टसाध्य असते.

हृदयदौर्बल्य कळणें कठीण असते. श्वास वगैरे उपद्रव नसूनही मृत्यू आलेला मी पाहिला आहे.

रक्तपित्त उपद्रव-

आडुळसा व Vitamin K. Injections दिली असतां साध्य असतो

चिकित्सा-

अिंग्रजी वैद्यकांत सदर रोगावर रामबाण औषध अजून सापडलेले नाहीं.

जी प्रचलित औषधें चालूं आहेत त्यांचा परामर्श घेऊं (१) कॅलोमेल (२) सोडा सल्फ (३) हेक्सा मिन (४) वाईल सॉल्ट्स (५) ग्लुकोज व्हिटॅमिन सी. (६) अिन्शुलिन (७) अमोनिया क्लोराईड.

येवढी औषधें प्रचलित आहेत.

ह्यापैकीं एकही औषध ह्या Virus वर हमखास लागू पडणारे नाही.

Calomel व Sodi Sulph

ही दोन्ही औषधें देऊन जुलाब होतात परंतु पुष्कळ जुलाब झाले म्हणून ह्या virus मुळें आलेली सूज कमी होत नाहीं. शिवाय पान्यामुळें मुखपाक होण्याचा संभव असतो, व वारंवार जुलाब देऊन कोष्ठामधून विषांचें शोषण जास्त प्रमाणावर होते. म्हणून हल्ली नव्या पुस्तकांतहि जुलाब देण्याची पद्धत वर्णिलेली नाहीं. परंतु कांहीं वेळा ही चुकीची आहे असेही उल्लेख आलेले आहेत. ह्या जुलाबामुळें रोगी विनाकारण गळाठतो.

Sodium salycilate ह्या औषधानें पित्त पातळ होते व त्याचा स्राव वाढतो परंतु ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जंतूवर त्याची क्रिया कांहींच होत नाहीं. उलट पित्ताला अडथळा असल्यानें पित्ताचा स्राव वाढणें कावीळ वाढविण्यासारखे होते.

ग्लुकोज व व्हिटॅमिन सी ही अन्नस्वरूपांत जमा असल्यानें व ग्लुकोजमुळें यकृत् जीवाणूंना अन्न मिळत असल्यानें ग्लुकोज देण्यास कांहींच हरकत नाहीं. जुन्या लोकांत ऊस खावयास सांगिलेला जातो तोही शास्त्रीय दृष्टचा असाच उपयोगी पडतो अिन्शुलीनमुळें ग्लुकोज पचनाला मदत होते व त्यामुळे यकृताची क्रिया अतिशय मंद असेल तर त्याचा उपयोग करावयास हरकत नाहीं.

Bile Salts

हें पित्तक्षार दिल्याने पोटांत पित्त-स्रावाचे काम होते व म्हणून पोट फुगण्याच्या तक्रारी कमी होतात. परंतु हे स्राव शोषले जाऊन पुनः पित्तस्राव वाढवितात व अशाप्रकारें मार्गांत अडथळा असताना असतांना पित्तस्राव वाढणें हितकारक ठरत नाहीं..

अमोनिया क्लोराइडचा यकृतावर कोणताही परिणाम होत नाही.

अशा तऱ्हेनें प्रचलित असणारी अिंग्रजी जुनी चिकित्सा रोग बरा करण्याच्या दृष्टीनें हमखास नाहीं.

नवी Choline व Methonine ही औषधें यकृतामधील मेदसंचय कमी करतात म्हणजे कफनाशक आहार हया सदरांत त्यांचा समावेश करतां येईल परंतु त्यामुळें रोग बरा करतां येतो असे मात्र नाहीं.

आयुर्वेदामध्यें वाग्भटाचार्यांनीं हया कामलेची जी जी चिकित्सा दिलेली आहे, ती मुख्य म्हणजे कफनाशक उपचारांनीं पित्त जिंकावे अशी दिलेली आहे व मेद वर्ज्य करण्यास सांगून मोर वगैरे पक्ष्यांची मांसे सांगितलेली आहेत; व मुळा खावयास सांगितलेला आहे.

रसैस्तं रूक्ष कट्वम्लैः शिखितित्तिरिदक्षजैः ।
शुष्कमूलकजैर्यूषैः कुलत्थोत्थैश्च भोजयेत्
भृशाम्लतीक्ष्णकटुक लवणोष्णंच शस्यते
सबीजपूरकरसं लिहयात् व्योषं तथाशयम् ।
स्वं पितमेति तेनास्य शकृदप्यनुरज्यते ।।
वायुश्च याति प्रशमं सहाटोपाद्युपद्रवैः

असा चिकित्सेचा सारांश आहे. पित्तज आहार पाण्डु रोगांत करू नये हे शास्त्र आहे.

परंतु ही रुद्धपथकामला त्याला अपवाद आहे हया ठिकाणीं अतिशय अम्ल, तिक्ष्ण असा कटु, उष्ण आहार करून कफ नाश करण्याचा. त्या दृष्टीनें मुळा सुंठ मिरी, पिंपळी कुलथ्याचे कढण ही सुचविलेली आहेत. प्रत्यक्ष औषधी चिकित्सा फारशी सुचविलेली नाहीं. अितर ठिकाणीं जी कामलाहर औषधें सांगितलेली आहेत ती पाण्डु-कामलाहर अशी आलेली असल्यामुळें हया कामलेसंबंधी त्याचा उल्लेख नाहीं, असेच धरावे लागते.

वैद्य पंचानन गुणेशास्त्री हयांनीं कुमारी आसव व मण्डूरभस्म सुचविलेले आहे. मण्डूर भस्माचा त्यांनी त्या प्रकरणांत रुद्धपक्षकामला असा उल्लेख करून हा उपाय सुचविलेला आहे. परंतु मण्डुर म्हणजे लोह कल्प व त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून मला हमखास गुण आढळलेला नाहीं.

खालील चिकित्सा मला आतापर्यंतच्या सर्व चिकित्सेपेक्षां बरी आढळली

व ती म्हणजे : त्रिकटु १ मासा + त्रिफळा ६ मासे + शंख भस्म १ मासा

अशा दोन पुडचा सकाळ संध्याकाळ.

अनुपान– मुळयाचा रस व मध हया बरोबर.

पथ्य— कुळथ्याचे कढण, ताक, भूक लागू लागल्यावर भात, भाकरी वगैरे

चार दिवसांमध्यें पित्त स्वाशयांत येते; मलाचा रंग बदलतो. अग्नि वाढतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पित्त स्वाशयांत आल्यावर इच्छाभेदी १ गुंज सकाळीं मनुकांच्या काढ्याबरोबर. एक दिवसाआड एकूण दोन वेळा.

प्रत्येक वेळी ७–८ जुलाब होऊन पित्तस्राव पुष्कळ होतो व डोळे लवकर उतरतात. मूत्र सुधारते आध्मान वगैरे लक्षणें बदलतात.

पुढें त्रिफळा प्रमाण निम्मे करून त्यांत नवायस चूर्ण ४ गुंजा घालून १५ दिवस पुडचा द्याव्या. ह्या चिकित्सेनें सर्व तक्रारी नष्ट होतात, व रोगी लवकर सुधारतो. विश्रांति मात्र पूर्ण घ्यावयास पाहिजे.

ह्या चिकित्सेनें ४ रोगी ह्या सहा महिन्यांत चांगल्या प्रकारें बरे झाले. त्यांची नांवनिशी या लेखाचे शेवटीं दिलेली आहे, ती पहावी.

४ वर्षांत एकूण २४ कामला रुग्णाचा औषध देण्याची संधि आली. त्यापैकी ४ चिकित्सारुग्णाचा तक्ता माण्डून दाखविला आहे व त्या लक्षणवार सर्व चिकित्सा दाखविली आहे ती पहावी.

कामलेवर नस्य चिकित्सा करून बरी झालेली उदाहरणें १९५० सालाच्या Antiseptic मध्यें आलेली होती. यांचा कांहींही परिणाम ह्या जंतूंवर होत नाहीं.

त्या मानानें ह्या सोप्या चिकित्सेनें पुष्कळ चांगले यश मिळते.

कै. वै. रघुनाथशास्त्री पटवर्धन चिपळूण ह्यांनी १९४७ साली आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयांत कामलेवर अनुभव सांगतांना त्रिफळा + शंख भस्म देऊन ३ दिवसांत शकृत् रंग पालटतो असे सांगितले होते.

त्यांत त्रिकटची वाढ व अनुपान मुळा वगैरे ग्रंथाला धरून मी वाढविली आहेत.

कामलेमध्ये पित्त स्वस्थानी परत येईतों जुलाब देऊ नयेत असे माझे मत आहे. त्यामुळे विनाकारण रोगी थकतो. सदर त्रिफळा + त्रिकटू + शं. भ. चिकित्सेनें फार तर दोन वेळा साफ शौचास होते. ही सर्व द्रव्यें कफनाशक व वातनाशक आहेत. त्रिफळा रसायन व कामलानाशक आहे. पित्तकफ नाशक असून वातवृद्धि करीत नाहीं. शंखभस्मानें घशाची जळजळ व पोटफुगी कमी होते. त्रिकटूनें अग्निमांद्य कमी होते व त्रिफळ्यानें मुख्य क्रिया म्हणजे पित्त स्वस्थानीं येण्याची लवकर होते. विश्रांति भरपूर घेणें म्हणजे दिवास्वाप नव्हे तर श्रमाचे काम न करणें अवश्य आहे.

सारांश–

(१) कामला ह्या रोगाचे प्रकार वर्णन करून रुद्धपथ कामला हा वेगळा रोग असून फक्त वाग्भटाचार्यांनीच तो वर्णिला आहे.

(२) रुद्धपथकामलेची आधुनिक व वाग्भटप्रणित संप्राप्ति माण्डली

(३) लक्षणें व उपद्रव ह्यांचे वर्णन केले

(४) ॲलोपॅथिक औषधांचे मूल्यमापन करून प्रत्यक्ष रोग बरा होण्याचे दृष्टीनें त्यांचा फारसा उपयोग नाहीं हें माण्डले

(५) त्रिफळा + त्रिकटु + शंख ह्या चिकित्सेचा क्रम व विरेचनाची अवस्था व नवायसचूर्णाच्या अवस्था वर्णन केल्या

(६) सदर चिकित्सेचे यश दाखविण्यासाठीं चार रुग्णांचे वर्णन दिले.

आधार–

१. अष्टांगहृदय वाग्भटाचार्य.
2. Savil's System of Chimal medicine:
3. Theraputic notes P. D.
4. Antiseptic 1953.
5. Medical Review.

Abstracts from Alopathic Books.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

In this condition there is an obstruction to the outflow of bile from the bile passage into small intestines.

Frequently an obstructive factor is also present (1) because the liver cells are swollen they tend to block the bile Canaliculi. (2) The inflammatory process may involve the bile ducts. The bile capillaries may thus become plugged in places, by an albuminous coagulable material. The distended bile cappillaries above the block, may even rupture with resulting return of chole–bilirubin into blood.

Page 191 Applied Physiology
Samson Wright 1952.

No specific treatment is available. Absolute bed rest should continue until jaundice has disappeared.

(म्हणजे निसर्गानेंच कमी होईतों वाट पहावी. हमखास कमी करतां येत नाहीं.)

Thurapuetic Notes P.D. 1953- 2nd
Clinical Analysis of hepatitis
by Moglcus Bjoer Neboe M. D

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION

मूळचे माफक हप्ते
आणखी कमी केले
विमेदारांना सर्वाधिक फायदा देण्याच्या कंपनीच्या धोरणानुसार कंपनीनें विमा हप्त्यांचे दर १ एप्रिल १९५४ पासून आणखी कमी केले आहेत. तरी जास्तींत जास्त फायदा मिळविण्यासाठीं
वेस्टर्न इंडियाची
पॉलिसी घ्या.
वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

रुग्णांचा तक्ता त्रिफळा पद्धतीनें चिकित्सिलेला

अनुक्रम	नांव	वय	पत्ता	मुख्य लक्षणें	चिकित्सा	उपशय
१	भोगीलाल शहा	४० वर्षे	लोणंद	डोळे पिवळे, त्वचा पिवळी, अग्निमांद्य, यकृतवृद्धि १ बोट, स्पर्शासहत्व, ज्वर ९९° फॅ., शकृत श्वेत, अंगाला खाज फार.	त्रिकटु + त्रिफळा + शं. भ. पथ्य वर वर्णिलेलें २६ ऑगस्ट १९५३ १ सप्टेंबर इच्छाभेदी त्रिकटु + त्रिफळा+ शं. नवायस १५ सप्टेंबरपर्यंत.	५ दिवसांनीं शकृत् पिवळें, अग्निवृद्धि, १० जुलाब झाले. २ दिवसांत वरील जुलाबानें डोळे उतरले. अशक्तपणा मात्र वाढला. विश्रांति. पूर्ण बरा.
२	कांतिलाल मूळचंद दोशी	३०	,,	,,	१२ सप्टेंबर १९५३ वरील औषध त्याच क्रमानें.	वरील प्रमाणें. पूर्ण बरा.
३	हरीबा शेळके	३५	,,	पूर्वेतिहास विषम ज्वराचा, कामला, प्लीहावृद्धि, श्वेत शकृत्, डोळे हिरवे पिवळे, अग्निमांद्य + + ज्वर १००° फॅ.	२० आक्टो. १९५३ वरील सर्व चिकित्सा + विषम ज्वरनाशक म्हणून Tr. Cinchona ३० थेंब & Ext. Gulvel. १२० थेंब पुढें १ नोव्हेंबर पासून + नवायस चूर्ण	ज्वर ८ दिवसांनीं कमी आला. शकृत् ४ दिवसांनी पीत. बरा १५ दिवसांनीं. १ नोव्हेंबरनंतर.
४	सौ. भागिरथी साहेबराव शेळके	२८	,,	पूर्वेतिहास विषमज्वर,+ कामला, श्वेत शकृत, अग्निमांद्य + + ; प्लीहा +	चिकित्सा नं. ३ प्रमाणें व कामलेची, २ जानेवारी १९५४	बरी उपशय वरीलप्रमाणें

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्वचा-रोगांचा प्रादुर्भाव होताच विचार करण्यांत
वेळ न दवडतां रक्तशुद्धीकरितां प्रसिद्ध
असलेलें रक्तदोषांतक घेणें सुरू करा.

"आफाळि"

रक्त दोषांतक

आ यु र्वे दा श्र म
फार्मसी लिमिटेड, अहमदनगर.

EVEREST R. 51

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुखी मातृपद

म्हणजेच भातेचें व बालकाचें

आरोग्य

मातृपदाची चाहूल लागतांच मातृत्वाची जबाबदारी सुरु होत असते आणि बालकाची आरोग्यपूर्ण वाढ होईपर्यंत ती संपत नाहीं.

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक टॉनिक

गर्भवतींनीं नियमितपणें युटोन घेतल्यानें प्रकृति उत्तम राहाते, गर्भाचें नीट पोषण होते व गर्भस्राव वा गर्भपात यांचें भय राहात नाहीं. अनियमित मासिक पाळी, प्रदर इ. गर्भाशय-विकारांवरहि गुणकारी.

स्तन्यशोधन

दुग्धशोधक, दुग्धवर्धक

मुलाला आईचें दूध मानवलें नाहीं तर तें बाळसें धरीत नाहीं, त्याची प्रकृति वारंवार बिघडते. मातेनें स्तन्यशोधन नियमित घेतल्यास दुधांतील दोष दूर होतात.

शिशुजीवन

बालकांचें आरोग्यरक्षक

मुलांच्या दमा, खोकला या विकारांवर गुणकारी टॉनिक. वारंवार सर्दी, पडसें होऊन श्वासाचा उपद्रव होतो तेव्हां शिशुजीवनचा अवश्य उपयोग करावा.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

श्रेष्ठ, गुणकारी आयुर्वेदीय औषधांचे निर्माते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

गुरुकुल-पत्रिका

गुरुकुल-पत्रिका

—शेठ चंदनमल मुथा—

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा शहर.

मुंबई आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टीच्या पदवी-अभ्यासक्रमाचे नवे वर्ग ता. १० जूनपासून सुरु होतील. एस्. एस्. सी किंवा मॅट्रिकला संस्कृत घेऊन इंटर सायन्स (बी ग्रूप) उत्तीर्ण झालेल्यांनीं आपले अर्ज संस्थेच्या छापील फॉर्मवर ता. ८ जूनपूर्वीं प्रवेश फीसह पाठवावेत. सुसज्ज रुग्णालय, प्रयोगशाला, शवच्छेदनगृह, विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृह, विद्यार्थिनींसाठीं स्वतंत्र वसतिगृहाची सोय, क्ष किरण विभाग इत्यादि सर्व उत्तम सोयी. फक्त मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश.

प्रिन्सिपॉल,
शे. चं. मुथा, आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्रमित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

२५।३।१९

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्मीमांसा

गुरुकुल-पत्रिका

जुलै] [१९५४

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारी संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत.....

आयुर्वेदीय शल्य तंत्राचें वैभव — वैद्य दि. वि. साठे
शोधन विधी — वैद्य पु. वि. धामणकर
अथ पित्तम् — वैद्य गो. आ. फडके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वार्षिक वर्गणी ३ रु.] [किरकोळ अंक ८ आणे.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

—आयुर्मीमांसा—

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १७ वें] जुलै १९५४. [अंक ५ वा.

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.
* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.
* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म.ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.
* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.
* सर्व व्यवहार "व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा." या पत्त्यावरच करावा.

भारतीय दंतरोगविज्ञान

ले. वैद्य पांडुरंग विष्णू जायदे
हुबळी

अभिप्राय

सदर पुस्तक मीमांसेकडे अभिप्रायार्थ आले. समग्र वाचले. आयुर्वेदाच्या अंगापैकीं कांहीं अंगेंच हल्लीं चालू आहेत. उर्ध्वजत्रू व्याधींचें निदान व चिकित्सेचें प्रमाणही कमी झाले आहे. अशा स्थितींत वैद्य जायदे यांनीं उर्ध्वांग व्याधीमध्येंही केवळ दंतरोगावर सविस्तर ग्रंथ लिहावा याचे फार कौतुक वाटते. वैद्य जायदे यांनीं केवळ ग्रंथ संकलन केलेले नाहीं, तर प्रत्यक्ष दृष्टकर्म व व कृतकर्म होऊन सदर ग्रंथ लिहिला, याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडें होईल ! ग्रंथामध्यें दंतासंबंधीं शरीर, त्यांचे व्याधी व चिकित्सा, यांवर संपूर्ण उहापोह शास्त्राधारें केला आहे. दंतरोग होऊं नयेत म्हणून त्यावर प्रतिबंधक इलाजही सांगितले आहेत. ग्रंथ अत्यंत संग्राह्य व उपयुक्त झाला आहे. वैद्य जायदे यांनीं दंतोत्पाटनाची कला वैद्य गुरुवर्य कशोरीलाल गुप्ता यांचेकडून घेतली व ती इतकी हस्तगत केली आहे कीं, स्वतंत्रपणें एकटा माणूस दंतयज्ञ चालवतो ! त्यांचें हें समाजसेवेचे कार्य अभिनंदनीय आहे. त्या कामांतून मिळालेले अनुभव त्यांनीं ग्रंथांत दिले आहेत, त्यामुळें ग्रंथाला भारदस्तपणा व वास्तवता प्राप्त झाली आहे. दंतोत्पाटनामध्यें वैद्य श्री. जायदे जालंधरबंध शिथिल करतात व दंतोत्पाटन जलद व वेदनारहित करतात. या संबंधीं पुढील प्रमाणें पृच्छा आहे. जालंधर बंध हा योग शास्त्रवर्णित आहे काय ? आयुर्वेदीय शारीररचनेंत त्याचा कोठें उल्लेख मिळेल का? दुसरी शंका अशी कीं, अशा तऱ्हेचें अन्य बंधाचे शिथिलीकरण करून तात्पुरता एकदेशीय संज्ञानाश करतां येईल काय ? व असा करता येत असल्यास त्याचा वैद्य जायदे यांनीं उल्लेख करावा म्हणजे अन्य शस्त्रकर्मे करणाऱ्या वैद्यांना त्याचा उपयोग होईल व शस्त्रकर्म वेदनारहित करता येईल. तरी वैद्य जायदे यांनीं वरील शंकांवर प्रकाश टाकावा ही त्यांना विनंती. वैद्य जायदे यांनीं दंतरोगावर स्वतंत्रपणें ग्रंथ लिहून आयुर्वेदीय वाङ्मयांत अमोलिक भर घातली आहे याबद्दल त्यांचें पुनः अभिनंदन करतो. ग्रंथाची किंमत अल्प असून विशेष म्हणजे त्यांतल्या फायद्याची रक्कम आयुर्वेदीय दंतसंस्था या संस्थेकडे जात आहे. सर्वांनीं ग्रंथ अवश्य विकत घेऊन स्वार्थ व परमार्थ साधावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गु. वै. वेणीमाधवशास्त्री जोशी यांची संस्थेस भेट

संस्थेचे माजी विद्यार्थी, माजी प्रधानाध्यापक व आयुर्वेद संशोधन समितीचे अध्यक्ष गु. वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांनीं संस्थेस ता. १८।६।१९५४ रोजीं भेट दिली. संस्थेचे सर्व विभाग पाहुन समाधान व्यक्त केलें. विद्यालयांत प्रविष्ट झालेल्या नवीन विद्यार्थ्यांपुढें "आयुर्वेद व विद्यार्थ्यांचें ध्येय" या विषयावर त्यांनीं वक्तव्य केलें व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलें. गु. जोशी हे संस्थेला कधींच विसरणार नाहींत. त्यांनीं असेच संस्थेला भेट देऊन मार्गदर्शन करावें अशी त्यांना विनंती आहे.

शेठ चंदनमल मुथा

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.

सन १९५४ एप्रिल मध्यें फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक युनानी तिब्बी सिस्टीम ऑफ मेडीसिन मुंबई तर्फे घेतलेल्या परीक्षेचा निर्णयः-

जी. एफ्. ए. एम्. प्रथम परीक्षाः-

१ नाईक भगवान रघुनाथ
२ मणेर रसुल बाबालाल.
३ चौधरी मधूकर नारायण.

वर्ष २ रें (डी. ए. एस्. एफ्.)

१ चव्हाण अरविंद वसंत.
२ कु. गोलवलकर कुमुद पुरुषोत्तम.
३ जिनराळकर शाम वामनराव.
४ हूहू पानाचंद रामचंद्र.
५ कु. केळकर लिला दामोदर.
६ पटवर्धन दिनकर महादेव.

वर्ष ३ रें (डी. ए. एस्. एफ्.)

१ भोमाज नेमिनाथ दादा.
२ डांगे नारायण पांडुरंग.
३ एकसंबेकर रामचंद्र दत्तात्रय.
४ गांधी शांतीकुमार फुलचंद.
५ जोशी भालचंद्र हरी.
६ कोल्हटकर गणेश चिंतामण.
७ मणरकर चंद्रकांत भिमराव.
८ नाडपुरोहित नारायण भिमाचार्य.
९ माणगांवे बाळकृष्ण रामचंद्र.
१० पलंगे दामोदर पांडुरंग.
११ कु. विद्युलता मोरेश्वर पंडीत.
१२ पाटील कलगोंडा शांतगोंडा.
१३ पोरे नारायण आबाजी.
१४ कु. वेलणकर भागीरथी रामचंद्र.
१५ उचगांवकर पांडुरंग व्यंकटेश.
१६ यडगुलकर भालचंद्र आप्पाजी.
१७ कुलकर्णी हरी महादेव.

वर्ष ४ थें (डी. ए. एस्. एफ्.)

१ आफळे दिनानाथ विष्णू.
२ भावे प्रभाकर गणेश.
३ देशपांडे नारायण हरी.
४ देशपांडे श्रीधर दत्तात्रय.
५ जळूकर श्रीनिवास दत्तात्रय.
६ थत्ते जनार्दन दत्तात्रय.

उत्तीर्ण झालेल्या वरील विद्यार्थ्यांचें मीमांसा अभिनंदन करीत आहे. पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनीं संस्थेवर व मीमांसेवर लोभ ठेवावा हीच त्यांना प्रार्थना

संपादक.

डॉ. ग. ता. महाडीक-

संस्थेचे एक कार्यकर्ते डॉ. महाडिक हे ता. २०।६।५४ रोजीं आकस्मिकपणें निधन पावले, हे कळविण्यास मीमांसेला फार दुःख होत आहे. डॉ. महाडिक यांचा स्वभाव फार आनंदी असे. कोणाही व्यक्तीला त्यांनीं कधींच दुखवलें नाहीं, त्यामुळें ते जणू अजातशत्रू वाटत. संस्थेमध्यें ते अध्यापनाचें कार्य करीत व आपल्या निगर्वी व आनंदी स्वभावामुळें विद्यार्थ्यांचें प्रिय शिक्षक झाले होते. अत्यंत लहान वयांत त्यांच्यावर क्रूर काळाची नजर पडावी याचे आश्चर्ययुक्त दुःख होते. नुकतेच ते नेत्रविकारासंबंधीं विशेष अभ्यासासाठीं जाऊन आले. संस्थेच्या वाढत्या व्यापाबरोबर सुगुण व कर्तबगार कार्यकर्त्यांची संस्थेला वाढती गरज आहे. अशा वेळीं डॉ. महाडीक हे आमचेमधून जावेत हें संस्थेचेही मोठेंच दुर्दैव होय. डॉ. महाडीक यांचे मृत्युमुळें त्यांचे कुटुंबावर फारच मोठा आघात झालेला आहे, तसेच संस्थेचेही मोठेंच नुकसान झालें आहे. त्यांचें वयोवृद्ध माता पिता व पत्नी यांना होणारे दुःखाचें वर्णनच होणार नाहीं. संस्थेचे सर्व कार्यकर्ते त्यांचे दुःखांत सहभागी आहोत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

WILCO
STRONGHOLD OF PROTECTION

....कालाबरोबर प्रगतिपथावर....

वेस्टर्न इंडियानें

आपली तेजस्वी परंपरा १९५३ सालींहि पूर्णत्वानें राखिली आहे.

१९५३ चे यशस्वी आंकडे

एकूण नवीन काम	रु. २॥। कोटीवर
एकूण चालू काम	रु. १९ कोटीवर
एकूण हप्त्यांची आवक	रु. ९४ लाखांवर
एकूण आयुर्निधी	रु. ६ कोटीवर
एकूण क्लेम्स दिले	रु. २। कोटीवर

१९५३ अखेरच्या मूल्यमापनाचें काम चालू आहे.
आपल्या पसंतीची एखादी उत्कृष्ट योजनेखालील
कमी केलेल्या दरांत

वेस्टर्न इंडियाची पॉलिसी घ्या.

सविस्तर माहितीसाठीं आपल्या जवळच्या
शाखा कार्यालयास लिहा अथवा भेटा.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय शल्य तंत्राचें वैभव.

: लेखक :

वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य.

एकदां आम्ही सर्व चिकित्सक एकत्र जमलों होतों. बोलतां बोलतां चर्चेचा विषय आयुर्वेदीय शल्यतंत्र या संबंधीं सुरू झाला. अन्य पंथीचे चिकित्सकांनीं प्रश्न केला "काय हो वैद्यराज आयुर्वेदामध्यें सर्जरी आहे काय ?" मी म्हणालों "बरीच आहे." यांवर त्यांना बरेचसें आश्चर्य वाटलें ! मी म्हणालों "असा आपल्याला प्रश्न कां बरे निर्माण झाला ?"..... सुशिक्षित वैद्यक क्षेत्रांतल्यांची ही पृच्छा ! मग सामान्य जनतेला आयुर्वेदीय शल्यतंत्राची माहिती किती असेल याची कल्पनाच केलेली बरी ! त्यांचे मतें वैद्य म्हणजे पुड्या, गोळ्या, आसावारिष्टें देणारे चिकित्सक! त्यांना शस्त्रक्रिया कुठून माहीत असणार !

वरील चर्चनंतर माझे मनांत विचार सुरू झाले कीं, शल्यतंत्रासंबंधीचें वैभव आपण कांहीं प्रकाशित करूं की कसे ? मी माझे स्नेह्यांना म्हणालों कीं "बाबांनो, पूर्वी लोकांना जखमा होत होत्या कीं नाहीं ? त्यांना अपघातानें अस्थि मोडणें, सांधे निखळणें वगैरे व्याधी होत होते कीं नाहीं ? तर मग वैद्यांना त्यांवर चिकित्सा करावी लागत होती व चिकित्सा करावयाचो म्हणजे शरीरांतले अवयवांचें सम्यग् ज्ञान हवे. त्याशिवाय चिकित्सा फळ मिळत नाहीं !" म्हणून लेखनाला सुरवात केली. आयुर्वेदाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा उपयोग होईल अशी आशा आहे.

आयुर्वेदांत वर्णन करतांना त्याचे वेगळे वेगळे आठ प्रकार पाडले, त्या प्रकारांना "अंग" अशो संज्ञा दिली.

कायबालग्रह उर्ध्वांगशल्य दंष्ट्रा जरा वृषान् अष्टौ अंगानि ।

वा. सू. अ, १सूत्र. ५ वें

भूयोऽष्टधा प्रणीतवान् ।
तद्यथा शल्यं शालाक्यं कायचिकित्सा इ.

सु. सू. अ. १ सू. ६-७

म्हणजे या अंगामध्ये शल्यतंत्र व शालाक्य तंत्र अशा विषयांचा उल्लेख केला आहे. व्याधीच्या निर्मितीचे २ प्रकार केले व ते म्हणजे

"निजाऽगन्तु विभागेन तत्र रोगाः द्विधा स्मृताः ।

वा. सू. १ । २०

म्हणजे शरीर वातादि दोषजनित ज्वरादि व्याधी हे निज होत. व

"यस्तु शस्त्रादीना हेत्वन्तरेण अुत्पन्नः सः आगन्तुः।" बाह्य हेतुजः । म्हणजे आगंतु व्याधीमध्यें बाह्य हेतू आघात, प्रपतन वगैरे असतात व त्यांनीं व्याधी निर्माण होतो.

कांहीं व्याधी प्रथम निज असून नंतर शस्त्रकर्म प्रयोजनार्ह होऊं शकतात; तेव्हां या तंत्रांमध्यें शल्य म्हणजे आशुगमन करणारे व त्वरित परिणाम करणारे असे बाह्य पदार्थ असतात; विविध तृण, काष्ठ, पाषाण, अस्थि, नख, वगैरे बाह्य पदार्थ. शरीरातल्या शरीरांत सुद्धां शल्यांची निर्मिती होते. अुदाः- सूज पिकल्यावर तयार झालेला पू, दुष्टरक्त, किंवा मृतगर्भ हीं शल्यें आहेत; म्हणून शल्यांचें लक्षण पुढीलप्रमाणें केले आहे.

"अतिप्रवृद्धंमलदोषजं वा
शरीरिणां स्थावर जंगमानाम्
यत्किञ्चित् आबाधकरं शरीरे
तत् सर्वं शल्यं प्रवदन्ति तज्ञाः ।

किंवा मनः शरीर आबाधकरानि शल्याणि ।

असें सूत्रण केलें. अशा या विविध शल्यांचें आहरण करून शरीराला स्वास्थ्य देणें हें शल्य तंत्राचें प्रधान अुद्दिष्ट आहे; या तंत्राच्या विषयामध्यें शरीरांतले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमुख अवयव अुत्तमांग किंवा शिर या ठिकाणीं असणाऱ्या कान, नाक, डोळे, मुख यांचे व्याधी, शलाका या नावाच्या लांबजाडीच्या यंत्रांनीं मुख्यतः बरे करता येतात, म्हणून या व्याधींना अधीक महत्त्व देअुन त्यांच्या चिकित्सेच्या विषयाचा शालाक्य तंत्र असा स्वतंत्र विषय तयार केला. अशा रितीनें शल्य-तंत्र आणि शालाक्य तंत्र असा विषय निश्चित केला.

शल्यतंत्र या विषयाचें क्षेत्रांत माणसाला येऊं लागूं नये म्हणून त्यांचे आहार विहाराचें नियमन शास्त्र-कारांनीं सांगितलें आहे. अतिमधुरादि पदार्थाचे सेवनानें मांस, मेद या धातूंचा शरीरांत अधीक संचय होईल व मांसअर्बुद, मेदअर्बूद अथवा ग्रंथी, अधिमांसादि व्याधी होतील म्हणून त्यांचें अतिसेवन करूं नये असें सांगितलें. नेत्रव्याधी होऊं नयेत म्हणून स्वस्थवृत्तांतच "योजयेत् सप्तरात्रेऽस्मात् स्रावणार्थे रसांजनम्", अशा सूत्रांनें नेत्राचे दोषांचे विस्रावण करावें, म्हणजे नेत्रव्याधी होणार नाहीं अशी सूचना दिली. कान, नाक, तोंड यांचे ठिकाणींही स्नेहन करणें, गुळण्या करणें, असें त्यांचें नैसर्गिक आरोग्य रहावें व त्यांना व्याधी होऊं नये म्हणून अुपचार सांगितलें. जमिनीवर नखानें ओरखडे काढूं नये, असा आदेश दिला. कारण त्यामुळें कुनख, व्याधी (नखुरडें) होण्याची शक्यता असते. मूळव्याध (अर्श) होऊं नये म्हणुन, मलप्रवृत्ति नीट ठेवावी, व अुकिडवें बसूं नये अशा तऱ्हेचा अुपदेश दिला. सारांश शस्त्रव्याध्य व्याधिची निर्मिती होऊं नये म्हणून स्वस्थवृत्त व ऋतुचर्या या विभागांत सविस्तर सूचना दिल्या. या विषयाचा मी येथें फक्त ओझरता उल्लेख केला आहे. बाह्य हेतुज व्याधी, आगंतु व्याधी, हे माणसाचे फारसे हाती नसतात. उदाः– अपघातानें होणारे व्याधी; या मध्येंही "नदीं तरेत् न बाहुभ्याम्" किंवा अग्निपासून दूर असावें, असे विविध उपदेशही सांगितलें आहेत. म्हणजे बाह्य ज्ञात आगंतु कारणें टाळावी.

शल्यजीविन् म्हणजे प्राधान्यानें शस्त्रकर्म करणारे धन्वन्तरी; अशा विद्यार्थ्यांचे ठिकाणीं शौर्यादि गुण असावे लागत. त्यांना तयार करतांना शस्त्रकर्म शिकविण्यापूर्वी मृतशोधन करणें अवश्य असे. मृतशोधन म्हणजे मृतदेहाच्या शरीरांतील पदार्थांचें ज्ञान शवाचे विच्छेदनानें मिळवणें.

"तस्मात् निसंशयंज्ञानं हर्त्रां शल्यस्य वाञ्छता
शोधयित्वा मृतं सम्यग् द्रष्टव्योऽङ्ग विनिश्चयः।

सु. शा. अ. ५।४७

शल्य आहरणादि क्रिया करण्यासाठीं शरीरातल्या अंगाचा व प्रत्यंगांचा स्पष्ट विनिश्चय वैद्याला असावा लागतो; म्हणजे शल्यतंत्राचें विद्यार्थ्यांना शवसंशोधन अवश्य असे. यामुळें शरीरांतल्या पदार्थांचें वैद्याचें ज्ञान वाढतें.

अशा तऱ्हेनें शारीरज्ञान झाल्यावर त्या विद्यार्थ्याचें ठिकाणीं शौर्यादि गुण असावें लागत. तो धीट असावा व त्याचे ठिकाणीं तत्काळ निर्णय घेण्याचा विशिष्ट गुण असावा लागे; शल्यतंत्राचे विद्यार्थी शस्त्रकर्म करणाराचे बरोबर असत व शस्त्रकर्म पहात असत. त्यामुळे त्यांचे रुधिरदर्शनाने होणारे मूर्च्छादि दोष जात. पुढें शस्त्रवैद्य त्यांना विविध छेदनादि शस्त्रकर्मे शिकवी. यासाठीं मृदु मोठाल्या फळावर उदा. (भोपळा) विद्यार्थी छेदादि शस्त्रकर्मे शिकत. पुढें या विद्यार्थ्यांना त्यांचा गुरु रुग्णावर छेदनादि कर्मे करावयास सांगे. व अशा रीतीनें विद्यार्थी दृष्टकर्म व कृतकर्म होत.

शस्त्रकर्म उत्तम व्हावे म्हणून लागणाऱ्या पदार्थांचा पुढील सूत्रांत उल्लेख केलेला आहे :–

शौर्यं आशुक्रिया तीक्ष्णं शस्त्रं अस्वेदवेपथुः।
असंमोहश्च वैद्यस्य शस्त्रकर्माणि शस्यते।

वा. सू. २३। २०.

मनाचा धीटपणा शस्त्रकर्मांत असावा लागतो. शस्त्रक्रिया करतांना होणाऱ्या अपघातानें (अति रुधिर-स्रावादि, किंवा रुग्णाच्या मूर्च्छनादि अवस्थानीं) शस्त्रवैद्य भिअुन जाऊन उपयोगी नाहीं. त्यानें धीट-पणानें पुढील असणाऱ्या अवस्थेला कोणताहि मानसिक तोल न घालवता शस्त्रक्रिया पुढें चालविली पाहिजे वा इष्ट त्या क्रिया केल्या पाहिजेत. शस्त्रवैद्य हा पाटनादि शस्त्रकर्मे गतीनें करणारा पाहिजे. अधिक वेळ लागल्यानें रुग्णाला मूर्च्छादि दोष व ओजक्षय संभवतात; म्हणजे तो चतुरहस्त असावा; त्याचें हाताला स्वेद असणें अगर कंप असणें ह्या अवस्था

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शस्त्रकर्म असम्यग् करणाऱ्या होतात; अतिस्वेदामुळें हातात शस्त्र दृढ रहात नाहीं, व हाताच्या कंपामुळें पाटनादि क्रिया वेडघा वाकडघा होतात. शस्त्रवैद्य धीट असूनही हाताला अधिक स्वेद असू शकतो. अशा वेळीं हाताला रुक्ष चूर्ण लावून मग शस्त्रग्रहण करावें. शस्त्रवैद्याची प्रकृति बरी नसतां हाताला कंप येतो. अशावेळीं त्यानें शस्त्रकर्म करूं नये. शस्त्रवैद्य वृद्ध झाल्यानें हाताला कंप येत असला तर त्या शस्त्रवैद्यानें शस्त्रकर्मांतून निवृत्त व्हावें. शस्त्रवैद्याचें ठिकाणीं असंमोह हा गुण असावा लागतो; शस्त्रकर्म करतांना त्या त्या वेळीं तीं तीं योग्य कर्मे सम्यग् रितीनें त्याचे हातून व्हावी लागतात;

तत् कालोचित कार्यं करणें सम्यग् प्रवृत्तिः।

अशा सूत्रांत असंमोह या शब्दाचें स्पष्टीकरण केलें आहे. आणि या सर्व शस्त्रवैद्याच्या मदतीला असणारे परिचारक व द्रव्यें शस्त्रादि हीहि अुत्तम असावी लागतात म्हणुन वरील सूत्रांत तीक्ष्णं शस्त्रं म्हणजे त्या शस्त्रापासून अपेक्षित असलेले त्याचें कर्म अुत्तम व्हावें, असा अुल्लेख केला.

अशा तऱ्हेनें शस्त्रवैद्य तयार झाल्यावर तो रुग्णालय प्रवेश करीत असे; त्याला कर्ममार्गप्रवेश विशिखानुप्रवेश म्हणत. त्या काळींही शस्त्रकर्म करण्यासाठीं राजांची परवानगी लागे. परवानगी न घेतां शस्त्रक्रिया त्यावेळींही करतां येत नसे. ह्यांतला हेतू स्पष्ट आहे. योग्य अशाच शस्त्रवैद्यांकडून शस्त्रकर्मे व्हावीत व प्रजेचें कल्याण व्हावे हें होय. याचा स्पष्ट उल्लेख खालीलप्रमाणें केलेला आहे.

" अधिगततन्त्रेण अुपासित तन्त्रार्थेन दृष्टकर्मणा कृतयोग्येन शास्त्रं निगदिता राजानुज्ञातेन..... विशिखानुप्रवेष्टव्यः। सु. सू. अ. १० । ३.

उत्तम तंत्र शिकलेला, तंत्राचा भावार्थाचा अभ्यास केलेला व दृष्टकर्म व कृतकर्म असाच शस्त्रवैद्य असावा लागे. राजा त्यांची सहाय्यकाकडून परीक्षा घेई व नंतर त्यांना शस्त्रक्रिया करण्यास परवानगी मिळे.

हे शस्त्रवैद्य देहानें व मनानें निर्मल असावेत. स्वच्छ कपडे परिधान केलेले असावेत व रुग्णांचे बद्दल मनांत आत्मभाव धारण करून त्यांना मदत करून (त्यांचेवर शस्त्रक्रिया करून) त्यांचें कल्याण होईल अशी इच्छा धारण करणारे असावेत.

या शस्त्रवैद्यांना परिचारक (परिकर्मिण) मदतनीस चांगले असावेत. म्हणजे शस्त्रवैद्यांची शस्त्रकर्मे यशस्वी होतील असा अुल्लेख केला आहे;

" परिकर्मिणश्च स्निग्धाः स्थिराः बलवन्तश्च ।
सु. सूत्र अ ५ सू. ६

स्निग्ध म्हणजे प्रेमळ, स्थिर मनानें अचल. धीट व बलवन्त म्हणजे सर्व कार्ये करण्यांत प्रवीण असे असावेत.

नंतर शस्त्रवैद्यानें खालीलप्रमाणें रुग्णपरीक्षा करावी.

" आनुरगृहं अभिगम्य, अुपविश्य, आतुरं अभिपश्येत्, स्पृशेत् पृच्छेत् च । सु. सू. अ. १० ४

अभिपश्येत् .. म्हणजे रुग्णाकडे सर्व बाजूनें पहाणें. या विधींत रुग्ण शयनस्थिती, वदनावर दिसणाऱ्या वेदनेच्या भावना, रुग्णाचें कार्श्य किंवा स्थौल्य इत्यादि गोष्टींचें ज्ञान होत असे. " स्पृशेत् " स्पर्शनानें सार्वदेशीय औष्ण्य, शैत्य, त्याप्रमाणें एक देशीय औष्ण्य, वेदनाऽसहिष्णुता, स्पंद इत्यादिकाचें ज्ञान होतें.

" पृच्छेत् " प्रश्न करून रुग्णाच्या व्याधीचें, वेदनांचें, निद्राबळ अग्नि इत्यादिकाचें ज्ञान होत असे.

या परीक्षणाला त्रिविध परीक्षण असें म्हणत.

षड्विधपरीक्षणः— त्रिविध परीक्षणाहुन विस्तृत असें षड्विध परीक्षण आहे. या त्रिविध परीक्षेपेक्षा षड्विधपरीक्षण अधिक पूर्ण आहे.

" पञ्चभिः श्रोत्रादिभिः प्रश्नेन च "
सु. सू. अ १० सू.

तत्र सफेनं रक्तं ईरयन् अनिलः स्रशब्दः निर्गच्छति ।

श्रोत्रेंद्रियानें व्रणगत स्राव, त्यांतून येणारे रुधिर, व सफेन (बुडबुडे) अथवा वायू व आवाज याचें ज्ञान करून घ्यावे.

स्पर्शनेंद्रियविज्ञेयाः शीतोष्णश्लक्ष्णकर्कश
मृदुकठिनत्वादयः स्पर्श विशेषाः ज्वरशोफादिषु ।

स्पर्शनानें शोफादिकाचें शीतोष्णादि स्पर्श विशेषांचें ज्ञान करून घ्यावें;

चक्षुरिंद्रियविज्ञेयाः शरीरोपयाचयासु लक्षणबलवर्णविकारादयः ।

डोळ्यानें शरीराची आकृति स्थूलादि भेदानें व बलाचें अनुमान करावे.

रसनेंद्रियविज्ञेयाः प्रमेहादिषु रसविशेषाः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्यक्ष जीभ व विषय (ज्याचा रसग्रहण करावयाचा तो पदार्थ) याचा संबंध आणावयाचा नाहीं. परंतु अनुमानानें रसज्ञान करावयाचें. उदा. प्रमेहांत मूत्रांत शर्करा असतां, तें मूत्र पिपीलिकांना (मुंग्यांना) प्रिय होते, अगर व्रण हा भिन्न चिरण्यायुक्त असतां, त्यांत लवणरस आहे असे अनुमान करावयाचें.

" घ्राणेंद्रिय विज्ञेयाः व्रणानां अव्रणानांच गंधविशेषाः ।"

व्रणांचा कुजलेला वगैरे दुर्गंध घ्राणेंद्रियानें ग्रहण करून व्रणाच्या अवस्थेचें ज्ञान करून घ्यावें.

प्रश्नानें देश, काल, सात्म्य, व्याधि उत्पत्ति इतिहास, वेदनाविशेष, बल, अग्नि, पुरीष, मूत्रप्रवृत्ति वगैरेंचें ज्ञान करून घ्यावें;

वरील व्याधी परीक्षणाचीं व रुग्णपद्धतीची माहिती ही सामान्यतः दिली आहे. प्रत्येक व्याधीनुरूप याचा विस्तार वेगळा आहे. येथें फक्त दिग्दर्शन केले आहे;

याप्रमाणें परीक्षण करतांना चूक झाली अगर प्रश्न विचारण्यांत चूक झाली तर वैद्याकडून व्याधीचें परीक्षण यथार्थ होत नाहीं व त्यामुळें वैद्य गोंधळून जातो, व चिकित्सा दुष्फळ होते.

शस्त्रवैद्यानें नंतर चिकित्सेच्या दृष्टीनें रुग्ण योग्य आहे किंवा नाहीं, याचा विचार करावा; साध्य रुग्णांवर चिकित्सा करावी. असाध्य रुग्णावर चिकित्सा करू नय, साध्य रोगांवर चिकित्सा केल्यानें यश, कीर्ती, धन याचा लाभ होतो. व असाध्यांवर चिकित्सा केल्यानें वरील तिन्हीपैकीं कांहीं लाभत नाहीं. उलट दुर्लौकिक होतो साध्य व्याधीसुद्धां कांहीं व्यक्तीमध्यें चिकित्सा पूर्ण करतां येत नसल्यानें त्रासदायक होतात. उदा. अतिबाल, राजसेवक, वैद्यरुग्ण, भित्रे,रुग्ण, कंजूसरुग्ण यांचे व्याधी चिकित्सेच्या दृष्टीनें साध्य असूनही त्रासदायक होण्याची शक्यता असते;

सर्व वैद्यांनीं आपले नैतिक आचरण उच्च ठेवावें असा स्पष्ट दंडक दिलेला आहे; खालील सूत्रावरून त्याची कल्पना येईल.

स्त्रीभिः सहास्यां संवासं परिहासंच वर्जयेत्
दत्तं च ताभ्यो नादेयमन्नादन्यद्भिषग्वरैः ।

सु सू. अ १०।९

शस्त्रवैद्य योग्य आहे कीं नाहीं, याचें लक्षण थोडक्यांत शास्त्रकारांनीं दिले आहे; शस्त्रवैद्याला शोफ म्हणजे सूज याचें पक्व सूज व अपक्व सूज ही ओळखतां यावीत. सूजप्रकरण–व्याधी–हा प्रतीकात्मक घेतला आहे; ज्या वैद्याला पक्वसूज कोणती व आम–अपक्व सूज कोणती हें कळते तो चांगला शस्त्रवैद्य होय. कारण त्या ज्ञानानें पक्वशोफाचें भेदन, व अपक्वाचें पाचनादि क्रिया तो करूं शकतो; जर या अवस्था त्याला समजल्या नाहींत तर पक्वशोफाचें उपेक्षेनें व अपक्व शोफाचें पाटवानें रुग्णाला त्रास होईल व वैद्याची अपकीर्ती होईल.

आमं विपच्यामानंच सम्यक् पक्वंच यो भिषक्
जानीयात् स भवेत् वैद्यः, शेषाः तस्कर वृत्तयः ।

सु. सू. १७।७

याप्रमाणें ग्रंथोक्त शल्यशालाक्य तंत्राचा उपोद्घात केल्यावर पुढील लेखांत प्राप्त विषय शोफ–सूज–याचे विवेचन करूं असे सांगून हा लेख पुरा करतो.

——

वसंत मिश्रण

सुवर्णयुक्त टॉनिक

४० गोळ्या किंमत ४ रुपये

पोस्टानें मागवा.

एग्युमिक्श्चर

कोणत्याहि ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, एग्यूमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें यणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शोधनविधी

(लेखांक २ रा.)

: लेखक :
वै. पु. वि. धामणकर,
धूतपापेश्वर-पनवेल.

शोधनाचे हेतू जमे अनेक, तसेच त्याचे प्रकारहि विविध. शोधनाकरितां द्रव्यें उपयोजिलीं आहेत, त्यांतही विभिन्नता पुष्कळ. त्यांतील सोपी कृति अगर सुलभ औषधी पसंत करून शुद्धिकार्य उरकतां यावें म्हणून हें वैचित्र्य ठेवलेलें नाहीं. तर योग आणि रोग ह्यांचेशीं जुळता मिळता प्रकार लाभावा व कार्यसिद्धि अधिक व्हावी म्हणून हा विस्तार केलेला आहे. निरनिराळ्या योगांत विशिष्ट रीतीनें शुद्ध केलेला शोध्य पदार्थ घ्यावयास सांगितला आहे. उदा.

१८० अमृतरसायन-गोमूत्रशुद्धं विषम् । नू. क.
(र. यो. सा.)

१४७ तालकेश्वर-गृहकन्यारसैःशुद्धं सूतम् । रसचिं.

तसेंच एकाच पाठांतील पृथक् पृथक् द्रव्यें विशिष्ट पद्धतीनें शुद्ध करून घ्यावयास सांगितलेलीं असतात. उदा. १६ कनकसुंदर (र. का.)

तालक — कोहळ्याच्या रसांत
गंधक—दूधांत
माक्षिक—१/४ सैंधव महाळुंगरसांत
मनशीळ—जयन्तीद्रवांत
रसक—नृमूत्रांत
मोरचूद—१ लें पुट १/४ टंकण+मांजराची विष्ठा.
२ रें पुट १/४ ,, + दहीं
३ रें पुट १/४ ,, + मध

तसेंच एकाच पदार्थांवर अनेक शुद्धि केल्याचें उदाहरण म्हणजे ३१० कुष्ठारिरस(र. का.) होय-जसें

चित्रक काढा, लसूणरस, बिब्याचे तेल ह्यांत प्रथम शुद्धपारद एक एक महिना पृथक् पृथक् खलावा. नंतर मालकांगणी, धोतरा, रेणुकबीज, गुंजा, आणि वचनाग यांच्या काढ्यांत, स्वरसांत अगर तैलांत एक एक महिना पारदाचें स्वेदन पृथक्पणें करावें

औषध हटकून गुण देणारें, किंवा रामबाण म्हणजे एका मात्रेंतच काम देणारें व्हावें असें इच्छिणाऱ्या वैद्यानें शोधन, मर्दन, भावन इ. औषधी प्रक्रियांगांत चालढकल करून अगर सौकर्य अथवा सौलभ्य ह्यांकडे लक्ष देऊन भागणार नाहीं. ह्याबाबतचा श्रीमच्चरकाचार्यांचा श्लोकच आदर्श मानणें युक्त ठरतें.

तदेव युक्तं भैषज्यं यदारोग्याय कल्पते ।
सचैव भिषजां श्रेष्ठो रोगेभ्योषः प्रमोचयेत् ॥
च. सू.

ह्याप्रमाणें साध्य साधायचें तर उत्तम औषध हाताशीं असणें अत्यंत आवश्यक असतें.

ह्या लेखमालेंत अनेक ग्रंथांचे आधार दिलेले आहेत. पण ते संक्षेप आहेत. त्यांचा समग्र बोध व्हावा म्हणून त्या आधार ग्रंथांचीं संपूर्ण नांवें व त्यांच्या सांकेतिक-संज्ञा येथें देत आहें.

१ अर्कप्रकाश—अ. प्र.
२ आदर्शनिघंटु— आ. नि.
३ आयुर्वेदप्रकाश— आ. प्र.
४ औषधीसंग्रह—औ. सं.
५ कल्याण कारक— क. का.
६ कामकुतूहल— का. कु.
७ नावनीतकम्— ना.
८ निघंटरत्नाकर— नि. र.
९ पारद संहिता — पा. सं.
१० बृहद्योगतरंगिणी — बृ यो. त.
११ भारतभैषज्यरत्नाकर— भा. भै. र.
१२ भावप्रकाश — भा. प्र.
१३ भैषज्यरत्नावलि— भै. र.
१४ योगरत्नाकर— यो. र.
१५ योगचिंतामणी— यो. चिं.
१६ रसयोग सागर— र. यो. सा.
१७ रसहृदयतंत्र— र. हृ. तं.
१८ रस मंजरी— र. मं.
१९ रस कामधेनु— र. का. धे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२० रस जलनिधी-- र. ज. नि.
२१ रसतरंगिणी— र. त.
२२ रसेंद्रचिंतामणी — र. चिं.
२३ रसपद्धति — र. प.
२४ रसरत्नसमुच्चय— र. र. स.
२५ रस चंडांशु— र. चं.
२६ रसार्णव-- र.
२७ रसप्रकाश सुधाकर— र. प्र. सु.
२८ रससंकेतकलिका-- र. सं. क.
२९ रसायनसार-- रसायन
३० रसचिंतामणी-- र. चिं.
३१ रसेंद्रभास्कर— र. भा.
३२ रसेंद्रसारसंग्रह— र. सा. सं.
३३ रसोद्धारतंत्र— र. तंत्र
३४ लोहसर्वस्व-- लो. स.
३५ वनौषधी गुणादर्श-- व. गु.
३६ वैद्यसारसंग्रह-- वै. सा. सं.
३७ शारंगधर-- शा.
३८ रसेंद्र चूडामणि – र. चू.
39 Indian Pharmaceutical Codex (I. P. C.)
40 Indegenous Drugs of India– Sir R. N. Chopra.
41 Pharmacographia India– Dymock.
42 United States dispensalory– U. S. D.
43 Text book of Pharamacognosy–Wallis or Denston
44 Pharmacopia Indica– Dr. Bose.
45 Indian Plants and Drugs– Dr: Kirtikar.

आलें

सं. आर्द्रकम् । इं. Ginger लॅ. Zinziberetc.

चरक संहितेंत पदार्थांचे बराबरत्व सांगतांना– " श्रृंगवेरं कन्दानां । (श्रेष्ठम्) " असें सांगितलें आहे. आलें मिळतें तें अखंड अविकल असतें. तेव्हां त्याबाबत प्रश्नच नाहीं. पण आलें सुकवून त्याची सुंठ करतांना विचारांत घेतां यावेत म्हणून आर्द्रक-शोधनाची माहिती येथें देत आहे.

कफाचा नाश करतें. (आर्द्रकम् ।) कंद औषधी आहे (कंदौषधम् ।) ह्या कंदावर शिंगासारखें तुकतुकीत, चिवट आणि पातळ कवच असतें (श्रृंगवेरम) ह्या संरक्षक आवरणामुळें वातावरणांतील आघातापासून त्याचा बचाव होतो. तें सहजासहजीं मरतही नाहीं. अर्थात तें सुकविणें हो गोष्ट अत्यंत अवघड होऊन बसतें. तेव्हां ह्यांतला जीव जावा व तें लौकर सुकावें म्हणून कांहीं प्रक्रियांचा अवलंब करतात. उदा.:–

१ कंदावरील कठीण कवच तीक्ष्ण सुरीनें खरडून अथवा तासून काढतात.

२ कवचयुक्त कंद उकळत्या पाण्यांत कांहीं काल बुडवून ठेवतात.

३ सफ्ल्युरस ॲसिड, क्लोरीन ह्यांचे संस्कार करतात.

४ कॉल्शियम् सल्फेट अगर कार्बोनेटचें आवरण देतात.

संस्कार परिणाम.–

१ कवच काढतांना त्यांबरोबर गंधद्रव्यांचे पिंड तासले गेल्यास त्या द्रव्याची उणीव जाणवते.

२ अग्नि संस्करणानें कंदांतील तिखटपणा कमी होतो.

३ ह्या प्रक्रियांमुळें दोन्ही दोष संभवतात.

४ हीं द्रव्यें सदोष असल्यानें सेवनीय पदार्थांत सुंठ उपयोजतांना तद्दोष हरण करणें जरूर असतें. तें गरम पाण्यानें सुंठ धुऊन घेतल्यानें पुष्कळसें साधतें.

(1,2) "The rhizomes are dug up and prepared for the market in different ways. In Jamaica, the best ginger is prepared by washing the rhizomes, removing their outer coating with a sharp knife, washing them again, and finally drying them in the sun. Sometimes, the rhizomes are

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

parboiled before drying, the process being known as 'bleaching'. This process has nothing to commend it and may seriously affect the active principle, if carried to excess. The peeling is a matter of great importance owing to the fact that the essential oil, to which the aromatic character of ginger is due, is present in the epidermal tissue, so that excessive scraping may impoverish the quality of the spice.

[Sir Dr. R. N. Chopra.

सुंठ करण्याचा उत्तम मार्ग

आल्याच्या पातळ काचऱ्या करून त्या सावलींत वाळविणें हा होय. आणि हीच खरी औषधी सुंठ. असें जरी आहे तरी एवढ्यानें आल्याचे गुण सुंठींत जसेच्या तसें येत नाहींत. आलें सुकतांना त्यांत कांहीं रासायनिक परिवर्तन होऊन, आलें सारक, कटुविपाकी, शीतल तर सुंठ अवष्टंभक, मधुरविपाकी, उष्ण असा ह्या दोहोंत फरक होतो. त्यामुळें आलें अथवा त्याचा रस ह्यांचे प्रतिनिधि म्हणून सुंठ अथवा तिचा काढा मान्य करतां येत नाहीं.

रसशास्त्रः--

Ginger contains from 0·25 to 3P.C. of volatile oil possessing the aroma but not the pnngency of the drug. The latter property is due to yellowish oily body, gingerol which is odourless but has an intensing pungent taste. The drug contains in addition rosin and about 56 P.C of starch. It yields from 2·4 to 5·4 P.C. of ash and 1·8 to 3·4 P.C. of ash soluble in cold water. The crude fibre varies from 1·7 to 9 P.C. with an average of 4 P.C. (Wallis)

बाजारांत आलें मिळतें त्यांत दोन प्रकार आढळतात. एकांत रेषामयभाग अधिक तर दुसऱ्यांत पिष्टमय. आल्याचा रस चाळणीनें चाळला तर आर्द्रकसत्व रसाबरोबर खालीं उतरतें आणि तो रस औषधांत घातल्यास औषध विरल बनतें व वाढतेंही. ही गोष्ट अफू शुद्धींत इष्ट असतें. म्हणून तेथें ससत्व रस योजावा. पण दीपन, पाचन, सहतत्व हे गुण वाढवावयाचें असले तर रस जाड फडक्यानें गाळावा म्हणजे सत्व फडक्यावर राहतें. किंवा तो रस निवळत ठेवल्यास सत्व तळाशीं बसतें व रस वर राहतो, तो घ्यावा आणि औषधांत घालावा.

कळलावी

सं. कलिकारी. इं. Gloriosa Superba.
म. खड्यानाग

कळलावीच्या वेली पावसाळ्यांत कुंपणांतून उगवतात. हिचीं फुलें फार आकर्षक असतात. त्यांच्यामुळें बागेस उत्तम शोभा येते किंबहुना शोभेचीं फुलें म्हणूनच त्यांची लागवड करतात. ह्या फुलांत इंद्रधनुष्याप्रमाणें अनेक रंग असतात. (इंद्र पुष्पा, शक्रपुष्पा) हिच्या फुलाला पाकळ्या असतात. त्यांचा आकार जीभेसारखा असतो, व त्या वाऱ्यानें फार हालतात. (अग्निजिव्हा, वन्हिशिखा, ज्वालामुखी.) हिचा कंद नांगराच्या जमिनींत जाणाऱ्या भागासारधा असतो. (लांगलिनी, लांगली, हलिनी, सीरी) गर्भ अगर जरा पातन धर्म अंगीं असल्यानें (गर्भहरा, अपरापातिनी) प्रनष्ट शल्य बाहेर काढते व ती जागा शल्यरहित करते. (विशल्या)

हिचें फल, वेल आणि कंद विषारी आहेत. पण औषधीयोगांत कंद इष्ट मानला आहे. ह्यांत नर व मादी असे दोन प्रकार असतात. पैकीं नरजाति औषधी श्रेष्ठ होय; असें एतद्देशीयांचें मत असल्याचें सर्जन मेजर थॉमसन् ह्यांनीं नमूद केलें आहे. (डीमक्)

गुणाः—

कलिहारीसराकुष्ठ शोफार्शोव्रणशूलजित् ।
सक्षारा श्लेष्मजित् तिक्ता कटुका तु वरापि च ॥
तीक्ष्णोष्णा क्रिमिजित् लघ्वी पित्तला गर्भपातिनी॥
(भा. प्र.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसशास्त्रः--

कळलावींत दोन राळी, कषायद्रव्य, कटुविषारीसत्व आहे. (औ. सं.)

Chemical Composition.

The root has been examined by Warden who obtained from it two resins, a tanin, and volatile principle which is provisionally named 'Superbine.' He considers the bitter principle is closely allied to, if not intenticated with that of squills. (Dymoc)

Clewer green and Tutin reported the presence of colchicine with another base possibly methylcol chicine and chlorine. (U.S.D.)

शोधन प्रकार

१ लागली शुद्धिमायाति दिनं गोमूत्र संस्थिता ।
यो. र., र. चं., वै. सा. सं.

२ गोमूत्र आणि दुधांत ४।४ प्रहर कळलावी शिजविल्यानें ती शुद्ध होंते. (पं हरिप्रपन्न)

३ कळलावीच्या कंदाच्या चकल्या ताकांत चार पांच दिवस भिजत घालून मग सुकवितात. म्हणजे आंतील विष कमी होतें व तें औषध पोटांत देण्यास योग्य होतें. (डॉ. डीमक् व डॉ. देसाई.)

शोधक	विधी	काल	
१ गोमूत्र	निमज्जन	८ प्र.	यो. र., वै. सा. सं., र. चं.
२ गोतक्र	निमज्जन	४ दि.	डॉ. डीमक्, डॉ. देसाई
३ गोदुग्ध	स्वेदन	४ प्र.	पं. हरिप्रपन्न
४ गोमूत्र	स्वेदन	४ .	प्रं. हरिप्रपन्न

कळलावी कंद कार्तिक मागशीर्षांत तयार होतो. हा जमिनींत तर जगतोच. पण उघड्या हवेंत ठेवला तरी तो हवेंतल्या ओल्यावरही जगतो. इतकेंच नव्हे तर अनुकूल ऋतू लाभतांच तेथेंही त्याला कोंब फुटूं लागतात. ह्या अर्थानें तो आल्याप्रमाणेंच अमर आहे. हा त्वचेवर लावला असतां तेथें लागलींच गांध येते.

आलें आणि सुंठ ह्यांत थोडासा फरक होतो. पण कळलावीचे काप वाळतांना त्यांत रासायनिक परिवर्तन होऊन तीमधील विषसत्व निर्विष होतें. म्हणून ही ओली वापरण्यास सांगितली आहे. शुद्धि संस्कारानें तीमधील जहाल विष प्रमाणतः अगर वीर्यतः कमी होते. (" येदुर्गणा विशेऽशुद्धे ते स्युर्हीन विशोधनात् तस्माद्विषं प्रयोगेषु शोधयित्वा प्रयोजयेत्–आ. नि. ।) पण तें निःशेष अथवा निर्वीर्य होत नाहीं: शुष्क कळलावी मात्र अशी होते. म्हणून ती औषधींत निरुपयोगी.

शोधक द्रव्यांत तीन प्रकार आहेत. विषसत्व किती राखायचें; हें प्रथम ठरायला पाहिजे. तदनंतर कोणता शोधकद्रव कोठें योजायचा हा विवेक साधला पाहिजे. उ. महाविषगर्भ इ. तैलांत गोदुग्ध, अर्शकुठारांत–गोमुत्र, कालकूटांत-ताक.

कोहळा

(म.) भुर्कोहळा (सं.)–कूष्मांड–फल
(लॅ) BENICASSA CERIFERA

(म.) भुईकोहळा. (सं.)–कूष्मांड–कंद
(लॅ) IPOMIA DIGITATA.

(म.) बेंद्रीचा कांदा (सं)–कूष्मांड–कंद
(लॅ) PUERARI TUBEROSA.

१ भुर्कोहळा

श्री. चरकानें 'मृद्वीका फलानां (श्रेष्ठम्) ।" असें म्हटलें आहे. श्री. वाग्भटानेंही "द्राक्षाः फलोत्तमाः ।"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें म्हटलें. पण "वल्लीफलानां प्रवरं कूष्मांडम्।" असेंही म्हटलें आहे. दोन्ही फळें उत्तमच आहेत. हें फळ वर्षभर चांगलें टिकतें. किंबहुना तदनंतरच ते वापरण्याला योग्य होतें. कारण "वृन्ताकं बहुबीजानां कूष्मांडं कोमलं विषम्॥" असें शास्त्रवचन आहे. (व. गु.) म्हणून तें एक वर्षाचें जुनें होऊं देणें हा एक शुद्धि प्रकारच आहे. ह्या फळाचें गुण ह्याचें रसांतच असल्यानें तें ओल्या वापरावयाच्या पदार्थांत गोंवलें आहे.

गुण:-

मूत्राघातहरं प्रमेहशमनं कृच्छ्राश्मरी छेदनम्।
विष्मूत्रग्लपनं तृषार्ति शमनं जीर्णांग पुष्टिप्रदम्॥
वृष्यं स्वादुतरं त्वरोचकहरं बल्यंच पित्तापहम्।
(कूष्मांडं प्रवरंवदन्ति भिषजो वल्ली फलानांपुनः।)
वातपित्तहरं हृद्यं बस्तिशुद्धिकरं तथा॥ (रा. नि.)
चित्तवैकारनुत् प्रोक्तं 'धन्वतरि निघंटके।'
कफवातहरं रूक्षं संप्रोक्त 'केयदेवके'। नि. शि.

२ भुईकोहळा

ईक्षुविदारी आणि क्षीरविदारी असे ह्याचे दोन भेद आहेत. पहिल्याचा आंतला भाग ऊंसाप्रमाणें असतो. ह्यांत फक्त रेषा अगर तंतुमय भाग व पाणी असतें. ह्या पाण्यांतच ह्याचे गुण असल्यानें हा ओलाच घ्यावा लागतो. ऊंस वाळल्यानंतर होणारी स्थितीच ह्याचीही होते. म्हणून हा सुकवूं नये. अगर सुकलेला घेऊं नये.

क्षीरविदारी:-हा कंद अंतरत: सुरणासारखा असतो. ह्यांत कांहीं रेषा व कांहीं पडदे; पण पीठ आणि चीक पुष्कळ असतात. आणि ह्याचे गुण ह्याचे चीकांत व पीठांतच असतात. आणि हा एकदां सुकलाकीं तो अत्यंत कठीण अशा लांकडासारखा होतो. ह्यांतील पीठ अगर चीक पुन: उमलत, फुलत नाहींत व कार्यकारीही होत नाहींत. म्हणून हा कंदही ओलाच वापरावयास सांगितला आहे. ह्यास कोंकणांत 'हळघाकांदा' अगर 'पांढरा भुईकोहळा' असें म्हणतात. अमृतप्राश (वाग्भट) सारख्या औषधी कल्पांत ओल्या कंदाचा रसच उपयुक्त ठरतो.

क्षीरकंदो द्विधा प्रोक्ते विनालस्तुसनालक:
विनालो रोगहर्ता स्याद्वय स्तंभी सनालक:। नि.शि.

शतावरी, लसूण इ. कंदामध्यें एक दांडा असतो. त्यामुळें त्याला सनालकंद म्हणतात. भुईकोहळघांत असें कांहीं नसतें.

गुणा:--

अथ क्षीरविदारी तु म ुराम्ल कशायक:
तिक्ताच पित्तशूलघ्नी मूत्रमेहहरा 'नृपे'।। नि.शि.

रसशास्त्र:—

भुई कोहळघांत पीठ पुष्कळ, साखर १० टक्के व फार अल्प प्रमाणांत जालपत्रध्यें असलेली अनुलोमिक राळ आहे. (डॉ. देसाई)

शोधन प्रकार

१) ताक अगर चुन्याचें निवळींत एक प्रहर भिजत घालून वाळवावा (परंपरा)

२) भुईकोहळा सोलून त्याचे लहान लहान तुकडे करून ते तासभर दुधांत शिजवून वाळवावेत.

पचन सुलभता लाभण्याचे दृष्टीनें हे दोन्ही शोधन विधी उपयुक्त मानले गेले आहेत पण ह्यांना शास्त्राधार नाहीं.

३ वेंद्रीचा कां ।

कोकणांत कोहळघाच्या दोन जाती आहेत—साधा भुईकोहळा व दूधभुईकोहळा. (क्षीरविदारी) साध्या भुईकोहळघाच्या वेलास बेंद्रीचा वेल म्हणतात. ह्याची पानें त्रिदळ असतास हा वेल घोडे खातात म्हणून ह्या वेलास घोडवेलही म्हणतात. व कंदास बेंद्रीचा कांदा म्हणतात

गुणा:--

विदारी मधुराशीता गुरुस्निग्धास्रपित्तजित्।
कफकृत्पुष्टिकृद्वल्या 'नृपे' विर्य विवर्धनी।
धन्वे समीरजित् प्रोक्ता 'केये' स्वर्यातथैवच।
वर्णदास्तन्यदा प्रोक्ता 'द्रव्ये' वांतिजित्तथा।
रक्तहृद्वात हृच्चैव प्रोक्ता 'मदन पालके'।नि.शि.

रस शास्त्र:--

Chemical Composition:- The peeled tubers in slices, dried by exposure to hot air, and reduced to powder, lost 5·21 per cent. of moisture at 100 C. The ash amounted to 18 01

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

per cent. No trace of manganese could be detected in the ash.

The fresh tubers afforded no reaction for starch. Saccharine matter was present which reduced Fehling's solution. A bitter principle an easily oxidizable rasin, and a rasin acid were also present in addition to the principle which we have mentioned as being probably allied to inulin.

(Dymock)

कोंकणप्रांती ह्याची शुद्धि प्रचलित असल्यास ती कळविण्याची कृपा करावी; ही विनंती.

पुढीलअंकी:– वचनाग, लसूण, वांकेरी, शतावरी, सुरण, हळद.

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अ शा श क्ति शा ली

'अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स' चा

उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.

सूचिपत्र मागवा.

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन-चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापक:– अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)

अखेर शोध लागला !

ग्रामीण जनतेला जर्जर करणाऱ्या

नारूच्या सांथीवर

खात्रीलायक उपाय सांपडला

नारूच्या कोणत्याही अवस्थेंत त्वरित व हमखास प्रभावी ठरलेलें

"बी. वी. सी." चें

ड्रॅक्युलॅन

त्वरित मागवा.

सोल डिस्ट्रिब्यूटर्स :—

धूतपापेश्वर सेल्स कॉर्पोरेशन लि. धूतपापेश्वर प्रासाद

मुंबई नं. ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथ पित्तम्..।

: लेखक :
गो. आ. फडके
आयुर्वेदाचार्य

पित्ताचे रस.... व पित्तप्रकृति-

साक्षात् अग्नीला वायु प्रमाणें कोणताच रस नसतो. पण इतर भूतांच्या साहचर्यामुळें त्यावर रस आरोपिला जातो. पित्त हे आयुर्वेदांत पांचभौतिक द्रव्य मानले असल्यामुळें त्याला रसही मानावा लागला. प्रत्येक द्रव्य षड्रसात्मक असते. पण त्यांत ज्याचे आधिक्य असेल त्याप्रमाणें त्या रसाचें तें द्रव्य आहे असें मानलें जाते. षड्रसांपैकीं अम्ल, लवण, व कटु हे तीन आग्नेय रस आहेत. ते पित्त समान आहेत. अग्नि व पृथ्वी, अग्नि व जल, आणि अग्नि व वायु अशा दोन दोन भूतांच्या आधिक्यानें अनुक्रमे हे तीन रस होतात. अग्नि हे तत्व शरीर देहांत पृथ्वी, जल, व वायु यांच्याशीं संमिश्र होते. व त्यामुळे विविध तऱ्हेची कार्यें अग्नि तत्वाची पहावयास मिळतात. शरीर व्यापार चालण्याचे दृष्टीनें असे संयोग तेजाचें इतर भूताशीं होणें इष्ट असतें. त्या त्या भूतांच्या संयोगामुळें अन्य अन्य कार्यें करितां येतात. पचन व्यापारांत पृथ्वी व अग्नि, वायु व अग्नि-असे संयोग निर्माण होतात. याच संयोगांना अनुक्रमें अम्ल व कटु रस असें म्हटलें जाते व हे दोन पित्ताचे रस आहेत.

उष्णं कटुरसं चैव विदग्धं चाम्लमेवच।

सु. २१-११

त्यांत विदग्ध पित्ताचा रस अम्ल असतो व पक्व पित्ताचा रस कटु असतो. पचन करणाऱ्या अवयवांत अन्नाचे जसजसे पचन पुढे पुढे होत जाईल तसतसे हे पित्ताचे रस बदलत जातात. अन्नाच्या पाक क्रियेंत मधुर, अम्ल व कटु हे तीन अनुक्रमें कफ, पित्त, वातांचे रस निर्माण होतात व ते आपापल्या सदृश द्रव्यांचें पचन करतात. मधुर कफसदृश द्रव्याचे, अम्ल पित्तसदृश द्रव्यांचे व कटु वायुसम द्रव्यांचे पचन करितो. आमाशयांत, ग्रहणींत व पक्वाशयांत अनुक्रमें ही पचनाची क्रिया चालते. त्यांत प्रथम पाकानंतर अन्नाला विदग्धत्व अथवा अम्लत्व येते. अन्न प्रथम षड्रसात्मक असते. त्या षड्रसांपैकीं पार्थिव व जलीय अंशाचें (मधुरप्रधान) पचन प्रथमावस्थेंत होते. व मग आग्नेय अंशांचें होते. या वेळीं विदग्धा अथवा अम्लता येते व शेवटी वायलीय अंशाचे पचन होते. अग्नि व वायु यांच्या संयोगानें कटुत्व हे शेवटीं प्रत्ययास येते. यासाठीं पक्व पित्ताचा रस, म्हणजे पक्वाशयांत आलेल्या पित्ताचा रस कटु सांगितला आहे.

षड्रसात्मक द्रव्याच्या या त्रिविध अवस्था आहेत. या त्रिविध अवस्था पचन मार्गांत असणारे मधुर, अम्ल व कटु हे तीन रस निर्माण करितात. किंवा दोषांच्या भाषेंत कफ, पित्त व वात ह्या अवस्था निर्माण करितात.

अन्न पचनानंतर आहार रस ग्रहणीकडून शोषला अथवा ग्रहण केला जातो व तो मग हृदयाश्रयी होतो.या रसाचें पचन परत शरीर धातूंतील अग्नीकडून व्हावयाचे असते. तेथेंही विविध रस परत निर्माण होतात. रक्तांत मधुराबरोबर लवण रस असतो. रस मधुर पण त्याच्या पाक क्रियेंत रक्त धात्वग्नीचें अग्नीकडून स्वशरीरपोषक असे रस परत निर्माण केले जातात. पण पाक करणाऱ्या म्हणजे अंतरमार्गांत मुख्यत: अम्ल व कटु हे रस असतात.

पचन हे मुख्य कार्य पित्ताचें असल्यामुळें दीपन, पाचन या क्रिया पुरतांच उल्लेख अम्ल व कटु रसात्मक पित्त म्हणून केला. अग्नीला पचन करण्याला मदत पृथ्वी, जल व वायु या तिघांचीही लागते. त्यांत पक्वाशयांत अग्नीला मदत वाताची मिळते व त्यामुळे तेथें अग्नि व वायु यांच्या संयोगाधिक्यानें कटु रस येत असतो. अग्नीचे गुण वाताच्या क्रियेला सर्वच कांहीं अनुकूल नसतात. पचनाच्या क्रियेपुरते अनुकूल असतात. रूक्ष, बद्ध, विट्कत्व स्नेह, क्लेद यांचे शोषण-ही कर्मे कटु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसाची–वाताधिक्याची आहेत. म्हणजे पक्व पित्त अथवा कटु रसात्मक पित्त ज्यांत वाताचे आधिक्य असते असें पित्त ही कार्यें करितें. उलट लवण अथवा अम्ल रसाश्रयी पित्त, विट्, मूत्र व मारुत यांचे स्रंसन करितात. जल, पृथ्वी, ही स्निग्ध आहेत. तसेच तो सर अथवा अधोगामी आहेत. प्रत्यक्ष सर हा गुण अग्नि या तत्वात नाहीं. पृथ्वी, जल यांच्या साहचर्यानें तो अम्ल-रसात्मक पित्तांत आला आहे. पित्ताचा कटु रस उष्ण आहे. पण त्यांतील औष्ण्य कमी दर्जाचे आहे. कारण ते पक्व झालेले आहे. औष्ण्य, अम्ल रसाच्या पित्तांत जास्त असते. कारण तें पच्यमान अवस्थेंत अथवा पाकाच्या विदग्धावस्थेंतील असते. लवण रसांत ते जास्त प्रमाणांत संचित करून ठेवलेले असते. म्हणजे अग्नीतील औष्ण्य पृथ्वींत, किंवा त्याही पेक्षा जलाच्या आश्रयानें म्हणजे लवण रसाच्या रूपानें अधिक प्रमाणांत राहात असते. जल शीत, अग्नि उष्ण त्यांच्या संयोगांत अग्नीचे औष्ण्य कमी व्हावयास पाहिजे, पण शरीर व्यापारांत अग्नि व जल याचे ऊष्ण व शीत हे गुण विरोध करीत नाहीत. उलट जल, अग्नीला आश्रय देतें असाच अर्थ याचा दिसतो. सर्व धातु विशेषतः रसरक्त या धातूंच्या आश्रयात-लवण रस प्राकृतिक स्थितींत पहावयास मिळतो. म्हणजे तेथें जल-अग्नि संयोग असतो.

त्या रसरक्तापासून लवण रसांतून विभजन होवून पृथ्वी अग्नि संयोग पित्ताचा अम्लरस म्हणून आमाशय, आंत्र यांचे मार्फत घनविला जातो व पुढे, अग्नीवायूचा संयोग घडवून कटुरस उत्पन्न होतो. असा विविध रसात्मक पित्तांचा संबंध शरिरांत आढळून येतो. त्यांत पचन क्रियेंत अम्ल व कटु हे रस निर्माण होतात. आणि धातुंत लवण रस असतो. किंवा अवस्थेप्रमाणें अग्नितत्वाचे संयोग इतर भूताशीं होवून या धातू असणाऱ्या लवणापासून अम्ल व कटु हे] रस पचन क्रियेंत निर्माण करणें या जिवंत देह कलेत शक्य असते.

विपाक तीन सांगितले आहेत. त्यांत लवण विपाक नाहीं. लवण रसाचा विपाक अथवा रसान्तर मधुर होते पण तें उष्ण वीर्याचें असते. या लवणापासून परत देहधातूंचे अग्निकडून पित्तवर्धक लवण रस निर्माण होवूं शकतो. म्हणूनच आपल्या रसरक्तांत लवण रस सांपडू शकतो.

—पित्त प्रकृति—

पित्त प्रकृति ही मध्यम प्रकृति आहे. शरिराचे व्यापार शंभर वर्षें नीट तऱ्हेनें चालण्यास शरिराची जी ठेवण व त्यांत जें गुण लागतात ते त्यांत पूर्णांशानें नसतात. पित्त प्रकृतींत पित्त हेच कफवातापेक्षां अधिक कार्यकारी असल्यामुळें पित्ताचेंच स्वरूप त्या देहांत व त्या देहाचे व्यापारांत पदोपदीं दृष्टीस पडतें. पित्ताची मुख्य क्रिया पचन ही असल्यामुळें वातासारखी गति अथवा हालचाल अधिक नसते किंवा त्याचे उलट कफा-सारखे मंदत्व ही नसते. अशी मध्यम अवस्था पित्त प्रकृतीची असते. चल हा गुण यांत नसतो. त्यापेक्षां कमी दर्जाचा गुण सर हा यांत असतो. पित्त प्रकृतींच्या देह घटकांत संघटना जास्त नसते किंवा विघटना अथवा व्ययही जास्त नसतो. संघटना ही मध्यम व व्ययही मध्यम असतो. आय व व्यय सारखाच असतो. पित्त प्रकृतीचे शरिरांत व्यय अथवा खर्च वात प्रकृतीप्रमाणें भरमसाट नसतो. किंवा कफाप्रमाणें अगदींच झीज कमी अशीही स्थिती नसते. सर्व कांही मध्यम प्रमाणांत असते. पित्त प्रकृतीच्या देहांत व देह व्यापारांत पित्ता-च्या उष्णादि गुणांचाच परिणाम अधिक प्रमाणांत दिसून येतो. पित्त प्रकृती मनुष्य कृशही नसतो, फार स्थूलहि नसतो. मध्यम असतो. त्याचे केस पिंगट असतात. त्याच्या अंगावर केस कमीच असतात पण ते राकट नसून मृदु असतात. त्याचे केस लवकर पिकतात. लव-कर गळतात. त्याला टक्कल पडते. त्याच्या कपाळावर व तोंडावर वार्धक्याच्या सुरकुत्या लवकरच येतात. पित्तामुळें पचन लवकर होतें व त्यामुळें देह लवकर पक्व होतो. त्याचे नेत्र मध्यम आकाराचे असतात. भिवया पापण्या यांचा रंग भुरा असतो. कृष्ण मंडळ निळे, हिरवे, घारे असते. श्वेत मंडळ आरक्त असते. वारंवार त्याचे डोळे लाल होतात. बाहुल्या मध्यमसर असतात. चेहरा–तोंडावळा लहानसर नसतो. फुगीरही नसतो. मध्यमसर असतो पण आरक्त असतो. ओष्ठ, जिव्हा तालु, कान, नाक, आरक्त असतात. तोंडांत मुखस्त्राव भरपूर असतो. डाळिंबी रंगाच्या हिरड्यावर दांत शोभून दिसतात. एकंदर पित्त प्रकृतीचा चेहरा तेजस्वी दिसतो. तळहात, तळपाय प्रसन्न व आरक्त असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नखे लाल असतात. पित्त प्रकृतीची माणसें सुन्दर व सुकुमार असतात. शरीरावरील सर्व त्वचा आरक्त असते पण त्यावर तीळ, पिडका ही पुष्कळच असतात. या माणसांना क्लेश फारसे सहन होत नाहींत. ऊन सहन होत नाहीं अशी अत्यंत नाजूक प्रकृती त्यांची असते. त्यांच्या उदरांत पित्ताचे पचनाचे व्यापार तीव्रतेनें चालतात. त्यामुळें त्यांना भूक व तहान फार लागते. अग्नि त्यांचा तीक्ष्ण असतो. पित्त प्रकृताची माणसें भरपूर खातात व पितात. पुनः पुनः त्यांना खावें प्यावें असें वाटते. पित्त प्रकृतीच्या माणसांच्या कोठयांतही पित्ताचे अधिक्य असल्यामुळें मल व मूत्र विसर्जनाची क्रिया व शक्ति या देहांत पुष्कळ व वारंवार होते. यांची शौचाला साफ होत नाहीं अशी कधींच तक्रार नसते. उलट दूध प्याले, ताक प्याले, जरा थोडे तिखट खाल्ले कीं रेच होतात. पित्त प्रकृतीच्या माणसांना घामही पुष्कळच येतो. थंडी, पावसाळा यांतही यांना घाम येत असतो. त्याच्या अंगाला, घामाला, तोंडाला, कपडयाना एक प्रकारची दुर्गंधी येत असते.

पित्त प्रकृतीची माणसें फार श्रम करीत नाहींत. उन्हांत हिंडणें, विस्तवापाशीं शेकणें, कोणतेही उष्ण पदार्थ, किंवा उष्ण वातावरण त्यांना आवडत नाहीं. त्यांना सर्व थंड पदार्थ आवडतात. मधुर कषाय तिक्त व शीत पदार्थ ते जास्त प्रमाणांत खातात व त्यामुळें त्यांना बरेही असते. वाळा, चंदन, कापूर व जाईजुई कमल यांचो फुले व माळा यांचे वास पित्त प्रकृतीना फार आवडतात. पित्त प्रकृतीची माणसे तेजस्वी तशी ती अत्यंत बुद्धिवानही असतात. कोणत्याही विषयांत त्यांची बुद्धी प्रविष्ट लवकर होते. तशीच ही माणसे शूर, पराक्रमी आणि मानी असतात. ती चारित्र्यसंपन्न आणि विशिष्ट ध्येयवादी आणि लहरी असतात. त्यांना मुलें थोडी असतात. पण आपल्या मुलाबाळांवर प्रेम फार करितात. तशीच ही माणसे फार संतापतात व संतापली म्हणजे त्यांचा क्रोध लवकर शांत होत नाहीं. शरीर, शरिराचे व्यापारांत-मनांत मनाचे व्यापारांत सर्वत्र पित्ताचे गुण दिसतात. त्यांना जीं स्वप्नें पडतील तीही पित्तप्रधानच असतात. स्वप्नांत विजा प्रकाशत आहेत. दिशा पेटलेल्या आहेत. सूर्य प्रखरतेनें तळपतो आहे. विस्तव पेटला आहे. जास्वंदीची फुलें, पळसाची फुलें, पसरलेली आहेत. अशी आरक्त, पित्त व्यें ही त्यांना स्वप्नांत सारखी दिसत असतात. पित्त प्रकृतीच्या देहांत धातू पोषण आणि वर्धन आणि धातु संग्रहण हें विशिष्ट पद्धतीनें होत असल्यानें त्यांचे शरीर शिथिल, मृदु राहते. मांसधातु इतकासा बलवान राहूं शकत नाहीं. त्यामुळें त्यांचेकडून श्रम फारसे होत नाहींत. त्यांचे बळ मध्यम स्वरूपाचे असते. पंचमहाभूतात्मक समवाय प्रदीर्घ काल टिकत नाहीं. त्यामुळें हीं माणसें मध्यम आयुष्याची असतात. त्यांना जिवित सुखाची द्रव्यादि साधनेंही मध्यम स्वरूपाचीच लाभत असतात.

वाघ, सिंह, मांजर या प्राण्याप्रमाणें स्वरूप व चेष्टानुकरण पित्त प्रकृतीच्या माणसांत आढळते. उष्ण, तीक्ष्ण, द्रव, विस्र हे पित्ताचे गुण त्याच्या देहांत नखशिखांत आढळत असतात.

—सेवा—

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते. अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधें वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोअर्स

पायधुणी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे. युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें मुख्य केंद्र.

अर्कशाला औषधांबद्दलचे आपले अनुभव ग्राहक, वैद्य व विक्रेते यांनीं कळवीत असावे ते मार्गदर्शक ठरतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गुरुकुल-पत्रिका
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

अनुभवसिध्द
अर्कशाला औषधें

युटोन
गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन
रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण
जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन
बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन
मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृध्दिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

GURUKULA-DEL... SAHARANPUR
7 JUL 15

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्रमित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

ऑगस्ट] [१९५४

: प्रमुख संपादक :
वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य

: कार्यकारी संपादक :
ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत.....

शोधन विधी — वैद्य पु. वि. धामणकर
अथ पित्तम — वैद्य गो. आ. फडके
आयुर्वेदीय शल्य तंत्राचें वैभव — वैद्य दि. वि. साठे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा
या संस्थेचें मासिक

—आयुर्मीमांसा—

: संचालक :
आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

वर्ष १७वें] ऑगस्ट १९५४. [अंक ६ वा.

वार्षिक वर्गणी ३ रुपये ◆ किरकोळ अंक ८ आणे.

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म.ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व व्यवहार "व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा." या पत्त्यावरच करावा.

प्रकाशनार्थ—

कुछ समय से ऐसा सुनने में आया है कि २०-२५ वर्ष से बन्द पडी हुई, किसी संस्था के नाम से, एक नई संस्था की स्थापना करने के लिये, बम्बई के कतिपय वैद्य, हकीमभाई प्रयत्नशील हैं तथा इस कार्य के लिये धन भी एकत्रित कर रहे हैं। पूज्य श्री यादवजी त्रिकमजी आचार्य, जैसे लब्धप्रतिष्ठ महानुभावी के नाम का उपयोग "कि उन्होंने भी संस्था के फण्ड में रुपये दिये हैं" ऐसी असत्य बातें कह कर तथा उनके नाम की झूठी रसीद बताकर, करते हैं। परन्तु श्री यादवजी महाराज ने एक व्यक्तिगत भेंट में बताया कि इस संस्था के फण्डमें उन्होंने कोई पैसा नहीं दिया है।

वस्तुतः हमें जो एकता स्थापित करनी है उसके लिये बम्बई, उपनगर, महाराष्ट्र, महागुजरात तथा कर्नाटक प्रदेशों में जो भिन्न संस्थाएँ हैं उन सबके प्रतिनिधित्ववाली एक विशाल संस्था-फेड्रेशन स्थापित करनी चाहिये, किन्तु ऊपर लिखित प्रवृत्तियां से तो जो कि मिथ्या एवं विद्वेषपूर्ण भावनाओं से प्रेरित हैं, इसके विपरीत ही कार्य होगा।

अर्द्ध शताब्दि से स्थापित आयुर्वेद के हितार्थ कार्य, करनेवाली अखिल भारतीय वैद्य समाज की एकमात्र प्रतिनिधि संस्था "अखिल भारतीय आयुर्वेद महासम्मेलन देहली," हमारे पास विद्यमान है। इस महती संस्था के हाथ दृढ़ करने की अपेक्षा जो भाई इसके विरुद्ध नई संस्था खड़ी करने का प्रयास कर रहे हैं वे "अ. भा. आयुर्वेद महासंमेलन" एवं वैद्य समाजके अहितकारी हैं

इस विषय में अ. भा. आयुर्वेद महासम्मेलन के पदाधिकारी एवं कार्यकर्ता भी यथासमय योग्य पग उठा कर इस प्रकार की घृणित एवं अनुचित प्रवृत्ति को दबा देने का प्रयत्न करें ऐसी प्रार्थना है।

संगठन के नाम से विभागीकरण करनेवाले आयुर्वेद का किन्चिन्मात्र भी हित नहीं कर सकेंगे, अतः सभी भाई बहिन इन प्रवृत्तियों से दूर रहेंगे, ऐसी आशा है।

ह० वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर
अध्यक्ष-महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मण्डल।

ह० वैद्य मलराध्यशास्त्री:
अध्यक्ष-निखिल कर्नाटक वैद्य मण्डल।

ह० वैद्य वामनराव दीनानाथ,
अध्यक्ष-महागुजरात प्रांतीय वैद्य मण्डल।

ह० वेणीमाधव जोशी, शास्त्री
अध्यक्ष-बम्बई और उपनगर वैद्य संम्मेलन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

सूचनाः- हें इतिवृत्त [illegible] हीं हिशेबपत्रकें म्हणजे इंग्रजी इतिवृत्त किंवा हिशेबपत्रकें यांचें संपूर्ण भाषांतर नसून माहितीसाठीं म्हणून त्याचा गोषवारा आहे.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कंपनी लि., सातारा.

३१ डिसेंबर १९५३ अखेरच्या पुऱ्या होणाऱ्या वर्षाचें

संचालकांचें चाळिसावें वार्षिक इतिवृत्त.

दि. ३१ डिसेंबर १९५३ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षांतील कंपनीच्या कामासंबंधीं चाळीसावें वार्षिक इतिवृत्त कंपनीचे भागीदार आणि विमेदार यांच्यापुढें कंपनीचें संचालक मंडळ मोठ्या आनंदानें सादर करीत आहे.

नवें कामः-या वर्षांत कंपनीकडे एकंदर ३,२०,४३,०१० रुपयांचे १३,६८७ विमाअर्ज आले. या व गेल्या सालअखेरीस अपुऱ्या राहिलेल्या विमाअर्जांपैकीं ११,५३९ विमाअर्ज मान्य होऊन एकंदर २,७६,२९,५१२ रुपयांचे विमे दिले गेले, आणि राहिलेल्या अर्जांपैकीं कांहीं अमान्य करण्यांत आले, कांहीं परत घेण्यांत आले, कांहींचा निर्णय लागला नाहीं आणि उरलेले मान्य झाले, पण हप्ता येण्यावर स्थगित होते. नवीन दिल्या गेलेल्या विम्यांच्या वार्षिक हप्त्याची रक्कम रु. १३,५८,२२९-८ होत आहे आणि सिंगल प्रीमियमची रक्कम रु. ४,५८४-१३ आणे होत आहे या व्यतिरिक्त वर्षासन योजनेखालीं ४९ विमापत्रकें देण्यांत आलीं असून त्यांची वर्षासनाची रक्कम, वार्षिक हप्त्यांची रक्कम व एकाच हप्त्यानें भरलेली रक्कम, हीं अनुक्रमें रु. ३३,०००, रु. ३१,४०४-० व रु. ५९,२६९-६ आहेत. हल्लींच्या कठीण परिस्थितींतही कंपनीनें लागोपाठ दरवर्षी वाढतें नवीन विम्याचें काम करून आपली उज्ज्वल परंपरा सिद्ध केली हें नमूद करण्यास आनंद वाटतो.

निधिः-चालू जागतिक मंदीच्या कठीण परिस्थितींतही कंपनीनें समाधानकारक प्रगति केली असून या वर्षांत आयुर्निधीमध्यें रु ७२,४६,४१५-८ भर टाकली. आतां तो निधि रु. ६,३३,१९६२७-१०-१० झाला आहे.

गुंतवणः-सन १९५३ अखेर बाजारभावानें कंपनीच्या रोख्यांची एकूण किंमत रु. ५,११,९८,८६३ होत असून कंपनीच्या ताळेबंदांत दिसणारी पुस्तकी किंमत रुपये ५,२७,३७,०८९ आहे. म्हणजे पुस्तकी किंमतीपेक्षां बाजारभावानें येणाऱ्या किंमतींत रु. १५,३८,२२६ इतकी घट आहे व त्याकरितां इन्व्हेस्टमेंट रिझर्व फंड काढून ठेविला आहे.

डिव्हिडंडः-भागीदारांना डिव्हिडंड देण्यासाठीं म्हणून राखून ठेवलेल्या डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडांतून सन १९५३ साठीं दर शेअरला रु. १५ विनाकर डिव्हिडंड द्यावें अशी संचालक मंडळाची शिफारस आहे.

भागीदारांचे संचालकः-श्री. य. रा. फडके हे भागीदारांच्या वतीचे संचालक आर्टिकल क्रमांक ९३ प्रमाणें निवृत्त होत आहेत. परंतु आर्टिकल क्रमांक ९७ प्रमाणें फेरनिवडणुकीसाठीं त्यांना उभें राहतां येतें. कै. म. पां. गुर्जर व श्री. रा. ग. कुबेर यांच्या संचालक मंडळामधील जागा अनुक्रमें ता. ५-१२-५३ व १८-१२-५३ पासून रिकाम्या झाल्या. आर्टिकल क्रमांक ८५-अ प्रमाणें त्यांच्या जागीं एकूण तीन नवे संचालक निवडण्याचा अधिकार भागीदारांना आहे.

हिशेबतपासनीसः-भागीदारांच्या वतीचे हिशेबतपासनीस श्री. बाटलीबॉय आणि पुरोहित, आणि विमेदारांच्या वतीचे हिशेबतपासनीस श्री. एस्. बी. दांडेकर आणि मंडळी हे कमी होत आहेत. करितां आर्टिकल क्र. १५०-अ प्रमाणें भागीदारांच्या वतीनें हिशेबतपासनीस निवडून त्यांचा आणि विमेदारांच्या हिशेबतपासनिसांचा मुशाहिरा ठरविण्याविषयीं भागीदारांना विनंति आहे. आर्टिकल क्रमांक १५०-अ व ७९-अ प्रमाणें भागीदारांनीं व विमेदारांनीं निवडावयाच्या हिशेबतपासनिसांची कांहीं विशिष्ट पात्रता असावी लागते, आणि शिवाय त्यांचें नांव संचालकमंडळानें मान्य केलेल्या अशा हिशेबतपासनिसांच्या यादींतहि असावें लागतें.

सातारा,
२३ मे १९५४

रा. ग. सोमण
अध्यक्ष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शोधनविधी

(लेखांक ३ रा.)

: लेखक :
वै. पु. वि. धामणकर,
धूतपापेश्वर-पनवेल.

वचनाग

सं. वत्सनाभ, लॅ. Aconitum Napellus

बचनाग व त्याच्या जाती अति उंच व दलदलीत भागांत होतात. ह्या प्रदेशाची उंची कमीत कमी दहा हजार फूट असते. बर्फ वितळल्यावर ह्यांची वाढ होऊं लागते.

ह्याचे क्षुप असतें. हे सबंध रोपटें अति विषारी असते. ह्याचे पानांमधून अति विषारी वायू बाहेर पडतात. त्यामुळें ह्याचे आसपास कोणतेंच वृक्ष होत नाहींत ह्याची पानें कातर निंगुडी सारखी असतात. व कंद गाईच्या वासराच्या नाभीसारखा असतो. म्हणून

'सिंदुवारसदृक्पत्रो वत्सनाभ्याकृतिस्तथा।'
गत्पार्श्वेन तरोर्वृद्धि वत्सनाभ इति स्मृतः। भा. प्र.

ह्याचे दोन प्रकार असतात. १ काळा २ पांढरा हे भेद त्याच्या फुलांच्या रंगावरून पडले आहेत. निळी, जांभळी फुलें असतात तो काळा व पांढरें फूल असतें तो पांढरा बचनाग होय. काळ्या बचनागाचा कंद पांच अंगुळें लांब, एका टोंकास जाड व दुसऱ्या बाजूस निमुळता गेलेला असतो. ह्याची बाह्य त्वचा काळी असून आंतील पिष्टमय भाग पांढरा व मधुर असतो. हे कंद वजनदार असतात.

बनावटी बचनागाचे स्वरूप

काळा बचनाग किंवा तेलिया बचनाग ह्या नांवानें १ उदी रंगाच्या, २ जड साधारण वांकलेल्या मुळ्या मिळतात. त्यांचा आकार गाजरासारखा पण खडबडीत असून लहान मोठ्या परंतु ३ साधारण तीन किंवा चार इंच लांब असतात. पुष्कळ दिवस ठेवल्यानंतर (सुकल्यानें) ह्यांचा रंग साफ काळा होऊन त्या सुरकुततात. मुळी मोडल्यावर आंतून ४ तांबूस, काळी असते. व राळेच्या तुकड्या (वाहव्याचे मगजा) प्रमाणें चकाकते. पावसाळ्यांत ही मुळी ५ दमसर व शिंगाप्रमाणें चिवट होते. आणि हातांत चोळली असतां हातास उदी रंग चढतो. हीस ६ उग्र बास येतो. नवीन मुळें औषधांत वापरावीत.

हें बनावट बचनागाचें वर्णन आहे. १, २, ३, ४, ५, ६, हे मुद्दे चिंत्य आहेत. हीं लक्षणें कशानें संभवतात हें त्याची बनावट दिल्यानें सहजीं विशद होण्यासारखें असल्यानें तीच येथें देतो.

बाजारी बचनागाची बनावट

प्रथम एका लोखंडाच्या कढईंत ४० शेर (पक्के) पाणी घालतात. मग त्यांत ३ ते ४ शेर हिराकस टाकतात. ३ ते ४ दिवसांत हिराकस विरघळला कीं मग त्यांत बचनाग, काळीमुसळ कंद व इतर कांहीं काटक्याकुटक्या त्यांत टाकतात. ८-१० दिवसांनीं हें मिश्रण चांगलें उकळतात. बचनाग आंतून बाहेरून चांगला रापला म्हणजे मग त्यांत गोमूत्र अथवा महिषीमूत्र टाकतात. त्याचा वास सुटला कीं अर्धा पाऊण शेर तैल सोडतात त्यांत. जरा वेळ उकडून उतरवितात. आणि असा हा १ काळा २ जड ३ तेलिया गोमूत्र गंधी बचनाग अस्सल म्हणून आंबट ओला (दमसर) असतांनाच रवाना करतात.

ही बनावटी भट्टी लक्षांत आली म्हणजे बाजारी बचनागाची चारही लक्षणें कशी नि कां जमतात हें सहज ध्यानीं येईल.

ह्या प्रक्रियेमुळें बचनागांतील विषसत्व कांहीं अंशीं परिवर्तित तर कांहीं अंशीं निर्गत झालेलें असतें. ह्यानंतर पुनः ह्याची शुद्धी केल्यास त्यांत बहुधा बचनागपणा शिल्लकच उरणार नाहींसें वाटतें. तरी पण अशा बचनागाचें रासायनिक विश्लेषण करून पाहून मग त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

मीठा तेलिया ह्या नावानें मिळणाऱ्या बचनागाचे कंदाचे वरचे अंग काळसर व आंतील भाग किंचित् पिंगट पण पांढरा असतो. चवीलाहि गुळचट असतो. ह्याचा स्पर्श जीभेला होतांच तेथें बिरबिर उत्पन्न होऊन तो भाग बधिर होतो. ती बिरबिर फार वेळ टिकते; तरी पण हें लक्षण कालांतरानें आपोआप कमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. तसें न झाल्यास टंकण-लाही मधांत कालवून तेथें लावावी. म्हणजे लागलीच तें लक्षण दूर होतें.

वचनाग गुणः

वत्सनाभोऽति मधुरः सोष्णोवातकफापहः ।
कंठरुक् सन्निपातघ्न पित्तसंतापकारकः ॥ रा. नि.

रसशास्त्रः-

Aconite Root Contains three closely allied Alkaloids aconitine, picraconitine and aconine. There are also very small amounts of five other alkaloids, viz:- Mesaconitine, Hypaconitine, Neopelline, Napelline and Nealine; other constituents are starch and aconitic acid. The total amount of alkaloid present is from 0·2 to 1·5 per cent, and as much as 2·4 per cent (Metin, 1926) has been recorded; the ether soluble alkaloid (chiefly aconitine) usually varies from 0·3 to 0·6 per cent. The drug yields from 2 to 6 per cent of ash.

Aconitine is acetyl-benzoylaconine and is crystalline and easily soluble in ether; picraconitine is benzoylaconine, both picraconitine and aconine are amorphous and insoluble in ether and they are both much less toxic than aconitine.

(T. E. Wallis page 404)

Indian Root:-

The alkaloid is pseudaconitine (Acetylveratroly-pseudaconine) of greater toxicity than aconitine. The starch is often gelatinized during drying of the drug.

(T. C. Denston, page 274)

बचनागांतील विषसत्वाबाबत डॉ. डीमकनें १७ सूचना दिल्या आहेत. केमिस्टनीं त्या पाहिल्यास त्यांचे रासायनिक विश्लेषणाचें काम सोपें होईल. १७ पैकीं फक्त ४ च सूचना येथें उद्धृत करीत आहे.

Benzoylaconine is the only active principle of Aconitum Napellus, the other alkaloids contained in the plant being amorphous and pharmacologically unimportant.

Aconitine and pseudo-aconitine are pharmacologically identical, but in consequence of its molecules being larger, more Veratroylaconine is required to produce the same effects as aconitine.

Aconitine and pseudo-aconitine are the strongest known poisons.

Aconitine and pseudo-aconitine do not split up in the animal organism, absorption and ejection taking place very quickly.

(Dymock P. 5; No. 2, 4, 6, 16)

शोधन प्रकार

१ विषं तु खण्डशः कृत्वा वस्त्रखण्डेन बंधयेत् ।
गोमूत्रेऽथ विनिक्षिप्य स्थापयेदातपे त्र्यहम् ॥
गोमूत्रं तु प्रदातव्यं प्रत्यहं नूतनं बुधैः ।
त्र्यहेऽतीते तदुध्दृत्य शोषयेन्मृदु पेषयेत् ॥
शुध्यत्येवं विषं सेवायोग्यं भवति रोगजित् ॥
र. त., वृ. यो. त.

२ गोमूत्रे पूर्णपात्रे च दोलायन्त्रे विषं पचेत् ।
र. भा.

दशतोलकमानेन चादौ वैद्योदिवानिशम् ।
र. सा. सं.

३ खंडीकृत्य विषं वस्त्रपरिबद्धं तु दोलया ।
अजापयसि संस्विन्नं यामतः शुद्धिमाप्नुयात् ॥
र. त.

क्षीराभावे ह्यजानां तु गव्यक्षीरेण शोधयेत् ।
वृ. यो. त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ विषभागांश्चणकवत्स्थूलान्कृत्वा तु स्वेदयेत्। गोदुग्धे घटिकान्पंच शुद्धिमायाति तद्विषम्।
र. चं. र. त.

५ विषग्रंथिं मलेत्यस्य माहिषे दृढमुद्रितम्। करीषाग्नौ पचेद्यामं वस्त्रपूतं विषं शुचि॥
वृ. यो. त.

६ अथवा त्रैफले क्वाथे विषं शुध्यति पाचितम्। रसे. सा. सं.

क्रमांक	शोधक पदार्थ	यंत्र	विधी	अग्नि	काल	ग्रंथावार
१	गोमूत्र	शराव	निमज्जन	आतप	३ दि.	भा. भै. र. ७०८६ रसे. सा. सं., र. मं., आ. वे. प्र. यो. र. वृ. यो. त. । त. ४३
२	"	दोला	स्वेदन	..	..	भा. भै. र. ७०८५, रसे. सा. सं.
३	अजापय	"	"	..	१ प्र.	र. त. वृ. यो. त.
४	गोदुग्ध	"	"	..	१ प्र.	भा. भै. र. ७०८३ (आ. वे. प्र. अ. ४
५	माहिषमल	शराव	पाचन	करीष	..	वृ. यो. त.
६	त्रिफलाकषाय	दोला	स्वेदन	..	१ प्र.	भा. भै. र. ७०८४ रसे. सा. सं.

ढोवळ मानानें शुद्धि प्रकारांचे वर्गीकरण करायचें म्हटलें तर असें म्हणतां येईल कीं, ज्वरहर योगांत गोमूत्र, क्षयहर औषधांत अजापयः, रसायन योगांत गोदुग्ध, शिलाजित, गुग्गुळ योगांत-त्रिफळा, आणि जेपाळयुक्त योगांत ताजा माहिषमल इ. इ. पण आजच्या कालांत एवढ्यावर भागणार नाहीं.

तेव्हां शुद्धिकार्यांत उपयोगांत आणलें जाणारें प्रत्येक द्रव्य, उदा. दूध, पाणी, गोमूत्र, अग्नि, उन्ह, काल व पात्र ह्यांचे कस ठरविले पाहिजेत. विषसत्व किमान व कमालपक्षीं किती असायला हवें तें कळलें पाहिजे. तसेंच पयस्विन्न, गोमूत्रशुद्ध अथवा मलविशोधित वचनाग कोणकोणत्या गुणांचा होतो, त्यांत अग्नि व उन्हानें काय काय फरक होतात, हें सिद्ध व्हायला पाहिजे. तसेंच कालमान, तपमान योग्य कोणतें, त्यांचे हीनाति-मिथ्यायोग कोणते हेंहि निश्चित व्हायला पाहिजे. हें झालें म्हणजेच योग्य स्थानीं योग्य शुद्धिप्रकार योजण्याचें कार्य सुलभ होणार आहे.

— लसूण —

सं.– रसोन, लशुन, रसोनक. लॅ. Allium Satirum

इं.– Garlic root.

सं.– क्षुद्ररसोन, लॅ. Allium ascalonium.

लसूण हा एक जातीचा कंद आहे. ह्याचे एक व अनेक कळी लसूण असे लसणाचे दोन प्रकार आहेत. औषधी क्षेत्रांत ह्यांत फारसा भेद मानीत नाहींत; पण इतर क्षेत्रांत मात्र एक कळीचा लसूणच ग्राह्य मानतात. ती अतिशय तीक्ष्ण, उष्ण आहे म्हणून तिला शुद्धीची आवश्यकता आहे.

नांवें:– रसोनः– एक रस ज्यांत कमी आहे असा

अम्लकान्तः– आंबट रस ज्यांत नाहीं तो.

पञ्चाभिश्च रसैर्युक्तः रसेनाम्लेन वर्जितः।
तस्माद्रसोनइत्युक्तो द्रव्याणां गुणवेदिभिः॥
कटुकश्चापि मूलेषु तिक्तः पत्रेषु संस्थितः।
नाले कषाय उद्दिष्टो नालाग्रे लवण स्मृतः॥
बीजे तु मधुरः प्रोक्तो रसस्तद्गुणवेदिभिः॥
भा. प्र.

गुणः–

वृष्यश्च मेधास्वरवर्णचक्षुः
भग्नास्थिसंधानकरो रसोनः।
हृद्रोगजीर्णज्वरकुक्षिशूल
विबंधगुल्मारुचिकासशोफान्।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुर्नामकुष्ठानलसादजंतु
समीरणश्वासकफांश्च हन्ति ॥

सुश्रुत सू.-४३

रसशास्त्रः-

Besides cellular tissue, garlic contains between 50 and 60 per cent. of water, 35 per cent of mucilage, some albumen, sugar, starch, and about $\frac{1}{4}$ per cent. of volatile oil, to which its odour and taste are due. W. Dahlen gives the following as the percentage proximate composition:-

Water..	..64·66
Albuminoids	6·76
Fat..	·06
Sugar..	..trace
Nitrogen free extractive..	26·31
Cellulose..	·77
Ash	1·44

Anhydrous garlic contained nitrogen 3·6 per cent. and carbohydrates 74·45 per cent. (Landw. Jahrbucher 8874)

Dymock p. 490

शुद्धिप्रकार

पक्वकन्द रसोनस्य गुलिका निस्तुषी कृता ।
पाटयित्वाच मध्यस्थं दूरीकुर्यात्तदङ्कुरम् ॥
तदुग्रगंधनाशाय रात्रौ तक्रे विनिक्षिपेत ॥ शा.
निस्तूषं लशुनं कृत्वा रात्रौ तक्रे विनिक्षिपेत् ।
तदुग्रगंधनाशायं प्रातर्गाह्यं जलाप्लुतम् ॥

वै. सा. सं.

लशुनो भृशतीक्ष्णोष्णः कटुपाकरसः सरः
हृद्यः केश्यो गुरुर्वृष्यो स्निग्धो रोचनदीपनः ॥

अ. हृ.

लसणीचे कार्यकारित्व तीमधील डयशील तेलावर अवलंबून आहे. (Many and perhaps all these species contain voatile oil upon which their activity depends.

(U. S. D)

लसूण वाळतांना तीमधील डयशील तैल उडून जातें. त्यामुळें ती हीनवीर्य समजली जाते. शोधनानें ह्या तैलाचा किंचित् अंश कमी होतो हे खरें पण तो किती कमी व्हायला पाहिजे आणि अम्लरस संस्काराचा इतर घटक द्रव्यांवर काय परिणाम होतो अगर अम्ल संयोगच अपेक्षित आहे कीं काय ह्या गोष्टींचा निर्णय लागला पाहिजे.

वांकेरी

लॅ. Cesalpini digyneen.

सं. घृतकरंज

वांकेरीचें झाड सागरगोटयाप्रमाणेंच कांटेरी असते. वांकेरीचीं पानें सागरगोटीप्रमाणेंच असतात. वांकेरीस जाड शेंगा व लाल तुरे येतात. ह्या झाडांचीं दाट बेटें असतात. अशी बेटें कनकेश्वर, रायगडावर आहेत. ह्या झाडाचें मूळ पंचवीसपासून पन्नास हात खाळीं खोल खणावें तेव्हां खालीं गड्डा सांपडतो. ह्या गड्डयास वांकेरीचें भातें म्हणतात. पर्जन्यकाळीं सह्याद्रीचे कडे कोसळतात तेव्हां हे गड्डे आपोआप सांपडतात.

वांकेरीचें भातें म्हणजे त्या झाडानें स्वतःकरितां तयार केलेला एक सांठा होय. हा पिष्टमय असतो. ह्याची रुचि किंचित कडसर असते. तरी पण त्यास कीड लागतेच ती लागूं नये व भातें पचायलाही हलकें जावें म्हणून हें दोलायंत्र विधीनें गोदुग्धांत एक प्रहर शिजविणें.

शतावरी

सं. शतावरी, लॅ.-Asparagus Racemoses.
सं. महाशतावरी, लॅ.-Asparagus Sarmentosus.

ही वेल आहे. हीची पानें अत्यंत लहान असतात. त्यांची टोकें सूक्ष्म असतात. तीं हातास कांटयाप्रमाणें टोचतात. हिच्या सोंट मुळास अनेक मुळया फुटतात. ह्यावरूनच तिला शतपदी, सहस्रपदी इ. नांवें आहेत. ह्या मुळयांचे स्वरूप कंदासारखें असते. ह्यांत एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दांडा असतो व वरून साल असते. दांडा निरुपयोगी म्हणून व साल विषवत् म्हणून दोन्हीही काढून टाकायची असतात. शतावरी वाळल्यानंतर हीं दोन्हीं निघूं शकत नाहींत. म्हणून शतावरी ओली असतांनाच हे अवयव दूर करावे लागतात.

गुणः—

शतावर्यो हिमे वृष्ये मधुरे पित्तजित् परे।
कफवातहरे तिक्ते महाश्रेष्ठे रसायने ॥ रा. नि.

रसशास्त्रः—

शतावरी व महाशतावरीच्या ताज्या कंदांत पाण्यांत मिसळणारा भाग.. .. .. ५२·५
चोथा.. .. .. ३३·५
पाणी.. .. .. ९·

पाण्यांत मिसळणाऱ्या भागांत ७ टक्के साखर आहे. सुक्या कंदाची राख ४ टक्के पडते.... (औ. सं.)

The powdered roots were examined as those of the previous article, and were found to contain–

Water	77·55
Cellulose	12·85
Moisture	6·00
Ash	3·60
	100·00

The water extract was a thick mucilaginous liquid which threw out white flocks of albuminous matter boiled, and was not effected by Fehling's solution. The portion of the root insoluble in water consisted of almost pure cellulose.

(Dymock Page 485)

Collection and storage:–

It is generally used fresh but the roots are to be bolied and then dried to preserve them.

Chemical composition-Large amount of saccharine matter and mucilage. The bark is poisonous.

(Dr. K. C. Bose. Page 6)

आयुर्वेदानें शतावरी ताजी व ओली घ्यावयास सांगितली आहे. हिची शुद्धि म्हणजे नाल व त्वक् दूर करणें ही होय.

सूरण

सुरणः–लॅ. Amorphophallus campanulatus.

सूरणः–(वन्य)–Amorphophallus sylveticus.

सूरणः–(तिक्त)–Amorphophallus dubias.

सूरणः। शीर्यते इति। झरवितो तो.

हें कार्य विशेषत्वानें मुळव्याधीचे मोडावर होतें. सूरणांतील क्षारानें अर्श रोगाचे मोड झरतात.

सूरणाच्या तीन जाती वर दिल्या आहेत. पैकीं पहिल्या जातींत दोन प्रकार आहेत. १ पांढरा, २ तांबडा. पांढऱ्यापेक्षां तांबडा सूरण अधिक खाजतो, त्यामुळें भाजीकरतां पांढरा व औषधाकरितां तांबडा अशी त्यांची वाटणी करतात. ह्या दोहोंपेक्षांही जंगली सूरण अधिक खाजरा असतो.

जंगली सूरणाची साल काढून तुकडे करून सुकवितात व ते दोरींत ओवून मदनमस्त ह्या नांवानें विकतात. हे तुकडे उदी रंगाचे, सुरकतलेले असून त्यावर पुळ्या असतात. पाण्यांत भिजविल्यावर ते फुगतात, नरम होतात आणि जलदी कुसकरतां येतात. ह्यांस किळसवाणा वास येतो, रुचि पिठुस जरा कडू आणि तिखट.

तिक्त सूरणाचा दांडा जांभळा असतो.

सूरणास पक्वकंद असें एक नांव आहे. पण ही संज्ञा त्याला दोन वर्षांनंतर लाभते. उदाः—

वर्षद्वयपरिक्रान्तं पक्वसूरणमाहरेत्। रसालं.

३४९. कैशोर गुग्गुळ.

ह्याला कंदनायकही म्हणतातः—कारण

सर्वेषां कंदशाखानां सूरणः श्रेष्ठ उच्यते। भा. प्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुणः–

सूरणो दीपनो रूक्षो कषायः कण्डुकृत् कटुः ।
विष्टंभी विशदो रुच्यः कफार्शकृन्तनो लघुः ॥
विशेषादर्शसां पथ्यः प्लीहगुल्मविनाशकः भा. प्र.

रसशास्त्र––

1st, several rows of thick–walled cells, having yellowish-brown granular contents (skin); 2nd, a parenchyma composed of thin-walled cells, having no solid contents except needle shaped crystals (pulp); 3rd, several rows of small cells containing chlorophyll (testa of seed); 4th, a delicate parenchyma, the cells of which are loaded with very small starch granulates mostly round, some truncated.(Dymock page 547)

शुद्धि प्रकार

सूरण सोलावा. त्याचे काप तयार करावेत. हे काप रात्रभर (१२ तास) ताकांत भिजत ठेवावेत म्हणजे ते शुद्ध होतात (वै. सा. सं.)

सूरणामध्यें कॅल्शियम् ऑक्झलेटस् असतात. त्यामुळेंच तो खाजतो. हें खाजणारे द्रव्य कमी करणें हा शुद्धि हेतु होय. हें द्रव्य सुरणांत असतें किती, पैकीं किती प्रमाणांत ते आपणांस हवें हें नक्की ठरलें जाणें गुणोत्कर्ष अथवा प्रामाण्य निर्णय ह्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे.

हळद

सं. हरिद्रा–लॅ.–Curcuma longa.
सं. हरिद्रा–(कृष्ण), लॅ.–Curcumaa Cesia.
सं. हरिद्रा–(आम्र), लॅ.–Curcuma Amada
सं. हरिद्रा–(वन), लॅ.–Curcuma Aromatica.

हळद, काळी हळद, आंबेहळद आणि रानहळद असे हळदीचे चार प्रकार आहेत. पैकीं नेहमींच्या आहारांत हळद, लेपाकरितां आंबेहळद, उदवत्तीकरतां वेडी(रान) हळद, अशी ह्या प्रकारांची विभागणी झालेली आहे असें आढळतें.

हळदीची लागवड पावसाळ्याचे आरंभीं करतात. पावसाळ्यानंतर तिला पाणी देतात, म्हणजे आठ महिन्यांनीं हळदीचे कंद पूर्ण दशेला येतात. हे कंद अमर असतात. सुकता सुकत नाहींत. व्यवहारांत ही फार मोठी अडचण भासते. हळदीचे काप करून ते सुकवून विकावेत तर तेंही गैरसोयीचें पडतें. ह्यामुळें हळदीचे कंद शिजवून त्यामधील जीव नष्ट करण्याची चाल पडली आहे.

गुणः–

हरिद्रा कटुका तिक्ता रूक्षणोष्णा कफपित्तनुत् ।
वर्ण्या त्वग्दोषमेहास्रशोथपांडुव्रणापहा ॥
अरण्यकदली कन्दः कुष्ठवातास्रनाशनः ॥ भा. प्र.

रसशास्त्रः–

Turmeric contains about 5 per. cent of volatile oil, resin and a crystalline yellow body, curcumin. These occur, in the fresh thizome in the particular secreting cells in which they have been produced, but pass during the scalding into the surrounding tissue, the parenchymatous cells of which are filled with amorphous masses of gelatinised starch.
(T. E. Wallis page 365)

शोधन विधि

The rhizomes so obtained are then steamed in their own juice or boiled in water for a half to one day by which the vitality that they otherwise obstinately retain is destroyed. They are finally dried either in the sun or in an oven.
(T. E. Wallis page 364)

हळद, गुन्हाळांत गूळ शिजविण्याचे काहिलींत तयार करतात. कढई चुलाण्यावर ठेवून हळदीचा कढईत ढीग करून तोवर ती शिजण्यास लागेल तितकें पाणी ओतून त्यावर हळदीची वाळलेली पानें, जुनीं पोतीं वगैरे घालून त्यावर शेणाचा अगर चिखलाचा लेप देतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर खालीं जाळ लावतात. सुमारें दीड तासांत हळद शिजून तयार होतें व हाताला मऊ लागते. भट्टी जरा थंड झाल्यावर ढोग फोडून हळद बाहेर काढतात व उन्हांत आठ दिवस वाळवतात.

व्यापार अथवा उदीम करण्याचे दृष्टीनें हें पाचन ठीक म्हणतां येईल. पण औषधांत घ्यावयाची हळद शिजविणें जरूर आहे काय ? कच्ची व पक्की हळद ह्यांत रासायनिक व गुण वैज्ञानिक दृष्टया काय फरक होतो हें पाहणें आगत्याचें झालें आहे. औषधी म्हणून वापरावयाची हळद उकडलेली नसावी, असें कांहीं वैद्यांचे म्हणणें आहे; मलाही तेंच मत बरोबर वाटतें. तरी पण ह्या दृष्टीनें एकवार संशोधन होऊन औषधी हळद शिजवावी कीं नाहीं ह्याचा निर्णय लागणें जरूर आहे.

मागील अंकीं–आलें, कळलावी, मुर्कोहळा, भुईकोहळा

पुढील अंकीं–अफू ऊद, डिकेमाली निवडुंग, बोळ, शिलाजतु, शिलारस आणि हिंग.

(पान १६ वरून पुढें चालूं)

आहे; हा ज्वर परतंत्र (शोफाधीन) असा असतो. शरीरांत पित्त दोष अधीक काम करत असल्यानें तृषा, दाह हीं लक्षणें निर्माण होतात. अन्तर्मार्गांत अग्नि हा अल्पबल असतो, व अग्निमांद्य, अरुचि व खाण्यावर इच्छा नसणें अशीं लक्षणें होतात. तीव्र पाचनादि क्रियेमुळें निद्रा कमी होते; व शरीर कोणत्याही अवस्थेंत ठेवले तरी अस्वस्थता वाटते. सर्वांगवेदना, जृम्भा अशी लक्षणें होतात.

पक्वावस्थेची लक्षणें:–

पक्वऽल्पवेगता ग्लानि पांडुता वलिसंभवः
नामोंऽतेपून्नतिर्मध्ये कण्डू शोफादि मार्दवम् ।
स्पृष्टे पूयस्य संचारो भवेद्वस्ताविवांभसः ।
वा. सू. २९।५.

अल्पवेगताः–

स्थानसंश्रयी पदार्थ हे शारीर पित्ताकडून पाचित झाले म्हणजे पच्यमान अवस्थेमधल्या तीव्र वेगाच्या शारीर क्रिया कमी होतात. याचा परिणाम म्हणून अल्पवेगता असें लक्षण निर्माण होते. शोफगत द्रव्यें ही सुटी होतात, व शारीर द्रव्यें (रक्तादि) आतां तेथें नसल्यानें शोफांची आकृती लहान होतें. शोफ म्लान दिसतो. त्या व रु सु र कु त्या " वलिसंभव " दिसूं लागतो. शोफाचा ताम्र वर्ण जाऊन त्या ठिकाणीं पांडुर वर्ण येतो; हा वर्ण पक्व-शोफगत पूयद्रव्याचा असतो. शोफांतली दुष्ट द्रव्यें शिथिल करणें हें कर्म शारीर कफ स्वतःच्या क्लिन्न-द्रव-गुणानें करतो. कफाचा वर्ण पांढरा असतो, तो शोफावर दिसतो; याच कफाची, कंडू, व मार्दव ही लक्षणें दिसतात; पूयः– यांत पक्व दुष्ट पदार्थ व नष्ट झालेलें शारीर धातूही येतात. हा द्रव पूय शिथिल त्वचेचे खाली असतो. व त्वचेचें पीडनानें पूय गति समजते. " स्पृष्टे पूयस्य सञ्चारो भवेत् " किंवा " वस्तौ इव उदकसंचरणम् " या सूत्रांनीं या लक्षणाचा स्पष्ट उल्लेख केला आहे; या पाचन क्रियेंत त्वचाही दुर्बल होते, व त्वचेच्या दौर्बल्यामुळें व पूयगत तीक्ष्ण गुणामुळें त्वचेचें भेदन होते. त्वचेंतून कांहीं कांहीं वेळां पू बाहेर येऊन शोफाचा शेवट होतो; अर्थात प्रत्येक वेळीं असें होतेंच असें नाहीं. तशा वेळीं शस्त्र वैद्यानें शोफाचें भेदन वगैरे क्रिया कराव्या लागतात. शोफ पक्व झाल्यावर पुनः भूक लागते, ज्वर कमी होतो. अरत्यादि पच्यमान अवस्थेंतली लक्षणें कमी होतात व रुग्णाला कांहींसे स्वास्थ्य वाटते.

(अपूर्ण)

एग्युमिक्श्चर

कोणत्याहि ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, एग्यूमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें यणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथ पित्तम्..।

: लेखक :
गो. आ. फडके
आयुर्वेदाचार्य

पित्ताचीं स्थानें व कर्मे....

पित्ताचें कार्य म्हणजे पचन अथवा रूपांतर, हें सर्व शरीरभर चालूं असते. शरीरस्थ प्रत्येक सूक्ष्म सूक्ष्म अवयव वा सजीव परमाणू पचनक्रियेंत गढून गेला आहे. आपल्याकडे आलेला आहारांतील परमाणू हा विभाजित करून, त्याचे पृथक्करण करून आपल्या अग्नीच्या सहाय्यानें त्याचे रूप पालटून त्यांतील सार भाग वेगळा करून त्यापासून स्वशरीर बनविणें, व नको असलेले किंवा मलिन पदार्थ-त्यांचें किट्टांत रूपांतर करणें ही पित्तक्रिया दर एक परमाणूंत अव्याहत चालूं असते. त्यामुळें पित्त व्यापी आहे. दर एक सजीव परमाणूंत तें आहे. तथापि ही पचनक्रिया ज्या स्थानीं अधिक प्रमाणांत चालतें ती स्थानें पित्तस्थानें म्हणून संबोधिली जातात. या प्रत्येक स्थानांतील पित्ताची क्रिया शरीर व्यापार चालण्याचे दृष्टीनें अवश्यकच असते. या दर एक पित्ताच्या स्थानाचा व तेथील कार्याचा स्वतंत्रपणें विचार करावयाचा आहे.

पित्ताचीं स्थानें वाग्भटांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केली आहेत.

नाभिरामाशयस्वेदो लसीका रुधिरं रसः।
दृक् स्पर्शनंच पित्तस्य नाभिरत्र विशेषतः ॥ अ. हृ.

नाभि, आमाशय, स्वेद, लसीका, रक्त रस, दृष्टी आणि त्वचा हीं आठ पित्ताचीं स्थानें आहेत. त्या सर्वांत नाभी हें प्रमुख स्थान आहे.

१) नाभीः-

नाभी याच अवयवाला ग्रहणी, पित्तधरा कला, लघ्वंत्र अशीं नांवें कार्यभेदावरून कित्येक वेळा लावलीं जातात. नाभी म्हणजे शरीरमध्य देश. उदराच्या मध्य भागाला नाभी असें म्हणतात. प्रत्यक्ष गर्भनाडी ज्या ठिकाणीं बद्ध असते त्याला नाभी किंवा बेंबी असें म्हटलें जाते. पण तेवढ्या भागालाच नाभी असे न म्हणतां नाभी म्हणजे नाभीच्या आसमंतात असणारा लघ्वंत्राचा भाग यालाही नाभी असेंच म्हटलें जाते. लघ्वंत्राच्या वरील महास्रोतसाचा जो भाग आहे, त्याला आमाशय असें सुश्रुताचार्य म्हणतात व या लघ्वंत्राचा पुढील व खालचा जो भाग आहे त्याला पक्वाशय असें म्हणतात. म्हणजे वरच्या बाजूला आमाशय हे कफस्थान व खालीं पक्वाशय हें वातस्थान यामध्यें जो महास्रोतसाचा भाग आहे त्याला नाभी अथवा पित्तस्थान असे म्हटलें जातें.

पक्वामाशयमध्यं पित्तस्य। सुश्रुत.

याच अवयवाला पित्तधरा कला किंवा ग्रहणी अशींही नांवें आहेत.

षष्ठी पित्तधरा नाम या कला परिकीर्तिता।
पक्वामाशयमध्यस्था ग्रहणी सा प्रकीर्तिता ॥

पित्तस्थान म्हणजे विपुल पित्त असते असें नाहीं. तर सर्वांत मोठी रसायन शाळा या नाभी प्रदेशांत आहे. नाभी अथवा लघ्वंत्र या स्थानीं अन्न पचण्याची मुख्य क्रिया चालते. लघ्वंत्राच्या वरील भागीं म्हणजे आमाशयांत अन्नाचें थोडे फार पचन होतें पण ते अगदीं प्राथमिक स्वरूपाचे असते. तसेच पक्वाशयांत अत्यल्प पचन होते. पण सर्वांत अधिक पचन करण्याचे सामर्थ्य या लघ्वंत्राचे ठिकाणीं आहे. आहारांत घेतलेल्या सर्व तऱ्हेच्या पदार्थांचे रूपांतर करण्याचे महान सामर्थ्य येथील पित्ताला आहे. त्याला पाचक पित्त असें नांव आहे. किंवा यालाच कायाग्नि किंवा जाठराग्नि असें म्हणतात. हें यकृत, अग्न्याशय, लघ्वंत्र या भागांत तयार झालेले असतें. या अवयवांतील ज्या शारीर सूक्ष्म परमाणूंकडून हे निर्माण केलें जाते त्या परमाणू समूहाला पित्तोत्पादक कला अथवा पित्तधरा कला असें म्हणतात. किंवा ग्रहणी असेंही म्हटलें जातें.

येथील पाचक पित्ताची किंवा अग्नीची क्रिया अन्नावर होऊन पांचभौतिक बाह्य जगतांत अन्नाचे जे स्वरूप होते ते पार बदलून टाकलें जातें. बाह्य स्वरूप बदलून त्याला मानवी शरीराशीं साजेल असे स्वस्वरूप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणें याला पचन असें म्हणतात. या क्रियेंत नवीन संयोग निर्माण करावे लागतात. बाह्य जगतांतील संयोग शरिरांत जमण्यासारखे जर ते नसतील तर ते मोडावे लागतात. ऊष्णतेनें रसांतर केले जाते. रूप रस गंध व स्पर्श ही पार बदलून टाकली जातात. अन्नांत जे दोष अथवा शरिराला मारक अंश असतात ते अग्नीच्या सहाय्यानें अमारक बनविले जातात. त्यांच्या रसादिकांत परिवर्तन घडवून पृथक्करण व संयोग घडवून अन्नरस निर्माण केला जातो. अन्नाचे रूपांतर किंवा पाक करण्याची अशी मोठी शक्ति नाभी या स्थानीं आहे.

अन्नाचे रूपांतर अथवा त्यास सूक्ष्मत्व आणल्यानंतर त्यांतील शरीरोपयोगी सार भाग वेचून ग्रहण करणें व किट्ट अथवा मलिन भाग मागें ठेवणें ही विवेचक शक्ति या अवयवाला आहे. शरिरोपयोगी सारांश या भागाकडून ग्रहण केला जातो म्हणून शरिरस्थ या भागाला ग्रहणी असें म्हणतात हे विवेचन व ग्रहण शोषण करण्यास वायूचे सहाय्य लागतेच. गतीशिवाय यापैकीं कांहींच कार्य होणार नाहीं. आंत्राला पचन व ग्रहण करण्याच्या कार्याला गति लागतेच. याला गति असते किंवा यामुळें त्यांतील द्रव्यांना गती मिळते म्हणून या अवयवाला अंत्र असे म्हणतात. " अमति अनेन वा । " "अम गतौ ।" अन्नाचे परमाणूंना पुढें पुढें ढकलावें लागते. पित्ताचा व अन्न परमाणूंचा संबंध आणावा लागतो. नको असलेल्यांना दूर न्यावें लागते. ज्यांना शरिरांत घ्यावयाचे असे घटक आंत्राच्या आंतील भितीपर्यंत न्यावे लागतात. तेथून रसवहस्रोतसाकडून त्यांचे ग्रहण व्हावे लागते. या सर्व क्रिया " गति " किंवा वातामुळेंच होतात; पण येथील गतीचा मुख्य उपयोग पचन, रूपांतर करण्यांत होत असल्यानें या सर्व क्रिया पित्ताच्या म्हटल्या जातात. येथील गतीवर तावा पित्ताचा असतो या सर्व आंत्राच्या हालचाली करण्यास पित्ताची जरूरी असते. पित्त नसेल किंवा कमी पडेल तर वाताची क्रिया या भागीं चालणार नाहीं असें मोठें महत्व या स्थानीं पित्ताला आहे. अनुलोम प्रवृत्ति ही सुद्धा व्यवस्थित चालण्यास पित्तच कारणीभूत असते. मोठ्या प्रमाणांत पचन आंतड्यांत चालते. त्याचप्रमाणें पण निराळ्या तऱ्हेचे पचन सर्व शरीरभर होत असते. आंतड्यांत जो अन्नरस बनला, ग्रहणीनें जो ग्रहण केला, तो रस सर्व शरीरभर टाकला जातो. या रसाचे परत पचन करून स्वशरीर निर्माण करण्याची क्रिया सर्व देहभर चालू असते. त्यासाठीं प्रत्येक धातुघटकांत अग्नीची जरूरी आहे. या अग्नींना धात्वग्नी असें म्हणतात या धात्वग्नींना बळ कायाग्नीकडून म्हणजे ग्रहणी या अवयवाकडून लाभत असते.

तत्रस्थमेव चात्मशक्त्या शेषाणां पित्तस्थानानां शरीरस्य चाग्निकर्मणाऽनुग्रहं करोति । सु. सू. २१

नाभीखेरीज, नेत्र, यकृतादि पित्तस्थानें आहेत त्याचा व नाभीचा संबंध असतो.

शरिरांत अनेक पित्तस्थानें आहेत. म्हणजे त्यांत पित्ताचा संचय सांठा आहे, असें नाहीं. तेथें रासायनिक बदल जास्त प्रमाणांत केलें जातात. हे बदल किंवा रूपांतर करण्याला शरीर धातूंना जे पदार्थ लागतात, किंवा जवळ बाळगावें लागतात ते पदार्थ पचनमार्ग अथवा त्यांतील प्रमुख पित्तस्थान नाभी या पासून त्यांना मिळत असतात. यकृत, अग्न्याशय, लघ्वंत्र हे नाभीच्या कक्षेंतील अवयव हे प्रमुख रासायनिक कारखाने आहेत. तेथें अन्नद्रव्यांवर पचन चालतेच. पण त्याच कारखान्यामधून शरीरस्थ इतर रासायनिक शालांचे कडे रासायनिक द्रव्ये पाठविली जातात. ही मोठी जबाबदारी नाभी या पित्तस्थानावर असते. आहारांतून जे पदार्थ येतात त्यांना आहाररसाचें रूप देणें या कार्याबरोबर आहारांतून घेतलेल्या द्रव्यापासून स्वतःच्या प्रयोग शाळेसाठीं जीं पित्तसमान द्रव्यें (रासायनिक) द्रव्यें लागतात तींही निर्माण करणें, व त्याचप्रमाणें इतर शरीरस्थ पित्तस्थानासाठीं लागणारी द्रव्यें त्याच आहारांतून आलेल्या द्रव्यापासून तयार करणें अशी दुहेरी जबाबदारी नाभी या पित्तस्थानावर आहे. हा पित्तसमान द्रव्यें रसाबरोबर त्या त्या पित्तस्थानीं जातात, व त्या त्या ठिकाणाच्या अग्नीकडून त्यांना भ्राजक, आलोचक, अशीं रूपें दिली जातात. पण शरीरस्थ या सर्व पित्तांसाठीं रासायनिक द्रव्यें निर्माण करण्याचा मोठा कारखाना, नाभीचे ठिकाणीं आहे.

स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संस्थिताः ।

आणि येथील कायाग्नीचे अंश सर्व धातूंत ठेवलेले असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाभी हे प्रमुख पित्तस्थान समजण्याचे आणखी एक तिसरें कारण समजले जातें. शरीरधातूंत पित्त धातू म्हणून, एक काल कार्य करणारे घटक, आपले कार्य करून कृतकृत्य झाल्यावर शरीर यंत्रांत त्यांचा यापुढें कांहीं उपयोग नाहीं. म्हणून या जीर्ण झालेल्या पित्त परमाणूंना शरिराबाहेर टाकून देण्याची अवश्यकता असते. या वेळीं या टाकाऊ जीर्ण झालेल्या घटकांना "मल" पित्त असें म्हटले जाते. मलपित्त बाहेर टाकण्याचा शरिरांतील मोठा बहिर्मार्ग म्हणजे लघ्वंत्र अथवा नाभी हेच आहे. सर्व शरीरधातूघटकांतून अयनद्वारा रसायनी वाटे व्यानाच्या प्रेरणेनें पचन करणाऱ्या या अवयवाकडे हे परमाणू आणिले जातात. रसांतील परमाणू घेऊन त्यांचे विसर्जन आंत्राकडून केले जाते. पचनमार्गांतून बाहेर पडत असतांना हे जातां जातां थोडी पचनाची क्रिया करितात. पुढें पुरीषाशीं संमिश्र होऊन हे मल पित्त पुरीषाबरोबर विसर्जन केलें जाते. पुरीषाला पिवळा वर्ण या मलिन पित्ताचा असतो. कांहीं थोडें पित्त, मूत्र व स्वेद या वाटें बाहेर पडतें पण मुख्य मार्ग ग्रहणी हाच आहे. शरीरव्यापारांत हे मलपित्त अधिक वाढले तर ते आतड्यावाटें अधिक प्रमाणांत बाहेर पडते. व मलाला अधिक गडद पिवळा रंग देते. विरेचन दिले तर अधिक प्रमाणांत पित्त आतड्यांत येते व ते जुलाबावाटे बाहेर पडते.

रक्त धातूचा पित्त हा मल समजला जातो. रक्त घटक जीर्ण झाले म्हणजे त्यांतील किट्टांश ग्रहणीकडून अशा रितीनें घेतला जातो व त्याचें मलावाटे उत्सर्जन केलें जाते. आहारांतून कित्येक वेळा विजातीय पित्तल द्रव्यें शरिरांत जातात; किंवा शरीरव्यापारांत बिघाड झाला तरी ती निर्माण होऊं शकतात. मग अशा द्रव्यांना "दोष" असे म्हणतात. हे दोषपित्त शरिरांत वाढत चाललें तर त्यापासून रक्तपित्त, पांडु, वीसर्प, प्लीहारोग, असे विविध पित्ताचे रोग उत्पन्न होण्याची भीति असते. हे दोषपित्त विरेचन द्रव्यें देऊन शरिराबाहेर काढून टाकावें लागते, व हे दोषपित्त बाहेर टाकून देण्याची जबाबदारी ग्रहणी अथवा नाभी या अवयवावरच पडते. असे दोष पित्ताचे शोधन विकृतावस्थेंतही याच अवयवाकडून करून घ्यावयाचे असते. या सर्व कारणास्तव नाभी हे मुख्य पित्तस्थान समजलें जातें.

वसंत मिश्रण
सुवर्णयुक्त टॉनिक
४० गोळ्या किंमत ४ रुपये
पोस्टानें मागवा.

आयुर्वेदांच्या क्षेत्रांत अद्वितीय
अ शा श क्ति शा ली
'अरविंद आयुर्वेदीय इन्जेकशन्स' चा
उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा
व यश मिळवा. शक्ति व शुद्धता
याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते.
सूचिपत्र मागवा.
सचित्र आयुर्वेदिक इंजेकशन-चिकित्सा
मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.
व्यवस्थापकः– अरविंद केमिकल वर्क्स,
छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय शल्य-तंत्राचें वैभव.

: लेखक :

वैद्य दि. वि. साठे, आयुर्वेदाचार्य.

अथ शोफ (सूज) निदानम् ।

शोफ म्हणजे सूज. शोफः, श्वयथुः, शोथः असे सुजेचे समानार्थी शब्द आहेत. सूज ही त्वचेवर व्यक्त होते. या सुजेचे सामान्यतः दोन प्रकार होतात. सर्व देह-व्यापी, किंवा शरीराचा बराचसा भाग व्यापणारी व पिकून न फुटणारी (अपाकी) अशी एक प्रकारची सूज होय. दुसरी म्हणजे सामान्यतः शरीराचा एक भाग व्यापणारी व पिकून फुटणारी अशी होय. पहिल्या प्रकारची सूज ही औषधोपचारानी साध्य असते, तर दुसऱ्या प्रकारची सूज म्हणजे शस्त्रानें वा लेपादिकांनीं प्रायः फोडून बरी करण्याची असते; शल्यतंत्रामध्यें दुसऱ्या प्रकारच्या सुजेचाच विचार करावयाचा आहे.

शोफांचे प्रकार.

शोफांचे दोन प्रकार होतात. एक म्हणजे निज शोफ व दुसरा आगंतु शोफ.

निजशोफांची कारणें:

अनिष्ट, दुष्ट आहार हें या शोफाचें प्रधान कारण आहे. अति लवण, तीक्ष्ण व ऊष्ण पदार्थांचें सेवन यानें पित्तप्रकोप होतो; माहीष, वराह, असे गुरु व अति स्निग्ध व जड मांस भक्षण, यानें कफ दुष्ट होतो; अति व्यायाम, श्रम, जागरण या क्रियांनीं वायु दुष्ट होतो. अशा तऱ्हेनें त्रिदोष व रक्तधातु यांची दुष्टी करणाऱ्या आहार विहाराचें सेवन हें शोफ निर्मितीचें मूलभूत कारण होय. या एवढ्या कारणांनीं निज शोफ होईलच असे नाहीं; तर या बरोबर रुग्णाचें व्याधिप्रत्यनीक बलही कमी झालेले असावे लागतें; आधीच धातूंचें कमी बल असणें, वा अन्य व्याधींनीं शारीरदौर्बल्य आलेले असणें अशा स्थितींत माणसाचें प्रत्यनीक बल कमी होतें. शारीरबल विशेषतः सिरागत व मांसगत कमी झालेलें असावें, म्हणजे शोफ निर्माण होतो. याचें स्वरूप वाग्भटकारांनीं थोडक्यांत पुढीलप्रमाणें वर्णित केले आहे.

" पित्त रक्तकफान् वायुः दुष्टः दुष्टान् बहिः सिराः
नीत्वा रुद्धगतिस्तैः कुर्यात् त्वक्मांससंश्रयम्
उत्सेधं संहतं शोफं..... वा. नि. अ. १३। २१

शोफसंप्राप्तींमध्यें वायुची दुष्टी व इतर दोषांची दुष्टी अत्यावश्यक असतें. प्रकुपित वायु इतर दोषांना व स्वतःला बहिर्मार्गांत नेतो; व ज्या ठिकाणीं मांसामध्यें व सिरामध्यें ख वैगुण्य आले असेल, तेथें या पदार्थांचा स्थानसंश्रय करतो. स्थानसंश्रयी पदार्थ त्वक् व मांस यांमध्यें राहतात, तेथून जात नाहींत आणि अशा तऱ्हेनें अन्तर्शल्याची निर्मिती होते; त्यालाच आपण शोफ, सूज असे म्हणतों.

आगन्तु शोफः–

याच्या कारणांमध्यें शरिरांत प्रथम दौर्बल्य असावेंच लागतें असें नाहीं. सुश्रुतांनीं संघातबलप्रवृत्त असा व्याधींचा प्रकार केलेला आहे; संघात-बल-प्रवृत्त म्हणजे प्रहारशक्तजात होय; हें प्रहार विविधस्वरूपानें देहावर घडतात. ते अटळ असतातच असें नाहीं; शस्त्र-निपात किंवा प्रपतन, किंवा काठी लागणें, झाडावरून पडणें या कारणांनीं शरीराच्या ज्या भागावर आघात होईल त्याठिकाणीं सूज, शोफ येईल. अत्यंत शीत वायु किंवा समुद्रवायु अगर अत्यंत ऊष्ण वायूच्या, त्वचेवर होणाऱ्या स्पर्शानें सूज येऊं शकते, तीक्ष्ण ऊष्ण वीर्याची द्रव्यें शरीराला लागणें उदा. विंच्याचें तैलानें कांहींना लगेच शोफ येतो. सविष प्राण्यांचें स्वेद, मल, मूत्र यांचा त्वचेशीं संपर्क किंवा इतर सविषवृक्ष, औषधी यांचे स्पर्शनानें त्वचेवर शोफ येतो.

वाग्भटकारांनीं " द्विधा वा निजमागंतु "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा स्पष्ट उल्लेख केला आहे, व आंगतु शोफ येतांना पुढीलप्रमाणें कारणपरंपरा स्पष्टपणें सांगितली आहे;

" अभिघातेन शस्त्रादिच्छेदभेदक्षतादिभिः ।
हिमानिलोदध्यनिलैर्भल्लातकृपिकच्छुजैः ॥
रसैः शूकैश्च संस्पर्शाच्छ्वयथुः स्यात् विसर्पवान्
भृशोष्णा लोहिताभासः प्रायशः पित्तलक्षणः ॥

विष शोफाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे;

विषजः सविषप्राणि परिसर्पगमूत्रणात्.... ....
विषवृक्षानिल स्पर्शाद्वर योगावचूर्णनात्
मृदुश्चलोऽवलंबी च शीघ्रो दाहरुजाकरः
वा. नि. अ. १३ सू. ३८ ते ४१

निज व आंगतु शोफामध्यें घडणारी शारीर क्रिया व त्यांची लक्षणें:-

संप्राप्तिमध्यें संचय, प्रकोप, प्रसर व स्थानसंश्रय या अंगांचा निजशोफांत मी विस्तारभयास्तव ओझरता उल्लेख केला आहे; आगंतु शोफामध्यें ज्या स्थानी आगंतु आघात असेल त्या स्थानीं एकदम स्थानसंश्रय ही अवस्था आलेली असते; अशा रितीनें दुष्ट द्रव्यें ही त्वक् मांसस्थायी होऊन त्वचेवर आकृति दर्शवूं लागलीं व सार्वदेहिक लक्षणें दिसूं लागली कीं, शोफ आला असें आपण म्हणतों.

शोफाचें लक्षण सुश्रुतांनीं पुढीलप्रमाणें केले आहे.

पृथु ग्रथितः समो विषमो वा त्वङ्मांस स्थायी दोष संघातः शरीर एकदेशोत्थितः शोफ इति उच्यते । सु. सू. १७।३.

शोफगत स्थानसंश्रयी द्रव्यें शरीराच्या एकदेशावर विशिष्ट आकार दर्शवूं लागतात त्याला शोफ असें म्हणावें; पुढें या शोफाचा " व्रणानां पूर्वलक्षणम् " पाक होऊन व्रणीभाव होऊं शकतो.

शोफाचें भवितव्य:-

निज शोफामध्यें शरीरांतलेच पदार्थ हे स्थानसंश्रयानें असतात. तें शरीरांत असतात पण शरीररूप झालेले नसतात; हे पदार्थ शल्यरूप होतात. अशा पदार्थांना शरीरांत दोन मार्ग असतात. एक म्हणजे शरीररूप होणें व दुसरा मार्ग म्हणजे शरीराच्या बाहेर निघून जाणें.शरीर बलवान असेल व शोफ द्रव्यें कमी बलवान असतील तर शरीर त्यांना पहिला मार्ग दाखवतें. व जर दुष्ट शोफद्रव्यें तीव्र बलवान असतील तर व त्यामानानें शारीरबल कमी असेल अशा वेळीं या द्रव्यांना शरीराबाहेर टाकलें जाते. किंवा हीं द्रव्यें शरीरांत आणखीही विकृती निर्माण करूं शकतात.

आंगतु शोफामध्यें बाह्य आघातामुळें शरीरांतल्या धातूंचें विचूर्णन होतें, व ही द्रव्यें शरीरांत असूनहो शरीररूप (धातुरूप) असत नाहींत; म्हणजेच ती शल्यरूप असतात. विषादिकांमुळें विषांच्या आशुकारी व धातुविनाश करणें या गुणांमुळें शरीरांतले पदार्थ मृत झालेले व शल्यरूप झालेले असतात. सारांश निज शोफांत व आंगतु शोफांत स्थानसंश्रयाचे वेळी शरीरांत दुष्ट पदार्थ शल्यरूप असतात आणि या पदार्थांशीं शरीराला क्रिया कराव्या लागतात.

शरीर हें स्वतः सर्वांत मोठें चिकित्सक आहे!

शरीर आपल्या सर्व बलानिशीं या शल्यरूप पदार्थांशीं सामना करतें. या संघर्षांत शरीराचीही हानी होते. शरीराचें ध्येय निजशोफगत दुष्ट दोषांचें व अल्प बल आगंतु दोषांचें निर्दुष्टीकरण असें असतें. दुष्ट दोष अगर आगंतु पदार्थ जास्त बलवान असतां, त्यांनीं शरीराची हानी कमीत कमी करावी, व त्यांनीं शरीरा बाहेर निघून जावें, असे दुसरे धोरणी ध्येय शरीराचें असतें. शोफ हें मूलतः सान्निपातिक असतात. या संघर्षांत शरीर आपल्या त्रिदोषांच्या शक्तीची मदत घेऊन कार्याला लागतें. वायुच्या अनुकूलतेनें शरीरांतलें त्रिदोष रक्तधातूमधून शोफस्थानीं येतात.

" सम्यग् गत्याच धातूनाम् " या सूत्राप्रमाणें वायू रक्त धातूची गती शोफ स्थानीं करतो. यानंतर शरीर स्थानिक दुष्ट पदार्थावर प्रथम शमनाची क्रिया करून पाहूं लागतें. शमन म्हणजे " विषमानां समीकरणम् " दुष्ट दोषांचें निर्दुष्टीकरण करणें; या क्रियेंत पाचन क्रिया महत्वाची असते. ही पाचनक्रिया पित्त या दोषाकडून केली जाते. प्रथम या दोषांचें स्नेहन शरीरांतल्या कफ या स्निग्ध पदार्थांकडून होतें. स्थानसंश्रयी पदार्थ स्नेहनानें क्लिन्न होतात, धातूपासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते थोडे अलग होतात; पित्तदोषाचा अल्प स्निग्ध गुणही स्नेहनाला उपयोगी पडतो. स्नेहनानंतर स्वेदन कर्म पित्त दोषाकडून होतें; पित्ताच्या आग्नेय गुणामुळें हें कर्म घडतें. याप्रमाणें स्वेदनानें दुष्ट पदार्थ द्रव होतात; यानंतर दुष्ट पदार्थ अल्पबल असल्यास त्यांचें निर्ष्ठुटीकरण होतें, व त्यांचेपासून निर्माण झालेलें शारीरसम घटक शरीरामध्यें जातात व या क्रियेंत ज्या मलांची निर्मिती होतें, (कीं जें पदार्थ शरीराशीं सम होऊ शकत नाहींत) त्यांना अन्नवह स्रोतसांकडे नेले जाऊन पुरीष, मूत्र, अगर मुखावाटें हें पदार्थ बाहेर काढून टाकले जातात. म्हणजेच त्यांचें शोधन होतें; असे शरीरांत झाले असतां शोफ हा निवृत्त झाला, शोफ विलयन पावला असें म्हटले जातें. ही शारीरक्रिया सर्वांत जास्त फायदेशीर, जास्तीत जास्त दुष्ट पदार्थांपासून चांगल्या पदार्थाची निर्मिती व कमीत कमी शरीरविनाश अशा अर्थाची सूचक असते.

नेहमीच अशा प्रकारें शोफ निवृत्त होतो असें नाहीं; कारण शरीरबळ कमी असले अगर बलयुक्त असूनही निज दुष्ट पदार्थ, अगर बाह्य आगंतु हेतु हें बलवत्तर असतां, शरीराला शमन कर्म करतां येत नाहीं. अशा वेळीं शरीर त्या दुष्ट पदार्थावर " शरीरसम होतील " असा त्या पदार्थांविषयीं लोभ न धरतां, हें पदार्थ शरीरांतून मलमार्गानीं व मुख्यतः त्याच स्थानांतून म्हणजे त्वचेंतून कसे बाहेर पडतील याची खटपट करतें; अर्थात या क्रियेंत शरीरविनाश हा जास्त असतो. पण शरीराच्या व्रणांतून हे पदार्थ बाहेर पडल्यानें, इतर शरीराची दुष्टी बऱ्याच प्रमाणांत कमी करतां येतें. पुढें शरीर, निर्माण झालेला व्रणही भरून शरीराचा काढते, व अशा तऱ्हेनें शरीरांतल्या आगंतु शल्याविरुद्ध प्रयत्न पूर्ण होतो.

वरील विवेचनासाठीं शोफाची आमादि अवस्थेंतली लक्षणें पाहूं; शोफ हा आमावस्था, पच्यमानावस्था, व पक्वावस्था अशा अवस्थांतून जातो.

शोफाच्या पाचनादि अवस्था आणण्यास व शोफ पक्व करण्यास त्रिदोष कारणीभूत असतात असा स्पष्ट उल्लेख सुश्रुतांनीं पुढीलप्रमाणें केला आहे:

" वाताद्दते नास्ति रुजा न पाकः
पित्ताद्दते नास्ति कफात् च पूयः
तस्मात् समस्तान् परिपाककाले
पचन्ति शोफास्त्रय एव दोषाः ॥

सु. सू. १७।१८.

शोफामध्यें असणारी रुजा वातजनित, असते. त्यांत होणारा पाक हा पित्तानें होतो व पूय निर्मितीला प्रधान कारण कफ दोष असतो, व सर्व त्रिदोष हे शोफाच्या-पाचनांत कारणीभूत होतात. असा वरील सूत्रांचा अर्थ आहे.

वाग्भटकारांनीं रक्त धातूचा आणखी उल्लेख पुढील प्रमाणें केला आहे:

" रागः रक्तात्; पाकः स्यात् अतो दोषैः सशोणितैः ।

वा. सू. अ. २९।७.

शोफामधला ताम्रवर्ण हा रक्तामुळें असतो. व म्हणून रक्तधातूही पचनामध्यें भाग घेतो असें स्पष्ट होते.

सारांश शोफपाचनाचे वेळीं तिन्ही दोष व रक्त धातू शोफस्थानीं येतात. शोफाच्या पच्यमान अवस्थेंत पित्ताची व पक्वावस्थेंत कफाची आधिक्यानें लक्षणें शोफस्थानीं व सार्वदैहिक दिसतात.

शोफाच्या आमावस्थेंतली लक्षणें:-

" शोफोऽल्पोष्ण रुक्सामः सवर्णः कठिनः स्थिरः । " वा. सू. २९।२

अल्पः-

आकृतीनें, प्रमाणानें शोफ या या अवस्थेंत लहान असतो; स्थानसंश्रयी द्रव्यें व थोडी शारीरद्रव्यें एवढींच तेथें असतात त्यामुळें आकृती लहान असते.

अल्प ऊष्णः-

हें लक्षण शोफाचें स्पर्शन केलें असतां समजतें. इतर त्वचेपेक्षां हा ऊष्ण लागतो. पण फार कढत असत नाहीं. शरीरांतलें पित्त थोड्या प्रमाणांत आल्याचें हें लक्षण आहे. वायू पित्ताला शोफस्थानीं आणतो. व उष्ण गुणामुळें, व तेथें होणाऱ्या अल्प पाचनक्रियेमुळें, त्वचा ऊष्ण लागते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अल्परुक्:-

हें वायूचें लक्षण आहे; वायु त्या ठिकाणीं येत आहे याचें दर्शक आहे; वायूनें इतर दोष त्या स्थानीं येण्याच्या क्रियेमुळें व शोफ गत असणाऱ्या दुष्ट द्रव्यामुळें अल्परुक् असे लक्षण मिळतें.

079434

सवर्णः-

त्वचेचा वर्ण इतर त्वचेच्या वर्णाप्रमाणें असणें. अजून त्वचाही शोफयुक्त झालेली असत नाहीं. त्वचेवर रक्त धातू अगर पित्तदोष याचा परिणाम न झाल्याचें तें द्योतक आहे.

0243

कठिण व स्थिरः-

स्पर्शनाला स्थानसंश्रयी पदार्थ स्थिर व लीन असल्यानें सूज ही कठीण व पक्कावस्थेंत जशी हलते तशी हालत नाहीं म्हणजे स्थिर असतें.

पच्यमानावस्थाः-

आमावस्थेंत होणारी लक्षणें पाहिली. त्या अवस्थेंत वर विवेचन केल्याप्रमाणें जर शारीरबल अधीक झालें तर शोफ हा निवृत्त होतो; परंतु स्थानी दुष्ट पदार्थ जास्त बलवान असतां शोफ हा निवृत्त होत नाहीं. व त्यानंतर शरीर या पदार्थांना पचवून सुटे करून शरीराच्या बाहेर काढून टाकणें, या मार्गाला लागते. ही अवस्था म्हणजेच शोफाची पच्यमानावस्था होय; या अवस्थेंत शरीर आपले बल पणाला लावते; व स्थानी द्रव्यांचें पाचन व्हावें म्हणून खटपट करते. या अवस्थेंत होणारी लक्षणें सुश्रुतानें व वाग्भटानें पुढीलप्रमाणें दिली आहेत; यांत द्विरुक्ति असली तरी वर्णनाचा विलास पहाण्याजोगा आहे, व एकंदर शारीरिक व स्थानिक लक्षणें काय काय होतात हें उत्तम रीतीनें सूत्रित केलें आहे.

" सूचीभिरिव निस्तुद्यते, दश्यत इव पिपीलिकाभिस्ताभिश्च संसर्प्यत इव छिद्यत शस्त्रेण इव भिद्यत इव शक्तिभिः ताड्यत इव दण्डेन, पीड्यत इव पाणिना घट्यत इव च अंगुल्या, दह्यते पच्यत इव अग्निक्षाराभ्यां ओष चोष परिदाहाश्च भवन्ति, वृश्चिकविद्ध इव च स्थानासनशयनेषु न शान्तिमुपैति । अध्मातवस्तिरिव आततश्च शोफो भवति, त्वक् वैवर्ण्य, शोफाभिवृद्धिः ज्वर दाहपिपासा, भक्ताऽरुचिश्च पच्यमानलिङ्गम् । "

सु. सू. १७ सूत्र ५

पच्यमानो विवणस्तु रागा बस्तिरिवाततः
स्फुटतीव सनिस्तोदः सांगमर्द विजृंभिकः ।
संरंभारुचिदाहोषा तृड् ज्वरानिद्रतान्वितः
स्त्यानं विष्यदयत्याजं व्रणवत् स्पर्शनासहः ।

वा. सू. २९।३·४

वैवर्ण्यः-

म्हणजे त्वचेचा वर्ण बदलून अन्य वर्ण येणें, आमावस्थेत त्वक्सम वर्ण असतो, पण या अवस्थेंत वैवर्ण्य त्वचेला येते; वैवर्ण्य दोषानुरूप असते, व सर्वांना सामान्य असा वर्ण रक्त असतो. हा तांबडा वर्ण रक्त धातूचा असतो. वायु शोफस्थानीं अधीक रक्तधातू आणतो व या रक्तांतून शारीर दोष विशेषतः पित्त शोफपाचनाची क्रिया करूं लागतात; वायूच्या शोफस्थानगत गतीमुळें शोफाचे ठिकाणीं ठणका (ठुसठुसणें) हें लक्षण येते.

विविध वेदनाः-

शोफस्थानीं असणारे पदार्थ व शारीर दोष यांचें अस्तित्वामुळें शोफ आकृति वाढतें, त्वचा मांस अधीक ताणली जातात, व शोफाचें ठिकाणीं " बस्ति इव आततः " म्हणजे फुगलेल्या बस्तीप्रमाणें रूप दिसते. स्थानिक असणाऱ्या पित्ताच्या तीक्ष्णादि गुणांमुळें टोचल्याप्रमाणें, मुंग्या चावल्याप्रमाणें वेदना होतात. पित्ताच्या आग्नेय गुणामुळें भाजल्याप्रमाणें वेदना होतात.

व्रणवत् स्पर्शनाऽक्षमः-

शोफस्थान अत्यंत हळुवार होते. त्या ठिकाणीं स्पर्श सोसत नाहीं. पीडन तर अत्यंत दुःखदायक असते.

सार्वदेहिक लक्षणेः-

ज्वरः- शरीरांत पाचनक्रिया चालल्याचें हें निदर्शक

(पान ९ वर पहा.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो

खोकल्यावरील अचूक उपाय

आ यु र्वे दा श्र म फा र्म सी लि मि टे ड,
अहमदनगर.

योजना यशस्वी करा
बापू बलशाली करा

EVEREST APK.-54-3 MAR

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No. B. 5225

07434

अनुभवसिद्ध

अर्कशाला औषधें

युटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन

रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण

जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन

बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन

मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृद्धिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लिं., सातारा

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे, यांनीं महाराष्ट्रमित्र छापखाना, ७७ शुक्रवार पेठ, सातारा, येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा यथ प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Complete
1998-2008

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar